# १

# घटक १ : आंतरराष्ट्रीय रचना

**घटक संरचनाः**

१.० उद्दिष्टे
१.१ प्रास्ताविक
१.२ विषय विवेचन
 १.२.१ शीतयुद्ध : अर्थ, स्वरुप व वैशिष्टे
 १.२.२ शीतयुद्धाची उत्पत्ती व विकास
 १.२.३ शिथिलतेचे धोरण व घडामोडी
 १.२.४ पूर्व युरोपातील क्रांतीची कारणे व सोव्हिएट रशियाची पतनाची कारणे
 १.२.५ शीतयुद्ध समाप्ती व प्रभाव
 १.२.६ नवशीतयुद्ध
१.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ
१.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे
१.५ सारांश
१.६ सरावासाठी स्वाध्याय
१.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

## १.० उद्दिष्टे

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर, आपल्याला

- शीतयुद्धाचा अर्थ, स्वरुप, उत्पत्ती व विकास तसेच शीतयुद्ध समाप्तीची कारणे स्पष्ट करता येईल.
- तणाव शिथिलतेचा अर्थ व शीतयुद्धातील त्याचे महत्त्व स्पष्ट करता येईल.
- पूर्व युरोपीय देशांतील साम्यवाद विरोधी क्रांतीचे स्वरुप स्पष्ट करता येईल.
- सोव्हिएट रशियाच्या पतनाची व शितयुद्ध संपण्याची कारणे सांगता येतील. तसेच नवीन शीतयुद्धाचे स्वरुप व कारणे स्पष्ट करता येतील.

## १.१ प्रास्ताविक

शीतयुद्धाची शक्यता द्वितीय महायुद्धानंतर इंग्लडचे पंतप्रधान विस्टन चर्चिल यांनी ०५ मार्च १९४६ रोजी दिलेल्या प्रसिद्ध 'फुल्टन' भाषणात वर्तविली होती. दुसऱ्या जागतिक महायुद्धानंतरचा म्हणजेच सन १९४५ ते सन १९९० अशा पंचेचाळीस वर्षाचा कालावधी आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या इतिहासात शीतयुद्धाचा कालखंड म्हणून ओळखला जातो. शीतयुद्धाचा प्रारंभ, अमेरिका व सोव्हिएट रशिया यांच्यातील तणाव शैथिल्याचा प्रयत्न, पूर्व युरोपातील साम्यवादी राजवटी विरोधातील चळवळ, सोव्हिएट रशियाच्या पतनानंतर शीतयुद्ध समाप्ती तसेच नव्या शीतयुद्धाची नांदी इत्यादी स्मरणीय घटनांनी हा कालखंड आंतरराष्ट्रीय राजकारणाला प्रभावित करणारा ठरला.

## १.२ विषय विवेचन

### १.२.१ शीतयुद्ध : अर्थ, स्वरुप व वैशिष्टे

शीतयुद्ध एक अशी स्थिती होय ज्या मध्ये पूर्णकालीन शांती पण नसते व वास्तविक युद्ध पण होत नाही. शांती व युद्ध यामधील अस्थिरता असते. शीतयुद्ध अशी स्थिती असते जी युद्धाची पहिली पायरी होय व ज्यामध्ये युद्धाची वातावरण निर्मिती केली जाते. अमेरिकन विद्वान हॉल व फ्रेंच विद्वान आंद्रे कोन्टेन यांच्या नुसार आंतरराष्ट्रीय राजकारणात शीतयुद्धाचा प्रारंभ १९१७ च्या बोल्शेविक क्रांती पासून झाला, ज्यामध्ये राज्याच्या शक्तीचे नवे स्वरुप तसेच सामाजिक व आर्थिक विकासचा नव वैकल्पिक कार्यक्रम समोर आला.

नामवंत विचारवंतांनी शीतयुद्धाची संकल्पना परिभाषित करण्याचा प्रयत्न केला. वॉल्टर लिपमेन यांनी सर्वप्रथम 'शीतयुद्ध' हा शब्दप्रयोग प्रचलित केला. ऑक्सफोर्ड इंग्रजी डिक्शनरी नुसार शीतयुद्ध म्हणजे 'हिंसेचा वापर न करता धमकी, अडवणूक व प्रसाराच्या माध्यमातून कटूता व कलहाची स्थिती उत्पन्न करणे होय. तर पं. जवाहरलाल नेहरु यांनी शीतयुद्ध असे युद्ध होय जे युद्धक्षेत्रात नव्हे तर मनुष्याच्या डोक्यात लढले जाते असे म्हटले. शीतयुद्धात प्रत्यक्ष युद्ध कधीच होत नाही. तर विशिष्ट विचार, मूल्ये, संस्कृती, जीवनपद्धती हीच जगात श्रेष्ट असून इतरांनी त्याचा अवलंब करावा यासाठी जाणीवपूर्वक प्रचार केला जातो. तेव्हा त्याला मानसशास्त्रीय युद्ध म्हणून संबोधले जाते.

दुसऱ्या महायुद्धानंतर अमेरिका आणि सोव्हिएट रशिया या दोन जागतिक महासत्ता म्हणून उदय झाला. जागतिक राजकारणात त्या दोन्ही परस्पराविरोधी विचारसरणीच्या पुरस्कर्त्या होत्या. एकीकडे अमेरिका भांडवलशाही, लोकशाही, मुक्त अर्थव्यवस्था, व्यक्तिस्वातंत्र ह्या विचारांची पुरस्कर्ता आहे. तर सोव्हिएट रशिया साम्यवादी, एकपक्षीय, बंदिस्त अर्थव्यवस्थेची पुरस्कर्ता होती. या दोन्ही महासत्तामधील तीव्र संघर्ष, परस्परसंशय, भीती, शस्त्रस्पर्धा, राजनैतिक पातळीवर शह-काटशह, दावे-प्रतिदावे, लष्करी व आर्थिक प्रदर्शन, आण्विक स्पर्धा इत्यादी मधून जी युद्धसदृश्य वातावरण निर्मिती झाली ती दर्शविण्यासाठी शीतयुद्ध हा शब्दप्रयोग वापरला गेला. शीतयुद्धात संपर्ण जागतिक राजकारणाचे ध्रुवीकरण झाले होते. प्रत्येक जागतिक संघर्षाला शीतयुद्धाची किनार लाभलेली होती. पूर्व-पश्चिम अशी जगाची सरळ विभागणी झालेली होती. दुसऱ्या विश्वयुद्धाच्या समाप्तीनंतर शीतयुद्धाची सुरवात झाली. ऑगस्ट १९४५ मध्ये अमेरिकेने जपानच्या हिरोशिमा व नागासाकी या शहरावर अणूबॉब टाकले. उध्वस्त झालेल्या जपानने शरणागती पत्करली व दुसऱ्या विश्वयुद्धाची समाप्ती झाली. अणूबॉब फेकण्यामागे अमेरिकेला आपल्या लष्करी सामर्थ्याची ताकत करुन देणे व जागतिक मंचावर अमेरिका हिच एकमेव महासत्ता होय यांची जाणीव सोव्हिएट रशियाला करुन देणे ही भूमिका होती. १९४७ साली जर्मनीतील संघर्षाने अमेरिका सावध झाली. सोविएट रशियाच्या पूर्व यूरोपातील वर्चस्वाला शह देण्यासाठी तसेच पश्चिम युरोपला त्याच्या प्रभावापासून दूर ठेवण्यासाठी व सोविएट रशियाचा वाढता प्रभाव मर्यादित किंवा नियंत्रित ठेवण्यासाठी अमेरिकेने जे धोरण स्विकारले ते साम्यवादाचे प्रतिरोधन धोरण (Containment Policy ) म्हणून ओळखले जाते.

शीतयुद्ध काळात अमेरिका व सोविएट रशिया या दोन्ही महाशक्ती मध्ये प्रभाव निर्माण करण्याची स्पर्धा लागलेली होती. इतर देशांपुढे एका महाशक्तीचे वर्चस्व स्विकारणे व दुसऱ्या महाशक्तीच्या प्रभावा पासून स्वतःला वाचविणे हाच एक पर्याय उरलेला होता. बहुतांश देशांनी आपले राष्ट्रीय हित व आर्थिक हितसंबंध जोपासले होते. दोन महासत्तांच्या गटाला साधारण पणे पश्चिमी गट व पूर्व गट असे संबोधिल्या गेले. कारण युरोपीय देशांमधील पूर्व युरोपीयन देश सोविएट रशियाच्या प्रभावाखाली तर पश्चिम युरोपियन देश अमेरिकेच्या प्रभावाखाली होते. यातून या ध्रुवीकरणाला पश्चिम-पूर्व संघर्ष असेही नाव दिल्या गेले. अमेरिकने पश्चिम गटाला एका संघटनेत परावर्तित करुन १९४९ मध्ये उत्तर अटलांटिक संधि संघटनेची (नाटो) स्थापना केली. यामध्ये १२ देश सहभागी झाले. संघटनेच्या कोणत्याही सदस्य देशावर आक्रमण झाल्यास ते सर्व देशावरील आक्रमण समजून प्रत्येक देश एकमेकाला मदत करेल असे संघटनेचे घोषित केले. याला प्रत्युत्तर म्हणून सोविएट रशियाने पूर्व युरोपीय

देशांचे गठबंधन करुन त्याला 'वॉर्सा संधी' असे नाव दिले. वार्सा संधीचे प्रमुख उद्दिष्ट म्हणजे नाटो संघटनेतील देशांचा मुकाबला करणे हे होते.

संपूर्ण जगाला दोन गटात विभाजीत करुन स्वतःच्या सामर्थ्याचे प्रदर्शन करण्यामागे अमेरिका व सोविएट रशिया यांचा अंतस्थ हेतू केवळ प्रभाव निर्माण करणे नसून आपल्या हितार्थ छोट्या राष्ट्रांचा वापर खालील कारणांसाठी करणे हा सुद्धा होता.

१. या देशांच्या नैसर्गिक संपत्तीवर जसे तेल, खनिज पदार्थ इ. नियंत्रण ठेवणे.
२. या देशांच्या भू-क्षेत्रावर नियंत्रण ठेवणे. लष्करी व शस्त्रांची वाहतूक करण्यासाठी त्याचा वापर करणे.
३. एकमेकांच्या हालचालींवर नियंत्रण व लक्ष्य ठेवण्याच्य दृष्टीने संवेदनशील व सामारिक दृष्ट्या महत्त्वाचे लष्करी ठाणे उभरणे.
४. याबदल्यात देशांना आर्थिक मदत करणे.

## १.२.२ शीतयुद्धाची उत्पत्ती व विकास

आंतरराष्ट्रीय तज्ज्ञांमध्ये शीतयुद्धाच्या उत्पत्तीविषयक तिथी मध्ये एकवाक्यता आढळून येत नाही. काही तज्ज्ञांनी १९१७ ची बोल्शेविक क्रांती प्रारंभ तिथी मानली. डेस्मंड डोमेली यानी त्यांच्या 'स्ट्रगल फॉर दि वर्ल्ड' या पुस्तकात शीतयुद्धाच्या उत्पत्तीचा प्रारंभ बिंदू १९ व्या शतकात मध्य आशियातील ब्रिटन व रशिया मधील साम्राज्यवादी संघर्ष होय असे प्रतिपादन केले. फेड्रिक शुमन यानी 'दि कोल्ड वॉरः रेट्रोस्पेक्ट ॲड प्रॉस्पेक्ट' या पुस्तकात १९४५ साल किंवा द्वितीय युद्ध नंतरचा काळ हा शीतयुद्धाचा प्रारंभकाळ नसून १९१७ मधील द्वितीय रशियन क्रांती पासून शीतयुद्धास प्रारंभ झाला असे प्रतिपादन केले. या क्रांतीच्या अवघ्या दहा महिन्यानंतर सोव्हिएट संघ व पश्चिमी देशांमध्ये संघर्ष निर्माण झाला. हा संघर्ष शीत स्वरुपाचा नव्हता तर उष्ण प्रकृतीचा होता. या संघर्षामुळे मोठ्या प्रमाणात मानवहानी व विध्वंस झाला. भय, संशय व घृणा कि ज्याने १९४० व १९५० च्या दशकातील शीतयुद्धास खतपाणी घातले त्याची उत्पत्ती १९१८-१९२१ च्या पूर्व-पश्चिम संघर्षातून झाली.

१९१७ च्या बोल्शेविक क्रांतीनंतर रशिया जागतिक स्तरावर एक सशक्त सत्ता म्हणून उदयास आली. प्रारंभी पाश्चात्य देशांनी रशियातील बोल्शेविक शासनाला मान्यता देण्यास नकार दिला. द्वितीय महायुद्धाच्या आधी रशियाने पाश्चात्य राष्ट्रांसोबत सुरक्षा व निःशस्त्रीकरणा संदर्भात एकत्र येण्याच्या अनेक संधी गमावल्या. जर्मनी संदर्भात अमेरिका, ब्रिटन व फ्रांस ने आखलेल्या धोरणाला रशियाने पाठिंबा दिला

नाही. शीतयुद्धाची बीजे अश्या छोट्या संघर्षातून निर्माण झाली. द्वितीय महायुद्धाच्या पार्श्वभूमीवर रशियाने पाश्चात्य राष्ट्रांना सहकार्य करण्यास मदत केली. पण याधीच दोन्ही बाजूकडील परस्पर विश्वास व संशयाच्या वातावरणात कमीपणा आला होता. सुरक्षिततेच्या कारणावरुन जर्मनीचे विभाजन करुन पूर्व युरोपीय देशांसाठी तटस्थ प्रदेश निर्माण करणे हा सोव्हिएट रशियाचा हेतू होता तर या भागात पूर्ववत स्थिती आणून संभाव्य विध्वसांला रोखणे हे अमेरिकेचे उद्दिष्टे होते. सोव्हिएट रशियाने काळा समुद्र व्यवसायासाठी खुले करण्यास तसेच डेब्यूनी नदीला आतंरराष्ट्रीय स्वरूप देण्यास नकार दिला कारण यामुळे अमेरिकेच्या या भागातील व्यावसायिक प्रवेश सुकर झाला असता. दोन्ही राष्ट्रांमधील अविश्वासाचे कारण शीतयुद्धास कारणीभूत ठरले.

## शीतयुद्धाच्या उत्पत्तीमागील काही प्रमुख कारणे पुढीलप्रमाणे :

१. १९४५ मध्ये रुझवेल्ट, चर्चिल व स्टॅलिन यांच्यामध्ये याल्टा येथील संमलेनात एक समझौता झाला. त्यानुसार पोलंड येथे प्रतिनिधी शासनाला मान्यता देण्यात सहमती झाली. पण द्वितीय महायुद्धा समाप्तीनंतर स्टॅलिन यांनी सहमती विरुद्ध जाऊन पोलंड मधील आपल्या विचार समर्थक शासनाला सहकार्य केले. अमेरिका व ब्रिटनच्या पर्यवेक्षकांना पोलंड प्रवेशास अनुमती नाकारली. लोकशाही समर्थक नेत्यांना अटक करण्यात आली. समझौत्याच्या विरुद्ध जाऊन हंगेरी, रुमानिया, चेकोस्लोवाकिया व बुल्गारिया या देशांमध्ये सोविएट संघाने आपला प्रभाव वाढविण्यास प्रारंभ केला. इतकेच नव्हे तर चीनच्या साम्यवादी पक्षाला अप्रत्यक्षपणे सहाय्यता पोहचविण्याचा प्रयत्न केला. सोव्हिएट रशियाच्या या सर्व गतिविधी याल्टा कराराच्या उल्लंघन करणाऱ्या ठरल्या. परिणाम अविश्वास व वैमनस्याची भावना निर्माण होऊन शीतयुद्धाचे एक कारण बनले.

२. दुसरे प्रमुख कारण म्हणजे सोव्हिएट संघाचे शक्तीशाली राष्ट्र म्हणून उदयास येणे. १९१७ च्या यशस्वी समाजवादी क्रांतीचा प्रभाव इतर राष्ट्रांवर पडू लागला. द्वितीय महायुद्ध दरम्यान सोव्हिएट रशियाच्या शक्तिशाली प्रदर्शनाने पश्चिमी राष्ट्रांमध्ये रशिया विरुद्ध ईर्षा निर्माण झाली. आपल्या शक्तीच्या आधारावर सोव्हिएट रशिया संपूर्ण विश्वात आपल्या साम्यवादी विचारसरणीचा प्रसार करेल हि भीती पश्चिमी राष्ट्रांना वाटत होती. द्वितीय महायुद्धानंतर सोव्हिएट रशिया विरोधी नीतीची अंमलबजावणी करण्यास सुरवात झाली. पश्चिमी राष्ट्रांना एकत्रित आणण्याच्या प्रयत्नाला गती प्राप्त झाली. या सर्व गतिविधी शीतयुद्धाची पार्श्वभूमी विकसित करण्यास कारणीभूत ठरल्या.

३. द्वितीय महायुद्ध दरम्यान जर्मनीच्या आत्मसमर्पणानंतर सहा महिन्याच्या आंत इराण मधून आपले लष्कर माघारी बोलविण्यात पश्चिमी राष्ट्र व सोव्हिएट रशियात सहमती झाली. युद्ध समाप्ती नंतर पश्चिमी राष्ट्रांनी आपला शब्द पाळला व दक्षिण इराण मधून आपले लष्कर हटविले. पण सोव्हिएट संघाने इराणवर दबाव आणून दिर्घकालीन तेल करार केला. यामुळे पश्चिमी राष्ट्रांमध्ये द्वेषाची भावना निर्माण झाली. संयुक्त राष्ट्रसंघाच्या हस्तक्षेपानंतर सोव्हिएट रशियाने उत्तरी इराण मधून आपले लष्कर हटविले. या सर्व घडामोडी शीतयुद्धास कारणीभूत ठरल्या.

४. द्वितीय महायुद्ध दरम्यान हिटलरच्या नेतृत्वातील जर्मनी लष्कर सोविएट संघाकडे अग्रेसर होत होते त्यावेळेस मोठ्या प्रमाणात होणाती वित्त व मनुष्यहानी टाळण्यासाठी सोविएट संघाने पश्चिमी राष्ट्रांकडे मदतीची याचना केली. सोविएट संघाने पश्चिमी राष्ट्रांना जर्मनीच्या आक्रमणाची तीव्रता कमी करण्यासाठी जर्मनी विरुद्ध दुसऱ्या बाजूने आक्रमण करण्यास सांगितले. यामुळे सोविएट लष्करावरील दबाव कमी होईल. पण पश्चिमी राष्ट्रांनी हेतूपरत्वे सहकार्य करण्यास विलंब लावला परीणाम जर्मनी लष्काराला रशियात भयानक विध्वंस करण्याची संधी प्राप्त झाली. या घटनेने पश्चिमी राष्ट्राविरुद्ध रशियाच्या मनात तीव्र चीड निर्माण झाली व शीतयुद्धास कारणीभूत ठरली.

५. १९४४ साली बाल्कन करारा अंतर्गत सोविएट संघ व ब्रिटन मध्ये पूर्व युरोपाचे विभाजन करण्या संदर्भात सहमती झाली व करारा प्रमाणे बुल्गेरिया व रुमानिया यावर सोविएट संघ तथा ग्रीसवर ब्रिटनचा प्रभाव स्विकार करण्यात सहमती झाली. हंगेरी व युगोस्लाविया या देशांवर दोघांचा प्रभाव मानण्यात आला. पण द्वितीय महायुद्धानंतर सोविएट संघाने या देशांमध्ये साम्यवादी प्रचाराला सुरवात केली व साम्यवादी सरकारांची स्थापना केली. या घडामोडींना पाश्चात्य राष्ट्रांनी करार विरोधी ठरवले परिणाम दोन्ही बाजूकडील कटूता वाढून शीतयुद्धाचे वातावरण तयार झाले.

६. द्वितीय महायुद्धादरम्यान अमेरिकेने गुप्तपणे अणू कार्यक्रम विकसित केला व सोविएट संघाला विश्वासात न घेता जपानवर अणू प्रयोग केला. अमेरिकेने आपल्या युद्ध तंत्रज्ञानाची माहिती सोविएट संघाला न देता अविश्वासाचे वातावरण निर्माण केले. यामुळे परस्पर सहयोगाच्या वातावरण निर्मितीला छेद दिल्या गेला. अमेरीकेची अणुकार्यक्रमाबाबतची एकाधिकारशाही सोविएट

संघाला सहन झाली नाही. सोविएट संघाने प्रत्युत्तर म्हणून अणूकार्यक्रमाबाबत असलेली साशंकता शीतयुद्धाच्या वातावरण निर्मितीस कारणीभूत ठरली.

७. द्वितीय महायुद्ध दरम्यान सोविएट संघाचे पूर्व बर्लिन तथा अमेरिका व ब्रिटनचा पश्चिम बर्लिनवर अधिकार प्रस्थापित झालेला होता. युद्धानंतर पश्चिमी राष्ट्रांनी आपल्या अधिकाराक्षेत्रात नवी चलनव्यवस्था प्रारंभ करण्याचा निर्णय घेतला. जून १९४८ मध्ये सोविएट संघाने या विरुद्ध बर्लिनची नाकेबंदी केली. परिणाम अमेरिका व सोविएट संघात झालेल्या प्रोटोकालचा भंग झाला व यासाठी संपूर्णतः सोविएट संघाला दोषी मानण्यात आले. पण सोविएट संघाला हे मान्य नव्हते. प्रकरण सुरक्षा परिषदेमध्ये गेले व शीतयुद्ध नव्या वळणावर गेले.

८. द्वितीय महायुद्धा नंतर संयुक्त राष्ट्र संघाची स्थापना झाली. सुरक्षा परिषदेतील पाच स्थायी सदस्य राष्ट्रांना नकारधिकार प्राप्त झाला. त्यापैकी सोविएट संघ हा सदस्य देश होता. अमेरिका व पश्चिमी राष्ट्रांनी संयुक्त राष्ट्र संघात आणलेल्या प्रत्येक प्रस्तावाच्या विरोधात सोविएट संघाने नकारधिकाराचा वापर केला. सोविएट संघाच्या या कृतीने अमेरिका व पश्चिमी राष्ट्रे दुखावल्या गेली व आरोप-प्रत्यारोपांना सुरवात झाली. दोन्ही बाजू कडील तणावाने वातावरण शीतयुद्धास कारणीभूत ठरले.

९. द्वितीय महायुद्धा नंतर दोन्ही महासत्तांनी एकमेकांच्या विरोधात जोरदार प्रचार केला. अमेरिकेने अधिकृतपणे साम्यवादा विरुद्ध लढण्यासाठी ट्रुमेन सिद्धांत अंमलात आणला. सिनेट मध्ये सोविएट संघाच्या विदेश नीतीची आलोचना होऊ लागली. त्याचप्रमाणे सोविएट संघाने साम्यवादी शक्तींना पश्चिमी खंडात आपल्या प्रभावाचे विस्तारीकरण करण्यास सांगितले. दोन्ही बाजूंनी एकमेकांविरुद्ध प्रचार अभियान चालविल्यामुळे परस्पर शत्रुत्व निर्माण झाले व याचे रुपांतर शीतयुद्धामध्ये झाले.

१०. द्वितीय महायुद्धानंतर अमेरिका व सोविएट संघाने आपला स्वार्थ साधण्याची एकही संधी सोडली नाही. संपूर्ण आंतरराष्ट्रीय स्तरावर संशयाचे वातावरण निर्माण झाले. परस्पराच्या हिताला बाधक अश्या कृती होऊ लागला. दोन्ही महासत्ता आपला क्षेत्राधिकार व प्रभाव वाढविण्याचा प्रयत्न करु लागल्या. संपूर्ण जग संघर्षाचा आखाडा बनले. त्यामुळे संपूर्ण विश्वास तणावाचे वातावरण बनले.

## शीतयुद्धाचा विकास

शीतयुद्धाचा विकास हळुहळु होत गेला. १९१७ ची बोल्शेविक क्रांती शीतयुद्धाचे पहिले लक्षण होते. द्वितीय महायुद्धानंतर शीतयुद्धाचे आंतरराष्ट्रीय स्तरावरील चित्र स्पष्ट झाले. दोन्ही महासत्तांमधील भीती व अविश्वासाच्या भावनेने याला चालना दिली. प्रारंभी मर्यादीत असलेल्या या संघर्षाने कालांतराने खुले व उग्र रुप धारण केले व दोन्ही महासत्ता जाहीरपणे एकमेकांची आलोचना करु लागले. यामुळे अविश्वास, भीती व अशांततेचे वातावरण निर्माण झाले. शीतयुद्धाचा संपूर्ण विकासक्रम पुढील प्रमाणे विशद करता येईल.

## शीतयुद्धाचा विकास : प्रथम चरण (१९४६ ते ४९)

१. ०५ मार्च १९४६ रोजी ब्रिटनच्या विस्टन चर्चिल याने वेस्टमिनिस्टर महाविद्यालय (फुल्टन) येथे भाषण करतांना औपचारिकरित्या शीतयुद्धाची घोषणा केली. अमेरिकेची लष्करी व अणूशक्ती निश्चितपणे सोविएट संघापेक्षा व जगातील इतर राष्ट्रांपेक्षा अधिक मजबूत व सशक्त होती. आंतरराष्ट्रीय धोरणाला प्रभावित करण्याची अमेरिकची क्षमता व इच्छा सोविएट संघाच्या विस्तारित धोरणाला मारक ठरत होती. पण दुसऱ्या बाजूला अमेरिकेची सोविएट संघावर वर्चस्व सिद्ध करण्याची इच्छा त्याच्या पाश्चिमी मित्रांमुळे शक्य नव्हती. कारण नुकत्याच झालेल्य द्वितीय महायुद्धामुळे आर्थिक व लष्करीदृष्टया हे राष्ट्र अमेरिकेइतके शक्तीशाली नव्हते तसेच या महायुद्धाच्या स्मृती अजूनही ताज्या असतांना पून्हा एका दुसऱ्या युद्धाला सामोरे जाणे या राष्ट्रांना झेपणारे नव्हते. त्यामुळे अमेरिकेची प्रत्यक्ष सोविएट रशिया बरोबर युद्ध करण्याची इच्छा अपूरी राहिली ती त्याने शीतयुद्धाच्या माध्यामातून पूर्ण केली.

या दरम्यान मार्च १९४७ मध्ये अमेरिकेन टुमन धोरणांतर्गत लष्करी कारवाई तर जून १९४७ साली मार्शल योजने अंतर्गत संपूर्ण पाश्चिमी क्षेत्राचे आर्थिक एकात्मिकरण करण्याचे धोरण आखले. संपूर्ण जगात साम्यवाद विरोध व भीती पसरविणे हा पहिल्या चरणाचा अमेरिकेतील महत्त्वाचा भाग होता. या कालावधीत जर्मन समस्येचे दोन महासत्तांमधील संघर्षाला खतपाणी घातले. पाश्चिमी सत्तेने व सोविएट संघाने त्यांच्या ताब्यातील भागांवर वर्चस्व प्रस्थापित करुन अनुक्रमे फेडरल रिपब्लिक ऑफ जर्मनी व जर्मन डेमोक्रेटिक रिपब्लिक क्षेत्र प्रस्थापित केले. १९४८ मध्ये पश्चिमी सत्तेने नवीन चालान व्यवस्था स्विकारल्याने तणावात भर पडली. प्रत्युत्तर म्हणून सोविएट संघाने बर्लिनची नाकेबंदी केली. यावर प्रत्युत्तर म्हणून पाश्चिमी सत्तेने हवाई चढाव करुन नाकेबंदी अयशस्वी करण्याचा प्रयत्न केला या दरम्यान अजून एका घटनेने दोन्ही

महासत्तांमधील संघर्षाला नवे वळण लावले ते म्हणजे अमेरिकेने चीन मधील साम्यवादी शासनाला संयुक्त राष्ट्रसंघामध्ये केलेला विरोध व दिलेली अमान्यता होय.

## शीतयुद्धाचा विकास : द्वितीय चरण (१९४९ ते ५३)

दुसऱ्या चरणात अमेरिकेचा सोविएट संघाविरुद्धचे लष्करी व आर्थिक मदतीचे धोरण पूर्ववत राहिले. ऑस्ट्रेलिया व न्यूझलंड सोबत सुरक्षात्मक करारा केला तसेच १९५१ मध्ये जपान सोबत शांती करार. कोरीयन युद्धाचा हाच काळ ज्यामध्ये दोन्ही महासत्तांमधील संघर्षाने परिसीमा गाठली. डिसेंबर १९४५ मध्ये मास्को येथे रशिया, अमेरिका व ब्रिटन यांच्या मत्र्यांमध्ये उत्तर व दक्षिण कोरीयातील सोविएट संघ व अमेरिकेच्या लष्करी प्रतिनिधींची सहभाग असलेला संयुक्त आयोग निर्माण करण्यास सहमती झाली. बहुतांश कोरीयन स्वातंत्र्याचे समर्थक होते. संयुक्त आयोगाचा प्रयोग सुद्धा फसला व शेवटी कोरीयन मुद्दा संयुक्त राष्ट्रसंघाकडे सोपविण्यात आला. जून १९५० मध्ये उत्तर कोरीयाने दक्षिण कोरीयावर अचानक आक्रमण केले. यामुळे प्रथमतः दोन्ही महासत्तांमधील संघर्षाला शस्त्र स्वरुप प्राप्त झाले व दोन्ही महासत्तांमधील संघर्षाला शस्त्र स्वरुप प्राप्त झाले. अमेरिकेने अमाप पैसा खर्च करुन साम्यवादा विरुद्ध प्रचार केला. दरम्यान सोविएट संघाने अणूस्फोट करुन अमेरिकेबरोबर अणूस्पर्धा सुरु केली. १९४९ मध्ये अमेरिकने मित्र राष्ट्रांच्या सहकार्याने नाटो लष्करी करार स्थापन केला. या अंतर्गत मित्र राष्ट्रांवर झालेला हल्ला हा अमेरिकेवरील हल्ला मानला जाईल व त्याचे गंभीर परिणाम संबंधित राष्ट्राला भोगावे लागतील असे अमेरिकने स्पष्ट केले.

## शीतयुद्धाचा विकास : तृतीय चरण (१९५३ ते ५७)

या काळात दोन नवे लष्करी करार निर्माण झाले. १९५३ मध्ये चर्चिल यांनी दक्षिण पूर्व आशिया साठी नाटो सारखा करार करण्याचा अमेरिकेला सल्ला दिला त्याप्रमाणे ०८ डिसेंबर १९५४ रोजी साऊथ ईस्ट आशिया ट्रिटी (सिटो) तसेच मिडल ईस्ट डिफेन्स ऑर्गनायझेशन (मेडो) संघ निर्माण झाला. पुढे रशियाने वार्स करार केला. १९५४ च्या व्हिएतनाम युद्धाने शीतयुद्धाची तीव्रता अधिक प्रखर केली. सोविएट संघाने हंगेरीत केलेला हस्तक्षेप, शीतयुद्ध भडकविण्यात कारणीभूत ठरला. या दरम्यान स्वेझ कालावा संदर्भात दोन्ही महासत्तांमधील संघर्षाने गंभीर रुप धारण केले. यासर्व घडामोडीत तणाव शैथिल्याच्या दिशेने झालेला पहिला प्रयत्न म्हणजे १९५५ साली जेनेवा येथे दोन्ही महाशक्तीनी जागतिक समस्येवर चर्चा केली.

## शीतयुद्धाचा विकास : चतुर्थं चरण (१९५७ ते ६२)

शीतयुद्धाचा हा कालावधी दोन परस्पराविरोधी प्रवाहाचा साक्षीदार ठरला. एकीकडे सहअस्तित्वाचे तत्त्व समोर आले तर दुसरीकडे क्युबीयन मिसाईल समस्येने संपूर्ण जगाला तिसऱ्या महायुद्धाच्या उंबरठयावर नेऊन ठेवले. अमेरिका व सोविएट संघाच्या प्रतिनिधींमध्ये सांस्कृतिक व राजकीय देवाणघेवाण झाली. दोन्ही महाशक्ती जीन्हा परीषदेसाठी मान्य झाल्या. पण यू - २ घटनेने या सर्व प्रयत्नांना धक्का पोहचला. अमेरिकेचे यू-२ हेरगिरी करणारे विमान सोविएट संघाने मिसाईलने आकाशातून पाडले. सेंट्रल इंटिलिंजस एजेंन्सीचे असलेले विमान फ्रान्सीस गॅरी पावर नावाचा पायलट चालवित होता. प्रारंभी अमेरिकेने या प्रकरणात सहभाग असल्याचा नकार दिला. पण सोविएट संघाने लष्करी तळाचे घेतलेले फोटो व पायलट याला समोर आणल्यानंतर अमेरिकेला त्यापाठीमागील लष्करी हेतू स्पष्ट करावा लागला. वरील घटना पॅरीस मध्ये होऊ घातलेल्या पूर्व-पश्चिम परीषदेच्या दोन आठवडे आधी घडली.

१९६१ मधील बर्लिन समस्येने दोन्ही महासत्तांमधील संबंधाना वेगळे वळण लावले. सोविएट रशियाने पूर्व बर्लिन मधून पश्चिम बर्लिन मध्ये होणाऱ्या स्थलांतराला रोखण्यासाठी बर्लिन भिंत उभारली. क्युबा प्रकरणाची तीव्रता कमी झालेली नव्हती. पण खुश्चेव व अमेरिकन अध्यक्ष केनेडी यांच्यात झालेल्या कराराने मानव जातीवरील आण्विक संकट काही प्रमाणात दूर झाले. सोविएट रशियाने क्युबा मधील लष्करी तळ हटविण्यास संमती दिली त्याबदल्यात अमेरिकने क्युबावर आक्रमण न करण्याचे आश्वासन दिले.

## शीतयुद्धाचा विकास : पाचवे चरण (१९६२ ते ६९)

अण्वस्त्रांच्या संभाव्य परीणामांचा संपूर्ण विश्वाने प्रकट केलेल्या चिंतेचा व त्यासंदर्भात आंतरराष्ट्रीय स्तरावर झालेल्या प्रयत्नांचा काळ म्हणून हे चरण ओळखल्या जाते. ०५ सप्टेंबर १९६३ रोजी अमेरिका, सोविएट संघ व ब्रिटन यांच्या मध्ये मास्का आंशिक परीक्षण बंदी करार झाला. यामुळे शीतयुद्ध समाप्तीच्या दिशेने पडलेले सकारात्मक पाऊल होते. १९६३ साली जिनेवा हॉट लाईन कराराने अमेरिका व सोविएट संघाला एकत्रित आणले. याच सौहार्द वातावरणाचा परिपाक म्हणजे १९६८ साली झालेला अण्वस्त्र प्रसार बंदी करार होय. (Non-Proliferation Treaty ) जर्मनी व हंगेरीचा प्रश्न कायम होता. शांततमय सहअस्तिव व एकंदरीत मानव जातीच्या अस्तित्वाची समस्या बघता निशःस्त्रीकरणाची संकल्पना व चळवळ उदयास आली.

सोविएट संघाच्या अध्यक्षांनी १९५९ मध्ये सहअस्तित्वाच्या संकल्पनेला अनुसरुन वांशिग्टनला भेट दिली व अध्यक्ष ऑयसेनहोर यांच्या सोबत भेट घेतली. याभेटी दरम्यान ख्रुश्चेव यांनी संयुक्त राष्ट्रसंघाच्या आमसभेला संबोधित केले व चार वर्षाच्या कालमर्यादेत सर्व राष्ट्रांनी निःशस्त्र व्हावे असे आवाहन केले.

१९६७ साली झालेल्या आंशिक प्रसार बंदी कराराने शीतयुद्धाची तीव्रता कमी करण्यास महत्त्वाची भूमिका बजावली. या कराराने जमिन, पाणी व आकाशात अण्वस्त्र चाचणी करण्यास मर्यादित बंदी आणली. आमसभेत आवाहन केल्याप्रमाणे सोविएत संघ, अमेरिका व ब्रिटन यांनी या कराराला स्विकृती दिली. या करारानुसार अण्वस्त्रधारक देश आपल्या अण्वस्त्र शस्त्रांचे हस्तांतरण किंवा त्यावरील नियंत्रण इतर अण्वस्त्रधारक नसलेल्या देशांकडे सोपविणार नाही किंवा त्यांना त्याची निर्मिती करु देणार नाही.

### शीतयुद्धाचे शेवटले चरण (१९७८ नंतरचा काळ)ः

१९६९ ते १९७८ चा काळ तणाव शैथिल्याचा काळ म्हणून ओळखल्या जातो. पण १९७८ साली निर्माण झालेल्या अफगणिस्थान संकटाने सौहार्दाचे पर्व संपुष्टात आले. या काळाला तणाव शैथिल्याची अंतिम यात्रा समजल्या जाते. दहा वर्षे दोन्ही महासत्तांमधील चांगले संबंध पुनः संघर्षात परावर्तित झाले. हा तणाव वाढण्यामागील प्रमुख कारणे पुढील प्रमाणे :

१. सोविएट संघाच्या वाढलेल्या शक्तीने अमेरिकेसोबत आपल्या जुन्या वैमनस्याला प्रारंभ केला.
२. रीगन राष्ट्राध्यक्ष झाल्यानंतर शस्त्रास्त्र स्पर्धेला चालना प्राप्त झाली व मित्र राष्ट्रांना शस्त्र खरेदी करीता बाध्य केल्या जाऊ लागले.
३. अमेरिका व सोविएट संघामध्ये आंतरिक्ष संशोधनाची चढाओड.
४. अफगाणिस्थान मध्ये सोविएट संघाचा हस्तक्षेप परीणाम शीतयुद्ध वाढीला चालना.
५. सोविएट संघाचा दक्षिण-पूर्व आशिया मध्ये प्रभाव वाढविण्यास प्रारंभ.
६. २३ मार्च १९८३ रोजी अमेरिकन राष्ट्रपती रिगन यांनी स्टार वार परियोजनेला मंजूरी दिली. यामुळे नवीन अस्त्र-शस्त्राची चढाओढ सुरु झाली.
७. हिंद महासागर क्षेत्रात सोविएट संघाने आपला प्रभाव व शक्तीत केलेली वाढ.

शीतयुद्धाच्या एकंदरीत स्वरुपावरुन शीतयुद्धाची खालीलप्रमाणे वैशिष्टे सांगता येतील.

(अ) शीतयुद्धाची संकल्पना ही ध्रुवीकरणाच्या कल्पनेवर आधारीत होय. यामध्ये दोन परस्पराविरोधी गट किंवा समुहांमध्ये सर्व साधारणपणे समान सत्ता विभागणी होते. दोन्ही गट आर्थिक, वैचारिक, लष्करी आणि राजकीय पातळीवर तुल्यबळ असतात.

(ब) शीतयुद्ध प्रत्यक्ष युद्ध नसून युद्ध सदृश्य स्थिती असते. यामध्ये दोन्ही गट एकमेकांसमोर येतात पण युद्ध करीत नाही. हा एक मानसशास्त्रीय संघर्ष होय.

(क) शीतयुद्ध दोन परस्परविरोधी विचारसरणींमधला संघर्ष या अर्थाने सुद्धा ओळखला जातो. भांडवलशाही व साम्यवाद किंवा लोकशाही किंवा साम्यवाद यांच्यातील संघर्ष.

(ड) शीतयुद्ध हे आंतरराष्ट्रीय स्तरावर लढल्या गेले. यामध्ये आशिया, युरोप, अफ्रिका व लॅटिन अमेरिकेतील राष्ट्रे दोन गटात विभागल्या गेली.

(इ) शीतयुद्ध हे लष्करी व आर्थिक सामर्थ्य प्रकट करण्याचे आंतरराष्ट्रीय व्यासपीठ होते. अमेरिका व सोविएट रशिया या दोन्ही महासत्तांकडून त्यांच्या मित्रराष्ट्रांना प्रत्यक्ष-अप्रत्यक्षपणे मदत दिल्या जात असे.

(फ) शीतयुद्ध काळात केवळ संघर्ष व अशांतता होती असे नव्हे तर स्पर्धेच्या निमित्ताने का होईना वैज्ञानिक व तंत्रज्ञान क्षेत्रात प्रचंड प्रगती व विकास झाला. याच काळात अंतराळ प्रवासाबाबत मानवाने मोठी झेप घेतली. अण्वस्त्रांचा विकास झाला पण त्याचबरोबर त्याच्या विध्वंशी स्वरुपाची कल्पना सुद्धा आली.

(उ) शीतयुद्धामुळे मानवाला स्वतःच्या अस्तित्त्वाची जाणीव झाली व त्यातूनच मानवी अधिकाराचा जन्म झाला. जागतिक निःशस्त्रीकरण व अहिंसा यासारख्या संकल्पनांना महत्त्व प्राप्त झाले. युद्ध नव्हे तर निरंतर विकास हाच महासत्ता होण्याचा निकष बनला.

## १.२.३ शिथिलतेचे धोरण व घडामोडी

अमेरिका व सोविएट रशियातील शीतयुद्धात असा काळ आला की ज्या मध्ये शीतयुद्धाची प्रखरता कमी झालेली होती. इ.स. १९५३ ते १९६० मधील काही घटना या तणाव शैथिल्य निर्माण करणाऱ्या ठरल्या. त्यातील घडामोडींचा परामर्श पुढीलप्रमाणे.

१. स्टॅलिन यांच्या मृत्युनंतर रशियातील धोरणात परिवर्तन होऊन खुश्चेव यांनी पाश्चात्य राष्ट्रांबरोबर सहअस्तित्त्वाचे धोरण स्विकारले.

२. १९५५ साली सर्वप्रथम महासत्ताक राष्ट्रांनी राजनयाला महत्त्व देऊन शिखर राजनयाला प्रारंभ केला.

३. १९६० साली क्यूबाच्या प्रश्नावरुन दोन्ही महाशक्तींमध्ये अणुयद्धाचे वातावरण निर्माण झाले. परंतु दोन्ही राष्ट्रांच्या समजूतदारापणाने तिसरे महायुद्ध टळले.

४. इ.स. १९६३ साली 'अणू-परीक्षण प्रतिबंधक संधी' व इ.स. १९६८ साली 'अण्वस्त्र निर्माण व प्रसार प्रतिबंधक संधी' मुळे परस्पर सहाकार्याचे वातावरण निर्माण झाले.

५. १९७५ पासून शीतयुद्धाची प्रखरता कमी झाली. एप्रिल १९७५ मध्ये अनेक वर्षापासून चालत आलेला व्हिएटनाम संघर्ष अमेरिकन सैन्याच्या माघारीमुळे समाप्त झाला.

६. चीनची वाढती ताकत व हायड्रोजन बॉम्बची केलेली चाचणी यामुळे शीतयुद्धाचे केंद्रच समाप्त झाले.

१९६२ नंतर तणाव शिथिलतेच्या प्रक्रियेला प्रारंभ झाला. सैनिकीकरणाची निरर्थकता, आण्विक युद्धातील जय पराजयाची अप्रासंगिता, दोन्ही बाजूमधील अविश्विसनियता इ. कारणांनी तणाव शिथिलतेसाठी पूरक परिस्थिती निर्माण केली. या व्यतिरिक्त सोविएट रशियात गोर्बाचेव्ह यांच्या रुपात असे नेतृत्व उदयास आले ज्यामूळे आंतरराष्ट्रीय राजकारणात तणावाची स्थिती समाप्त करण्यास मदत झाली. आंतरराष्ट्रीय राजकीय पटलावर ग्लासनोस्त एवं पेरेस्त्रोइका या नवीन विचारधारेचा जन्म झाला ज्यामुळे तणावात शिथिलता निर्माण झाली. सोवएट संघ व पश्चिमी देशांनी एकमेकांविरुद्ध सैद्धांतिक आधारावर प्रचार करणे बंद केले. अश्या स्थितीत दोन्ही गटातील संशय व तणावाचा लोप होणे स्वाभाविक होते.

तणाव शैथिल्याच्या घडामोडींचा काळ हा खऱ्या अर्थाने १९६९ पासून धरल्या जाऊ शकतो. या काळात कुरघोडीच्या राजकारणापेक्षा सहकार्यात्मक संवादावर अधिक भर दिल्या गेला. भीती, धमक्या, संघर्ष, यांची जागा भेटीगाठी, सांस्कृति देवाणघेवाण, व्यापार, करार, तंत्रज्ञान सहकार्य यांनी घेतली. शस्त्रस्पर्धेचा खर्च तणाव शैथिल्याला कारणीभूत ठरला. तणाव शैथिल्याचे वातावरण १९५९ साली खुश्चेव यांनी जो सहअस्तित्वाचा सिद्धांत मांडला त्यामुळे निर्माण झाले. १९७० साली सोविएट संघाने पश्चिम जर्मनी विरुद्ध सहकार्यात्मक संवादावर अधिक भर दिला गेला व पश्चिम जर्मनी विरुद्ध आक्रमण न करण्याचा करार केला. त्यामुळे युरोप मधील तणाव निवळण्यास बरेच मदत मिळाली. यासोबतच बर्लिन संदर्भात सोविएट संघ, अमेरिका, ब्रिटन व फ्रांस यांच्यामधे झालेला करार सर्वच पक्ष तणाव शिथिल करण्यास अनुकूल होते, हे सिद्ध होते. १९७३ साली सोविएट संघाच्या साम्यवादी पक्षाचे सर्वेसर्वा ब्रेझनेव्ह यांनी वाशिंग्टनला परिषदे निमित्त भेट दिली. या परिषदेत अनेक महत्त्वांच्या विषयावर करार झाले. यामध्ये शेती संशोधन, दळवळण, सांस्कृतिक व वैज्ञानिक देवाणघेवाण यांच्या प्रामुख्याने उल्लेख करता येईल.

या दरम्यान महासत्तामधील संबंधाला एक नवा आयाम प्राप्त झाला. सोविएट संघ व चीन तसेच चीन व अमेरिका यांच्यात संघर्ष निर्माण झाला. १९७१ साली हेनरी किसिंगर, परराष्ट्र सचिव, अमेरिका यांनी चीनला गुप्त भेट दिली व चीन सोबत संबंधामध्ये सामान्यपण येणाच्या शक्यता पडताळून पाहिल्या. याबरोबरच शांघाय वार्तालाप झाला त्यामुळे अमेरिका व चीन यांच्यामध्ये तणावशैथिल्याची संभावना वाढली. १९७९ साली अमेरिका व चीन यांच्यामध्ये एकमेकांच्या देशात राजदूताची नेमणूक करण्याला सुरुवात झाली.

तणाव शैथिल्याच्या काळात महासत्तांमध्ये संघर्ष झालाच नाही असे नव्हे. अमेरिकेने मध्यपूर्व आशियात आपला प्रभाव निर्माण करण्यासाठी इराण मध्ये शस्त्रपुरवठा पूर्ववत ठेवला. भारतीय सामुद्रीक क्षेत्रात प्रभाव निर्माण करण्याच्या दृष्टीने दिएगो गार्शियाला लष्करी तळामध्ये परावर्तित करण्याच्या अमेरिकेचा प्रयत्न होता. यामागील मुख्य हेतू सोविएट संघाचा या क्षेत्रातील प्रभाव कमी करण्याचा होता. दुसऱ्या बाजूने सोविएट संघाने दक्षिण-पूर्व आशियातील अमेरिकेचा प्रभावाला पर्याय म्हणून आशियन सामुहिक सुरक्षितेचा प्रस्ताव मांडला. १९७१ मधील बांगलादेश संघर्ष आणि १९७३ मधील इजिप्त-इस्त्रायल युद्धदरम्यान दोन महासत्तांनी विरुद्ध देशांना केलेली मदत तणावशैथिल्याचे वातावरण निर्माण करण्यास बाधक ठरले.

**स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न-१**

(१) शीतयुद्धाला पर्यायी शब्द कोणता वापरला गेला?

(२) शिथिलतेचे धोरण म्हणजे काय?

## १.२.४ पूर्व युरोपातील क्रांतीची व सोव्हिएट रशियाची पतनाची कारणे

१९८० दशकाच्या उत्तरार्धात सोविएट संघाने घोषणा केली की पूर्व युरोपीय देशातील साम्यवादी व्यवस्था कायम ठेवण्यास सोविएट संघ पूर्वीप्रमाणे कोणत्याही दबाव तंत्राचा अवलंब करणार नाही. कारण याच दशकात पूर्व युरोपमध्ये उदारमतवादी लोकशाहीची स्थापना करण्याची मागणी जनतेद्वारा करण्यास प्रारंभ झालेला होता. सोविएट संघाने ज्याप्रमाणे १९५६ मध्ये पोलंड व १९६८ मध्ये चेकोस्लोवाकियात दबाव तंत्राचा अवलंब केला होता तसाच तो पूर्व युरोपातील राष्ट्रांबाबत करेल अशी भीती होती. पण ही शंका निराधार ठरली. अधिकांश पूर्वी युरोपातील देशात साम्यवादी व्यवस्थेऐवजी उदारमतवादी लोकशाहीची स्थापना झाली पण सोविएट संघाने या प्रक्रिये मध्ये कोणतीही अडचण निर्माण केली नाही. शीतयुद्धाचे महत्त्वपूर्ण प्रतिक असलेली बर्लिन भिंत नष्ट करुन पूर्व व पश्चिम जर्मनीचे एकीकरण झाले. एक प्रकारे पूर्व युरोपातील क्रांतीची लाट साम्यवादाच्या पतनास कारणीभूत ठरली. पोलंड या देशापासून सुरु झालेली ही क्रांतीची लाट पुढे हंगेरी, पूर्व जर्मनी, बलजेरिया, झेकोस्लाविया व रुमानिया इ. देशांत पसरली. पूर्व युरोपातील या क्रांतीचे वैशिष्टे म्हणजे या सर्व देशांनी एकपक्षीय राजवटी विरुद्ध उभे केलेले आंदोलन रुमानिया असा पूर्व युरोपीय देश होय कि ज्याने हिंसक मार्गाने साम्यवादी एकपक्षीय राजवट उलथवून टाकली. पोलंड मध्ये सार्वजनिक निवडणूकीत जनतेने शांततेच्या मार्गाने तेथे सत्ता परिवर्तन केले.

शीतयुद्धाने निर्माण केलेली ध्रुवीकरणाची व्यवस्था १९९० च्या दशकाच्या पूर्वार्धात सोविएट संघाच्या विघटनामुळे कोसळली. याचबरोबर शीतयुद्धाच्या समाप्तीला

सुरवात झाली. सोविएट संघाच्या विघटनामुळे नाटो व वार्सा करारा सारख्या सैनिक संघटनाची महत्त्वता कमी झाली. १९९१ नंतर शीतयुद्धकालीन ध्रुवीकरणाची व्यवस्था नष्ट होणे व शीतयुद्धाची कालबाह्यता शीतयुद्धाच्या समाप्तीची नांदी ठरली.

## १.२.५ शीतयुद्ध समाप्ती व प्रभाव

१९८० च्या दशकातील उत्तरार्धा पासून तर १९९० च्या दशकाच्या प्रारंभापर्यंत आंतरराष्ट्रीय राजकारण जे परिवर्तन आले त्यामुळे आंतरराष्ट्रीय राजकारणाने विद्वान व पर्यवेक्षक यांच्या दृष्टीने शीतयुद्धाची स्थिती अतिशय रोचक बनली. सोविएट संघ व तिसऱ्या जगतातील विद्वानांनी शीतयुद्धा संबंधी आपले मत व्यक्त करतांना शीतयुद्ध समाप्तीची घोषण केली. शीतयुद्धाचा विकास व विस्तार यासंबंधी चर्चा केल्यानंतर शीतयुद्ध समाप्तीसाठी नेमकी कोणती कारणे व परिस्थिती कारणीभूत ठरली याचा ऊहापोह होण आवश्यक आहे. ती पुढीलप्रमाणे

१) शीतयुद्धामुळे दोन्ही महासत्तांच्या अर्थकारणावर प्रचंड ताण पडला. शस्त्र निर्मिती व स्पर्धा यामुळे प्रचंड खर्च होऊन आर्थिक व्यवस्था कोसळण्याची भीती निर्माण झाली. त्यामुळे अशी स्पर्धा फार काळ टिकविणे दोन्ही महासत्तासाठी व्यावहारिक ठरले नाही.

२) संपूर्ण जग दोन गटांमध्ये विभागल्या गेल्याने तिसऱ्या जगतातील देशांवर अन्याय झाला. परीणाम तिसऱ्या जगताचे संघटन होऊन अलिप्ततावादी चळवळ फोफावू लागली. या देशांची संख्या जास्त असल्याने त्यांचे अस्तित्त्व नाकारणे महाशक्तींना परवडणारे नव्हते.

३) शीतयुद्धाच्या राजकारणाची प्रतिक्रिया म्हणजे काही देशांमधून राष्ट्रवादी भावनेची लाट निर्माण झाली. एकीकडे अश्या देशांना आर्थिक मदत करतांना दुसरीकडे विरोध सहन करणे अश्या कोंडीत महासत्ता आल्या. त्याचे तीव्र परिणाम झाले. व्हिएतनाम व अफगाणिस्तान मध्ये अमेरिका व रशियाची झालेली फसगत व अपयश यामुळे दोन्ही महासत्तांना असे राजकारण किती काळ सुरु ठेवायचे याबाबत पुनर्विचार करणे भाग पडले.

४) शीतयुद्धाच्या दरम्यान महासत्तांच्या समर्थक गटांमध्येच संघर्ष व मतभेद निर्माण झाले. बदलती जागतिक परिस्थिती व जागतिकिकरणाच्या प्रक्रियेत भांडवशाही किंवा साम्यवाद यासारख्या विचारसरणींनी स्विकारणे अवघड ठरले. त्यातून

अनेक देशांनी महासत्तांचे वर्चस्व झुगारुन स्वतःच्या स्वतंत्र धोरणानुसार व्यवहार करण्यास प्राधान्य दिले. फ्रांसने रशिया समोर मैत्रीसाठी घेतलेला पुढाकार, चीन-रशियात झालेले मतभेद व चीनचा अमेरिकेकडे वाढलेला झुकाव, युरोपीय राष्ट्रांमध्ये झालेले मतभेद व एकत्रिकरण तसेच युरोपीयन संघाची स्थापना इत्यादी कारणांमुळे शीतयुद्धाच्या प्रासंगिकतेला आव्हान दिल्या गेले.

५) शीतयुद्ध दरम्यान एकीकडे महासत्तांचा आर्थिक भार वाढून आर्थिक विकास खोळंबला असतांना दुसरीकडे आशियाई खंडातील देशांनी या परिस्थितीचा फायदा घेऊन प्रचंड आर्थिक विकास साधला. जपान, सिंगापूर, मलेशिया, थायलंड इतकेच नव्हे तर चीनने या परिस्थतीचा फायदा घेऊन तिसरी शक्ती निर्माण झाल्याचा आभास निर्माण केला. ही सर्व परिस्थिती महासत्ताक देशांसाठी साठी एकप्रकारे धोक्याची सूचना होती. त्यामुळे संघर्ष सोडून दोन्ही महासत्तांनी आर्थिक हितसंबंधाना प्राधान्य द्यायला सुरवात केली.

६) जागतिक पातळीवर निरनिराळ्या आर्थिक समुहांचा उदय व त्यांची आर्थिक ताकद यामुळे जागतिक अर्थकारणाची दिशा व दशा बदलण्यास सुरवात झाले. तेल उत्पादक देश, आशियान समुह, नाम चळवळ, सार्क परिषद, इ. प्रादेशिक संघटना व समुहामुळे आर्थिक व राजकीय शक्तीचे स्त्रोत केंद्र बदलण्याला सुरवात झाली. महासत्ताक देशांना याकडे दुर्लक्ष करुन चालणारे नव्हते.

७) सोविएट रशियाची विस्कटलेली अर्थव्यवस्था, नियंत्रण ठेवण्यात आलेले अपयश, जागतिक पातळीवर अमेरिकेचे निर्विवाद वर्चस्व, अमेरिकने केलेली वैज्ञानिक व तांत्रिक प्रगती, तसेच रशियाने नाटोचे स्विकारलेले सदस्यत्व शीत युद्धाच्या समाप्तीचे लक्षणे ठरली.

द्वितीय महायुद्धानंतर इ.स. १९९० पर्यंत आंतरराष्ट्रीय राजकारणात शीतयुद्धाचा प्रभाव राहिलेला आहे. शीतयुद्धकालीन ज्या समस्या व प्रश्न निर्माण झाले होते. त्या अद्याप सुटलेल्या नाही. उलट त्याचे नकारात्मक परिणाम आजही संपूर्ण जग सोसतो आहे. शीतयुद्धामुळे तिसरे जागतिक महायुद्ध टळले ही वास्तविकता सुद्धा स्विकारावी लागेल.

## शीतयुद्धाचा आंतरराष्ट्रीय राजकारणावर कोणता प्रभाव पडला याचे विवेचन खालीलप्रमाणेः

१) शीतयुद्धामुळे आंतरराष्ट्रीय राजकारण ध्रुवीकरणाला सुरवात झाली. भांडवलवाद,

साम्यवाद, गुटनिरपेक्षता यासारख्या वैचारिक संकल्पना अस्तित्वात आल्या. याचबरोबर प्रादेशिक संघटना व समूह यांना महत्त्व प्राप्त झाले.

२) संयुक्त राष्ट्रसंघातील पाच स्थायी सदस्यांपैकी अमेरिका व पूर्व सोविएट संघ एकमेकांविरुद्ध उभे राहिल्याने संयुक्त राष्ट्र संघाचे व्यासपीठ वैचारिक संघर्षासाठी वापरल्या गेले. दोन्ही देशांना 'व्हेटो' अधिकार असल्याने सुरक्षा परीषदेत त्याचा वापर एकमेकांविरुद्ध केल्या जाऊ लागला. परिणाम सुरक्षा परीषदेत सारखी सर्वात शक्तीशाली संस्था निष्क्रिय झाली.

३) शीतयुद्धामुळे शस्त्रस्पर्धा, लष्करी सामर्थ्याची स्पर्धा सुरु झाली. याचा परिणाम म्हणजे. अण्वस्त्रधारक देशांची वाढती संख्या होय.

४) शीतयुद्धाचा वैशिष्ट पूर्ण नकारात्मक परिणाम म्हणजे दहशतवाद व आतंकवादचा जन्म. आज संपूर्ण जग दहशतवादी कारवाया अंतर्गत आलेले आहे. अमेरिका व रशियाने एकेकाळी एकमेकांविरुद्ध जोपासलेला समूह गट आज दहशतवादी गटाच्या रुपाने जगासमोर येत आहे.

५) अमेरिका द्वार गुप्तपणे अणुबॉम्बची निर्मिती व सोविएट संघाला त्याची माहिती नसणे हा विश्वासघात मानून सोविएट संघाने काही दिवसात अणूबॉम्बची यशस्वी चाचणी केली. शीतयुद्धानंतर अणूबॉम्ब बनविण्याची यशस्वी चाचणी केली. शीतयुद्धानंतर अणूबॉम्ब बनविण्याची फॅशन निर्माण झाली. आज इराण व पाकिस्तान सारख्या राष्ट्रांनी अणूबॉम्बची निर्मिती केली. त्यामुळे संपूर्ण जग विनाशाच्या उंबरठयावर येऊन ठेपलेला आहे. थोडासा नासमजपणा जगाच्या विध्वंसाला कारणीभूत ठरु शकतो.

६) शीतयुद्धामुळे जगातील सर्व देशांवर संरक्षणाचा भार अधिक वाढला. परस्परांवरील अविश्वासामुळे देशांनी शस्त्रांची प्रचंड प्रमाणात निर्मिती केली. वाढलेल्या संरक्षण खर्चामुळे आर्थिक आणि सामाजिक विकासासाठी आवश्यक आर्थिक तरतुदीत मोठी कपात करावी लागली. परिणाम जागतिक मंदीची लाट पसरली.

७) शीतयुद्धामुळे अनेक स्थानिक संघर्षाला वैश्विक रुप प्राप्त होऊन त्यांचे स्वरुप अधिक गुंतागुंतीचे बनले. संघर्ष सोडविण्यापेक्षा त्याच्या आड आपले हितसंबंध

जोपासण्याचा प्रयत्न महासत्तांनी केला. परिणाम अनेक समस्या शीतयुद्धानंतरही कायम राहिल्या, उलट त्याचे स्वरुप अधिक उग्र होत गेले.

८) शीतयुद्धामुळे तिसरे जागतिक महायुद्ध झाल्यास त्याची तीव्रता कशी राहील याचा अंदाज आला. त्यामुळे एकीकडे शस्त्रास्त्र स्पर्धा वाढत असताना दुसरीकडे शस्त्रनियंत्रण निःशस्त्रीकरणाच्या संकल्पना पुढे येत आहे. मानवाधिकार सारख्या संकल्पनांचा उदय व त्याचे महत्त्व यामध्ये निर्णायक भूमिका पार पाडू शकते.

**स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न - २**

(१) पूर्व युरोपातील कोणत्याही दोन देशांची नावे सांगा?

(२) शीतयुद्धामुळे आंतरराष्ट्रीय राजकारणावर पडणाऱ्या प्रभावाचे दोन शब्दात वर्णन करा.

## १.२.६ नवशीतयुद्ध

नवशीतयुद्ध हे दुसरे शीतयुद्ध किंवा शीतयुद्ध -२ या नावाने ओळखल्या जाते. नवशीतयुद्धाची उत्पत्ती ही साधारण डिसेंबर १९७९ च्या कालावधी दरम्यान गृहित धरल्या जाते. ज्यावेळेस सोविएट संघाने अफगाणिस्थान मध्ये हस्तक्षेप केला तो कालावधी नवशीतयुद्धाचा प्रारंभ होय, असे आंतरराष्ट्रीय तज्ञांचे मत होय. काही आंतरराष्ट्री तज्ञ हा कालावधी १९७८ पासून मानतात. अमेरिकचे अध्यक्ष जिमी कार्टर यांचे राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार ब्रेझेझीनस्की यांनी 'पॉवर ॲड प्रिसिंपल' या ग्रंथात १९७८ पासून दोन्ही महासत्तांच्या संबंधामध्ये नकारात्मक वळण आले असे सांगितले. आपला मुद्दा अधिक स्पष्ट करतांना त्यांनी १९७८ च्या सोविएट संघाच्या इथोपियातील लष्करी नियुक्तीला प्रतिक्रिया म्हणून अमेरिकने त्याठिकाणी टास्क फोर्स पाठविण्याचा प्रस्ताव ठेवला पण सोविएट संघाला तो मान्य नव्हता. पण अफगाणिस्तान प्रकरण हे नवशीतयुद्धाचा प्रारंभबिंदू मानल्या जातो. यासाठी ब्रेझेझीनस्की यांनी सोविएट संघाला कारणीभूत ठरविले. तर दुसरीकडे, सोविएट संघाने अमेरिकेला यासाठी जबाबदार ठरविले. अमेरिकन प्रशासनात झालेले बदल व राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार म्हणून

ब्रेझेझीनस्की यांची झालेली नियुक्ती सोविएट संघाप्रती दृष्टीकोण बदलणारी ठरली असे सोविएट संघाला वाटत होते.

नवशीतयुद्धापूर्वी तणावशैथिल्याची गरज दोन्ही महासत्तांना का भासू लागली व त्यातूनच नवशीतयुद्धाचा विकास कसा झाला हे पाहणे आवश्यक ठरते. व्हिएतनामच्या अपयशानंतर अमेरिकेला सोविएट संघासोबत सौहार्दाचे संबंध हवे होते. कारण आंतरराष्ट्रीय स्तरावर जैसे थे स्थिती ठेवण्यास अमेरिकेचे हित दडलेले होते. सोविएट संघाच्या आण्विक शक्तीची दखल घेऊन अमेरिकेने जागतिक संतुलन बिघडू न देण्याची काळजी घेतली. दुसरीकडे सोविएट संघाच्या प्रभावाला मारक ठरणाऱ्या अनेक घटना घडल्या. उदा. सोविएट संघ व चीन संघर्ष, सोविएट संघाची इजिप्त असलेली पकड सैल झाली. सौदे अरेबियाचा राजा व इराणचा शाह यांचे सत्तावर्चस्व अमेरिकेच्या प्रभावाचे द्योतक होते. अमेरिकेची तंत्रज्ञानातील सर्वोच्चता या सर्व गोष्टी अमेरिकेच्या हिताला समर्थक व आंतरराष्ट्रीय स्तरावर जैसे थे स्थिती ठेवण्यास फायद्याच्या होत्या.

सत्तरीच्या दशकातील पूर्वार्ध हा अमेरिकन हिताला बाधित करणारा ठरला. अंगोला मध्ये क्युबीयनला बोलावणे अमेरिकेसाठी धक्कादायक होते. १९७६-७७ मध्ये इराणचा शाह व सौदी अरेबियाचा राजा यांनी अफगाणिस्थानमधील सरदार दाऊद याला सोविएट संघापासून अलिप्त ठेवण्याची खेळी अफगाणिस्थानमधील हस्तक्षेपास कारणीभूत ठरली.

यादरम्यान अमेरिकन प्रशासनाने आंतराष्ट्रीय स्तरावर अमेरिकेचा प्रभाव निर्माण करण्यासाठी मानवाधिकाराचा उपयोग करण्याचे ठरविले. दक्षिण अफ्रिका, लॅटिन अमेरिका व दक्षिण कोरीयातील नेत्यांना मानवधिकार नाकारण्याच्या मुद्दावरुन अमेरिकेने टिका केली. १९७९ मध्ये अमेरिकन अध्यक्ष कार्टर यांनी अवकाशात क्रुज मिसाईल प्रस्थापित करण्याचा निर्णय घेतला. यामुळे शस्त्रसंघर्षाला पून्हा एकदा झळाळी प्राप्त होणार होती. ब्रेझेझीनस्की यांची चीन भेट व निरनिराळ्या संयुक्त उपक्रमात चीनचा सहभाग रशियाच्या दृष्टीने त्याच्या विरुद्ध केलेली आघाडी होय असा समज झाला. अमेरिकेचे चीन सोबतचे राजनयिक संबंध मास्कोने स्वतः विरुद्ध खेळलेली एक नियोजनबद्ध खेळलेली चाल होती असे समजले.

या सर्व संघर्षाच्या काळात अमेरिकन अध्यक्ष जिमी काटेर व सोविएट अध्यक्ष यांच्यात व्हिएतनाम येथे साल्ट-२ करार झाला. पण वाशिंग्टनला पोहचल्यावर कार्टन

यांच्या मनात या कराराविषयी शंका उत्पन्न झाल्या. त्यामुळे त्यांनी या कराराला अधिमान्यता देण्यापूर्वी सोविएट संघाने क्युबा मधून आपला लष्करी तळ हटवावा अशी मागणी केली. अपेक्षेप्रमाणे सोविएट संघाने हि मागणी अमान्य केली परिणाम अमेरिकेने साल्ट-२ करारातून माघार घेतली. त्याचबरोबर १९८० मधील मॉस्को ऑलम्पिकवर बहिष्कार टाकला.

## १.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

**प्रतिरोधन धोरण :** शीतयुद्ध काळात सोविएट संघ व साम्यवादाच्या प्रसाराल मर्यादित करण्यासाठी अमेरिकेने अवलंबिलेले धोरण होय.

**नाटो :** नॉर्थ अटलांटिक ट्रिटी ऑर्गनायझेशन

**सीटो :** साऊथ ट्रस्ट एशियन ट्रिटी ऑर्रानायझेशन

**सेन्टो :** सेंट्रल ट्रिटी ऑर्ननायझेशन

**व्हेटो :** संयुक्त राष्ट्र संघाच्या सुरक्षा परीषदेतील स्थायी सदस्यांना असलेला नकाराधिकार.

**सार्क :** साऊथ एशियन ॲसोसिएशन फॉर रिजनल कॉपरेशन

**ANZUS** : ऑस्ट्रेलिया व न्यूझलंड व अमेरिका यांच्यातील सुरक्षात्मक कराराला दिलेले नाव.

## १.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

### स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न - १

(१) मानसशास्त्रीय युद्ध (Psychological Warfare)

(२) १९५३ ते १९६० दरम्यान जागतिक पातळीवर अश्या घटना घडल्या ज्यामुळे दोन्ही महासत्तांमधील संघर्षाची तीव्रता कमी होऊ सलोख्याच्या धोरणांना अग्रक्रम दिल्या गेला. त्यालाच शिथिलतेचे धोरण म्हटल्या जाते.

**स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न - २**

(१) पोलंड, हंगेरी

(२) शस्त्रस्पर्धा व दहशतवाद

## १.५ सारांश

दुसऱ्या महायुद्धात इंग्लंड, फ्रांस सारख्या राष्ट्रांची स्थिती अत्यंत दयनीय झालेली होती. याचा लाभ अमेरिका व सोविएट रशिया यासारख्या राष्ट्रांनी घेतला व संपूर्ण जगाला आपल्या नियंत्रणाखाली आणून आर्थिक साम्राज्यवाद पसरविण्यास प्रारंभ केला. सोविएट संघाने साम्यवाद विचारसरणीचा पुरस्कार करुन साम्राज्यवादाची भूमिका स्विकारली. याला प्रत्युत्तर म्हणून अमेरिकेने साम्यवाद विरोधी भूमिका घेऊन सोविएट संघाविरुद्ध इतर पाश्च्यात्त राष्ट्रांना भय व भीती दाखवून आपल्या गटात ओढले. कालांतराने जागतिक पातळीवर अमेरिका व सोविएट संघ यांच्या नेतृत्वाखाली संपूर्ण जगाचे द्विध्रुवीकरण झाले. अमेरिकेन सोविएट संघाला शह देण्यासाठी लष्करी करार करुन तीन लष्करी संघटना निर्माण केल्या तर सोविएट रशियाने सुद्धा आपल्या गटातील देशांची संरक्षणाची जबाबदारी घेऊन लष्करी संघटन निर्माण केले. शीतयुद्धाच्या कालखंडात अनेक क्षण आले की ज्या मध्ये युद्ध सदृश्य परिस्थिती निर्माण झाली. परंतु महासत्तांनी वेळीच घेतलेल्या सामंजस्य भूमिका मुळे युद्ध झाले नाही. शीतयुद्ध हे एक प्रकारे मानसशास्त्रीस युद्ध होते. कालांतराने आण्विक युद्धाचे परिणाम, ढासळत चाललेली आर्थिक परिस्थिती, सोविएट संघाने पतन, असुरक्षितता, प्रचंड खर्च यामुळे शीतयुद्ध स्पर्धा अधिकाळ चालू ठेवणे दोन्ही महासत्तांना परवडणारे नव्हते. त्यातून १९९१ साली झालेल्या सोविएट संघांच्या विघटनानंतर शीतयुद्धांची तीव्रता व राजकारण संपुष्टात आले. कालांतराने रशिया हा देश सुद्धा नाटोत सामील झाला.

## १.६ सरावासाठी स्वाध्याय

**खालील प्रश्नांची उत्तरे थोडक्यात लिहा.**

(१) शीतयुद्धाचे स्वरुप व वैशिष्टे सांगा.
(२) शीतयुद्धाचा प्रभाव कसा पडला ते स्पष्ट करा.
(३) शीतयुद्धाचा उत्पत्ती व विकास स्पष्ट करा.
(४) सोविएट संघाच्या पतनाची कारणे शोधा.
(५) शीतयुद्ध समाप्तीची कारणे कोणती.
(६) शिथिलतेचे धोरण स्पष्ट करा.
(७) नवशीतयुद्धाचे स्वरुप स्पष्ट करा.

## १.७ अधिक वाचनासाठी पुस्तके


(१) पामर ॲन्ड पार्किन्स, ‘इंटरनॅशनल रिलेशन’ दिल्ली, सीपीएस पब्लिशर्स, १९८५
(२) महेंद्र कुमार, ‘थेअरॉटिक आसपेक्टस ऑफ इंटरनॅशनल पॉलिटिक्स’ दिल्ली, शिवलाल अग्रवाल ॲड कंपनी, १९८२
(३) प्रकाश चंदर, प्रेम अरोरा, ‘कॉसमॉस बुकहाईव प्रा.लि.’ दिल्ली
(४) वसंत रायपूरकर, ‘आंतरराष्ट्रीय संबंध’, नागपूर, मंगेश प्रकाशन, १९९१,


*****

# २

# घटक २ : आंतरराष्ट्रीय रचना आंतरराष्ट्रीय आर्थिक आणि विकाससंबंधी घटक

**घटक संरचनाः**

२.० उद्दिष्टे
२.१ प्रास्ताविक
२.२ विषय विवेचन
 २.२.१ दि ब्रेटन वुड व्यवस्था
 २.२.२ आंतरराष्ट्रीय मुद्रा कोष
 २.२.३ पुर्ननिर्माण व विकासासाठी आंतरराष्ट्रीय बँक
 २.२.४ नव आंतरराष्ट्रीय आर्थिक व्यवस्था
 २.२.५ उत्तर-दक्षिण संवाद
 २.२.६ आंतरराष्ट्रीय व्यापाराचे राजकारण :
२.३ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ
२.४ स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे
२.५ सारांश
२.६ सरावासाठी स्वाध्याय
२.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

## २.० उद्दिष्टे

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर, आपल्याला

* आंतरराष्ट्रीय संबंधाबाबत आर्थिक व विकासात्मक दृष्टीकोन समजण्यास सहज शक्य होते.
* नव आंतरराष्ट्रीय आर्थिक व्यवस्थेची मागणी व त्यामागील कारणे यांचा शोध घेणे शक्य होईल.

* विकसित व विकसनशील देशांमधील संघर्षाचे स्वरूप व त्याचे निराकरण करण्याचे प्रयत्न कसे झाले हे स्पष्ट होईल.
* विकसित व विकसनशील देशांतील आंतरराष्ट्रीय व्यापार व त्यामागील राजकाणाचा वेध घेणे शक्य होईल.

## २.१ प्रास्ताविक

राजकीय व्यवस्था व आर्थिक व्यवस्था यांचा संबंध केवळ राष्ट्रीय नव्हे तर आंतरराष्ट्रीय स्तरावर सुद्धा असतो. राजकीय व्यवस्थेचे निर्धारण व त्याचे स्वरूप बहुतांशपणे आर्थिक व्यवस्थेवर निर्भर असते. आंतरराष्ट्रीय स्तरावर ज्या संस्था अथवा संघटनां यांची निर्मित, संघर्ष व टकराव होत असतो त्यापाठीमागे इतर कारणांपेक्षा आर्थिक कारणे महत्त्वाची असतात. आंतरराष्ट्रीय राजकारणाचा अभ्यास व विश्लेषणात आर्थिक घटकांना दुर्लक्षित करता येत नाही. त्यामुळे राजकीय अर्थशास्त्र ही नवीन संकल्पना उदयास आली.

आंतरराष्ट्रीय राजकारणातील भेदभावपूर्ण आंतरराष्ट्रीय आर्थिक व्यवस्थेच्या विरुद्ध विकसनशील राष्ट्रांद्वारे नव आंतरराष्ट्रीय आर्थिक व्यवस्थेची मागणी केल्या गेली. कारण विकसनशील व अर्धविकसित देशांच्या समस्या या अर्थकारणाशी संबंधित आहे. नव आंतरराष्ट्रीय आर्थिक व्यवस्थेची मागणी मागे घेण्यासाठी विकसित देशांनी तिसऱ्या जगातील देशांसमोर उत्तर-दक्षिण संवादाचा प्रस्ताव ठेवला. आंतरराष्ट्रीय राजकारणाला दशा दिशा देणाऱ्या प्रमुख घटनांपैकी ब्रेटन वुड व्यवस्था, नव आंतरराष्ट्रीय आर्थिक व्यवस्थेची मागणी, उत्तर-दक्षिण संवाद तसेच गॅट व नंतर डब्ल्यू.टी.ओ.च्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय पातळीवर जे राजकारण झाले त्याचा आंतरराष्ट्रीय संबंध समजून घेण्याच्या दृष्टीकोनातून अभ्यास होणे आवश्यक आहे.

आंतरराष्ट्रीय स्तरावर जे आर्थिक व विकास संदर्भात मुद्दे मांडल्या गेले त्यामध्ये प्रकर्षाने नव आंतरराष्ट्रीय आर्थिक व्यवस्थेची मागणी वैशिष्टपूर्ण होय. ही संकल्पना समता, सार्वभौम समानता, समान हित व सहकार्य यावर आधारीत होय. सामाजिक व आर्थिक व्यवस्था कोणत्याही स्वरूपाची असो ही व्यवस्था अस्तित्वात असलेला अन्याय दूर करून विकसित व विकसनशील देशांतील अंतर दूर करून आर्थिक व सामाजिक विकासाची प्रक्रिया निरंतरपणे चालू ठेवण्यास सहाय्यक ठरेल. त्यामुळे भविष्यात शांतता व न्याय प्रस्थापित होईल. आंतरराष्ट्रीय संबंधाच्या आर्थिक व विकासात्मक प्रक्रियेत या घटकांचे महत्त्व विशद करण्याचा प्रयत्न पुढीलप्रमाणे करण्यात आला आहे.

## २.२ विषय विवेचन

### २.२.१ : दि ब्रेटन वुड व्यवस्था (The Bretton Woods system)

द्वितीय महायुद्धानंतर जागतिक आर्थिक व्यवस्था मोडकळीस आल्याने व आर्थिक समस्यांचा निपटारा करण्यासाठी १९४४ साली ४४ देशांमधील ७३० प्रतिनिधी अमेरिकेतील न्यू हॅम्पशायर स्थित ब्रेटन वुड मधील होटेल माऊंट येथे संयुक्त राष्ट्रसंघाच्या मौद्रिक व वित्तिय परीषदेत एकत्रित आले. याच परीषदेला ब्रेटन वुड परीषद असे संबोधिल्या गेले. विविध देशांतील प्रतिनिधींनी १ ते २२ जुलै १९४४ दरम्यान सखोल चिंतन करून ब्रेटन वुड करारावर हस्ताक्षर केले. आंतरराष्ट्रीय मौद्रिक व्यवस्थेचे संचालन करण्यासाठी संस्था, नियम, प्रक्रिया यांची रचना करण्यासंदर्भात या परिषदेत चर्चा झाली. या करारा अंतर्गत जागतिकर स्तरावर आंतरराष्ट्रीय व इंटरनॅशनल बँक फॉर रिकन्स्ट्रशन अॅन्ड डेव्हलपमेंट (IBRD) या दोन संस्थाचा उदय झाला. या संस्था सध्या जागतिक बँक समूहाचा एक भाग होय.

जागतिक स्तरावर एकूण असलेल्या सोन्याच्या साठ्यापैकी दोन तृतीयांश सोन्यावर अमेरिकेचे नियंत्रण होय. अमेरिकेने ब्रेटन वुड व्यवस्था ही अमेरिकन डॉलर व सोने यावर आधारीत असावी अशी मागणी केली. सोविएट रशिया प्रारंभी या परीषदेत सहभागी झाला पण कालांतराने ब्रेटन वुड व्यवस्था ही 'वॉल स्ट्रिटची शाखा' होय असे घोषित करून करारावर स्वाक्षरी करण्यास व संमती देण्यास नकार दिला. या संस्था १९४५ पासून अस्तित्वात आल्या. या दोन्ही संस्थाचा थोडक्यात आढावा व कार्य पुढीलप्रमाणे :

### २.२.२ : आंतरराष्ट्रीय मुद्रा कोष (IMF) :

ब्रेटन वुड संमेलनामध्ये आंतरराष्ट्रीय मुद्रा कोष स्थापण्या संदर्भात निर्णय झाला. अधिकृतपणे २७ डिसेंबर १९४५ रोजी या कोषाची स्थापना झाली. अमेरिकेतील वॉशिंग्टन डि.सी. येथे कोषाचे मुख्य कार्यालय आहे. कोषाने आपल्या वित्तीय प्रक्रियेला ०१ मार्च १९४७ रोजी प्रारंभ केला. कोणताही विनियम दर जो १० टक्केच्या वर असेल त्याला आंतरराष्ट्रीय मुद्रा कोषाची मान्यता घ्यावी लागते. देशांच्या मौद्रिक निती संदर्भात मार्गदर्शन व सल्ला देण्याचे कार्य कोष करते. आंतरराष्ट्रीय मुद्रा कोषाचे महत्त्वाचे कार्य पुढीलप्रमाणे :

१. सदस्य देशांची आर्थिक स्थिती सुधारणे.

२. आंतरराष्ट्रीय आर्थिक सहकार्य, आंतरराष्ट्रीय व्यापार, रोजगार, विनिमय दर स्थिरता, याबाबत पुढाकार घेणे.

३. आर्थिक भुगतानाबाबत सदस्य देशांना वित्तीय स्त्रोत उपलब्ध करून देणे.

## आंतरराष्ट्रीय मुद्रा कोषाची रचना :

**बोर्ड ऑफ गव्हर्नर :** प्रत्येक सदस्य देशाला दोन सदस्य नियुक्त करण्याची परवानगी आहे. बोर्डाची वर्षातून एकदा बैठक होते. कार्यकारी संचालकांची निवडणूक किंवा नियुक्ती करण्याची जबाबदारी बोर्डाची असते. देशांना सदस्यत्व बहाल करणे, रद्द करणे, करारामध्ये किंवा उपविधिमध्ये दुरुस्ती करणे इत्यादी अधिकार बोर्डाला आहे. बोर्डाला सल्ला देण्यासाठी आंतरराष्ट्री मुद्रा आणि वित्तिय समिती तसेच विकास समिती आहे.

**कार्यकारी समिती :** कार्यकारी समितीच्या संचालकांची सदस्य संख्या २४ असून सर्व १८८ देशांमधून क्रमवार पद्धतीने सदस्य संचालकांची निवड केली जाते. २००८ मधील दुरुस्ती अनुसार ८ सदस्य देश आपला स्वत:चा कार्यकारी संचालक नेमू शकतात. यामध्ये अमेरिका, जपान, जर्मनी, फ्रांस, इंग्लड, चीन, रशिया आणि सौदी अरब देशांचा समावेश होय. बाकी १६ सदस्य संचालक ४ ते २२ या समुहाला एक या प्रमाणात संचालक नियुक्त करू शकतात.

**व्यवस्थापकीय संचालक :** आंतरराष्ट्रीय मुद्रा कोषाचे नेतृत्व व्यवस्थापकीय संचालक करीत असतो तसेच तो संपूर्ण कर्मचारी व कार्यकारी समितीचा अध्यक्ष असतो. त्याला सहाय्य करण्यासाठी चार उपव्यवस्थापकीय संचालक असतात. परंपरे प्रमाणे आंतरराष्ट्रीय मुद्रा कोषचा व्यवस्थापकीय संचालक युरोपियन तर जागतिक बँकेचा अध्यक्ष अमेरिकन असतो. पण या परंपरेला आता आव्हान दिले जात आहे. ब्रिक्स देशांच्या सदस्यांनी या परंपरेला विरोध करून गुणवत्तेच्या आधारावर इतर देशांना संधी द्यावी अशी मागणी केली.

**कार्य :** ब्रेटन वुडस् परीषदेत आंतरराष्ट्रीय मुद्रा कोषला तीन महत्त्वाचे कार्य सोपविल्या गेले. पहिले, विनिमय धोरणा संदर्भात आचारसंहिता आणणे व चालु खात्याच्या भुगतान व्यवहारावर बंधने आणणे. दुसरे, सदस्य राष्ट्रांना भुगतान असंतुलन दुरुस्ती अथवा ती टाळण्यासाठी वित्तिय पुरवठा करणे. तीसरे, आंतरराष्ट्रीय मुद्रा विषयी सदस्यांना एकमेकांबाबत संवाद व सहकार्य करण्यासाठी व्यासपीठ उपलब्ध करून देणे व सदस्यांना भुगताना संदर्भात येणाऱ्या सदस्येचे निराकरण करणे. आंतरराष्ट्रीय

मुद्रा कोष सदस्य राष्ट्रांना वित्तिय पुरवठा करेल व त्यासंदर्भात दोन मुलभूत तत्वे पाळले जातील. पहिले, भुगताना संदर्भात सदस्य राष्ट्रांच्या समस्येचे जसे निराकरण झाले तसे त्यांनी घेतलेले कर्ज वापस करावे व ज्या चलना मध्ये कर्ज घेतलेले आहे त्याच चलनाद्वारे कर्ज परत करण्याची अपेक्षा सदस्य राष्ट्रांकडून करण्यात आली. दुसरे, कर्ज घेतांना भुगतान समस्यांचा निपटारा कशाप्रकारे केल्या जाईल, कर्जाचा परतावा कशा प्रकारे होईल याबाबत आंतरराष्ट्रीय मुद्रा कोषला आश्वस्त करणे आवश्यक असेल. विशेष बाबतीत आंतरराष्ट्रीय मुद्रा कोष कर्ज परतावा कालावधी १० वर्षे इतका वाढवू शकते.

आंतरराष्ट्रीय मुद्रा कोषमध्ये वित्तिय योगदानाच्या प्रमाणात सदस्य राष्ट्रांना मतदानाचा अधिकार होता. त्यामुळे ज्या राष्ट्रांचे योगदान जास्त त्यांच्या मतदानाचे मूल्य अधिक, याचा सरळ फायदा ब्रिटन, अमेरिका या सारख्या विकसित राष्ट्रांना अधिक होत होता. त्यामुळे विनिमय दरासंदर्भात जे धोरण आखल्या जात असे त्यावर पाश्चिमात्य राष्ट्रांचा प्रभाव होता. आंतरराष्ट्रीय मुद्रा कोषचे महत्त्वाचे कार्य म्हणजे घरेलु व आंतरराष्ट्रीय स्तरावर वित्तिय बाबींचे अवलोकन करणे जेणेकरून भुगतान संदर्भात समानता राखल्या जाईल.

## २.२.३ : पुर्ननिर्माण व विकासासाठी आंरतराष्ट्रीय बँक (IBRD) :

आंतरराष्ट्रीय मुद्रा कोषासोबत पुर्ननिर्माण व विकासासाठी आंतरराष्ट्रीय बँकची स्थापना १९४५ साली झाली व १९४७ साली संयुक्त राष्ट्रसंघाचे विशेष अभिकरण म्हणून त्याला मान्यता प्राप्त झाली. ही बँक स्थापण्यामागे प्रमुख उद्दिष्ट म्हणजे द्वितीय महायुद्धानंतर युरोपची जी आर्थिक स्थिती बिघडली त्याला सावरण्यासाठी प्रामुख्याने या बँकेची स्थापना झाली. युरोपचे पुर्ननिर्माण झाल्यानंतर बँकेनी आपला विस्तार वाढविला व संपूर्ण जगाचा आर्थिक विकास व दारिद्रय उन्मूलन आपले उद्दिष्ट्ये ठेवले. बँक सदस्य देशांना सवलतीच्या दराने वित्तीय सहाय्यता पुरवित असते. यामध्ये परिवहन व मुलभूत सुविधा सुधारणेसाठी, शिक्षण, पर्यावरण, उर्जा, आरोग्य, अन्नधान्य, जल तसेच सांडपाणी व्यवस्थापनासाठी असलेल्या प्रोजेक्टला साहाय्यता देते.

### पुर्ननिर्माण व विकासासाठी आंतरराष्ट्रीय बँकेची रचना :

बँकेचे संचालन जागतिक बँक समुहाच्या बोर्ड ऑफ गव्हर्नर कडून केले जाते. बँकेची वर्षातून एकदा वार्षिक सभा होते. प्रत्येक सदस्य देशाचा एक गव्हर्नर

असतो तो साधारणत: देशाचा अर्थमंत्री किंवा अर्थसचिव असतो. बोर्ड ऑफ गव्हर्नर ने नियमित कार्य करण्याचे जसे कर्ज देण्यासंबंधी व्यवहार कार्यकारी संचालक मंडळाकडे प्रदत्त केले. कार्यकारी संचालक मंडळाकडे २५ संचालक असतात व त्याचे अध्यक्षस्थान जागतिक बँक समुहाचा अध्यक्ष भूषवितो.

**उद्दिष्टे व कार्य :** पुर्ननिर्माण व विकास आंतरराष्ट्रीय बँकेचा कार्यविस्तार केवळ उत्पादक वस्तु पूरतीच मर्यादित आहे. जसे शेती व ग्रामीण विकास, उर्जा, शिक्षण, आरोग्य, कुटुंब नियोजन व पोषक आहार, रस्ते व रेल्वे, संसूचन, शहरी बंदरे व उर्जा सवलती इ. कर्ज देतांना त्याच्या परतावाची क्षमता पाहूनच कर्ज दिले जाते. कर्ज देतांना शासनाची हमी आवश्यक असते. कारण बँक कर्ज देण्यासाठी पैशाची उभारणी खाजगी भांडवली बाजारातून करत असते कोणत्या शासनाकडून नाही. त्यामुळे आंतरराष्ट्रीय वित्तसंबंधी आधारभूत तत्वांचे कठोरपणे पालन केले जाते. बँकेचे मुख्य कार्य म्हणजे विकास कामासाठी विविध राष्ट्रांना वित्तपुरवठा करणे जेणेकरून राष्ट्राच्या उत्पादकतेत वृद्धी होईल. भारताने सुद्धा रेल्वेच्या पुर्नरचनेसाठी व विकासासाठी कर्ज स्विकारले आहे. बँक अतिशय माफक व्याजात कर्ज उपलब्ध करून देते पण त्याचबरोबर दिलेल्या पैशाचा विनियोग करतील अटीनुसारच होत आहे कि नाही यावर सुद्धा लक्ष ठेवते. बँकेने सामाजिक प्रोजेक्टसाठी कर्ज पुरवठा करण्यास मर्यादा आणलेल्या आहे. उदा. हॉस्पिटल व शाळा बांधणी, स्वच्छता तसेच सामन्य हेतुसाठी कर्ज व भुगतान संदर्भात बँक कर्ज उपलब्ध करून देत नाही. पण त्याच बरोबर कर्जदार राष्ट्रांना आर्थिक विकासाठी कर्ज उपलब्ध करून देण्याबाबत बँकेने उदार दृष्टीकोन स्विकारलेला आहे. राष्ट्रांना त्यांच्या विकास नियोजनात मदत करणे, प्रोजेक्ट प्रस्तावासाठी मदत करणे, वरीष्ठ विकास अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देणे इ. कार्य बँक करीत असते. बँकेच्या एकंदरीत दृष्टीकोनात बदल होऊन सुद्धा बँक अविकसित राष्ट्रांच्या भांडवली गरजा पूर्ण करण्यात संसाधने व क्षमतेच्या बाबतीत मर्यादीत ठरली.

## स्वयं-अध्ययनासाठी-१

(१) ब्रेटन वुड करार केव्हा अस्तित्वात आला?

(२) आंतरराष्ट्रीय मुद्रा कोषच्या वित्तिय प्रक्रियेला प्रारंभ केव्हा झाला?

(३) पुर्ननिर्माण व विकासाठी आंतरराष्ट्रीय बँक कोणत्या कारणास्तव निर्माण करण्यात आली.

## २.२.४ : नव आंतरराष्ट्रीय आर्थिक व्यवस्था (NIEO) :

जगातील भांडवलवादी व विकसित देशांविरुद्ध समांतर आर्थिक व्यवस्था निर्माण करण्याच्या प्रयत्नातून विकसनशील देशांनी उभारलेल्या आर्थिक व्यवस्थेला नव आंतरराष्ट्रीय आर्थिक व्यवस्था म्हटली जाते. १९७० साली संयुक्त राष्ट्र संघाच्या व्यापार व विकास परीषदेत काही विकसनशील देशांनी एक प्रस्ताव ठेवला. ज्यामध्ये व्यापारा संबंधी शर्ती, विकासासाठी अर्थसाहाय्य तसेच करांमध्ये सुट इत्यादी मुद्यांचा समावेश होता. हा प्रस्ताव म्हणजे संपूर्ण आंतरराष्ट्रीय अर्थव्यवस्थेची पूर्नरचना व पूर्नमांडणी करण्याचा प्रयत्न होता तसेच ब्रेटन वुड्स व्यवस्थेला पर्याय म्हणून तिसऱ्या जगतानी आपले हित समोर ठेवून सादर केलेला हा प्रस्ताव होता. १ मे १९७४ रोजी संयुक्त राष्ट्रसंघाच्या आमसभेने सहाव्या विशेष अधिवेशनात नव आंतरराष्ट्रीय आर्थिक व्यवस्था स्थापने सदर्भांत प्रस्तावास स्विकृती दिली. अर्थसहाय्य, आर्थिक विकासासाठी भांडवलवादी देशांच्या मर्जीवर अवलंबून न राहता, आपण कच्चा माल पुरवठा करणारे देश न राहता आपल्याला उत्पादक देशाचा अधिकार प्रदान असावा तसेच एकमेकाच्या सार्वभौमत्वाचा आदर करणे या नवीन व्यवस्थेचे उद्दिष्टे होय. ही संकल्पना विकसनशील देशांच्या राष्ट्रीय हिताला अनुकूल आहे. कारण जगातील अर्ध्यापेक्षा जास्त कच्चा मालावर विकसनशील देशांचा क्षेत्राधिकार होय. आर्थिक स्वाधीनता, स्वावलंबन व स्वाभिमान यांच्या प्रस्थापनेसाठी तिसऱ्या जगातील देशांनी नव आंतरराष्ट्रीय आर्थिक व्यवस्थेची मागणी केली. या संकल्पनेचे मुलभूत तत्त्वे खालीलप्रमाणे :

(१) कच्च्या मालाच्या किमतीमध्ये घट अथवा वृद्धी करण्याच्या भांडवलवादी प्रवृत्तीला विरोध तसेच कच्चा माल व पक्का माल यांच्या किमंतीमध्ये तफावत नको.

(२) विकसित देशांसोबत व्यापारीकरणाला महत्त्व.

(३) जागतिक अर्थ व्यवस्थेचे सामान्यीकरण करणे.

(४) विकसनशील देशांद्वारा उत्पादित औद्योगिक मालाच्या निर्यातीला प्रोत्साहन देणे.

(५) विकसित व विकसनशील देशांमधील तांत्रिक प्रगती संदर्भातील तफावत दूर करणे.

(६) विकसनशील देशांवरील आर्थिक कर्जाचे ओझे कमी करणे.
(७) बहुराष्ट्रीय कंपन्यांच्या व्यवहारांवर योग्य ते नियंत्रणे लादणे.
(८) डंकेल प्रस्तावा संदर्भात अर्थविकसित देशांचे हित जोपासणे.
(९) नैसर्गिक संपत्तीवरील संबंधित देशाची सार्वभौमता मान्य करणे.
(१०) पर्यावरण संतुलन व संवर्धन इ. विषयी आपली भूमिका आग्रहाने मांडणे.

नव आंतरराष्ट्रीय आर्थिक व्यवस्थेची मागणी सर्वप्रथम डॉ. कुर्तवाल्डहिम यांनी १९७४ मध्ये केली. संयुक्त राष्ट्रसंघ महासभेने विशेष अधिवेशनात नव आंतरराष्ट्रीय आर्थिक व्यवस्था संदर्भात एक घोषणापत्र जारी केले तसेच कार्यक्रम घोषित केला. नव्या जागतिक अर्थव्यवस्थेची मागणी काही प्रमुख मूद्द्यां भोवती केंद्रित होती. यामध्ये गरीब राष्ट्रांना संसाधनाचे योग्य आर्थिक मूल्य देणे, त्यांच्याद्वारे खरेदी केलेल्या यंत्रसामग्रीवर वाजवी पेक्षा जास्त नफा न कमविणे तसेच तंत्रज्ञानाचे हस्तांतरण करतांना आफ्रिका व आशिया खंडातील देश स्वावलंबी होईल याची दक्षता घेणे. यासंदर्भात नव आंतरराष्ट्रीय आर्थिक व्यवस्थेची उद्दिष्टे पुढीलप्रमाणे :

(१) जगातील व्यापारीक देशांमध्ये सामाजिक न्यायाची प्रस्थापना करणे. यामध्ये प्रचलित संस्थांची पुर्नबांधणी करणे व नवीन संघटनांची स्थापना करणे ज्या माध्यमातून व्यापार, तंत्रज्ञान व भांडवल यांचा प्रवाह विश्व जागतिक अर्थकारण व अर्धविकसित देशांच्या फायद्यासाठी सामान्य हिताला नियंत्रित करेल.
(२) जागतिक स्त्रोतांचे समान वितरण करून त्याचा प्रवाह श्रीमंत राष्ट्रांकडून गरीब राष्ट्रांकडे जास्त प्रमाणात वाढविणे.
(३) गरीब व श्रीमंत राष्ट्रांमधील जीवनशैली जगण्यासंदर्भात जी कमालीची तफावत आढळते ती कमी करणे.
(४) आंतरराष्ट्रीय व्यवहारात निर्णय निर्धारण प्रक्रियेत गरीब देशांचा सहभाग व त्यांच्या मतांना महत्त्व प्राप्त करून देणे.
(५) स्वावलंबन व दक्षिण-दक्षिण सहकार्य यांच्या माध्यमातून गरीब देशांमध्ये आर्थिक विकास प्रक्रिया प्रारंभ करणे.
(६) भुगतान समस्या, आर्थिक असमानता, कर्जाची समस्या, परकीय चलन प्रश्न इत्यादी गंभीर समस्यांचा सामना करणे.

नव आंतरराष्ट्रीय आर्थिक व्यवस्थेच्या तत्त्व व उद्दिष्टांमध्ये जगात आर्थिक समानता व सामाजिक न्यायावर आर्थिक व्यवस्थेची निर्मिती करण्यावर भर देण्यात

आला. पण ही व्यवस्था नेमकी कशी आणायची याचा कृती कार्यक्रम सुद्धा तयार करण्यात आला. यातील काही ठळक बाबी खालीलप्रमाणे.

(१) आंतरराष्ट्रीय आर्थिक सहयोगाच्या दृष्टीने एका नवीन कार्यक्रमाचा प्रारंभ केल्या गेला. ज्याचा उद्देश अल्पविकसित देशांमधील विकास संदर्भात अंतर कमी करणे होय. याला 'अंकटाड' (UNCTAD) असे म्हटल्या जाते. अंकटाडची स्थापना संयुक्त राष्ट्रसंघाच्या महासभेत एक स्थायी विभागाच्या स्वरूपात दिनांक ३० डिसेंबर १९६४ मध्ये केल्या गेली. जागतिक व्यापार विकसित करणे व अर्धविकसित देशांतील जनतेचे जीवनस्तर वाढविण्याच्या दिशेने आंतरराष्ट्रीय समुदायाने केलेला हा महत्त्वपूर्ण प्रयत्न होय.

(२) नव आंतरराष्ट्रीय आर्थिक व्यवस्था प्रचलित मुक्त बाजार संकल्पनेला विरोध करते. या बदल्यात गरीब राष्ट्रांची आर्थिक विकासाची गती वाढविणे व जागतिक व्यापारात त्यांचा हिस्सा वाढेल अश्या रितीने व्यापाराच्या शर्ती व अटी निर्माण करणे होय.

(३) आंतरराष्ट्रीय वित्तिय व्यवस्थेची पुर्नबांधणी करून त्यामध्ये विकसनशील व अर्धविकसित देशांचा सहभाग विकसित देशांइतकाच महत्त्वपूर्ण राहील याची व्यवस्था करणे.

## स्वयं-अध्ययनासाठी-२

(१) संयुक्त राष्ट्रसंघाच्या विशेष महासभेने कोणत्या दिवशी नव आंतरराष्ट्रीय आर्थिक व्यवस्थेच्या प्रस्तावाला मान्यता दिली?

(२) नव आंतरराष्ट्रीय आर्थिक व्यवस्था निर्माण करण्यामागे हेतू कोणता?

___

___

___

___

## २.२.५ : उत्तर–दक्षिण संवाद (North-South Dialogue) :

विकसनशील देशांनी नव आंतरराष्ट्रीय आर्थिक व्यवस्थेची मागणी केल्यानंतर विकसित देशांनी या मागणीचा जोर कमी करण्याच्या दृष्टीने उत्तर–दक्षिण संवादाची संकल्पना मांडली. सर्वप्रथम उत्तर–दक्षिण या संकल्पना म्हणजे काय हे समजून घेणे आवश्यक आहे.

**उत्तर :** उत्तर म्हणजे उत्तर गोलार्धातील असे पश्चिमी विकसित देश ज्यांची अर्थव्यवस्था भांडवलवादी विचारधारेवर आधारीत आहे. ज्यांनी विज्ञान, तंत्रज्ञान व औद्योगिक क्षेत्रात प्रचंड प्रगती केली आहे. भांडवत व बचत निर्माण करण्याचे प्रमाण मोठे आहे व जेथे राजकीय स्थिरता आहे असे सर्व देश 'उत्तर' या संज्ञेशी संबंधित आहे. उदा. अमेरिका, कॅनडा, इंग्लंड, फ्रांस, जर्मनी इ. देश उत्तर गोलार्धात येतात.

**दक्षिण :** दक्षिण म्हणजे दक्षिण गोलार्धातील अधिकांश विकसनशील तिसऱ्या जगतातील देश होय. या देशांच्या समस्येचे स्वरूप मोठे आहे. भांडवलाची कमतरता, संसाधनाच्या प्रमाणात जास्त लोकसंख्या, दारिद्र्य, बेरोजगारी, शेतीवर आधारीत अर्थव्यवस्था, विज्ञान व तंत्रज्ञान प्रगतीचा अभाव तसेच परंपराप्रिय व रूढीवादी समाज असे अनेक समस्या या देशात आहे. त्यामुळे विकसित देशांच्या तुलनेत विकसनशिल देश कोणत्याही स्पर्धेत त्यांचा सामना करू शकत नाही. द्वितीय महायुद्धानंतर विकसित व अविकसित अशी जागतिक विभागणी झाली. या संकल्पनेला मूर्त स्वरूप देण्याचे श्रेय अमेरिकन राष्ट्राध्यक्ष ट्रुमन यांच्याकडे जाते. अविकसित देशांना विकसित देश, विकसनशील देश व तिसऱ्या जगतातील देश या नावाने संबोधिल्या जाते.

विकसित व अविकसित देशांमधील दरी सरत्या वर्षासोबत अजूनच वाढत गेली. विकसित देश अधिक श्रीमंत होत गेले तर अविकसित देशांच्या विकास प्रक्रियेत कोणतीही गती दिसून आली नाही. दक्षिणेतील विकसनशील देशांची लोकसंख्या जगाच्या एकूण लोकसंख्येच्या ७३.६ टक्के होय पण जगातील एकूण उत्पादनात त्यांचा हिस्सा केवळ २१.५ टक्के होय. याउलट उत्तरेतील विकसित देशांतील लोकसंख्या जगातील एकूण लोकसंख्येच्या केवळ २६.४ टक्के होय पण जगाच्या उत्पादनातील एकूण हिस्सा ७८.५ टक्के होय. विकसनशील देशांतील दरडोई उत्पन्न ७३० डॉलर आहे तर विकसित देशांतील दरडोई उत्पन्न १०,७२० डॉलर आहे. ब्रेटन वुड्स व्यवस्था अविकसित देशांच्या दृष्टीने फारशी परिणामकारक राहीली नाही. कारण त्यांना जुन्या औद्योगिक व्यवस्थेच्या आधारावर वागणुक दिल्या गेली. विकसित देशांना जो आर्थिक

निकष लावल्या गेल्या तोच अविकसित देशांना लावल्या गेला. अविकसित देशांच्या मुलभूत गरजा लक्षात न घेता अस्तित्वात असलेल्या असमानतेचे पोषण व संवर्धन केल्या गेले. आयएमएफ व गॅटनी अविकसित देशांच्या गरजांकडे लक्षच दिले नाही. इतकेच नव्हे आयबीआरडी ने द्वितीय महायुद्धात आर्थिकदृष्ट्या उध्वस्त झालेल्या पाश्चिमात्य व युरोप देशांच्या आर्थिक संरचना पुर्नरचित करण्याकडेच लक्ष दिले.

१९६० नंतर दक्षिणेकडील राष्ट्रांमध्ये अस्तित्वात असलेल्या आंतरराष्ट्रीय व्यापार व्यवस्थेमध्ये जोपर्यंत बदल होत नाही तोपर्यंत त्यांचा दर्जा व प्रतिष्ठेमध्ये कोणताही बदल होऊ शकणार नाही. विकसनशील देशांनी संयुक्त राष्ट्रसंघाच्या व्यासपीठावरून विविध प्रसंगी या संदर्भात चर्चा घडवून आणली व स्वत:चा दबावगट निर्माण केला ज्याला ७ देशांचा समूह म्हणजे जी-७७ असे संबोधिले गेले. या समूहाने आंतरराष्ट्रीय आर्थिक संबंधामध्ये रचनात्मक बदल घडविण्यासाठी व विकसित तसेच अविकसित देशांमध्ये सहकार्य निर्माण व्हावे यासाठी विविध आंतरराष्ट्रीय समित्यांवर दबाव निर्माण करण्याचा प्रयत्न केला. यासंदर्भात उत्तर-दक्षिण संवादाच्या दृष्टीने खालीलप्रमाणे प्रयत्न केल्या गेले.

बेलग्रेड संमेलन, १९६२ : सप्टेंबर १९६२ मध्ये बेलग्रेड संमेलनामध्ये जी-७७ या समूहाने आपले मत पहिल्यांदा प्रातिनिधिक स्वरूपात मांडले. जगात जी वैज्ञानिक व तांत्रिक क्रांती झाली त्याची अंमलबजावणी आर्थिक विकासाच्या सर्व क्षेत्रांमध्ये व्हावी जेणेकरून आंतरराष्ट्रीय न्याय साध्य करता येईल. १९७० सप्टेंबरच्या लुसाका येथील अलिप्त राष्ट्रांच्या संमेलनात अधिकृतपणे घोषित करण्यात आले की, आर्थिक विकास हा आंतरराष्ट्रीय समुदायाचा अविभाज्य अधिकार असून, सर्व राज्यांनी नविन व न्यायपूर्ण आर्थिक व्यवस्था निर्माण करण्यासाठी आपले योगदान देणे आवश्यक असून सर्व राष्ट्रांना भयमुक्त वातावरणात जीवन जगण्याचा अधिकार प्राप्त आहे.

अंकटाड संमेलन, १९६४ : अविकसित देशांकडून व्यापारा संदर्भात चांगल्या हमीची मागणी सतत येत असल्याने १९६४ साली आंतरराष्ट्रीय समुदायाने संयुक्त राष्ट्रसंघाचे व्यापार व विकास परीषद निर्माण केली (UNCTAD) कि जी संयुक्त राष्ट्रसंघाच्या आमसभेची अभिकरण (Agency) म्हणून कार्य करेल. या परीषदेची पहिली सभा १९६४ मध्ये जेनेव्हा येथे भरली. यामध्ये व्यापार वृद्धी, तिसऱ्या जगतातील उत्पादनाला मदत होईल अश्या रितीने करआकारणी इ. बाबी यामध्ये चर्चिल्या गेला. विकसित देशांनी यासंदर्भात कारवाईचे आश्वासन दिले पण आश्वासनाची पूर्तता न झाल्याने १९६७ मध्ये अलझायर येथे तिसऱ्या जगतातील देशांनी औद्योगिक देशांच्या

संकुचित दृष्टीकोनावर टिका करून जागतिक बाजारात स्वत:च्या पतसुधारणेसाठी सीमा शुल्क आकारणी व व्यापारी विशेषहक्का बाबत अनुकुल धोरण निर्माण करण्याची मागणी केली. पण विकसित राष्ट्रांच्या धोरणांत कोणताही बदल न झाल्याने व त्यांच्याकडून कोणत्याही अपेक्षांची पूर्तता होणे संभव नसल्याने तिसऱ्या जगातातील राष्ट्रांनी स्वावलंबनाचे धोरण स्विकारले.

१९७२ सालच्या सॅंटिगोच्या तिसऱ्या अंकटाडच्या परीषदेत अविकसित देशांनी प्रचलित द्विपक्षीय व बहुपक्षीय साहाय्यता धोरणांवर टिका केली. विकसित राष्ट्रांना त्यांच्या धोरणांबाबत पूर्नविचार करण्यास भाग पाडले. पण सॅंटिगोच्या या परीषदेतून अविकसित राष्ट्रांच्या पदरी फारसे यश हाती आले नाही. १९७३ साली अरब राष्ट्रांनी तेलाच्या माध्यमातून विकसित राष्ट्रांना त्यांचे धोरण बदलविण्यास भाग पाडले. त्यामुळे तिसऱ्या जगतातील राष्ट्रांना सुद्धा आपल्या देशांतील कच्चा मालाचा वापर दबाव गटासारखा करण्यास भाग पडले. अरब राष्ट्रांच्या तेल धोरणामुळे विकसित देशांना अविकसित राष्ट्रांच्या मागणीकडे दुर्लक्ष करता येणे शक्य नव्हते. १९७६ साली झालेल्या नैरोबी येथील पाचव्या अंकटाड परीषदेत तिसऱ्या जगताने विकसित देशांवरील आपला दबाव कायम ठेवला.

पॅरिस संमेलन, १९७५ : संयुक्त राष्ट्रसंघ महासभाद्वारा नव आंतरराष्ट्रीय आर्थिक व्यवस्थेच्या घोषणा संदर्भात एक वर्षाच्या आंत अमेरिकाद्वारा आंतरराष्ट्रीय आर्थिक सहयोग संदर्भात पॅरिस येथे संमेलन बोलविण्यात आले. यालाच 'आंतरराष्ट्रीय आर्थिक सहयोग संमेलन' या नावाने ओळखल्या जाते. या संमेलनात ०८ विकसित व १९ विकसनशील देशांनी सहभाग घेतला होता. जून १९७७ मध्ये संमेलन समाप्त झाले. तब्बल १८ महिने चाललेले हे संमेलन उत्तर-दक्षिण देशांमध्ये आर्थिक मतभेद झाल्याने विफल ठरले.

ब्रांट आयोग, १९७७ : पॅरिस संमेलनाच्या विफलते नंतर जागतिक बँकेचे अध्यक्ष राबर्ट मैकनामार यांनी आंतरराष्ट्रीय विकास संबंधी मुद्यांचा निपटारा करण्याच्या दृष्टीने गैर-शासकीय स्वतंत्र आयोग स्थापन करण्याचा प्रस्ताव ठेवला तथा १९७७ पासून आयोगाचे कार्य सुरू झाले. पश्चिम जर्मनीचे भूतपूर्व चांसलर विलीब्रांट या आयोगाचे अध्यक्ष असल्याने त्याचे नाव ब्रांट आयोग असे पडले. ब्रांट आयोगाचे उत्तर-दक्षिण संवादावर जोर देऊन खालील मुद्यांसदर्भात शिफारसी केल्या -

* विकसनशील देशांसाठी विदेशी कर्जाची सोय : ब्रांट आयोगाने तिसऱ्या जगताचा विकास व दारिद्रय निर्मुलनासाठी मोठ्या प्रमाणात संसाधनाच्या

हस्तांतरणावर भर दिला. यामध्ये अविकसित राष्ट्रांच्या अधिकृत वित्त साहायत्तेमध्ये वाढ करणे तसेच जागतिक बँक व आंतरराष्ट्रीय मुद्रा कोष यांच्या वित्तिय धोरणांमध्ये लवचिकता आणणे.

* आंतरराष्ट्रीय वित्तिय सुधार : वित्तिय पुरवठ्या संदर्भात विकसित देशांना अनुकूल जे धोरण होते त्यामध्ये फेरबदल करून अविकसित राष्ट्रांना वाटणाऱ्या जाचक अटी संदर्भात विचार करणे.
* तंत्रज्ञानाचे हस्तांतरण : विकसित राष्ट्रांनी अविकसित राष्ट्रांना तंत्रज्ञान विकण्यापेक्षा त्याचे हस्तांरण करावे.
* बहुराष्ट्रीय व्यापार : आंतरराष्ट्रीय व्यापारा संदर्भात अविकसित राष्ट्रांच्या शासनाला हस्तक्षेप करण्याचा अधिकार प्रदान करावा. अविकसित राष्टांना व्यापारामधील जास्तीत जास्त वाटा प्राप्त व्हावा हा त्यामागील उद्देश.

या व्यतिरिक्त ब्रांट आयोगाने उत्तर-दक्षिण राष्ट्रांमध्ये संयुक्त राष्ट्रसंघाच्या चौकटीत वाटाघाटी व्हाव्यात व त्यासाठी उत्तर-दक्षिण राष्ट्रांतील परीषदेत त्याची पार्श्वभूमी तयार केली जावी असे सुचविले.

कानकुन संमेलन, १९८१ : ब्रांट आयोगाने केलेल्या शिफारशीनुसार मेक्सिकोच्या कानकुन शहरात दिनांक २२-२३ ऑक्टोंबर १९८१ रोजी भारतासह २२ देशांनी उत्तर-दक्षिण संवाद साधण्याच्या दृष्टीने एका लघु शिखर संमेलन आयोजित केले. यामध्ये १४ अविकसित व ८ विकसित देशांच्या प्रतिनिधींनी सहभाग नोंदवला होता. सोव्हिएट रशियाला सुद्धा आमंत्रित केले होते पण त्याने सहभागास नकार दिला. या संमेलनात जागतिक वाटाघाटी करण्याला महत्त्व दिले व आंतरराष्ट्रीय मुद्रा कोष व जागतिक बँकेवर संयुक्त राष्ट्रसंघाची सर्वोच्चता असावी असा अविकसित राष्ट्रांचा आग्रह होता. अमेरिकेने वरील वित्तिय सस्थांना निर्णय घेण्याचा अधिकार त्यांच्या पूरतीच मर्यादीत असून तो अंतिम असावा अशी भूमिका घेतली. अमेरिकेची यामागील भूमिका स्पष्ट होती. संयुक्त राष्ट्रसंघाच्या आमसभेला हा अधिकार दिल्यास विकसित व औद्योगिक राष्ट्र अल्पमतात असल्याने तसेच अविकसित राष्ट्रे बहुमतात असल्याने महत्त्वाच्या वित्तिय संस्थावर त्यांचे नियंत्रण असेल. अमेरिकेच्या या भूमिकेला ब्रिटन व पश्चिम जर्मनीने आपला पाठिंबा दिला तसेच जागतिक अर्थव्यवस्थेला पूर्नरचित करण्याच्या वाटाघाटी संबंधित वित्तिय संस्थांच्या मर्यादेतच व्हाव्या असे सांगून संयुक्त राष्ट्रसंघाला जागतिक वाटाघाटी संदर्भात सर्वोच्च अधिकार देण्यास नकार दिला.

संमेलनात विकसित व अविकसित देशांत मतभेद झालेले असले तरी जागतिक

वाटाघाटी करण्याची प्रक्रिया सुरू असावी असे ठरले. त्याच बरोबर उर्जेची समस्या ही सार्वत्रिक असल्याने त्याचे निराकरण सामुहिकपणे करण्यास संमती झाली. अविकसित देशांमध्ये अन्नधान्याचे उत्पादन वाढविण्यावर भर दिला गेला. मदतीपेक्षा व्यापार वृद्धीवर भर देण्यात आला तसेच खाजगी गुंतवणुकदारांना आकर्षित करण्याचे धोरण अविकसित राष्ट्रांनी आखावे असेही ठरले. १९८१ साली मेलबोर्न येथे झालेल्या कॉमनवेल्थ राष्ट्रांच्या प्रमुखांच्या परीषदेत उतर-दक्षिण संवादाची समीक्षा करण्यासाठी समिती गठित करण्यात आली. समितीला विकसित व अविकसित राष्ट्रांमधील होत असलेल्या घडामोडींचा आढावा घेणे, यादरम्यान येणाऱ्या प्रमुख अडथळ्याचा शोध घेणे व त्याचा परीणाम वाटाघाटीवर कसा होत आहे याचा शोध घेणे, त्यावर उपाय सुचविणे इत्यादी कार्य सोपविण्यात आली.

१९८१ साली अविकसित देशांच्या प्रतिनिधींनी आमसभेत आंतरराष्ट्रीय अर्थव्यवस्था पुर्नरचित करण्यासंदर्भात एक प्रस्ताव आणला. पण विकसित देश विशेष करून अमेरिकेने त्याला विरोध केला. आंतरराष्ट्रीय मुद्रा कोष व जागतिक बँकेसारख्या स्वायत्त संस्थांना त्यामुळे धोका निर्माण होऊ शकतो असा दावा अमेरिकेचा होता. अविकसित देशांनी नंतर या प्रस्तावाला विशेष महत्त्व दिले नाही.

**स्वयं-अध्ययनासाठी-३**

(१) उत्तर-दक्षिण म्हणजे काय?

(२) विकसित देशांनी उत्तर-दक्षिण संवाद साधण्यापाठीमागे हेतू कोणता.

## २.२.६ : आंतरराष्ट्रीय व्यापाराचे राजकारण : (Politics of International Trade) :

१९३० च्या जागतिक मंदीच्या दरम्यान आंतरराष्ट्रीय व्यापाराचा विकास मंदावला परिणाम देशांनी मालाच्या आयातीवर नियंत्रणे लादण्यास सुरवात केली.

यामुळे जागतिक व्यापाराच्या उत्पन्नामध्ये प्रंचड घट झाली. या समस्येतून मार्ग काढण्यासाठी १९४५ साली अमेरिकेने आंतरराष्ट्रीय व्यापार व रोजगाराच्या विस्ताराच्या उद्देशाने अनेक प्रस्ताव मांडले. ३० ऑक्टोंबर १९४७ रोजी जेनेवा येथे २३ देशांद्वारा सीमा शुल्क संबंधी करारावर हस्ताक्षर झाले. याच कराराला गॅट असे नाव दिल्या गेले. हा करार १९४८ पासून लागू झाला. प्रारंभी अस्थायी असलेला हा करार कालांतराने स्थायी झाला. १२ डिसेंबर १९९४ रोजी गॅट कराराचे अस्तित्व समाप्त केले व त्याच्या जागी जानेवारी १९९५ मध्ये विश्व व्यापार संघटन (**W.T.O.**) अस्तित्वात आले. संपूर्ण आंतरराष्ट्रीय व्यापार या करारांतर्गत होत असून सर्व अटींचे पालन सदस्य देशांना करावे लागते. या संघटनेचे महत्त्वाचे उद्दिष्टे पुढीलप्रमाणे:

(१) सदस्य देशांच्या जीवनशैलीमध्ये वृद्धि करणे.
(२) संपूर्ण राजेगारात वाढ करणे.
(३) वस्तुंच्या उत्पादन व व्यापाराचा प्रसार करणे.
(४) सेवांच्या उत्पादन व व्यापाराचा प्रसार करणे.
(५) जगाच्या संसाधनांचा अधिकतम उपयोग करून घेणे.
(६) निरंतर विकासाच्या संकल्पनेला स्विकारणे.
(७) पर्यावरणाचे संरक्षण व सुरक्षा करणे.

विश्व व्यापार संघटनेच्या स्थापनेनंतर व आधीपण आंतरराष्ट्रीय व्यापाराचे स्वरूप व राजकारण यांचा अन्यन संबंध होता. आंतरराष्ट्रीय व्यापारीक राजकारणाचा अभ्यास हा साधारपणे तीन अंगाने केल्या जाऊ शकतो. पहिले म्हणजे, आंतरराष्ट्रीय व्यापार हा केवळ दोन व्यक्ती अथवा दोन देशांतील संबंधाचा आकृतीबंध नव्हे तर सर्व देशांतील कॉरपोरेट हाऊस, देशांचे शासन व देशांतील अनेक संस्थांचा संबंध आंतरराष्ट्रीय व्यापारा सोबत येत असतो. व्यापार म्हणजे केवळ देवाणघेवाण नसून व्यापाराच्या अटी, शर्ती, त्याची व्याप्ती व सर्वात म्हणजे या व्यापारात लोकांचा पैसा लागलेला असतो. केवळ नियमांनी आंतरराष्ट्रीय व्यापार होत नसून देशांचा दृष्टीकोन महत्त्वाचा असतो. देशपरत्त्वे व्यापार करण्याच्या पद्धती सुद्धा वेगळ्या असतात. उदा. जर्मनी अथवा भारतात व्यापार करतांना देखील केंद्रीय शासन सहभागी होते तर अमेरिकेत व्यापारी व्यवस्थापनात शेअरहोल्डर्स यांना महत्त्व दिल्या जाते.

दुसरे म्हणजे, जागतिक अर्थकारणाची व्याप्ती मोठी आहे. प्रत्येक देश विकासाच्या वेगळ्या अवस्थेत असतो. त्यामुळे त्यांची करप्रणाली, वित्तिय स्थिती व मौद्रिक धोरण यांचे प्रतिबिंब त्यांच्या व्यापारीक स्थितीवर पडत असते.

तिसरे म्हणजे, प्रत्येक देशात काही अ-आर्थिक व्यापारीक धोरणे असतात त्यांचा सन्मान होणे आवश्यक आहे.

जागतिकिकरणाच्या आजच्या युगात प्रत्येक देश एकमेकांवर अवलंबून असतो. विकसित देशांजवळ भांडवल असेल तर ते गुंतविण्यासाठी त्याला बाजारपेठ आवश्यक आहे जी विकसनशील व अविकसित देशांच्या स्वरूपात त्याला प्राप्त होऊ शकते. विकसनशील व अविकसित देशांना आर्थिक विकास व त्याकरीता गुंतवणूक आवश्यक असते ज्याची गरज विकसित देश पूर्ण करीत असतात. त्यामुळे दोन्ही बाजू एकमेकांवर अवलंबून असतात. त्यामुळे आंतरराष्ट्रीय व्यापाराच्या संदर्भात व्यापारीक राजकारण सौदेबाजीच्या रुपात नव्हे तर सहकार्याच्या स्वरुपात झाल्यास आंतरराष्ट्रीय व्यापारातील राजकीय अडथळे दूर होऊ शकतात.

## २.३ : पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

**NIEO:** न्यू इंटरनॅशनल इकॉनॉमिक ऑर्डर (नव आंतरराष्ट्रीय आर्थिक व्यवस्था)

**UNCTAD:** युनायटेड नॅशन्स कॉन्फरन्स ऑन ट्रेड अॅन्ड डेव्हलपमेंट (अंकटाड)

**G -७:** ग्रुप ऑफ सेव्हन कन्ट्रिज (सात देशांचा समूह जी-७)
**IMF:** इंटरनॅशनल मॉनेटरी फंड (आंतरराष्ट्रीय मुद्रा कोष)

**IBRD:** इंटरनॅशनल बँक फॉर रिकन्स्ट्रशन अॅन्ड डेव्हलपमेंट (पुर्ननिर्माण व विकासासाठी आंतरराष्ट्रीय बँक)

गॅट (**GATT**) : जनरल अॅग्रीमेंट ऑन टॅरिफ अॅन्ड ट्रेड

डब्ल्यूटिओ (**W.T.O.**) : वर्ल्ड ट्रेड ऑर्गनायझेशन

## २.४ : स्वयं-अध्ययन प्रश्नांची उत्तरे

### स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न-१

(१) विविध देशांतील प्रतिनिधींनी १ ते २२ जुलै १९४४ दरम्यान सखोल चिंतन करन ब्रेटन वुड करारावर हस्ताक्षर केले व करार अस्तित्वात आला.

(२) ०१ मार्च १९४७ रोजी प्रारंभ झाला.

(३) द्वितीय महायुद्धा नंतर युरोपची जी आर्थिक स्थिती बिघडली त्याला सावरण्यासाठी प्रामुख्याने या बँकेची स्थापना झाली.

### स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न-२

(१) १ मे १९७४ रोजी संयुक्त राष्ट्रसंघाच्या आमसभेने सहाव्या विशेष अधिवेशनात नव आंतरराष्ट्रीय आर्थिक व्यवस्था स्थापने संदर्भात प्रस्तावास स्विकृती दिली.

(२) विकसनशील देशांना आंतरराष्ट्रीय व्यापार व अर्थकारणात सन्मानपूर्वक सहभाग व हिस्सा प्राप्त व्हावा यासाठी.

### स्वयं-अध्ययनासाठी प्रश्न-३

(१) उत्तर म्हणजे विकसित राष्ट्रे तर दक्षिण म्हणजे विकसनशील व अर्धविकसित राष्ट्रे.

(२) नव आर्थिक व्यवस्थेपासून विकसनशील देशांचे लक्ष्य दूर ठेवण्यासाठी उत्तर-दक्षिण संवाद साधण्याचा प्रयत्न विकसित देशांनी केला.

## २.५ सारांश

दुसऱ्या महायुद्धानंतर जागतिक आर्थिक व्यवस्थेची जी हानी झाली तिला सावरण्याकरिता ज्या हालचाली आंतरराष्ट्रीय पातळीवर झाल्या त्यापैकी महत्त्वाची हालचाल म्हणजे ब्रेटन वुड्स व्यवस्था होय. विकसित व विकसनशील देशांना आर्थिक संकटातून मुक्त करण्यासाठी अमेरिकेच्या पुढाकाराने आंतरराष्ट्रीय मुद्रा कोष स्थापन करण्यात आला. यामुळे जगातील तमाम देशांना अर्थव्यवस्थेचा पुरवठा करणारी संस्था अस्तित्वात आली. त्याचवेळेस द्वितीय महायुद्धा नंतर युरोपात जी आर्थिक अधोगती झाली त्याला सावरण्यासाठी पुर्ननिर्माण व विकासासाठी आंतरराष्ट्रीय बँकेची स्थापना झाली. यामुळे युरोपीन अर्थव्यवस्था सांभाळली व पुढे बँकेचा विस्तार होऊन विकसनशील व अर्धविकसित देशांना सुद्धा मदत केल्या गेली. आंतरराष्ट्रीय संबंधातील महत्त्वाचा पैलू म्हणजे विकसनशील देशांनी केलेली नव आंतरराष्ट्रीय आर्थिक व्यवस्थेची केलेली मागणी होय. समांतर व्यवस्था निर्माण करण्याचा प्रयत्न या अंतर्गत केल्या गेला. याला प्रत्युत्तर म्हणून विकसित देशांनी उत्तर-दक्षिण संवादाची संकल्पना मांडली व विकसनशील व अर्धविकसित देशांना सहयोग व सहकार्य करण्याची तयारी दर्शविली. आंतरराष्ट्रीय संबंधाच्या दृष्टीकोनातून या सर्व घटना आंतरराष्ट्रीय राजकारणाला वेगळीच दिशा देण्यास कारणीभूत ठरल्या.

## २.६ सरावासाठी स्वाध्याय

खालील प्रश्नांची उत्तरे थोडक्यात लिहा.

(१) नव आंतरराष्ट्रीय आर्थिक व्यवस्था निर्माण करण्याची कारणे?
(२) आंतरराष्ट्रीय मुद्रा कोषाची रचना?
(३) ब्रेटन वुड व्यवस्थे विषयी सांगा?
(४) उत्तर-दक्षिण संवाद म्हणजे काय?
(५) पुर्ननिर्माण व विकासासाठी आंतरराष्ट्रीय बँकेचे स्वरूप स्पष्ट करा?
(६) आंतरराष्ट्रीय व्यापारातील ठळक वैशिष्टे सांगा?

## २.७ अधिक वाचनासाठी पुस्तके

(१) प्रकाश चंद्र, अरोरा प्रेम, इंटरनॅशनल रिलेशन, कॉसमॉस बुक, न्यू दिल्ली, १९९२

(२) हॅरॉल्ड जेम्स, इंटरनॅशनल मॉनेटरी कॉपरेशन सिंस ब्रेटेन वुड्स, ऑक्सफर्ड युनिवर्सिटी प्रेस, युएसए, १९९६

(३) वसंत रायपूरकर, 'आंतरराष्ट्रीय संबंध', नागपूर, मंगेश प्रकाशन, १९९१.

*****

# ३

# घटक ३ : सिद्धांत व दृष्टिकोन

**घटक संरचनाः**


३.० उद्दिष्टे

३.१ प्रास्ताविक

३.२ विषय विवेचन

  ३.२.१ पारंपारिक दृष्टिकोन - आदर्शवाद

  ३.२.२ वास्तववाद

  ३.२.३ वैज्ञानिक उत्क्रांती-वर्तनवादी दृष्टिकोन

  ३.२.४ व्यवस्थात्मक दृष्टिकोन

  ३.२.५ निर्णय निर्धारण दृष्टिकोन

  ३.२.६ खेळ सिद्धान्त

  ३.२.७ नववास्तववाद

  ३.२.८ आंतरराष्ट्रीय राजकीय अर्थकारण/ परावलंबीत्वाचा सिद्धान्त

  ३.२.९ राष्ट्रातीतवाद

३.३ सारांश

३.४ सरावासाठी स्वाध्याय

३.५ अधिक वाचनासाठी पुस्तके


## ३.० उद्दिष्टे

या घटकाचा अभ्यास केल्यानंतर आपणास-

- आंतरराष्ट्रीय संबंधांच्या विविध सिद्धांताची व त्यांना स्पष्ट करणाऱ्या दृष्टिकोनांची ओळख होईल.
- आंतरराष्ट्रीय संबंधांच्या बदलत्या स्वरुपाचे आकलन करुन घेता येईल.
- आंतरराष्ट्रीय क्षेत्रात होणाऱ्या बदलांचा राष्ट्रांमधील संबंधांवर काय व कसा परिणाम होतो हे समजून घेता येईल.

- आंतरराष्ट्रीय संबंधांच्या अभ्यासकांच्या या विषयाच्या अध्ययना संबंधी काय धारणा होत्या त्यांचा परिचय होईल.
- आंतरराष्ट्रीय संबंधांच्या अध्ययनाच्या जुन्या व नव्या पद्धतीची ओळख व त्यातील फरक समजून घेता येईल.

## ३.१ प्रास्ताविक

आंतरराष्ट्रीय संबंधांचा अभ्यास करण्यासाठी अभ्यासकांनी वेगवेगळ्या अभ्यासपद्धतींचा व दृष्टिकोनांचा अवलंब केलेला आढळून येतो. आंतरराष्ट्रीय संबंधांविषयी अभ्यासकांच्या ज्या धारणा होत्या त्यानुसार त्यांनी वेगवेगळे दृष्टिकोन निवडलेले दिसून येते.

आंतरराष्ट्रीय संबंधांशी संबंधीत सिद्धांताची वर्गवारी पारंपरिक व आधुनिक अशा दोन प्रकारात करता येते. पारंपरिक सिद्धान्तांमध्ये आदर्श व नैतिकता यावर भर दिलेला दिसून येतो. पारंपरिक दृष्टिकोनांद्वारे मूल्ये, आदर्श व औपचारिक संस्था यांवर भर दिला गेला. विशेषतः पहिल्या महायुद्धाच्या सुमारास एक स्वतंत्र विषय म्हणून अभ्यासल्या जाणाऱ्या या विषयावर पहिल्या जागतिक युद्धोत्तर परिस्थितीचा प्रभाव होता. राष्ट्राराष्ट्रांमधील संघर्ष टाळणे, आंतरराष्ट्रीय शांतता प्रस्थापित करणे, कलह निवारण्यासाठी युद्धाव्यतिरिक्त इतर मार्गांना प्राधान्य देणे यावर याकाळात विशेष भर दिलेला दिसून येतो.

दुसऱ्या महायुद्धा नंतर १९५० च्या दशकात वैज्ञानिक दृष्टिकोनाच्या आधारांवर आंतरराष्ट्रीय राजकारणाचा अभ्यास करण्यास प्रारंभ झाला. या काळात शास्त्रीय व अनुभवनिष्ठ दृष्टिकोनांच्या आधारे सिद्धान्त मांडले गेले. विसाव्या शतकात आंतरराष्ट्रीय राजकारणासमोर नवी आव्हाने उभी राहिली. राज्येतर घटकांचे वाढते महत्त्व, अण्वस्त्रांची निर्मिती यामुळे आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या अभ्यासाला नवी दिशा लाभली. परिणामी ८०च्या दशकांत उदयास आलेल्या नव्या दृष्टिकोणांचाही प्रभाव आंतरराष्ट्रीय राजकारणावर पडलेला दिसून येतो. विशेषतः नववास्तववाद, परावलंबित्त्वाचा सिद्धान्त यासारख्या सिद्धान्तांचा उल्लेख यात करता येईल. आंतरराष्ट्रीय संबंधांवरील सिद्धान्त हे प्रामुख्याने अराजकी राष्ट्र-राज्य व्यवस्थमध्ये सुरक्षा व व्यवस्था कशी प्रस्थापित करावी या संबंधी स्पष्टीकरण देतात. या सिद्धांतांपैकी काही प्रमुख सिद्धान्तांचा अभ्यास या घटकात आपण करु या.

## ३.२ विषय विवेचन

## ३.२.१ पारंपारिक दृष्टिकोन – आदर्शवाद

आंतरराष्ट्रीय संबंधांच्या अभ्यासासंबंधी हा सिद्धान्त एक जुना व प्राचीन सिद्धान्त आहे. अशाप्रकारच्या सिद्धान्तांमध्ये आदर्शवादी एखादया भविष्यकालीन आदर्श व्यवस्थेची कल्पना करतात व ती मांडतात. अशाप्रकारच्या सिद्धान्तामध्ये काही गोष्टी अन्य काही गोष्टींपेक्षा चांगल्या आहेत हे गृहीत सर्वच कृतीच्या व विचारांच्या मागे असते 'चांगले' किंवा 'अधिक चांगले' याचा नेमका अर्थ काय? या प्रश्नाचे उत्तर शोधले जाते. आदर्शवादी मूल्य व नैतिकता यांवर आधारित व्यवस्थेची कल्पना विचारवंत मांडताना दिसतात. त्यांच्या मते 'सत्तेचे राजकारण' हे हळूहळू लुप्त होणार आहे. त्यांच्या मते या व्यवस्थेत हिंसाचार वा अनैतिकता असणार नाही. कल्पनेतील आदर्श जग वास्तवात येण्याकरीता आवश्यक असलेल्या व्यवस्थांचे वर्णन यात येते.

रुसो, कांट, वुड्रो विल्सन या सारख्या आंतरराष्ट्रीय संबंधाशी संबंधीत संबंधाशी संबंधीत विचार मांडणाऱ्या विचारवंतांच्या लिखाणातून अशा प्रकारचा आदर्शवाद मांडला गेल्याचे आढळून येते. या विचारवंतांनी एका अशा जगाचे चित्र आपल्या लेखनातून रेखाटले आहे की ज्यात असमानता, युद्ध, शोषण, हिंसा नाही. अशा आदर्श जगातच मानवी कल्याण साध्य होऊ शकते असे त्यांचे मत आहे.

कांट सारख्या विचारवंताने राज्यांना युद्धापासून परावृत्त होण्याचे आव्हान केले आहे. त्याचप्रमाणे जागतिक शांतता प्रस्थापित करण्यावर भर दिला आहे. अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष वुड्रो विल्सन यांच्या विचारांचे योगदान या सिद्धान्तातील महत्त्वपूर्ण विचारांचे योगदान आहे. व्हर्सायच्या संधीद्वारे त्यांनी या विचारांना मूर्त स्वरुप देण्याचा प्रयत्न केला. त्याकरीताच त्यांनी जागतिक शांतता प्रस्थापित करण्याकरीता आंतराष्ट्रीय संस्थेच्या स्थापनेवर भर दिला आहे. एकंदरीत या सिद्धान्तांद्वारे विभिन्न राष्ट्रांनी आपल्या हितसंबंधांची जुळवणी मानव जातीच्या कल्याणासाठी करावी अशी शिकवण दिली गेली आहे.

**आदर्शवादी सिद्धान्तातील दोष :**

**आदर्शवादी सिद्धान्तात खालील दोष आढळतात :-**

१) आदर्शवादी सिद्धान्त व्यवहार्य नाहीत. या सिद्धान्तांद्वारे आदर्श जी काल्पनिक मांडणी केली जाते ती सर्व राष्ट्रांद्वारे जोवर नैतिकतेचे पालन केले जाणार नाही तोवर व्यवहारात येऊ शकत नाही.

२) या सिद्धांन्तांच्या आधारे ज्या आदर्श 'जागतिक शासनाची' निर्मिती अपेक्षिली आहे तशी निर्मिती तेव्हाच शक्य आहे. जेव्हा सर्व राष्ट्र लोकशाही पद्धतीने सर्वंकष शक्तीला नष्ट करतील. असे होईलच याची ग्वाही देता येणे शक्य नाही.

३) कल्पना व वास्तव यांतील फारकती मुळे हे सिद्धान्त व्यवहार्य वाटत नाहीत. ते अनुभवावर आधारीत नाहीत. राष्ट्रे प्रत्यक्षात तसे वागत नाहीत जसे आदर्शवादयांना अपेक्षित आहे.

या सर्व कारणांमुळे आदर्शवादी सिद्धान्त किंवा दृष्टिकोन कालबाह्य ठरला.

## ३.२.२ वास्तववाद

या सिद्धांताचे पद्धतशीर विवेचन करणारा प्रमुख विचारवंत म्हणजे हॅन्स मॉर्गेन्थो हा होय. वास्तववादी सिद्धान्ताला सत्तेचा दृष्टिकोन असेही म्हणतात कारण या सिद्धान्तात सत्तेवर विशेष भर दिलेला दिसून येतो. वास्तववादयांच्या मते प्रत्येक राष्ट्र आंतरराष्ट्रीय राजकारणात स्वतःच्या राष्ट्राच्या हीताची जोपासना करण्याकरताच प्रयत्नशील असतो. हे हित साधण्याकरीता सत्ता हे सर्वात प्रभावी माध्यम आहे. त्यामुळे सत्तेच्या आधारावरच राष्ट्रा-राष्ट्रांमधील संबंध स्पष्ट करता येतात.

हॅन्स मॉर्गेन्योचा पूर्वी ट्रइष्क (Trcitschre), नित्से (Nietsche), हॅरॉल्ड लॉसवेल यासारख्या विचारवंतांनी सत्ता या घटकाचा आंतरराष्ट्रीय राजकारणात मध्यवर्ती स्थान दिलेले आहे.

शूमन् या विचारवंताच्या मते, 'सर्व राजकारण म्हणजे सत्तेसाठी संघर्ष होय. ज्यांच्या हाती सत्ता आहे. त्यांना इतरांवर आपली सत्ता गाजवण्यात व आपल्या इच्छेप्रमाणे त्यांच्याकडून कार्य करवून घेण्यात आनंत वाटतो.' या सर्व लेखकांमध्ये मॉर्गेन्थो या विचारवंताचे विचार सर्वात महत्त्वपूर्ण आहेत.

## मॉर्गेन्थोच्या यांच्या वास्तववादी सिद्धान्ताचे सहा प्रमुख तत्त्वे –

खालील सहा प्रमुख तत्त्वांच्या आधारे मॉगन्थो यांच्या सिद्धान्ताचे वर्णन करता येईल–

### १) वास्तविक नियमांद्वारे आंतरराष्ट्रीय राजकारणाचे नियंत्रण –

मॉर्गेन्थोच्या मते आंतरराष्ट्रीय राजकारण काही स्थूल नियमांप्रमाणे चालत असते. त्यामुळे आंतरराष्ट्रीय राजकीय व्यवहारांची माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी आधी हे नियम समजणे आवश्यक आहे. हे नियम नैतिकतेवर आधारीत नसून बुद्धी व अनुभव या आधारेच समजवून घेतले जावे असे हा सिद्धान्त सांगतो.

### २) शक्तीच्या आधारे राष्ट्रीय हित साध्य केले जाते –

हा मॉर्गेन्या यांनी मांडलेला दुसरा वास्तववादी विचार आहे. वास्तववादांच्या मते सर्वच राष्ट्र सदैव केवळ राष्ट्रीय हिताचाच विचार करतात. परराष्ट्र धोरणाचे एकमात्र उद्दिष्ट केवळ राष्ट्रहित हेच असते व शक्तिच्या आधारे ते प्राप्त करण्याचा प्रयत्न प्रत्येक राष्ट्र करत असते असे ते मानतात.

### ३) राष्ट्रांद्वारे परिस्थितीच्या संदर्भात राष्ट्रीय हिताचा विचार –

आंतरराष्ट्रीय राजकारणाचे एकमात्र उद्दिष्ट राष्ट्रीय हित हेच असल्यामुळे शक्तीचा उपयोग करणे व त्या आधारे राष्ट्र हित साध्य करणे या करीताच प्रत्येक राष्ट्र प्रयत्नशील असते असे वास्तववादी मानतात.

### ४) नैतिक आदर्श –

वास्तववाद्यांना नैतिक आदर्श हे राज्याचे धोरण ठरविताना आधार म्हणून मान्य नाही. देश, काळ व परिस्थितीनुरूप नैतिकतेचे स्वरुप देखिल बदलत असते असे त्यांचे मत आहे. विवेक व बुद्धि यांना ते नैतिक आदर्शापेक्षा अधिक महत्त्व देतात.

### ५) राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय नैतिक नियम – वास्तववादी दृष्टिकोन

वास्तववाद्यांच्या मते राष्ट्राच्या नैतिक इच्छा व आकांक्षा आणि जगाला नियंत्रित करणाऱ्या नैतिक नियमांमध्ये समन्वय स्थापन केला जाऊ शकत नाही. दोन्हींचे स्वरुप व नियम परस्पराहून भिन्न आहे असे ते मानतात.

### ६) राजकीय विचारांचे श्रेष्ठत्त्व -

वास्तववादी राजकीय विचारांच्या श्रेष्ठत्वाला विशेष महत्त्व देतात. राजकीय क्षेत्राच्या स्वायत्ततेला ते मान्यता देतात.

मॉर्गेन्थोच्या मते, 'हे जग म्हणजे परस्पराविरोधी हितसंबंधाच्या संघर्षाचे जग होय. जगात चांगले वाईट. आरोग्य व रोगराई, शांतता युद्ध यांच्यामध्ये कधीही न संपणारा संघर्ष सदैव चालू असतो. सत्तेची लालसा मनुष्यमात्रात महत्त्वाची असते. ही सत्तालालसा सर्व राजकारणाची केंद्रबिंदू असते. सत्ता हे राष्ट्रहित साध्य करण्याचे साधन होय.''

मॉर्गेन्थोच्या मते ज्या राज्याजवळ सत्ता व प्रभाव असतो ते राज्य आपले हितसंबंध वाढविण्यास सतत प्रयत्न करते. याउलट ज्या राज्याजवळ हे दोन्ही ही नसते ते आपले हितसंबंध नियंत्रित ठेवते. राष्ट्रहित हेच सर्व राज्यांचे सर्वोच्च नैतिक कर्तव्य आहे असे सांगत असताना विश्व शांतता टिकून राहण्यासाठी मॉगेन्थोने खालील तीन मार्ग सुचविले आहेत.

१) शांतता प्रस्थापित करण्याकरता सत्ता नियंत्रण पद्धतीचा अवलंब करणे उदा. निःशस्त्रीकरण, सामूहिक संरक्षण, आंतरराष्ट्रीय न्यायालय यांच्याद्वारे सत्तेवर नियंत्रण आणणे.
२) विश्वराज्याची निर्मिती करुन त्यास सर्व राज्यांची सत्ता अर्पण करणे.
३) राजनय पद्धतीचा स्विकार करुन सत्तेवर मर्यादा घालणे.

एकंदरीत वास्तववादी दृष्टीकोन सांगणाऱ्या विचारवंतांनी सत्तेचे आंतरराष्ट्रीय संबंधातील महत्त्व अधोरेखित केलेले आहे.

### वास्तववादावरील आक्षेप -

वास्तववादी सिद्धान्तावर खालीलप्रमाणे प्रखर टिका करण्यात आलेली आहे.

१) हा दृष्टिकोन संकुचित आहे. संघर्षा व्यतिरिक्त सहकार्य, परस्परावलंबित्व इत्यादी पैलू ही आंतरराष्ट्रीय संबंधात महत्त्वपूर्ण आहेत. त्यांचा विचार या विचारवंतांनी केलेला नाही.
२) या सिद्धान्ताने केवळ सत्तेच्या आधारे आंतरराष्ट्रीय संबंधाचे वर्णन केले आहे. प्रत्यक्षात मात्र अनेक राज्य सत्ता संघर्षापासून अलिप्त राहू इच्छितात.

उदा. भारत अथवा स्वित्झलँड या सारख्या राष्ट्रांचा विचार या सिद्धान्तात झालेला नाही.

३) विचारधारेचा संघर्ष हे देखिल जागतिक संघर्षाचे एक मूळ कारण असू शकते याचा विचार मॉर्गेन्थोने केलेला नाही.

४) या सिद्धान्ताने मनुष्याचे वर्णन सत्तालोलूप व आक्रमक वृत्तीचा प्राणी असेच केले आहे. परंतु असे गृहीत धरणे नकारात्मक स्वरुपाचे व चुकीचे आहे.

५) वसाहतवाद विरुद्ध स्वातंत्र्याची चळवळ हे देखिल जागतिक संघर्षाचे एक कारण आहे. याचा विचार वास्तववादात झालेला नाही.

६) मॉर्गेन्थोच्या सिद्धान्त प्रतिवादनात त्यांचा मानवावर विश्वास दिसत नाही. एकीकडे असे असताना जागतिक शांतीसाठी मात्र राजनय हा एकमात्र उत्तम उपाय असल्याचे ते सांगतात मात्र उत्तम राजनीतिज्ञ क्वचितच आढळतात असे त्यांचे मत आहे. असे राजनितिज्ञ कसे निर्माण करावे हे मात्र ते सांगत नाही. ही त्यांच्या विचारातील विसंगती आहे.

## ३.२.३ वैज्ञानिक उत्क्रांती-वर्तनवादी दृष्टिकोन

दुसऱ्या महायुद्धानंतर आंतरराष्ट्रीय संबंधाच्या अभ्यासकांची दुसरी पीढी उदयास आली. इतिहास, तत्त्वज्ञान व वर्णन प्राधान्य यावर आधारित पारंपारिक दृष्टिकोनाबाबत असमाधानी असलेल्या अभ्यासकांनी पर्यायी अशी अनुभवनिष्ठ अध्ययन पद्धती शोधून काढली. तिलाच वर्तनवाद किंवा वर्तनलक्षी दृष्टिकोन असे म्हटले जाते. 'जी तथ्ये पचेद्रिंयांनी किंवा यांत्रिक' उपकरणांकरवी झालेल्या प्रत्यक्ष ज्ञानावर आधारित असतात तेवढीच तथ्ये प्रमाण मानावीत हे वर्तनवादाचे प्रमुख सूत्र आहे. अमेरिकेत विकसित झालेल्या या सिद्धान्ताला प्रचंड लोकप्रियता प्राप्त झाली.

या दृष्टिकोनाचे अभ्यासक अनुभवजन्यतेवर (empiricism) भर देऊन शहानिशा करता येण्याजोगे (verifiable) नियम व सिद्धान्त मांडण्यावर भर देतात. नैसर्गिक विज्ञानाप्रमाणेच आंतरराष्ट्रीय संबंधाचेही वस्तुनिष्ठ आणि शहानिशा करता. येण्याजोगे नियम बनविण्याचा प्रयत्न त्यांनी केला. या अभ्यासकांनी मोठ्या प्रमाणावर माहितीचे संकलन करणे, तिचे मापन, परिमाणन, वर्गीकरण करुन सामान्यीकरण करणे व त्या आधारे नियम किंवा सिद्धान्त मांडणे या पद्धतीचा अंगिकार केला.

### वर्तनवादी दृष्टिकोनाची गृहीते

डेव्हिड ईस्टन या अभ्यासकाने या दृष्टिकोनाचा पाया घातला असे मानले जाते. त्याने सांगितलेली आठ गृहीते किंवा हेतू खालील प्रमाणे सांगता येतील.

**१) वारंवारता –**

स्पष्टीकरण व भाकीतकथन करता येणे या कोणत्याही शास्त्राच्या प्रमुख कसोट्या असतात. या दोहोंकरता ही वारंवार होणाऱ्या घटनांचे, प्रक्रियांचे अवलोकन करणे आवश्यक असते.

**२) पडताळा –**

अनुभवसिद्ध पुराव्यांच्या आधारावरच सिद्धान्त कथन केले जाते. तेव्हा ज्ञान, नियम वा सिद्धान्त यांची वैधता निरीक्षणक्षम प्रयोगांनी सिद्ध केली गेली पाहिजे.

**३) अध्ययन तंत्रे –**

नैसर्गिक शास्त्रांप्रमाणेच आंतरराष्ट्रीय राजकारणाचे देखिल विश्लेषण केले पाहिजे. गणिती पद्धतींनी प्रस्थापित केलेली मांडणी ही विश्वसनीय व वादातील असते. त्यामुळे सर्वेक्षण पद्धती, नमुना पाहण्या यासारखी तंत्रे वर्तनवादी अभ्यासक वापरतात.

**४) परिमाणन –**

संख्याशास्त्रीय परिमाणनाचा (quantification) उपयोग मोठ्या प्रमाणावर वर्तनवादी अभ्यासक करतात.

**५) मूल्यतठस्थता –**

वर्तनवादात मूल्यांना व नीतिशास्त्रीय निकषांना गैरलागू समजले गेले आहे. या अभ्यासकांच्या मते तथ्ये व मूल्ये या दोन वेगवेगळ्या गोष्टी आहेत. त्या अभ्यासकांनी कटाक्षाने वेगळ्या ठेवाव्या. तसेच तथ्यांना विशेष प्राधान्य दयावे.

**६) प्रमेय मांडणी –**

वर्तनवादी दृष्टिकोनातील सिद्धान्ताचे स्वरुप कार्यकारणात्मक स्वरुपाचे असते. यात तथ्य संकलन, विश्लेषण, स्पष्टीकरण करुन प्रमेय मांडली जातात.

**७) विशुद्ध शास्त्र –**

संशोधन हे एक विशुद्ध शास्त्र आहे. त्यांचा उपयोग सामाजिक राजकीय प्रश्न सोडविण्यासाठी झालाच पाहिजे हा आग्रह अनाठायी आहे.

**८) आंतरविद्याशास्त्रीय एकत्रीकरण –**

कोणत्याही एका क्षेत्राचे आकलन अन्य क्षेत्रांचा संदर्भ लक्षात घेतल्यावाचून होऊच शकत नाही. तेव्हा आंतरविद्याशाखीय एकत्रीकरण आवश्यक आहे. अशाप्रकारे सूक्ष्म निरीक्षण, शास्त्रशुद्ध पडताळणी, आधुनिक तंत्रांच्या आधारे प्रमेय मांडणी यांच्या आधारे आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या अभ्यासाचा अनुभवनिष्ठ आशय समृद्ध करण्याचा प्रयत्न वर्तनवादाने केला आहे.

## वर्तनवादी दृष्टिकोनाचे परिक्षण :

वर्तनवादी अभ्यासकांनी शास्त्रीय पद्धतींचा अवलंब करुन नैसर्गिक शास्त्रांप्रमाणे शास्त्रशुद्ध सिद्धान्त निर्मितीचा प्रयत्न केला. मात्र प्रत्यक्षात पद्धतीशास्त्राची गुंतागुंत आणि असंबंद्ध प्रतिमानांचा (मॉडेल्स) गदारोळ एवढेच निष्पन्न त्यातून झाले. पुढील मुद्दयांच्या आधारे वर्तनवादी दृष्टीकोनावरील टीका स्पष्ट करता येईल.

### (अ) विषयाचे शास्त्रीयीकरण झालेच नाही –

आंतरराष्ट्रीय राजकारणाचे स्वरुपच असे आहे की नैसर्गिक शास्त्राच्या अर्थाने शास्त्रीय प्रतिष्ठा त्याला लाभूच शकत नाही. राष्ट्रांमधील वर्तन हा विषय प्रयोगशाळेमध्ये अथवा तठस्थपणे अभ्यासला जाऊच शकत नाही. आंतरराष्ट्रीय घटक हे नित्य बदलणारे असतात व ते इतके असंख्य असतात की त्यांना 'शास्त्रीय' चिमटीत अचूक पकडणे शक्य नाही.

### (ब) अभ्यासविषयापेक्षा अध्ययन तंत्रालाच प्राधान्य :

या दृष्टिकोनाचे निरीक्षण स्पष्टीकरणाच्या नवनव्या पद्धतीमुळे तथ्यसंकलन काटेकोर झाले. मात्र विषयाच्या ज्ञानात भर पडली नाही. अध्ययन तंत्रालाच अति प्राधान्य दिल्यामुळे अभ्यासक समकालीन ज्वलंत प्रश्नांना सामोर जाऊ शकले नाही. आंतरराष्ट्रीय राजकारणाचा अभ्यास करण्याच्या दृष्टीने वर्तनवाद पद्धतीशास्त्र तुटपुंजे ठरले.

### (क) महत्त्वाच्या प्रश्नांकडे डोळेझाक :

वर्तनवादी अभ्यासकांनी ज्यांच्याबद्दल परिमाणन शक्य होईल असेच प्रश्न हाताळल्यामुळे अव्वल महत्त्वाच्या प्रश्नांकडे त्यांची डोळेझाक झाली. सिद्धान्त जेव्हा प्रश्न सोडवण्यास साह्यभूत होतात. तेव्हाच त्यांना मोल प्राप्त होते. वर्तनवादी सिद्धान्त मात्र असे प्रश्न सोडविण्यास उपयोगी ठरले नाही. परिणामी ते फारच तकलादू स्वरुपाचे ठरले.

### (ड) संशोधक केवळ तंत्रज्ञ ठरला :

वर्तनवादी अभ्यासकांची सार्वत्रिक सिद्धान्ताबद्दलची अवस्था, पोकळ संज्ञांचे आत्यंतिक स्तोम या सर्वांचा परिणाम म्हणजे संशोधक केवळ तंत्रज्ञ ठरले. एकंदरीत

नैसर्गिक विज्ञानाची अभ्यास पद्धती सामाजिक विज्ञानाच्या अभ्यासास तंतोतंत लागू होणे शक्य नसल्यामुळे वर्तनवादाचा प्रभाव काही काळाने ओसरला.

## ३.२.४ व्यवस्थात्मक दृष्टिकोन

द्वितीय महायुद्धानंतर आंतरराष्ट्रीय संबंधाच्या अभ्यासासाठी अनेक नवीन सिद्धान्त उदयास आले. त्यापैकी व्यवस्थात्मक दृष्टिकोन हा एक महत्त्वाचा दृष्टिकोन आहे. हा सिद्धान्त आंतरराष्ट्रीय संबंधाच्या अभ्यासासाठी ज्या नव्या शास्त्रीय पद्धती शोधून काढण्यात आल्या त्यावर आधारीत सिद्धान्त आहे.

राज्यांच्या समूहाला राज्यांचे कुटुंब किंवा समाज असे न संबोधता 'आंतरराष्ट्रीय व्यवस्था किंवा पद्धती' म्हणून अभ्यासल्यास अधिक शास्त्रीय पद्धतीने राजकीय प्रश्नांना ऊहापोह करता येतो असे या दृष्टिकोनाच्या समर्थकांचे मत आहे. त्यांच्या मते जगात घडणाऱ्या राजकीय घटना या अव्यवस्थितपणे घडत नसून त्यांच्यात एक निश्चित व्यवस्था व क्रम असतो. व्यवस्था या शब्दाचा प्रयोग पुढील तीन अर्थाने केला जातो.

१) आंतरराष्ट्रीय रचना किंवा व्यवस्था ही स्वतः निष्क्रीयच असते. मात्र तिची रचना करणारी विभिन्न राज्ये सक्रिय असतात. आंतरराष्ट्रीय व्यवस्थेत गतिशीलता या राज्यांच्या आपसांतील क्रिया व प्रतिक्रिया यांच्यावर अवलंबून असते. त्यामुळे या घटकांची (राज्यांची) माहिती करुन घेणे अर्थात त्यांचे आपसातील व्यवहार समजून घेणे म्हणजेच व्यवस्थेचा अभ्यास होय.

२) व्यवस्था किंवा पद्धतीची रचना तिच्या घटकांपेक्षा श्रेष्ठ आहे. ही व्यवस्थाच घटकांचे (राज्यांचे)परस्पर व्यवहार नियंत्रित करीत असते. या अर्थानुसार जी नियम व्यवस्था घटकांना मार्गदर्शन करीत असते तिचा अभ्यास यात अपेक्षित आहे.

३) काही लेखकांच्या मते व्यवस्था म्हणजे आंतरराष्ट्रीय संबंधांचे विश्लेषण करण्याची एक पद्धती आहे. त्यांच्या मते आंतरराष्ट्रीय राजकारणाची समस्या समजून घेण्यासाठी एका पद्धतीची किंवा व्यवस्थेची कल्पना करणे आवश्यक असते.

### मार्टन काप्लान यांचा सहा पद्धतींचा दृष्टिकोन

काप्लान यांच्या मते आंतरराष्ट्रीय राज्यव्यवस्थेत राष्ट्रराज्यांची भूमिका महत्त्वपूर्ण असते व ती काळ व परिस्थितीनुसार बदलत असते. त्यांनी खालील सहा पद्धतींचे विवेचन केले आहे.

## (अ) सत्ता संतुलन पद्धती :

इ.स. १६४८ मध्ये ज्यावेळी राष्ट्र-राज्य व्यवस्थेला प्रारंभ झाला त्यावेळी कुठलीही केंद्रीय सत्ता अस्तित्त्वात नव्हती एखादे राज्य जर शक्तिशाली बनले. तर इतर राष्ट्रांना धोका निर्माण होऊ शकतो. म्हणून इतर राज्ये एकत्र येऊन त्या बलाढय राष्ट्राविरुद्ध लढली तेथुनच सत्ता संतुलन पद्धतीचा प्रारंभ झाला असे मानले जाते. १७ व्या, १८व्या व १९ व्या शतकात युरोपात ही पद्धती अस्तित्वात होती. या पद्धतीचा नियम खालील प्रमाणे आहेत -

१) प्रत्येक राष्ट्राने राजनयाच्या माध्यमानेच आपली शक्ती वाढविली पाहिजे.
२) प्रत्येक राष्ट्राने राष्ट्रहिताचाच विचार करणे व गरज पडल्यास युद्ध करणे.
३) युद्ध झाल्यास शत्रुराष्ट्राचा नाश करणे.
४) कोणत्याही एका राष्ट्रास अधिपत्य स्थापन न करु देणे.
५) जी राज्ये विश्व राज्यीय संस्था स्थापन करण्याचा प्रयत्न करताहेत त्यांना रोखणे.
६) पराभूत राष्ट्रास सत्ता संतुलन पद्धतीत गटात सामील करणे.

## (ब) शिथील द्वि-ध्रुवीकरण पद्धती -

या पद्धतीत जगाचे विभाजन परस्पर विरोधी गटात झाल्याचे आढळून येते. अनेकदा या पद्धतीत शक्ती गटामध्ये अंतर्गत मतभेद असल्याचे दिसून येते. उदा. नाटो व सीटो या सारख्या संघटनांमध्ये राष्ट्रांमध्ये परस्पर मतभेद असल्याचे दिसून येते. या पद्धतीत तिसऱ्या गटाचे अस्तित्त्व आंतरराष्ट्रीय क्षेत्रात राहू शकते.

## (क) दृढ द्वि-ध्रुवीकरण पद्धती -

या पद्धतीमध्ये जगातील तठस्थ राष्ट्रे नष्ट होऊन कोणत्या तरी गटात सहभागी होतात. आंतरराष्ट्रीय संघटन देखिल समाप्त होते. परिणामी संपूर्ण जगात केवळ दोन प्रभावी गट राहतात.

## (ड) विश्वात्मक संस्था पद्धती -

यात असे अपेक्षित आहे की शिथील द्वि-ध्रुवीकरणातून आंतरराष्ट्रीय संघटनांची निर्मिती होईल. प्रत्येक राष्ट्र आपली जवाबदारी व्यवस्थित पार पाडेल. सर्व राष्ट्रे

शांततेच्या मार्गाने आपले ध्येय गाठण्याचा प्रयत्न करतील. आंतरराष्ट्रीय पातळीवर एक संघ सरकार राहील.

### (इ) श्रेणीबद्ध पद्धती –

जर आंतरराष्ट्रीय संस्थात्मक पद्धती नष्ट झाली तर ही पद्धती त्यातून निर्माण होऊ शकेल. यात सर्व राष्ट्रे सामूहिकरीत्या एका शक्तिशाली राष्ट्राच्या नेतृत्वाखाली येणे अपेक्षित आहे. ही पद्धती निर्देशात्मक किंवा अनिर्देशात्मक असू शकते पहिल्या प्रकारात संपूर्ण जग एका राष्ट्राद्वारे जिंकून ही पद्धती निर्माण होऊ शकते. तर दुसऱ्या प्रकारात एक राष्ट्रप्रमुख राहील व त्याच्या अंतर्गत शक्तीचे वाटप राष्ट्रांना त्यांच्या श्रेणीनुसार करण्यात येईल.

### (फ) एकात्मक नकाराधिकार पद्धती –

ज्यावेळी प्रत्येक राज्याकडे दुसऱ्या राष्ट्राचा विनाश करु शकतील अशी शस्त्रे असतील तेव्हा ही पद्धती निर्माण होईल. अर्थात या पद्धतीत प्रत्येक राज्याला नकाराधिकार प्राप्त होतो. या पद्धतीत शांतता भंग करणाऱ्या राष्ट्राविरुद्ध सर्व राष्ट्रांना उभे राहणे आवश्यक आहे.

### मॉर्टन कप्लान यांच्या सिद्धांताचे परिक्षण –

१. या सिद्धान्तात राष्ट्रीय हिताच्या कल्पनेस गतिहीन मानले आहे परंतु जग हे गतिमान आहे. परिस्थितीनुसार राष्ट्रीय हिताच्या कल्पनेत बदल होत असतो.

२. या सिद्धान्तात केवळ राजकीय पद्धतीचा विचार केलेला आढळतो. प्रत्यक्षात मात्र राज्याच्या व्यवहारावर धार्मिक, सांस्कृतिक, सामाजिक इत्यादी अनेक घटकांचा परिणाम झालेला असतो. ज्यांचा परिणाम राष्ट्रांच्या आंतरराष्ट्रीय व्यवहारावर होत असतो. याचा विचार या दृष्टिकोनात झालेला नाही.

३. मॉर्टन कप्लान यांचा सिद्धान्त चुकीचा वाटतो यात विश्वात्मक पद्धतीतून श्रेणीबद्ध पद्धती निर्माण होईल असे म्हटले आहे. परंतु ते शक्य नाही. असे परिवर्तन साम्राज्यवाद किंवा वसाहतवाद यांचे पुनरुज्जीवन झाल्यावरच होऊ शकते. आजच्या स्थितीत अशी कल्पना करणे योग्य नाही.

४. टिकाकाराच्या मते मार्टन कप्लान व इतर व्यवस्थात्मक सिद्धान्त स्पष्ट करणाऱ्या विचारवंतानी सर्व राष्ट्रे एकाच आंतरराष्ट्रीय पद्धतीचे घटक असून ते वेगवेगळ्या पद्धतीत भाग घेत असतात असे म्हटले आहे. परंतु असे पद्धतीचे वर्गीकरण अशास्त्रीय व अव्यवस्थित आहे. उदा. दक्षिणपूर्व पद्धती व पश्चिम युरोपीय पद्धती या वेगवेगळ्या असल्या तरी एकमेकांशी संबंधित आहेत.

५. आंतरराष्ट्रीय पद्धतीचा विचार करताना विचारवंतांमध्ये फरक आढळून येतो. काही विचारवंत संपूर्ण विश्वाला आंतरराष्ट्रीय व्यवस्थेचे क्षेत्र व त्याबाहेरील अंतरिक्षाला आंतरराष्ट्रीय वातावरण असे मानतात. काही आंतरराष्ट्रीय घटनांचा राज्यांवर होणारा परिणाम विचारात घेतात तर काही आंतरराष्ट्रीय घटनांचा निर्णय निर्धारणावर होणारा परिणाम लक्षात घेतात.

## ३.२.५ निर्णय निर्धारण दृष्टिकोन (Decision Marking Approach)

हा आंतरराष्ट्रीय संबंधांच्या अभ्यासातील नवीन दृष्टिकोन आहे. या सिद्धान्तात असे गृहित धरलेले आहे की आंतरराष्ट्रीय राजकारण म्हणजे राज्याच्या क्रिया, प्रतिक्रिया व पारस्पारिक क्रिया आहेत. एखादे विशिष्ट कार्य का करण्यात आले, कोणत्या परिस्थितीत करण्यात आले तसेच त्या निर्णयावर प्रभाव टाकणारे घटक यांचा विचार या दृष्टिकोनात करण्यात येतो.

हा दृष्टिकोन सर्वप्रथम १९५० मध्ये प्रो. रिचर्ड स्नायडर व त्यांचे सहकारी एच. डब्यु. ब्रुक व बर्टन सपिन यांनी मांडला. यात एखादया कार्यकर्त्याप्रमाणे (Actor) राज्यांना मानून विशिष्ट परिस्थितीत कोणते निर्णय घेतले जातात याचे निदान करता येते. निर्णय निर्धारक कोण तसेच त्यांच्यावर कोणत्या अंतर्गत व बाह्य घटकांचा प्रभाव होत असतो याचा विचार या सिद्धान्तात केला जातो. एडवर्ड शिल्स ( Edward Shils) व टालकॉट पार्सन (Talcott Parson) यासारख्या समाजशास्त्रज्ञांच्या विचारातून निर्णय ग्राह्यांची संकल्पना घेऊन स्नायडर, ब्रुक व सापिन यांनी ही संकल्पना परराष्ट्र धोरणांबाबत होणाऱ्या कृतीला लावण्याचा प्रयत्न केला आहे.

निर्णयग्राह्याचा सिद्धान्त सूक्ष्म विश्लेषणात्मक पद्धतीवर (micro analysis system) आधारीत आहे. या दृष्टिकोनाचे प्रमुख उद्देश दोन आहेत.

१) राजकीय क्षेत्रात जेथे निर्णय घेतले जातात व त्यानुसार प्रत्यक्ष कार्य केले जाते अशा निर्णायक किंवा महत्त्वाच्या रचनेची ओळख करुन घेणे.

२) राज्यांद्वारे घेतल्या गेलेल्या निर्णयांचे शास्त्रीय व पद्धतशीर विश्लेषण करणे.

**निर्णयाची प्रक्रिया व त्यावरील प्रभाव :-**

निर्णयग्राही दृष्टिकोनात राज्याला प्रमुख निर्णयात्मक केंद्र मानून निर्णय निर्धारकांच्या कृतीचे विश्लेषण केले जाते. निर्णय निर्धारण करणाऱ्यावर खालील घटकांचा प्रभाव प्रामुख्याने पडतो.

**१) बाह्यस्थिती -**

राज्याच्या भौगोलिक सीमेबाहेरील घटक - जागतिक संघटना, जागतिक लोकमत, बड्या शक्तींचे सैनिकी करण इत्यादींचा प्रभाव परराष्ट्र धोरण ठरविताना राज्यांवर पडत असतो.

**२) अंतर्गत स्थिती -**

अंतर्गत राजकारण, राज्यातील लोकमत, भौगोलिक स्थिती, शासनातील प्रमुख व्यक्ती, निर्णय घेणारी शासन यंत्रणा, राज्यातील दबाव गट, राज्यातील तांत्रिक व आर्थिक स्थिती या सर्वांचा विचार करुनच राज्याचे परराष्ट्र धोरण निश्चित होत असते.

**३) व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव -**

निर्णय निर्धारकांवर त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा व वर्तणुकीचा प्रभाव पडत असतो. उदा. स्टॅलिन, ख्रुश्चेव, पंडित जवाहरलाल नेहरु, लालबहादुर शास्त्री सारख्या नेत्यांच्या परराष्ट्र धोरणासंबंधी घेतलेल्या निर्णयांवर त्यांच्या व्यक्तिमत्त्वाचा प्रभाव दिसून येतो.

**४) वातावरणाचा प्रभाव -**

प्रत्येक धोरण निर्धारकावर मनोवैज्ञानिक वातावरणाचा परिणाम आढळून येतो. उदा. इंग्लंड व फ्रान्स मधील पुढाऱ्यांना साम्यवादी आक्रमणाचे अमेरिकेइतके भय वाटत नाही. त्यामुळे त्यांच्या साम्यवादी राष्ट्राबद्दलच्या निर्णयात व अमेरिकेच्या धोरणात फरक आढळतो.

**५) कार्यकारिणी व विधीमंडळाचा प्रभाव -**

राज्याच्या कार्यकारिणी व विधीमंडळाचा प्रभाव परराष्ट्र धोरणांवर प्रामुख्याने

पडतो. उदा. अमेरिकेतील सिनेट हे परराष्ट्र धोरणातील निर्णयांवर प्रभावी नियंत्रण ठेवीत असते.

**निर्णयग्राही दृष्टिकोनाचे परीक्षण –**

१) या दृष्टिकोनात केवळ निर्णय घेण्याचा विचार केलेला आहे. तो योग्य की अयोग्य याचा विचार केलेला नाही.

२) सत्तेच्या राजकारणाच्या व आंतरराष्ट्रीय वर्तणुकीच्या इतरही अनेक पद्धती आहेत. जसे संतुलन, आंतरराष्ट्रीय कायदे इत्यादींचा विचार यात झालेला नाही.

३) या दृष्टिकोनात शवचिकित्सा (Post Mortem) करावी तशी पद्धती वापरण्यात आलेली आहे. निर्णय अगोदर घेतले जातात व त्यांच्यावर मागाहून चर्चा केली जाते.

४) भविष्य काळात कशी परिस्थिती निर्माण होईल व कसे निर्णय घेतले जातील याचा अंदाज लावता येत नाही.

५) या सिद्धान्ताची उपयुक्तता प्रामुख्याने उपलब्ध माहितीवर अवलंबून आहे. अचूक माहिती न मिळाल्यास चुकीचे निर्णय घेतले जाऊ शकतात.

वरील दोष असले तरी परराष्ट्र धोरणाबाबत अभ्यास करणाऱ्यांकरीता हा एक मार्गदर्शक सिद्धान्त आहे.

## ३.२.६ खेळ सिद्धान्त

या सिद्धान्ताचा विकास प्रामुख्याने गणितज्ञ व अर्थशास्त्रज्ञांद्वारे झाला आहे. सर्व प्रथम गणितज्ञ व तत्त्ववेत्ता लीबनीझ याने या सिद्धान्ताचे प्रतिपादन युद्धनीतिच्या दृष्टीने केले. त्यानंतर १९ व्या शतकात एजवर्थ ( Edejworth ) युद्धनीतिच्या दृष्टीने उपयुक्त असा एक नमुना ( Model ) तयार केले.

खेळ सिद्धान्त ही एक विश्लेषणाची पद्धती आहे येणाऱ्या परिस्थितीनुसार योग्य तो निर्णय घेऊन कोणता पवित्रा घ्यावा यासंबंधीचे उत्तम मार्गदर्शन या सिद्धान्तात केलेले आहे. आंतरराष्ट्रीय व्यवहारात राज्यांना नेहमीच योग्य कृतीबाबत निर्णय घ्यावा लागतो. अशा राष्ट्रांना खेळ सिद्धान्ताद्वारे योग्य मार्गदर्शन मिळू शकते.

या सिद्धान्तात एखाद्या खेळातील दोन गट असावेत तसेच परस्परविरोधी राज्यांना समजले जाते. दोन ही राज्यांनी एकमेकांच्या हालचालीचा अंदाज घेऊन निर्णय घेणे अपेक्षित आहे. याकरीता खेळाडूंनी म्हणजे राज्यांनी इतर राज्यांच्या सामर्थ्य, कौशल्य व स्थितीबाबत माहिती प्राप्त करणे आवश्यक आहे. या आधारावरच राज्य आपले डाव रचू शकतात व प्रतिपक्षाचे डावपेच विफल करु शकतात.

## खेळ सिद्धान्ताचा विकास :

या सिद्धान्ताच्या विकासात इ.स. १९२८ मध्ये जॉन व्हॉन न्युमन ( John Von Neumonn ) याने या सिद्धान्ताचे महत्त्व प्रतिपादन करणारे जे प्रमेय मांडले ते महत्त्वपूर्ण आहे. पुढे १९४४ मध्ये न्युमन व आस्कर मार्गन्सटर्न याने खेळ सिद्धान्त आर्थिक क्षेत्राबाबत मांडला.

आंतरराष्ट्रीय राजकारणात या सिद्धान्ताचे मुख्य प्रतिपादन मार्टिन शुबीक ( Martin Shubik) व कार्ल डवायट्श या लेखकांनी केले आहे.

## खेळ सिद्धान्ताचे महत्त्वपूर्ण नियम :-

(१) आंतरराष्ट्रीय क्षेत्रात परस्परविरोधी असे दोन तुल्यबल पक्ष असतात. परस्परविरोधी धोरणामुळे त्यांच्यातील संघर्ष अटक असतो. यालाच संघर्ष (conflict ) असे म्हणतात.

(२) खेळातील दोन पक्ष ज्याप्रमाणे आपल्या बळाचा विचार करुन काही नियम तयार करतात, त्याचप्रमाणे परस्परविरोधी राष्ट्रे देखिल आपली स्थिती व बळ लक्षात घेऊन काही नियम तयार करतात.

(३) गुप्तहेर व अन्य साधनांचा उपयोग करुन प्रतिस्पर्धी राष्ट्रातील अंतर्गत व बाह्य व्यवहाराबाबत माहिती काढली जाते. यात अंतर्गत माहितीत राज्याच्या आर्थिक, तांत्रिक व सैनिक क्षमतांचा अंदाज घेतला जातो. तर बाह्य स्थिती संबंधी माहिती काढताना मित्र व शत्रू राष्ट्रांचा त्या राष्ट्राविषयीचा दृष्टीकोन जाणून घेतला जातो.

(४) या सिद्धान्तात असे गृहीत धरले जाते की राष्ट्रे परस्परांविरुद्ध युद्धनिती ठरवित असतात.

(५) या सिद्धान्ताच्या पाचव्या अवस्थेत राजकारणातील खेळाचे मूल्यमापन केले जाते. यात युद्धकाळात किती लाभ होऊ शकतो याचे अनुमान काढले जाते. यालाच मूल्य फेड (Pay off) असे म्हणतात.

अशाप्रकारे या सिद्धान्तात संघर्ष, खेळाचे नियम, सूचनाप्राप्ती, युद्धनीती व मूल्यमापन असे पाच नियम आढळतात.

## खेळ सिद्धान्ताचे प्रकार

खेळ सिद्धान्ताचे महत्त्वपूर्ण प्रकार खालील प्रमाणे आहेत –

**(१) हितसंबंधाचे खेळ (Games with identical interest )**

या प्रकारच्या खेळात खेळाडू समजूतदार असणे आवश्यक आहे. हितसंबंधाचे खेळ त्यांच्या द्वारे सहकार्याच्या तत्त्वावर खेळले जातात.

**(२) परस्परविरोधी हितसंबंधाचे खेळ (Games with opposite interest )**

या प्रकारात खेळाडूचे सहकार्य अशक्य असते. यात परस्परांवर दबाव आणण्याचा प्रयत्न केला जातो.

**(३) संमिश्र हितसंबंधाचे खेळ (Games with mixed interest )**

यात सहकार्य आणि विरोध दोन्हीची शक्यता असते.

**खेळ सिद्धान्तात पुढील तीन प्रकारांचा ही समावेश होतो.**

**(अ) शून्य योग खेळ (Zero Sum Game )**

या प्रकारच्या खेळात एक पक्ष प्रतिस्पर्धी राष्ट्रास पूर्णपणे नष्ट करतो व विजयी होतो. असा खेळ सर्वंकष अमर्यादित अवस्थेत निर्माण होतो. या प्रकारात दोन्ही पक्षांमधील संघर्ष जीवनमरणात्मक असतो. यात लाभ व नुकसान यांचे समीकरण सारखेच असते. अर्थात यात एकाला ज्याप्रमाणात लाभ होतो दुसऱ्याचे त्याच प्रमाणात नुकसान होते.

**(ब) सतत किंवा अविरत योग खेळ ( Constant Zero sum Game )**

यात एक पक्ष किंवा गट दुसऱ्या पक्ष किंवा गटाचे कोणतेही नुकसान होऊ न देता स्वतः जास्तीत जास्त लाभ प्राप्त करुन घेण्याचा प्रयत्न करीत असतो. एखाद्या बाजारात विक्रेते दुसऱ्याचे नुकसान न करता ज्याप्रमाणे स्वतःचा अधिकाधिक फायदा करुन घेण्याचा प्रयत्न करीत असतात त्याच प्रमाणे या खेळात प्रतिस्पर्ध्याचे नुकसान न करता त्याच्याबरोबर सहकार्यच केले जाते.

**(क) अ शून्य योग खेळ (Non-Zero Sum Game)**

परस्परविरोधी राज्ये जेव्हा निरंतर संघर्ष व सहकार्य या दोहोंत व्यस्त असतात अशा खेळास अ शून्य योग खेळ असे म्हणतात.

या सिद्धान्तात बुद्धीबळाप्रमाणेच जास्तीत जास्त प्यादे ज्याच्या पटावर असतील तो जिंकला असे समजले जाते. या सिद्धांताचे क्षेत्र व्यापक हितसंबंधाची प्राप्ती असून त्यात आर्थिक, राजकीय, लष्करी व सामाजिक हितसंबंध समाविष्ट असतात.

**खेळ सिद्धान्ताचे परीक्षण :**

खेळ सिद्धान्ताचा मुख्य दोष म्हणजे यात मुख्यतः दोन राज्यांच्या शून्य योग खेळाबाबत सांगितले गेले आहे. परंतु अनेकदा बहुविध राज्ये या खेळात भाग घेतात. अशाप्रकारच्या शून्य योग खेळाबाबतच संदेह निर्माण केला जातो. थॉमस शिलिंग यांनी विषेशतः राज्यांतर्गत सहकार्य व समायोजन अत्यावश्यक सांगितले आहे.

काही लेखक शून्य योग खेळाऐवजी 'चिकन गेम' अशी संकल्पना मांडून या खेळाद्वारे संघर्ष व विनाश टाळून नुकसान होणार नाही अशा प्रकारे संबंध निर्माण करावे असे मत मांडताना दिसतात.

खेळ सिद्धान्तात प्रत्येक राष्ट्र दुसऱ्याच्या कृती व सद्व्यवहाराबद्दल साशंक असते. राज्ये सदैव प्रतिस्पर्धाच्या इच्छेबाबत साशंक असतात. यालाच 'Prisoner Dilemma' असे म्हटले जाते.

या सिद्धान्ताची आणखी एक मर्यादा म्हणजे ह्या सिद्धान्ताचा उपयोग युद्धाच्या डावपेचात्मक खेळाबाबत सैनिकांना व त्यांच्या अधिकाऱ्यांना प्रशिक्षण देण्यासाठी होतो. राजकारणातील कठीण समस्यांचे आकलन होण्यासाठी हा सिद्धान्त उपयुक्त नाही.

थॉमस शिलिंग यांच्या मते हा सिद्धान्त मर्यादित युद्ध, शीतयुद्ध, अचानक आक्रमण किंवा अण्वस्त्रांच्या अधारावर धाक याबाबत उपयुक्त नाही. केवळ सर्वंकष युद्धावस्था लक्षात घेऊनच याचा अर्थबोध होऊ शकतो.

**निष्कर्ष –**

आंतरराष्ट्रीय राजकाराणातील काही घटनांचे सूक्ष्म विश्लेषण करण्याकरीता हा सिद्धान्त उपयुक्त आहे. जरी याद्वारे आंतरराष्ट्रीय समस्यांचे आकलन होत नसले तरी देखिल प्रतिपक्षाची युद्धनीती समजवून घेऊन त्यातील डावपेचांना शह देण्यास हा सिद्धान्त उपयुक्त ठरतो.

## ३.२.७ नववास्तववाद

आंतरराष्ट्रीय संबंधांच्या सिद्धान्ताच्या विकासातील कालानुक्रमे आलेला एक महत्त्वपूर्ण टप्पा म्हणजे नववास्तववाद होय. वास्तववादात राष्ट्र–राज्ये हा आंतरराष्ट्रीय

व्यवस्थेचा प्रमुख व मूलभूत घटक समजला जातो. राष्ट्र-राज्यातील संघर्षाचे प्रमुख कारण सदोष आंतरराष्ट्रीय संरचना आहे असे नववास्तववाद मानतो.

## नववास्तववादी सिद्धान्ताचा विकास -

ई.एच.कार लिखित (The Twenty years Crisis) या पुस्तकाद्वारे आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या अभ्यासातील एका नव्या सिद्धान्ताचा-वास्तववादाचा जन्म झाला. आंतरराष्ट्रीय राजकारण जसे आहे तसे समजून घेणे व तिचा अभ्यास करणे हा वास्तववादाचा गाभा होय. शीतयुद्धाच्या काळात अमेरिका व सोविएत संघ या महासत्तांमधील शस्त्रस्पर्धा व अण्वस्त्रस्पर्धा तीव्र सुरु असतानाच्या काळात वास्तववाद विशेष लोकप्रिय होता. दरम्यानच्या काळात शीतयुद्धात शांतता प्रस्थापित होत असतानाच सोविएत संघाद्वारे अफगाणिस्तानवर हल्ला करण्यात आला. या घटनेद्वारे अमेरिका व सोविएत संघातील शीतयुद्धाचे पुनरुज्जीवन झाले. याच दरम्यान केनेथ वॉल्टझ् या विचारवंताचे (Theory of International Politics ) हे पुस्तक प्रकाशित झाले. या पुस्तकाद्वारे नववास्तववादाची व्यवस्थित मांडणी केली गेली. पुढे अभिजात वास्तववादावरील उदारमतवादी आणि वर्तनवादी आक्षेपांची दखल घेत वास्तववादाची पुर्नमांडणी करण्याचे श्रेय वॉल्टझ् यांनाच जाते. त्यांच्या मांडणीवर वैज्ञानिक अभ्यास पद्धतीचा प्रभाव स्पष्टपणे दिसून येतो. हळूहळू ऐंशीच्या दशकात जागतिक राजकारणाच्या अभ्यासावर नववास्तववादाचा प्रभाव स्पष्टपणे दिसू लागला. शीतयुद्धाच्या काळात एकीकडे अमेरिका आणि सोविएत संघ यांच्यातील संघर्ष तर दुसरीकडे युरोप व जपान यांची अमेरीकेसोबत चालू असलेली व्यापारी स्पर्धा या सर्व घडामोडी नववास्तववादाच्या चिकित्सेचे केन्द्रबिंदू होते.

## नववास्तववादाची वैशिष्ट्ये :-

(१) नववास्तववादाचे प्रणेते वॉल्ट्झ यांच्यामते राष्ट्र-राज्ये ही क्षमतेच्या (capabilities) निकषावर भिन्न असतात. अराजकी आंतरराष्ट्रीय संरचना व त्यातून निर्माण होणाऱ्या असुरक्षेवर मात करण्याकरीता सत्ता अथवा क्षमता हे राष्ट्र-राज्याचे प्रभावी साधन आहे असे नववास्तववाद मानतो.

(२) प्रत्येक राष्ट्र राज्य आपल्या तौलनिक क्षमतेविषयी संवेदनशील असून आपल्या तौलनिक स्थानाला धक्का लागणार नाही. याविषयी जागरुक असतो व हेच नववास्तववादानुसार राज्यांमधील संघर्षाचे मूल कारण आहे.

(३) अभिजात वास्तववादाची मांडणी करणारे अभ्यासक मॉर्गेनथो यांच्या मते बहुध्रुवीय सत्तासंतुलन ही आदर्श व्यवस्था असते. परंतु नववास्तववाद प्रतिपादीत करणाऱ्या वॉल्टझ यांनी द्विध्रुवीय सत्ता संतुलन हे अधिक स्थिर व सुरक्षित असते असे मत मांडले आहे.

(४) वास्तववादानुसार माणसांप्रमाणेच सार्वभौम राज्येही स्वार्थी असतात व त्यांच्यात सत्तेविषयी लालसा असते. इतरांवर वर्चस्व गाजविण्याची दुर्दम्य इच्छा त्यांच्यात असते. अभिजात वास्तववादानुसार हितसंबंधाचा पाठपुरावा हेच राज्यांमधील संघर्षाचे मूळ आहे. तर नववास्तववादाद्वारे सदोष आंतरराष्ट्रीय संरचना हे राज्या-राज्यातील संघर्षाचे मूळ मानले गेले आहे.

## ३.२.८ परावलंबीत्वाचा सिद्धान्त (Dependency Approach)

दुसऱ्या महायुद्धानंतर जगात जी अर्थव्यवस्था निर्माण झाली ती १९व्या शतकातील किंवा २०व्या शतकाच्या पूर्वार्धातील अर्थव्यवस्थेहून वेगळ्या प्रकारची अशी होती. दळणवळण व संदेशवहन यांच्या साधनात झालेला बदल, तंत्रज्ञान क्षेत्रात झालेली प्रगती यामुळे जागतिक अर्थव्यवस्थेत बदल झाले. याच दरम्यान जगभरात नव्या राष्ट्रांचा जन्म झाला होता. याव्यतिरिक्त नव्या बहुराष्ट्रीय कंपन्या देखिल अस्तित्वात आल्या होत्या. संपूर्ण जग हे अमेरिका व सोविएत युनियन या दोन महासत्तांध्ये विभागले गेले होते.

या काळात मुख्यतः तीन आर्थिक उपव्यवस्था अस्तित्वात आल्या. ज्यांना तीन जगांमधील अर्थव्यवस्था म्हटले जाते. यात-

(१) परस्परावलंबन असणारी पाश्चात्य व्यवस्था

(२) परावलंबनाची उत्तर-दक्षिण व्यवस्था

(३) यापासून स्वतंत्र अशी पूर्व-पश्चिम व्यवस्था यांचा समावेश होतो. यापैकी पहिल्या अर्थव्यवस्थेत उत्तर अमेरिका, पश्चिम युरोप व जपान यांच्यातील परस्परावलंबन असणाऱ्या प्रगत अर्थव्यवस्थांचा समावेश होतो. दुसऱ्या प्रकारात श्रीमंत पाश्चात्य देश व त्यांच्यावर अवलंबून असणारे नव्याने स्वतंत्र झालेले गरीब देश यांच्यातील आर्थिक संबंधावर आधारीत विषम अर्थव्यवस्था येते. तिसऱ्या प्रकारात मुख्यतः साम्यवादी देशांच्या अर्थव्यवस्था येतात. या तीन अर्थव्यवस्थांपैकी दुसऱ्या प्रकारच्या अर्थव्यवस्थेसंबंधी परावलंबित्वाचा सिद्धान्त मांडला जातो.

**परावलंबित्वाच्या सिद्धान्ताची वैशिष्ट्ये :-**

(१) आशिया, आफ्रिका व लॅटिन-अमेरिका या खंडांतील देशांच्या विकासाच्या कमी पातळीचे स्पष्टीकरण वेगळ्या प्रकारे मांडणारा हा सिद्धान्त आहे. या खंडांमधील देशांमध्ये भांडवल, बचतीचा दर, पायाभूत संरचना व तंत्रज्ञान यांचा अभाव या गोष्टी प्रामुख्याने या देशांच्या मागासलेपणा करीता जबाबदार आहेत असे 'आधुनिकीकरणाच्या' सिद्धाताद्वारे सांगण्यात आले. परावलंबित्वाच्या सिद्धान्ताद्वारे मात्र या देशांच्या मूलभूत गरजांची पूर्तता व समता यावर विशेष भर देण्यात आलेला आहे. केवळ आर्थिक विकास म्हणजे विकास असे हा सिद्धान्त मानत नाही.

(२) या सिद्धान्ताद्वारे उत्तर व दक्षिण अर्थात विकसित बाजारपेठी अर्थव्यवस्था व त्यांच्या आर्थिक मदतीवर आणि त्यांच्याबरोबर चालणाऱ्या व्यापारावर अवलंबून असणारे स्वतंत्र झालेले गरीब देश यांची अर्थव्यवस्था यांमध्ये वाढत चाललेल्या विषमतेला प्रकर्षाने सामोरे आणले गेले.

(३) १९६० ते १९७० या काळात विकसित झालेल्या या सिद्धान्ताने तिसऱ्या जगातील देशांच्या अर्थात गरीब, कमी विकसित व पूर्वीच्या वासाहतिक देशांच्या अविकासाची कारणे त्यांच्या अंतर्गत नसून त्यांच्याबाहेर म्हणजेच आंतरराष्ट्रीय व्यवस्थेत आहे असे सांगितले. या सिद्धान्तानुसार तिसऱ्या जगातील राष्ट्रांचे अविकसित राहण्याचे प्रमुख कारण त्यांचे पहिल्या जगातील विकसित राष्ट्रांवरील परावलंबित्व हे आहे.

(४) या सिद्धान्ताचे मुख्य प्रवर्तक आंद्रे गुंदर फ्रँक यांच्या मते 'परकीय थेट गुंतवणूक' हे तिसऱ्या जगातील गरीबीचे प्रमुख कारण आहे. जागतिक अर्थव्यवस्थेत विकसित देशांनी तिसऱ्या जगातील देशांमध्ये अशी गुंतवणूक केली व त्याद्वारे पद्धतशीपरणे तेथिल संपत्ती आपल्याकडे खेचून आणली.

(५) या सिद्धान्ताने तिसऱ्या जगातील देशांमध्ये असणाऱ्या भांडवल, तंत्रज्ञान या सारख्या अंतर्गत गोष्टींमुळे मागासपणा आहे असे प्रतिपादन करणाऱ्या 'आधुनिकीकरण' सिद्धान्ताला व तसेच 'भांडवलशाही सर्वत्र विकास घडवून आणते' असे मत मांडणाऱ्या कार्ल मार्क्सच्या सिद्धान्तास फेटाळून लावले.

(६) मुख्यतः असमान व्यापारी करार, विकसित देशांद्वारे व आंतरराष्ट्रीय कंपन्याद्वारे तिसऱ्या जगातील देशांमध्ये होणारी परकीय थेट गुंतवणूक, कर्जावरील व्याजाची परतफेड तसेच महाग औद्योगिक तयार मालाच्या बदल्यात स्वस्त कच्चा माल अशी देवाणघेवाण यातूनच जागतिक व्यवस्थेमध्ये प्रचंड विषमता आली असून केन्द्र व परीघ असे असमान संबंध निर्माण झाले असे स्पष्टीकरण हा सिद्धान्त देतो.

## **३.२.९ राष्ट्रातीतवाद** (Transnationalism)

नव्या जागतिक व्यवस्थेमध्ये राष्ट्र-राज्य अंतर्गत गट आणि संघटना, क्षेत्रीय व आंतरराष्ट्रीय संघटना, फुटीरतावादी, स्वांतत्र्यवादी, दहशतवादी इत्यादी गट व संघटना, बहुराष्ट्रीय कंपन्या अशा विविध प्रकारच्या अराज्यघटकांचा प्रभाव जागतिक राजकारणावर पडलेला दिसून येतो. या घटकांमुळे अनेक प्रकारची आव्हाने देखिल राष्ट्र राज्यांपुढे उभी टाकली आहेत. राष्ट्रातीत (Transnational) पातळीवर ही आव्हाने उभी आहेत.

जागतिक व्यवस्थेचा मूलभूत घटक राष्ट्र-राज्ये असली व त्यांच्या अंतर्गत व परराष्ट्र धोरणांनी जागतिक राजकारण आकारास येत असले तरी देखिल सार्वभौम राष्ट्रांच्या पलिकडले घटक जागतिक राजकारणावर प्रभाव पाडीत आहे. दिवसे-न-दिवस या घटकांचा आंतरराष्ट्रीय संबंधांवरील प्रभाव वाढतच जाताना दिसून येत आहे. (Transnationalism) राष्ट्रातीतवाद अंतर्गत या सर्व घटकांचा विचार केला जातो. या राष्ट्रातील घटकांचा व त्यांच्या जागतिक राजकारणावरील परिणामांचा ऊहापोह खालील मुद्द्यांच्या आधारे करता येईल -

### **(अ) बहुराष्ट्रीय कंपन्या :**

जगभरातील विविध देशात उत्पादन व व्यापार करणाऱ्या औद्योगिक संघटनांना बहुराष्ट्रीय कंपन्या असे म्हणतात. आपल्या कॉर्पोरेट साम्राज्याच्या जोरावर ते जागतिक संबंध प्रभावित करीत असतात. अशा कंपन्यांचे काम जरी अनेक देशात चालत असले तरी त्याचा फायदा मात्र एकाच देशाकडे वळत असतो. नववसाहतवादाची साधने म्हणून या कंपन्यांकडे बघितले जाते. आपल्या फायदयासाठी या कंपन्या आपल्या सरकारवर दबाव आणून आंतरराष्ट्रीय संबंध नियंत्रित करण्याचा प्रयत्न करीत असतात.

## (ब) आंतरराष्ट्रीय संघटना :

राष्ट्राराष्ट्रांमधील प्रश्न, युद्ध, मानवी हक्क इत्यादी बाबींमध्ये हस्तक्षेप करुन विविध देशांची धोरणे व जागतिक राजकारणाला प्रभावित करण्याची क्षमता या संघटनांकडे असते. यात काही क्षेत्रीय तसेच आंतरराष्ट्रीय संघटनांचा उल्लेख करता येईल, नाटो सारख्या संरक्षण कराराच्या संघटना आग्नेय आशियाई राष्ट्रांची (आसियान) ही आर्थिक संघटना तसेच संयुक्त राष्ट्रांचा मानवी हक्क आयोग इत्यांदीचा दाखला या संदर्भात देता येईल. जागतिक व्यापार संघटना (WTO) सारखी आंतरराष्ट्रीय व्यापार संघटना जागतिक व्यापार नियंत्रित करते. हे उदाहरण आंतरराष्ट्रीय संघटनांचा जागतिक राजकारणावरील प्रभाव दर्शविण्यास पुरेसे बोलके उदाहरण आहे.

## (क) बिगर-सरकारी स्वयंसेवी संघटना :

ना-नफा तत्त्वावर काम करणाऱ्या अनेक अशासकीय संघटना आंतरराष्ट्रीय स्तरावर आहेत. युरोपातील ग्रीन पीस, भारतातील नर्मदा बचाव आंदोलन यासारखे पर्यावरणवादी गट या अंतर्गत येतात. मानवी हक्कांची सुरक्षा करणे, पर्यावरणाचे रक्षण करणे, धार्मिक मूलतत्त्ववादांच्या समस्येवर तोडगा काढणे अशा विविध उद्दिष्टांना सामोरे ठेऊन या संघटनांची निर्मिती व कार्य चालू असते. प्रामुख्याने विविध प्रकारच्या वैश्विक समस्या सोडविण्याकरीता यांचे आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रयत्न सुरु असतात.

## (ड) धर्म :

धर्माचा आंतरराष्ट्रीय संबंधावर असलेला प्रभाव पूर्वापार काळापासून दिसून येतो. धर्माच्या आधारावर निष्ठेने सातत्याने लढा देत वेगवेगळ्या देशात राहणाऱ्या नागरीकांनी इस्त्राएल निर्माण केले. या घटनेचा एकूणच जागतिक राजकारणावर परिणाम झाला होता. 'अखिल इस्लाम' (Pan Islamism) च्या घोषणेद्वारे असेच मुस्लिमबहुल राष्ट्रांचा गट निर्माण करण्याचे प्रयत्न झालेले दिसतात. अलिकडच्या काळात धर्माच्या नावावर दहशतवादी संघटनांनी ही आंतरराष्ट्रीय संबंधावर परिणाम केलेला दिसून येतो.

## (इ) अनिवासी नागरिक : (Diaspora)

वेगवेगळ्या राष्ट्रांमध्ये मूळ तिथले नसलेले परंतु स्थलांतरानंतर तिथेच स्थायिक झालेले अनेक नागरिक दिसून येतात. हे अनिवासी नागरिक कधी चांगल्या संधीच्या तर कधी उज्ज्वल भविष्याच्या शोधात दुसऱ्या देशात गेले तरी त्यांचे भावनिक तसेच आर्थिक

नाते मूळ देशाशी असते. या अनिवासी नागरिकांच्या मार्फत ही द्विराष्ट्रांचे संबंध दृढ होण्यास मदत होते. अलिकडच्या काळात भारत-अमेरिका संबंध सौहार्दाचे झाले यात अमेरिकेतील भारतीय स्थलांतरितांचे योगदान मोठे आहे.

### (फ) स्वांतत्र्यवादी किंवा फुटीरतावादी संघटना :

एखाद्या राष्ट्रातील विशिष्ट जनसमूह आपल्या असंतोषास वाचा फोडण्यासाठी अशाप्रकारच्या संघटनेची निर्मिती करतो. असा संघटनांचा प्रभाव जागतिक राजकारणावर स्पष्टपणे बघितला जाऊ शकतो. उदा. इस्त्राएल मधील पॅलेस्टिनी जनतेच्या स्वातंत्र्याच्या मागणीसाठी अस्तित्वात आलेली पॅलेस्टिन मुक्ति संघटना (PLO), श्रीलंकेतील तमिलींच्या हक्कांसाठी लढा देणारी तमिळ वाघांची संघटना (LTTE) इत्यादी या संघटना एखाद्या जनसमूदायाच्या स्वातंत्र्यासाठी जरी लढा देत असली तरी देखिल त्या राष्ट्राच्या शासनाच्या दृष्टिकोणातून त्या संघटना फुटिरतावादी असतात.

### (ग) दहशतवाद :

दुसऱ्या महायुद्धा नंतर दहशतवादाचे आव्हान जागतिक राजकारणापुढे उभे ठाकले. दहशतवादी संघटना ज्या सुरवातीला केवळ विशिष्ट राष्ट्रांमध्ये सक्रीय होत्या त्यांचे जाळे हळूहळू जागतिक स्तरावर पसरत गेले. त्यांच्या दहशतवादी कारवायांनी जागतिक सुरक्षेपुढे आव्हान निर्माण केले आहे. यांचा परिणाम असा झाला की सीमापार दहशतवाद थांबविण्यासाठी राष्ट्रा-राष्ट्रांमधील सहकार्य वाढीस लागले आहे.

अलिकडच्या काळात या विभिन्न अराज्य घटकांचा जागतिक राजकारणावरील प्रभाव स्पष्टपणे बघितला जाऊ शकतो. राष्ट्र-राज्ये व त्यांची अंतर्गत व परराष्ट्र धोरणे यांच्या पलिकडे असलेल्या या अराज्य घटकांचा अभ्यास म्हणूनच दिवसे-न्-दिवस महत्त्वपूर्ण होतो आहे.

## ३.३ सारांश

आंतरराष्ट्रीय संबंधाचा अभ्यास विविध दृष्टिकोन व सिद्धान्त यांच्या आधारे केला जातो. आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या सिद्धान्तांचे १) पारंपारीक २) अनुभववादी असे प्रमुख दोन दृष्टिकोन आहेत. या घटकात या दोनही प्रकारच्या दृष्टिकोनांचा अभ्यास आपण केला. अलिकडच्या काळात विकसित होत असलेला व आंतरराष्ट्रीय राजकारणाला विशेषत्वाने प्रभावित करीत असलेला राष्ट्रातीतवाद देखिल आपण अभ्यासला.

वास्तववाद किंवा आदर्शवाद यासारख्या पारंपारिक सिद्धान्तांमध्ये कोणती आदर्श तत्त्वे व मूल्ये मांडली गेली तिचे विवेचन यात केले आहे तसेच या सिद्धान्तांचे परिक्षण ही करुन त्यातील दोष नोंदवले आहेत. अनुभववादी सिद्धान्तांची सुरवात

वर्तनवादापासून झाली. पन्नासच्या दशकात आलेल्या वर्तनवादाच्या लाटेपासून आंतरराष्ट्रीय संबंधाचे अभ्यासकही अलिप्त राहू शकले नाही. त्या दरम्यान आंतरराष्ट्रीय राजकारणाचेही एक मूल्यविरहित विज्ञान निर्माण करण्याचे प्रयत्न झाले. पुढील काळातही सैद्धान्तिक विकासावर वैज्ञानिक दृष्टिकोनाचा प्रभाव राहीला. आधुनिक सिद्धान्तामध्ये खेळ सिद्धान्ता सोबतच व्यवस्थात्मक व निर्णयग्राही या दोन दृष्टिकोनांचा अभ्यास देखिल त्यांची वैशिष्टे, प्रकार व परिक्षण यासह आपण केला.

विसाव्या शतकात आंतरराष्ट्रीय राजकारणा समोर नवी आव्हाने उभी राहिली. परिणामी आंतरराष्ट्रीय राजकारणाचे राज्यकेन्द्री व वास्तववादी स्वरुप बदलत गेले. बदलत्या काळानुसार जागतिक राजकारणावर राज्येतर घटकांचे महत्त्व वाढत गेले. अण्वस्त्रांमुळे जागतिक राजकारणा समोर नवीनच आव्हाने निर्माण झाली. परिणामी या सर्व घटकांचा विचार करुनच नववास्तववाद व राष्ट्रातीतवाद (Transnationalism) सारखे सिद्धान्त उदयास आले. आंतरराष्ट्रीय संबंध म्हणजे वेगवेगळ्या राज्यांमधील संबंध असून सार्वभौम राज्ये हा जागतिक व्यवस्थेचा सर्वात महत्त्वाचा घटक आहे हा विचार मागे पडून अराज्य घटकांचा वाढता प्रभाव या सिद्धान्तांमध्ये अधोरेखित केला गेला. असे अराज्य घटक कोणते आहेत व ते आंतरराष्ट्रीय राजकारणाला कशाप्रकारे प्रभावित करीत असतात याचे विवेचन या घटकात केलेले आहे.

आधुनिक काळात राजकारण व अर्थकारण हे एकमेकांत गुंतलेले दिसून येते. त्यामुळेच या दोहोंच्या परस्पर संबंधावर आधारीत सिद्धान्ताचा अभ्यास करणे महत्त्वपूर्ण ठरते. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे अर्थ राजकारणाच्या अभ्यासाला आंतरराष्ट्रीय संबंधाच्या अभ्यासात महत्त्व प्राप्त झाले आहे. आंतरराष्ट्रीय संबंधाच्या बदलत्या चौकटीनुसार आंतरराष्ट्रीय राजकीय अर्थकारणाला स्पष्ट करणाऱ्या परावलंबित्वाच्या सिद्धान्ताचा देखिल अभ्यास करणे त्यामुळेच गरजेचे ठरते. आर्थिक सत्तेचे जागतिक राजकारणावरील वाढते महत्त्व लक्षात घेऊन या सिद्धान्ताचा अभ्यास यात आपण केला. एकंदरीत पारंपारिक सिद्धान्तांपासून सुरवात करुन टप्पाटप्प्याने जागतिक राजकारणात जसा जसा बदल झाला व त्या बदलाचा विचार ज्या-ज्या दृष्टिकोनातून विभिन्न सिद्धान्तात केला गेला, त्यांची ओळख विद्यार्थ्यांना करुन देण्याचा प्रयत्न या घटकात केला आहे.

## ३.४ सरावासाठी स्वाध्याय

पुढील प्रश्नांची १० ते १५ ओळीत उत्तरे लिहा.

(१) आंतरराष्ट्रीय संबंधाच्या आदर्शवादी सिद्धान्ताचे वर्णन करा.
(२) वास्तववादी दृष्टिकोनाचे मूल्यमापन करा.
(३) वर्तनवादी दृष्टिकोनाचे टीकात्मक परिक्षण करा.
(४) व्यवस्थात्मक दृष्टिकोनाचे सटीक विवेचन करा.
(५) जागतिक राजकारणासंबंधी निर्णयग्राही दृष्टिकोन म्हणजे काय? स्पष्ट करा.
(६) आंतरराष्ट्रीय संबंध समजवून घेण्यात खेळ सिद्धान्ताचे स्वरुप, महत्त्व व भूमिका विशद करा.
(७) नववास्तववादाची वैशिष्ट्ये सांगा.
(८) परावलंबित्वाचा सिद्धान्त सोदाहरण स्पष्ट करा.
(९) राष्ट्रातीतवादातील (Transnationalism) अराज्य घटक स्पष्ट करा व त्यांच्या जागतिक राजकारणावरील प्रभावाचे विवेचन करा.

## ३.५ अधिक वाचनासाठी पुस्तके

(१) पेंडसे अरुणा, सहस्त्रबुद्धे उत्तरा, 'आंतरराष्ट्रीय संबंध'
(२) देवळाणकर शैलेन्द्र, 'भारत आणि जग'
(३) रायपूरकर वसंत, 'आंतरराष्ट्रीय संबंध'

*****

# ४

# घटक ४: संकल्पना

**घटक संरचनाः**

४.० उद्दिष्टे
४.१ प्रास्ताविक
४.२ विषय विवेचन
    ४.२.१. राष्ट्रिय सत्ता
    ४.२.२ सामुहीक सुरक्षा
    ४.२.३ संयुक्त राष्ट्रसंघ आणि विश्वशांती
    ४.२.४ अलिप्तता चळवळ
४.३ सारांश
४.४ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न
४.५ सरावासाठी प्रश्न
४.६ अधिक वाचनासाठी पुस्तके

## ४.० उद्दिष्टे

या पाठामध्ये आपण पुढील घटकांचा अभ्यास करणार आहोत. त्यामध्ये –

१) राष्ट्रीय सत्ता म्हणजे काय आणि राष्ट्रीय सत्तेचे उद्देश्य

२) सामुहीक सुरक्षेची व्याख्या तसेच महत्व याबद्दल माहीती घेणार आहोत.

३) संयुक्त राष्ट्रसंघाची स्थापना आणि जागतिक शांतता स्थापनेमध्ये संयुक्त राष्ट्रसंघाच्या भूमिकेचा अभ्यास याबद्दल चर्चा करणार आहोत.

४) अलिप्तता चळवळ सुरू होण्याचे कारणे व जागतिक संरचनेवर त्याचा झालेला परिणाम याचा अभ्यास करणार आहोत.

## ४.१ प्रास्ताविक

आंतरराष्ट्रीय संबंधाचा अभ्यास करताना विविध घटकांचा अभ्यास करणे खूप महत्वाचे आहे. या पाठामधून आपण राष्ट्रीय सत्ता, सामूहीक सुरक्षा, संयुक्त राष्ट्रसंघ आणि विश्वशांती तसेच अलिप्ततावादी चळवळ याबद्दल विविध वैशिष्टयांसह समजून घेणार

आहोत. आजच्या बदलत्या आंतरराष्ट्रीय संबंधामध्ये विविध घटकांचा समावेश मोठ्या प्रमाणात पाहायला मिळतो. त्यामध्येच राष्ट्रीय सत्ता, सामुहीक सुरक्षा, संयुक्त राष्ट्रसंघ आणि अलिप्तता चळवळ यांची महत्वाची भूमिका आहे.

राष्ट्रीय सत्ता म्हणजे काय ? राष्ट्रीय सत्तेचे उद्देश्य, त्यानंतर राष्ट्रीय शक्तीचे वैशिष्ट्ये, प्रकार याबद्दलची माहीती या पाठामध्ये आहे. राष्ट्रीय सत्ता हा घटक प्रत्येक राष्ट्राच्या परराष्ट्रधोरण निर्मितीचा महत्वाचा घटक आहे. प्रत्येक देशाच्या परराष्ट्र धोरणावर राष्ट्रीय सत्तेतील विविध घटकांचा परीणाम पाहायला मिळतो. राष्ट्रीय सत्तेचे प्रकार पाहताना मृदू सत्ता तसेच लष्करी सत्ता यांचा सुद्धा सामावेश होतो.

आंतरराष्ट्रीय संबंधामध्ये तसेच जागतिक पातळीवर जागतिक समिकरण बदलण्यामध्ये सर्वात महत्वाचा घटक म्हणजे सामुहीक सुरक्षा सामुहीक सुरक्षेमध्ये, गटातील किंवा समुहातील एका सदस्यावरील हल्ला हा समदायावरील हल्ला समजून त्याचा प्रतिकार सामुहीक पातळीवर होताना दिसतो. तसेच दुसऱ्या महायुद्धानंतर आणि पूर्वी सुद्धा सामुहीक सुरक्षेची संकल्पना आपणास पाहायला मिळते. दुसऱ्या महायुद्धानंतर सुद्धा सामुहीक सुरक्षा जागतिक पातळीवर पाहायला मिळते.

सामुहीक सुरक्षेअंतर्गत आंतरराष्ट्रीय पातळीवर विविध संघटनांची स्थापना झालेली आहे तसेच सामुहीक सुरक्षेच्या उद्दीष्टामुळे बऱ्याच प्रमाणात प्रादेशिक पातळीवर सामुहीक सुरक्षेबद्दल विविध गट निर्माण करण्याचा प्रयत्न सुद्धा पाहायला मिळतो. सामुहीक सुरक्षेमुळे सत्ता संतुलनावर पण परीणाम होतो. किंबहूना सत्ता संतुलन राखण्यास मदत होते. शितयुद्धाच्या काळामध्ये सामुहीक सुरक्षे अंतर्गत जागतिक पातळीवर दोन मोठे गट निर्माण करण्यात आले होते.

संयुक्त राष्ट्रसंघ ही दुसऱ्या महायुद्धानंतर निर्माण करण्यात आलेली जागतिक पातळीवरील सर्वात महत्वाची संस्था होय. संयुक्त राष्ट्रसंघाच्या स्थापनेमागचा सर्वा महत्वाचा उद्देश्य म्हणजे जागतिक शांतता निर्माण करण्यास सहकार्य करणे, मानवी हक्कांचे संरक्षण करणे इ. संयुक्त राष्ट्रसंघ ही संस्था आंतरराष्ट्रीय संस्था आहे, ज्यामध्ये आपणास जागतिक सर्वच राष्ट्राचे प्रतिनिधी पाहायला मिळतात.

संयुक्त राष्ट्रसंघ ही संस्था आंतरराष्ट्रीय संस्था आहे, ज्यामध्ये आपणास जागतिक सर्वच राष्ट्राचे प्रतिनिधी पाहायला मिळतात.

१९५०च्या दशकामध्ये जगामध्ये बऱ्याच मोठ्या प्रमाणावर विविध वसाहती

स्वातंत्र्याच्या मागणीने प्रेरीत होऊन स्वतंत्र लढा लढत होते. त्यानंतर १९६०च्या दशकात बरेच अविकसीत राष्ट्रांनी, वसाहतवादी शक्ती पासुन स्वातंत्र्य मिळाले आणि त्याचाच भाग म्हणजे प्रत्येक राष्ट्र सार्वभौमपने राज्यकारभार चालवायचा प्रयत्न करत होते. या सार्वभौमत्वामध्ये अडथळा निर्माण होऊ नये यासाठी जवळपास ११८ विकसनशील राष्ट्रांनी स्वतंत्र असा गट निर्माण करण्याचा प्रयत्न केला त्याचाच परीणाम म्हणजे अलिप्ततावादी चळवळ होय.

अलिप्ततावाी चळवळीमध्ये भारत, ईजिप्त, इंडोनेशिया आणि युगोस्लोव्हाकीया या राष्ट्रांनी प्रामुख्याने अलिप्ततावादी गट स्थापन करण्यासाठी पुढाकार घेतला. अलिप्ततावादी चळवळीचे मुख्य उद्देश्य म्हणजे पूर्व (साम्यवादी) लष्करी गटापासुन आणि पश्चिम (भांडवलवादी) राष्ट्रांच्या लष्करी गटांनी प्रभावित न होता स्वतंत्र्य आणि सार्वभौमपणे राष्ट्राचे अस्तित्व टिकवणे हा या अलिप्ततावादी चळवळीचे मुख्य तत्व होते. याचाच परिणाम आजच्या जागतिक संरचनेवर पाहायला मिळतो. अलिप्ततावादी गटाच्या चळवळीमुळे तिसऱ्या जगातील राष्ट्रांना प्रतिनिधीत्व मिळवून देण्यात मदत झाली. या सर्व आजच्या परिस्थीतीत अलिप्ततावादी चळवळीचे संबंध किती प्रमाणात आहे याबद्दलची चर्चा या पाठामध्ये झालेली आपणास दिसुन येईल.

## ४.२ विषय विवेचन

## ४.२.१. राष्ट्रिय सत्ता

आंतरराष्ट्रीय संबंधाच्या अध्ययनाचा मूलभूत घटक आपण लक्षात घेतल्यास 'सत्ता' हाच आहे. प्राचीन काळापासुन ते आधुनिक किंवा उत्तर-आधुनिक काळापर्यंत सर्व प्रकारच्या, आदर्शवादी, वास्तववादी, विचारवंतानी या घटकाला अनुसरुन या विषयाचे अध्ययन केलेले आहे. त्यामुळेच 'सत्ता' हा विषय आज ही तेवढाचा महत्त्वपूर्ण आहे. 'सत्ता' या घटकाचा प्रभाव व्यक्ती, व्यक्ती समुह त्यांच्याशी निगडीत राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक अशा सर्वच घटकांवर प्रभाव पाडत असतांना आपल्याला दिसून येतो. आंतरराष्ट्रीय संबंधाचा अभ्यासक किंवा विद्यार्थी या नात्याने आपल्याला या घटकाचे समकालीन महत्व समजून घेणे आवश्यक आहे.

सत्ता किंवा दंडशक्ती हाच संपूर्ण जगाच्या संचालनाचा प्रमुख आधार आहे हे प्राचीन सुत्र आज जरी संपूर्ण सत्य नसले तरी याच्या भोवतालच संपूर्ण जगाचे

राजकारण फिरत असते हे मान्यच करावे लागते. आज केवळ या संपल्पनेची व्याप्ती वाढली आहे. तसेच नवीन तंत्रज्ञानामुळे याच्या उपयोगीतेत बदल झाला आहे हे आपण समजु शकतो.

द्वितीय महायुद्धानंतर आर्थिक घटकाने या संकल्पनेला एक नवीन आयाम दिला तर उत्तर आधुनिक काळात म्हणजेच १९७० नंतर सांस्कृतिक साम्राज्यवाद जो निर्माण झाला त्याच्या मुळाशी आपण विचार केल्यास सत्ता निर्माण करणे हाच हेतु आहे हे मान्यच करावे लागते.

तेव्हा अशा पारंपारिक व आधुनिक आशयातुन या संकल्पनेचे अध्ययन करणे आज आवश्यक झाले आहे.

**व्याख्या अर्थ :-**

राष्ट्रीय सत्ता ही संकल्पना आपल्याला लक्षात घेण्याकरिता अभ्यासकांनी दिलेल्या व्याख्या या ठिकानी मांडणे आवश्यक ठरते.

मॉर्गेन्थो यांच्या मतानुसार शक्ती म्हणजे एका माणसाने दुसऱ्या माणसाच्या मन व कृतीवर नियंत्रण होय.

शुभॉ यांच्या मते सर्व राजकारण म्हणजे शक्तीसाठी चाललेला संघर्ष होय. ज्याच्या हाती सत्ता आहे त्यांना इतरांवर आपली सत्ता गाजविण्यात व आपल्या इच्छेप्रमाणे त्यांच्याकडून कार्य करून घेण्यात आनंद वाटतो.

लॉस्वेल व कॉप्लानच्या मते संपूर्ण राज्यशास्त्रामध्ये शक्तीची संकल्पना ही अतिशय मूलभुत स्वरूपाची आहे. राजकीय प्रक्रिया ही शक्तीचीच आकारीत प्रतिमा असून, शक्तीचे वाटप व शक्तीचा वापर त्यात होतो.

रॉबर्ट बर्स्टीडच्या मते बल प्रयोगाची क्षमता म्हणजे शक्ती होय.

वरील व्याख्यांचा थोडक्यात आशय आपण लक्षात घेतल्यास दुसऱ्या व्यक्ती किंवा राष्ट्राला नियंत्रीत करण्याची क्षमता म्हणजेच सत्ता होय.

परंतु सत्ता आणि क्षमता या दोन्ही संकल्पना भिन्न आहेत. क्षमता ही अधिक व्यापक संकल्पना आहे. तिचे अस्तित्व देखिल अधिक असते. सत्ता ही तात्कालिक असुन ती असे पर्यतच तुमचे नियंत्रण दुसऱ्यावर असते आणि तीचे अस्तित्व हे केव्हाही संपुष्टात येवू शकते.

राष्ट्रीय सत्ता आणि राष्ट्रीय हित या दोन्ही संकल्पना देखिल एकमेकांवर अवलंबुन आहेत. सत्ता असेल तर ते राष्ट्र आपले हित साध्य करू शकते किंवा आपले राष्ट्रीय हित साध्य करण्याकरिता सत्ता प्राप्त करावी लागते. त्यामुळेच आंतरराष्ट्रीय राजकारणात एखादे राष्ट्र आपला पूर्वीचा निर्णय का बदलतो किंवा कायम ठेवतो या मागे देखिल त्याचे राष्ट्रीय हित हाच घटक अधिक महत्वपूर्ण असतो हे लक्षात घेणे आवश्यक आहे.

## राष्ट्रीय सत्तेचे उद्देश :

### १) आपल्या राष्ट्राचे संरक्षण करते :-

प्रत्येक राष्ट्र सत्तेच्या आधारावरच आपल्या राष्ट्राचे सार्वभौमत्व व अखंडता कायम ठेवण्याचा प्रयत्न करीत असतो. त्यामुळे अधिक सत्ता कशी प्राप्त करता येईल याचा ही विचार करित असतो.

### २) दुसऱ्या राष्ट्रावर प्रभाव पाडणे :-

राष्ट्रीय सत्तेचा दुसरा उद्देश हा दुसऱ्या राष्ट्रावर प्रभाव पाडणे व आपले हित जोपासने हा असतो. प्रभावातुन सहज सत्ता प्राप्त होत असते व त्यातुनच दुसऱ्या राष्ट्राचे वर्तन नियंत्रीत करता येऊ शकते. म्हणुनच या उद्‌देशावर प्रत्येक राष्ट्राचा भर असतो.

## राष्ट्रीय शक्तीची वैशिष्ट्ये

### १) शक्तिसंवर्धन आणि संरक्षण :-

कोणत्याही राज्याचे मुल्यमापन त्या राज्याच्या शक्तीनुसार होते. उदा. अमेरीका, रशिया, साम्यवादी चीन ही आज महत्त्वाची राष्ट्रे ठरली आहेत. कारण शक्तीच्या आणि स्वसंरक्षणाच्या दृष्टिने ही राज्ये बलवान आहेत. ह्याउलट स्वीडन, डेन्मार्क ही राष्ट्रे कमजोर किंवा शक्तीहीन ठरली आहेत. कारण आपल्या राज्याचे संरक्षण करण्यास ही राष्ट्रे कमजोर ठरली आहे.

राष्ट्रीय शक्ती कमजोर असणे किंवा बलशाही असणे हे सापेक्ष तत्व आहे. तरीपण जगातील प्रत्येक राष्ट्र आपल्या राष्ट्राचे संरक्षण अधिक संवर्धन करण्यासाठी राष्ट्रीय शक्तीवरच अवलंबुन असते.

### २) शक्ती हे साधन आहे :-

आपले हित साध्य करण्यासाठी राष्ट्राला शक्तीचा वापर करावा लागतो. परंतु ह्याचा अर्थ शक्ती हे साध्य नाही, ते साधन आहे. शक्तीचा साध्य म्हणुन उपयोग केल्यामुळे जर्मनी व जपान ही राष्ट्रे दुसऱ्या महायुद्धात पराभुत होऊन शक्तीहीन राष्ट्रे झाली.

### ३) शक्ती गतिशील आहे :

राष्ट्रीय शक्ती ही कधीच स्थिर नसते ती गतिमान आहे. कारण आज शक्तीप्रधान असलेले राज्य भविष्यात शक्तीशाली राहीलच असे नाही. सोव्हीएट रशियाच्या विघटनामुळे ते राज्य पुर्वीसारखे शक्तीशाली राज्य राहिले नाही. दुसऱ्या महायुद्धापुर्वी इंग्लंड, जपान, जर्मनी ही शक्तीशाली राज्ये होत. परंतु दुसऱ्या महायुद्धानंतर तीच राज्ये शक्तीहीन झाली आहेत.

### ४) परंपरेवर आधारीत आहे.

राज्याची शक्ती ही त्याच्या गौरवशाली परंपरेवर बऱ्याचअंशी अवलंबुन असते. त्या आदर्शाकडे दुर्लक्ष झाल्यास राष्ट्र शक्ती बनते.

### शक्तीचे प्रकार :

राष्ट्रीय शक्तीचा अर्थ, प्रकार, उदिष्ट्ये, वैशीष्ट्ये पाहिल्यानंतर राष्ट्रीय शक्तीचे प्रकार आपल्याला समजुन घ्यावे लागतात.

राष्ट्रीय शक्ती ही निरनिराळ्या घटकांचे एकत्रीकरण प्रवृत्ती आहे. ह्या राष्ट्रीय शक्तीमध्ये आर्थिक, वैज्ञानिक, संरक्षण, तांत्रिक अशा अनेक शक्तीचा समावेश होतो. त्यामुळे तिचे प्रकार पाडणे अशक्य आहे. परंतु अभ्यासाच्या सोयीसाठी राष्ट्रीय शक्तीचे पुढील प्रकार पाडण्यात येतात.

## १) सैनिक शक्ती :

राज्याची अंतर्गत आणि बहिर्गत सुव्यवस्थीत आणि सुरक्षीतता टिकविण्यासाठी सैनीकी शक्ती आवश्यक ठरते. सैनीक शक्तीच्या अभावी राष्ट्राचे स्वातंत्र्य आणि सार्वभौमत्व टिकणे शक्य नसते. उदा. भारतात पंजाबमध्ये अतिरेक्यांचा बंदोबस्त करण्यासाठी भारत सरकारला सैनिक शक्तीचाच आधार घ्यावा लागला. राष्ट्रावर आलेले परकीय आक्रमण परतुन लावण्यासाठी राष्ट्राची एकता, अखंडता कायम राखण्यासाठी सैनिक शक्तीच महत्त्वाची आणि उपयुक्त ठरते.

ह्या सैनिक शक्तीमध्ये पुढील घटकांचा समावेश होतो. (१) सैनिकांचे मनोधैर्य, (२) सैनीकांची संख्या, (३) आधुनिक शस्त्रे आणि शस्त्रांचा वापर (४) दळणवळणाची साधणे, (५) त्यांच्यामधील राष्ट्रभक्तीची जाणीव.

राष्ट्राच्या सैनिक शक्तीचा परिणाम आंतरराष्ट्रीय क्षेत्रामध्ये पडतो. उदा. सैनिकी शक्तीमुळेच अमेरिकेचा सर्वाधिक प्रभाव आंतरराष्ट्रीय राजकारणावर पडला आहे.

## २) आर्थिक शक्ती :

कोणत्याही राष्ट्राचे सैन्य ते पाठीवर चालत नाही, ते पोटावर चालते, असे म्हटले जाते. ह्याचा अर्थ आर्थिक आणि औद्योगीक पाठिंब्याशिवाय सैन्य भरती करणे, सैनिकांना शस्त्रास्त्रांचा पुरवठा करणे. त्यांना अन्नधान्य आणि इतर जीवनावश्यक वस्तुंचा पुरवठा करणे शक्य नसते. म्हणून आज शक्तीशाली राष्ट्रे प्रथम आपल्या आर्थिक परिस्थितीचा विचार करतात आणि मगच इतर राष्ट्रांनी कशी? कोणती? आणि का? मदत द्यायची ह्याचा निर्णय घेतात.

## ३) राजनयीक शक्ती :

काही शास्त्रज्ञ राजनयाला राष्ट्रीय शक्तीचा घटक मानत परंतु पामर आणि पार्किन्स राजनकीय शक्तीला राष्ट्र शक्तीचा प्रकार संबोधत राष्ट्रीय शक्तीचा वापर करणारे राजनय हे एक साधन आहे. राजनयशाच्या कुशलता आणि व्यवहारचातुर्यामुळे आंतरराष्ट्रीय क्षेत्रामध्ये राज्याला म्हणजे राष्ट्रीय शक्तीला महत्व प्राप्त झाले आहे. म्हणुनच राजनयाच्या शक्तीत झालेली वाढ म्हणजे पर्यायाने राष्ट्रीय शक्तीत झालेली वाढ, असे समजण्यात येते.

## ४) जनमत प्रस्थापित करणारी शक्ती :

स्वदेशातील आणि विदेशातील लोकांवर प्रभाव पाडण्याची क्षमता हा राष्ट्रीय शक्तीचा एक प्रकार आहे. राष्ट्रीय शक्तीच्या अशा प्रभावामुळे आपल्या देशाच्या संरक्षणासाठी सर्वस्व अर्पण करण्याची तयारी हा तेथील लोकांमध्ये निर्माण होते. त्यामुळे आपले आणि आपल्या सैनिकांचे मनोबल वाढ शत्रु राष्ट्राच्या लोकांचे मनोबल खच्ची होते. त्यामुळे शत्रु कमजोर होतो. म्हणून जनमत प्रभावित करणारी शक्ती हा राष्ट्रशक्तीचाच प्रकार मानला जातो.

## राष्ट्रीय शक्तीचे आधारभुत घटक :-

पामर आणि पार्किन्स ह्यांनी राष्ट्रीय शक्तीचे जे घटक सांगितले आहे त्यांचे अभ्यासाच्या दृष्टिने ५ प्रकारात वर्गीकरण केले आहे. ह्या सविस्तर वर्णन पुढीलप्रमाणे केले आहे.

## (१) नैसर्गिक घटक :

राष्ट्रीय शक्तीच्या नैसर्गिक घटकांमध्ये राज्याची भौगोलीक परिस्थिती, राज्याचे स्थान, राज्याचा आकार, हवामान आणि नकाशे ह्यांचा समावेश होतो. त्यांचे सविस्तर विवेचन खालील प्रमाणे.

## अ) भौगोलीक परिस्थिती :

राष्ट्रीय शक्ती निर्धारीत करताना राज्याच्या भौगोलीक परिस्थितीला फार महत्व असते. कारण ह्यावरच राज्याचे परराष्ट्रीय संबंध निर्धारीत होतात, असे मॉर्गन्थॉ म्हणतो. राज्याच्या परराष्ट्रीय धोरणावर भौगोलीक स्थितीचा राजकारणावर सर्वाधीक प्रभाव पडतो असे पेब्ल आणि लिंकन म्हणतात. अलीकडे राज्यशास्त्रामध्ये राष्ट्रीय हित आणि राजकारण ह्यांचा असलेला संबंध जोडण्याचे कार्य आणि तो संबंध स्पष्ट दाखविण्याचे कार्य राज्यशास्त्र (Geo-Politics) करते.

## ब) राज्याचे स्थान :

प्रत्येक देशाचे एक निश्चित क्षेत्र किंवा निश्चित भुप्रदेश असतो. हा भुप्रदेश निर्मित किंवा कृत्रिम सीमा आणि नैसर्गिक सीमा ह्यांनी दर्शविला असतो. ज्या राज्याला नैसर्गीकदृष्ट्या अनेक सिमा लाभलेल्या आहेत. उदा. पर्वत, नद्या, सागर, घनदाट जंगले, प्रचंड वाळवंट वगैरे अशी राज्ये राष्ट्रीय शक्तीच्या दृष्टिने सशक्त किंवा बलवान

ठरतात. उदा. आल्पस पर्वतामुळे इटलीचे रक्षण झाले. हिमालय पर्वतामुळे भारतावर उत्तरेकडून आक्रमण करणे प्रत्येक देशाला कठीण आहे. इंग्लंडच्या चारही बाजुनी समुद्र असल्या कारणानी तो देश युरोपीयन देशापासुन अलग राहीला आणि त्याचे परकीय आक्रमणापासुन संरक्षण झाले. तसेच नार्वे, स्वीडन आणि स्वित्झलॅन्ड हे देश विशीष्ठ भौगोलीक स्थानामुळेच युरोपच्या राजकारणापासून स्वतंत्र राहीले.

## क) राज्याचा आकार :

आकार किंवा भुविस्ताराच्या बाबतीत जगातील राज्या-राज्यांमध्ये भिन्नता दिसुन येते. उदा. जगात अर्थात लहान व्हॅटिकनसीटी आणि सर्वात मोठे सोव्हीएट रशिया होते. रशियाचा आकार किंवा भुविस्तार सर्वाधिक असल्यामुळे रशियाला पादाक्रांत करणे हिटलर आणि नेपोलियनला शक्य झाले नाही. जपानने अनेक वेळा चीनचा प्रदेश जिंकला परंतु उर्वरीत चिनकडून जपानला सतत विरोध झाला. त्यामुळे असा प्रदेश कायमचा आपल्या हातात ठेवणे जपानला कधिच शक्य झाले नाही.

लहान आकाराची राज्ये आपले परराष्ट्रीय धोरण यशस्वी व खंबीर बनवु शकत नाही. उदा. नेदरलॅण्ड, रूमानीया, बेल्जीयम, बल्गेरिया इ. भारताकडून पाकिस्तानला तीन वेळा पराभव सहन करावा लागला. ह्याचे एक कारण म्हणजे पाकीस्तान आकाराच्या किंवा भुविस्ताराच्या दृष्टिने भारतापेक्षा लहान आहे.

परंतु राज्याचा आकार किंवा भुप्रदेश मोठा असला म्हणजे त्याची राष्ट्रीय शक्ती वाढते, असा निष्कर्ष काढणे चुकीचे आहे. राज्याच्या आकारापेक्षा राज्याचा भुप्रदेश कसा आहे? तेथे खनिज संपत्ती किती? कोणत्या प्रकारची आहे? ह्याला आज महत्व आहे. उदा. सहाराचे वाळवंट, ऑस्ट्रेलियातील वाळवंट, ब्राझीलमधील घनदाट जंगल आकाराने मोठे आहे. परंतु राष्ट्री शक्तीच्या दृष्टिने ही राज्ये अतिशय कमजोर आहेत. ह्याउलट इंग्लड हे आकाराने लहान राज्य असूनही त्याने मोठ्या राज्यांना पराभुत केले आणि अर्ध्या जगावर आपले साम्राज्य निर्माण केले.

## ड) राज्याचे हवामान :

राज्याच्या भौगोलीक स्थितीवर राज्याचे हवामान अवलंबून असते. उदा. उत्तर ध्रुव आणि दक्षिण ध्रुव येथील हवामान अतिशय थंड आहे. मनुष्याल वस्ती करून राहणे तेथे अशक्य आहे. तसेच अतिशय उष्ण हवामान असलेल्या प्रदेशातही मनुष्याला

राहणे कठीण आहे. उदा. विषुवृत्तावरील प्रदेश, त्यामुळे अतिशय शीत आणि अतिशय उष्ण हवामानाच्या प्रदेशाची प्रगती होत नाही.

ह्याउलट समशीतोष्ण हवामानाचे प्रदेश आपली प्रगती झपाट्याने करू शकतात. हवामानाचा परिणाम परराष्ट्रीय धोरणावर होतो. उदा. फ्रान्स, अमेरिका, रशिया, इटली व जर्मनी ह्या देशातील चांगल्या हवामानामुळे त्या देशाची प्रतिष्ठा वाढली. त्यांची प्रगती झाली.

भारतात सर्वत्र सारखे वातावरण नाही. तसेच पर्जन्याचे प्रमाण प्रदेशपरत्वे कमी जास्त आहे. म्हणुन भारतात जास्त किंवा कमी पाऊस आला तर ओळा किंवा कोरडा दुष्काळ पडतो आणि त्यामुळे अन्नधान्याची परराष्ट्राकडून आयात करावी लागते.

## २) नैसर्गिक साधने

राष्ट्रीय शक्तीमध्ये वृद्धी करणे किंवा कमी करणे ही गोष्ट त्या देशातील नैसर्गिक साधनांवर बऱ्याच प्रमाणात अवलंबुन असते. आणि नैसर्गिक संपत्ती त्या देशातील औद्योगीक विकासाला तारक ठरते. उदा. ज्या देशामध्ये सुपीक जमिनीची, खनिज संपत्तीची कमतरता असेल तर त्यांना इतर राज्यांवर अवलंबुन रहावे लागते. उदा. पेट्रोलसाठी आज अनेक राज्यांना अरब राज्यांवर अवलंबुन राहावे लागते.

मार्गन थॉने नैसर्गिक अन्नधान्य आणि कच्चा माल असे प्रकार पाडले. पामर आणि पार्किन्सने नैसर्गिक साधनाचे (१) कच्चा माल, (२) खजिन पदार्थ, (३) औद्योगिक शक्तीची साधने आणि अन्नधान्य व कृषी उत्पादन असे चार प्रकार पाडले.

## ३) सामाजिक घटक

राष्ट्रीय शक्तीच्या घटकांमध्ये सामाजीक घटकाला एक महत्त्वाचे स्थान मिळाले आहे. ह्या सामाजिक घटकांमध्ये लोकसंख्या, आर्थिक विकास, राष्ट्रीय चारित्र्य आणि राजकीय आकृती ह्यांचा समावेश होतो. या घटकांचा विचार पुढील प्रमाणे करावा लागतो.

### अ) लोकसंख्या :

राष्ट्रशक्तीचा आणखी एक महत्त्वाचा घटक म्हणुन लोकसंख्या या घटकाचा विचार केला जातो. जनसंख्या हा राज्यांचा आरि राज्याच्या शक्तीचा महत्त्वाचा घटक आहे.

आजही जास्त लोकसंख्या असलेल्या राज्याचा युद्धामध्ये सहजासहजी पराभव करणे शक्य नसते. अधिक लोकसंख्या असलेल्या देश पारतंत्र्यात असेल तर तेथील लोक स्वातंत्र्याचे आंदोलन उभारून पारतंत्र्यातुन मुक्त होतात हे भारताच्या उदाहरणावरुन स्पष्ट होते.

परंतु केवळ अवाढव्य लोकसंख्या राष्ट्रीय शक्तीमध्ये वाढ करते असे नाही. चारित्र्य संपन्नता, राष्ट्रभक्ती, कष्टाळु वृत्ती, स्वावलंबन, स्त्री-पुरुषांचे योग्य प्रमाणे, सुशिक्षतता, निरोगीपणा इत्यादी गुणांनी युक्त असलेले आणि लोकसंख्येने कमी असलेले तरी राष्ट्रीय शक्तीच्या दृष्टिने ते लोक महत्त्वाचे ठरतात.

### ब) आर्थिक विकास :

राष्ट्राची शक्ती ही अधिक विकासावर अवलंबुन असते. शक्तीची वाढ योग्य होत नसते. आपल्या गरजांपेक्षा जास्तीत जास्त वस्तुचे उत्पादन वस्तुंची परराष्ट्रीय निर्यात करून पैसा कमविणे आणि अविकसीत राज्यांना मदत करून त्यांना आपल्या प्रभावाखाली आणणे म्हणजेच राष्ट्रीय शक्तीची वाढ करणे होय. उदा. युरोप खंडातील साम्राज्यवादापासून रोखण्यासाठी रशियाने भारताला कोट्यवधी रुपयाची आर्थिक मदत व तांत्रिक मदत केली आहे.

### क) राष्ट्रीय चारित्र्य :

राष्ट्रीय चारित्र्य, राष्ट्रभक्ती निर्माण करते. अशी राष्ट्रभक्ती व्यक्तीला राष्ट्राच्या संरक्षणासाठी प्रगतीसाठी कोणत्याही प्रकारचा त्याग करण्याची वृत्ती वाढविते. धैर्य, साहस, विश्वास ह्या गुणांमुळे राष्ट्रीय चारित्र्य वाढते. आधुनिक काळातील युद्ध लढण्यासाठी शस्त्रास्त्रे आणि सैनिकशक्ती एवढेच महत्त्व तेथील लोकांच्या राष्ट्रीयता, त्याग, सहिष्णुता आणि सहकार्य ह्या सद्‌गुणांना द्यावे लागते. त्यामुळेच राष्ट्रीय शक्तीमध्ये वाढ होते ही गोष्ठ इस्त्राईल लोकांच्या राष्ट्रीय चारित्र्यावरून स्पष्ट होते.

### ड) राजकीय आकृती :

राज्याचे परराष्ट्रीय धोरण हे देखील तेथील शासनाच्या आकृतीवर अवलंबुन असते. बदलत्या परिस्थितीनुसार देशाच्या परराष्ट्रीय धोरणात बदल होत असेल तर त्याचा विपरीत परिणाम राष्ट्रीय शक्तीवर होतो. शिक्षण, प्रचार, नुतनीकरण, धर्मनिरपेक्षता आदी बदलत्या तत्वांचा परिणाम राजकीय आकृतीवर आणि पर्यायाने राष्ट्रीय शक्तीवर होतो.

## ४) ध्येयवादी घटक :

ह्यामध्ये पुढील घटकांचा समावेश होता. त्यांचा विचार असा करता येतो.

### अ) विचारप्रणाली :

विचारप्रणालीचा प्रभाव राज्यावर आणि राज्याच्या विकासावर होतो. किंबहुना आधुनिक काळातील प्रत्येक राजकीय व्यवस्थेच्या मुळाशी तसेच तेथील राजकारणाला आच्छादीत करणारी कोणतीतरी विचारप्रणाली असते. कारण विचारप्रणालीच्या साहाय्याने प्रत्येक राज्य विशिष्ट प्रकारचे आर्थिक, सामाजिक व राजकीय शक्ती प्राप्त करते. विचारप्रणालीचा प्रकार कोणताही असो, प्रत्येक विचारप्रणाली राष्ट्राला एक प्रकारची शक्ती प्रदान करते. विचार प्रणालीच्या माध्यमातुन जनतेचे मनोधैर्य, राष्ट्रीय चारित्र्य उंचावता येते. विशिष्ठ ध्येय व धोरणाला जनतेचा पाठींबा प्राप्त करून घेणे, राज्याला स्थैर्य प्रदान करते तर कधी प्रचलित राजकीय व्यवस्था बदलणे अशी कार्ये पार पाडली जातात. लोकमताचा पाठिंबा विचारसरणीला प्राप्त झाल्यामुळे राज्याची शक्ती वाढते. ह्याच विचारसरणीच्या आधारावर हिटलरने जर्मनीची राष्ट्रीय शक्ती वाढविली होती. देशातील आणि विदेशातील लोकांवर प्रभाव पाडणे, त्याद्वारे राष्ट्रीय शक्तीची वाढ करणे असे कार्य विचारसरणीच करते.

### ब) नेतृत्व :

कुशल नेतृत्व राजकीय आणि राष्ट्रीय शक्तीचा विकास घडविण्यास कारणीभूत ठरते. कुशल नेतृत्वाची गरज ही शांततेच्य आणि युद्धाच्या काळातही उपयुक्त ठरते. देशातील उपलब्ध साधनसामुग्रीच्या आणि संपत्तीचा उपयोग करून राष्ट्राची प्रगती करणे हेच कुशल नेतृत्वाचे कार्य आहे. उदा. भारताची आज निरनिराळ्या क्षेत्रात जी प्रगती झाली आणि होत आहे, त्याचे कारण भारताचे पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरुंच्या कुशल नेतृत्वासाठी भारताने स्वीकारलेली आणि अमलात आणलेली पंचवार्षिक योजना हेच आहे.

राष्ट्रीय हित डोळ्यांसमोर ठेवून नेतृत्व कार्य करीत असेल, नेत्याचे चारित्र्य आणि उद्देश चांगला असेल तर राष्ट्राचे मनोबल व राष्ट्रीय शक्ती वाढते.

### ५) तांत्रिक घटक :

आधुनिक युग तांत्रिक आणि वैज्ञानिक युग आहे. तंत्रज्ञानाच्या वापरामुळे निरनिराळ्या संशोधनांमुळे राष्ट्राचा सर्वच क्षेत्रात विकास होतो. त्याचा परिणाम राष्ट्राच्या परराष्ट्रीय धोरणावर आणि अंतर्गत धोरणावर होतो. अणुशक्तीच्या वापरामुळे मानवी प्रगती झाली. तसेच संपूर्ण जग नष्ट करण्याची शक्ती महाशक्तीच्या राष्ट्रांनी प्राप्त केली. आज तांत्रिक, वैज्ञानिक व अनुशक्तीच्या वापरामुळे अमेरिका, रशिया, फ्रान्स, चीन, कॅनडा, भारत ही शक्तीशाली राज्ये बनली. तंत्रविज्ञानाच्या विकासामुळे संपुर्ण जग लहान आहे. राष्ट्र-राष्ट्राचे परस्परसंबंध वाढल. त्यामुळे राष्ट्रीय शक्तीत वाढ झाली आहे.

अशा प्रकारे राष्ट्रीय शक्तीची निर्माती आणि विकास अनेक घटकांमुळे होतो. तो विकास विशिष्ठ घटकामुळे होत नाही.

### राष्ट्रसत्तेवरील मर्यादा :

प्रत्येक राष्ट्राची कमी अधिक प्रमाणात राष्ट्रसत्ता असते आणि त्यातुनच राज्यांची प्रभुसत्ता किंवा राज्याचे सार्वभौमत्व व्यक्त होत असते. मात्र प्रत्येक राष्ट्राच्या सत्तेवर काही मर्यादाही असतात.

राष्ट्रसत्तेवरील मर्यादा १) अंतर्गत मर्यादा, २) बाह्यमर्यादा असे वर्गीकरण करता येते. राष्ट्रसत्तेवरील अंतर्गत मर्यादा किंवा बंधनांमध्ये अंतर्गत वर्गीकरण करता येते. राष्ट्रसत्तेवरील अंतर्गत मर्यादा किंवा बंधनांमध्ये अंतर्गत विरोध, अराजकता, समर्थ नेतृत्वाचा अभाव, अकार्यक्षम शासन, राजकीय गटबाजी व सत्ता स्पर्धा, समाजातील सांप्रदायवाद, जातीयवाद, विभक्तता वाद, शक्तिशाली लष्कराचा प्रभाव, आर्थिक परावलंबन, दारिद्र्य, बेकारी इत्यादी बंधनांचा किंवा मर्यादांचा समावेश करता येतो.

## ४.२.२ सामुहीक सुरक्षा :

### सामुहीक सुरक्षितेचा अर्थ व व्याख्या :

सुमाहिक सुरक्षितता हा आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षितता प्रस्थापीत करण्याचा एक सर्वोत्कृष्ट मार्ग आहे. किंवा ऑल नेशन्स ऑफ युनोच्या संविधानामध्ये सामुहिक सुरक्षिततेचा विचार केला आहे.

अमेरिकेचा राष्ट्रध्यक्ष विड्रो विल्सन हा ह्या संकल्पनेचा प्रमुख समन्वय आणि जनक मानल्या जातो. त्यानेच जागतिक शांतता व सुव्यवस्था प्रस्थापित करण्यासाठी सामुहित सुरक्षेच्या आधारावर लीग ऑफ नेशन्सची निर्मिती करण्याची कृती मांडली होती.

जगातील सर्व राष्ट्रांना सुरक्षितता प्रदान करण्याची जबाबदारी संतुलन स्वीकारीत नाही. त्या सिद्धांताची मर्यादा लक्षात घेऊनच हा सामुहिक सुरक्षितता सिद्धांत मांडण्यात आला.

**व्याख्या :**

''प्रस्थापित आंतरराष्ट्रीय व्यवस्थेविरुद्ध आक्रमण करणाऱ्या राष्ट्रावर सामोहिक कृतीद्वारे प्रतिबंध घालणारी यंत्रणा म्हणजे सामुहिक सुरक्षितता होय.'' असे स्वत्झ बर्जर म्हणतो.

मार्गन्थॉ च्या मते ''आक्रमक राष्ट्राविरुद्ध एकाधिक राष्ट्रांनी स्वीकरीत्या केलेली किंवा करावयाची कृती म्हणजे सामुहित सुरक्षितता.

स्टॅनले बॉल्डविन च्या मते ''आक्रमक राष्ट्राविरुद्ध सर्व राष्ट्रांची एकाचवेळी आक्रमणकाला प्रतिबंध करण्याची तयारी असते. त्यासाठी आक्रमकाला धमकी देणे, प्रसंगी त्याच्याविरुद्ध सामुहिकरित्या युद्ध करण्यास तयार असणे.''

## सामुहित सुरक्षिततेचे आधार :

सामुहिक सुरक्षिततेचा अर्थ, व्याख्या पाहिल्यानंतर आधार खालीलप्रमाणे सांगता येतील.

### १) एकावरील आक्रमण सर्वांवरील आक्रमण :

राष्ट्रा-राष्ट्रांमध्ये संघर्ष आणि युद्ध होणारच त्यामुळे शांतता व सुरक्षिततेला धोका निर्माण होणारच म्हणुन एकता गटातील एखाद्या राष्ट्रावर झालेले आक्रमण हे आपणा सर्वांवर आक्रमण आले आहे, असे गृहीत धरून आक्रमक राष्ट्राविरुद्ध संघटितरीत्या कार्यवाही करण्यास कटिबद्ध असले पाहिजे.

### २) सहकार्य :

स्वत:चे संरक्षण करण्यासाठी राष्ट्र ज्या उपाययोजनांचा किंवा मार्गाचा अवलंब करते,

तशाच प्रकारची कार्यवाही आपल्या गटातील राष्ट्रावर आक्रमण झाल्यास प्रत्येक सभासद राष्ट्राने केलीच पाहिजे, हे गृहीत तत्व ह्यासामाजिक सुरक्षिततेच आहे.

**३) समान तत्परता :**

असे आक्रमण रोखल्यास किंवा प्रसंगी युद्ध करण्यास राष्ट्राच्या शक्तीपेक्षा जास्त आणि परिणामकारक असली पाहिजे. तरच ती राष्ट्रे आक्रमक राष्ट्राविरुद्ध यशस्वी उपाय अमलात आणु शकतात.

**४) शक्तिमान उपाययोजना :**

सामुहिक सुरक्षिततेमध्ये भाग घेणाऱ्या राष्ट्रांची एकत्रित शक्ती ही आक्रमण करणाऱ्या राष्ट्राच्या शक्तीपेक्षा जास्त आणि परिणामकारक असली पाहिजे, तरच ती राष्ट्रे आक्रमक राष्ट्राविरुद्ध यशस्वी उपाय अमलात आणू शकतात.

**५) परस्परविरोधी हिताला तिलांजली :**

आक्रमक राष्ट्र कोणते? त्याविरुद्ध कोणती कार्यवाही करावयाची? ह्या गोष्टी निश्‍चित झाल्यानंतर त्या सुरक्षा गटातील राष्ट्रांनी परस्परविरोधी हितांना तिलांजली दिली पाहिजे. त्यांच्यामध्ये मतभेद कायम राहिले तर सामुहिकरीत्या योजणारे उपाय निरर्थक ठरतात.

**६) राष्ट्राचे समान धोरण :**

यात आक्रमण करणाऱ्या सर्व बाजूंचे समान धोरण किंवा काही पातळीवर समान हित संबंध असणे आवश्यक आहे तरच सामुहिक सुरक्षितता शक्य होते.

**७) जागतिक संघटनेची निर्मिती :**

सामुहिक सुरक्षिततेत संयुक्त राष्ट्र संघा सारख्या संस्थाची जबाबदारी अधिक महत्वाची आहे.

## सामुहित सुरक्षिततेची वैशिष्ट्ये

### १) आंतरराष्ट्रीय संघटनेची निर्मिती :

सामुहित सुरक्षितता निर्माण करण्यासाठी संबंधित राष्ट्रांनी परस्परांच्या स्वातंत्र्याला आणि सार्वभौमत्वाला मान्यता देऊन जागतिक स्तरावर संघटनेची निर्मिती करणे आवश्यक आहे. उदा. नाटो ह्या जागतिक संघटना परस्परांच्या सार्वभौमत्वाला आणि स्वातंत्र्याला मान्य नाही.

### २) सामर्थ्यात वाढ :

केवळ एकाधिक राष्ट्रांनी एकत्रीत येणे आणि जागतिक स्थापन केल्याने सामुहीक सुरक्षा निर्माण होत नाही. त्यासाठी त्यांनी निर्माण केलेली ही आक्रमक राष्ट्राविरुद्ध उपाय योजण्यासाठी जास्त शक्तिमान किंवा सामर्थ्य आवश्यक आहे. तिच्या समर्थ्यातील वाढ लक्षात घेऊन आक्रमक राष्ट्र करण्यात धाजणार नाही.

### ३) धोरणाबाबत समानता :

सामुहिक सुरक्षिा प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने संघटनेत सामील होणाऱ्या राष्ट्राचे धोरण समान असले पाहिजे. ते परस्पराच्या विरोधी नसावे. तेव्हाच ही संघटना आक्रमक राष्ट्रांविरुद्ध प्रभावी उपाय योजणा अमलात आणू शकते.

### ४) स्वमताला गौण स्थान :

आक्रमक राष्ट्राविरुद्ध कोणते उपाय योजावे व केव्हा? हे बहुमताने निश्चित झाल्यावर त्या संघटनेतील कोणत्याही सभासद त्यांना मान्य नसले तरीही त्या सामुहीक कृतीला पाठिंबा दिलाच पाहिजे. वीचल्याने वागु नये. असे केल्यास आक्रमक राष्ट्राविरुद्ध करावयाची कार्यवाही अशक्य आहे.

### ५) शांततेला महत्व :

सामुहिक सुरक्षितता युद्धाची शक्यता गृहीत धरते. ही असली तरीही प्रत्येक प्रश्न प्रथम शंततेच्या, वाटाघाटीच्या-मध्यस्थांच्या मार्गाने त्याचा प्रयत्न केला पाहिजे. कारण युद्धाचे प्रश्न कायमचे सुटत नाही. उलट त्यात युद्धामुळे वाढ होते.

## सामुहित सुरक्षिततेचे महत्व :

१) सामुहित सुरक्षिततेला योग परस्पर विरोधी गट ही कल्पना मान्य नाही. जगातील सर्व राष्ट्रे समान आहेत. प्रत्येक राष्ट्राला सुरक्षिततेची आवश्यकता आहे. असे महत्त्वाचे तत्व हा सिद्धांत सांगतो.

२) आक्रमक राष्ट्रापासून इतर राष्ट्राचे संरक्षण करणे, जगात शांतता व सुव्यवस्था प्रस्थापित करणे ह्या दृष्टीने सामाजिक सुरक्षिततेला महत्व आले आहे.

३) लीन ऑफ नेशन्स आणि युनो ह्या जगातील संघटनाची निर्मिती सामाजिक सुरक्षितता ह्याच आधारवर झाली.

४) सामाजिक सुरक्षितता सर्वांसाठी एक आणि एकासाठी सर्व हे तत्व मान्य करते आणि आक्रमक राष्ट्राचा सामुहिक प्रतिकार करते. त्यामुळे सामुहिक कृतीच्या भितीमुळे कोणतेही आक्रमण करण्याचे धाडस करीत नाही. कारण असे केल्यास त्याचा विनाश अटळ आहे.

अशा प्रकारे जागतिक शांतता टिकवुन ठेवण्यासाठी सामुहिक सुरक्षिततेला फार महत्त्व प्राप्त आले आहे.

## सामुहिक सुरक्षिततेचे गुण/फायदे :

## सामुहिक सुरक्षिततेमुळे होणारे फायदे खालीलप्रमाणे

१) सामुहिक सुरक्षिततेमुळे राष्ट्रीय स्वातंत्र्य आणि राष्ट्रीय हीत ह्यांचे संरक्षण होते. कारण एका राष्ट्रावर झालेले आक्रमण हे त्या संघटनेतील सर्व सभासद राष्ट्रांवर आक्रमण झाले, असे समजून ही संघटना एकजुटीने आक्रमण राष्ट्राविरुद्ध योग्य उपाय योजते.

२) संघटनेतील सर्व सभासद राष्ट्रांमध्ये परस्पर सहयोग आणि सहकार्य वाढीला लागते.

३) त्यामुळे आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुव्यवस्था प्रस्थापित होते.

४) सामुहित सुरक्षितता कोणत्याही राष्ट्राच्या स्वातंत्र्यावर आणि सार्वभौमत्वावर बंधने घालीत नाही. उलट सार्वभौम समानतेला ती प्राधान्य देते.

५) सामुहित सुरक्षिततेमुळे सभासद राष्ट्रांची लष्करी शक्ती वाढते. त्या लष्करी शक्तीच्या सामुदायिक उपयोगामुळे आक्रमक राष्ट्राला भिती वाटते व आक्रमण करण्याचा धोका असे राष्ट्र पत्करीत नाही. कारण आक्रमण केल्यास सामुहीक शक्तीसमोर आपला विनाश अटळ आहे, ह्याची त्याला खात्री पटते.

## सामुहिक सुरक्षिततेचे दोष/तोटे/टिका :

सामुहित सुरक्षितेचे गुण अभ्यासल्यानंतर त्याचे दोष किंवा तोटे खालीप्रमाणे :

### १) अव्यवहार्य व धोक्याची :

सामुहिक सुरक्षितता ही आदर्श कल्पना आहे. ती यशस्वी होण्यासाठी त्यागाची सहकार्याची गरज आहे. परंतु असा त्याग करणे आणि सहकार्य करणे ही भावना संघटनेच्या सभासदांमध्ये नेहमीच दिसुन येत नाही. कारण आपल्या राष्ट्रीय शक्तीवर अंकुश लावुन घेण्यास कोणतेही राष्ट्र सहजासहजी तयार होत नाही. म्हणुन सामाजिक सुरक्षितता ही संकल्पना अव्यवहार्य आणि धोक्याची आहे, असे मार्गन लॉ म्हणतो.

### २) सैन्य पाठविण्यास नाखुष :

सामुहिक सरक्षिततेसाठी व्यापक सैन्यशक्तीची आहे. शस्त्रांस्त्रांची गरज आहे. परंतु प्रत्यक्षात अशी सुरक्षितता प्रस्थापित करण्यासाठी संघटनेतील सभासद राष्ट्रेच आपले सैन्य पाठविण्यास तयार नसतात. त्यामुळे सामाजिक सुरक्षितता प्रस्थापित करणे अवघड झाले आहे.

### ३) समान धोरण नाही :

सामुहिक सुरक्षिततेसाठी राष्ट्र-राष्ट्रांमध्ये समान धोरण आणि समान दृष्टिकोण आवश्यक आहे. परंतु तसे आढळत नाही. उदा. इटालीने युरोपीयावर जे आक्रमण केले, या घटनेशी इंग्लंडचा संबंध नाही, इंग्लंड इटलीविरुद्ध कार्यवाही करणार नाही, असे उद्‌गार तत्कालीन इंग्लंडच्या पंतप्रधानाने (चेंबरलेन) काढले होते. त्यावरून सामुहिक सुरक्षिततेबाबतची अनास्ता स्पष्ट होते. आजही नाटो संघटनेत अमेरिका व फ्रान्स ह्यांच्यामध्ये मतभेद आहेत.

### ४) व्हेटोचा गैरवापर :

आक्रमक राष्ट्र कोण? ह्यांची अंतीम व्याख्या करणे हा सुरक्षा समितीचा अधिकार आहे. सुरक्षा समितीमधील कायमचे सभासद स्वत:चा स्वार्थ साधण्यासाठी नकाराधिकाराचा उपयोग करून आक्रमक राष्ट्र कोण? हे ठरवितात. त्यामुळे खऱ्या अर्थाने आक्रमकाची व्याख्या करणे कठिण झाले आहे. उदा. भारताच्या काश्मिर भागात आणि कारगिल क्षेत्रात पाकिस्तानतलं जे दहशतवादी पाठविले जातात, ह्यासाठी

पाकिस्तानला आक्रमक राष्ट्र म्हणुन घोषीत करावे, ही भारताची विनंती नकाराधिकाराचा दुरुपयोग करून अमेरिका सतत धुडकावुन लावते. कारण अमेरिकेचा पाकिस्तानमध्ये असलेला लष्कर स्वार्थ हेच आहे.

### ५) शक्तिसंचयाचा प्रभाव :

सामुहिक सुरक्षिततेसाठी शक्तिसंचय आवश्यक आहे. त्याशिवाय सामुहिक सुरक्षितता प्रस्थापित होत नाही. आज असा शक्तिसंचय झालेला दिसून येत नाही. त्यामुळे सामुहिक सुरक्षितता ही एक भ्रामक कल्पना ठरली आहे.

### ६) त्यामुळे युनो अयशस्वी ठरली :

सैन्यशक्तिच्या अभावामुले राष्ट्रसंघ व संयुक्त राष्ट्रसंघ ह्या संस्था सामुहिक सुरक्षिततेच्या दृष्टिने अयशस्वी ठरल्या. ह्या संघटनेची सभासद राष्ट्रे युनोला सैन्य देत नाही आणि राष्ट्राने युनोला सैन्य दिलेच पाहिजे, असे बंधन सभासद राष्ट्रांवर नाही.

### ७) राष्ट्राचा स्वार्थ :

राष्ट्रा-राष्ट्रामध्ये त्यागाची व परस्पर सहकार्याची भावना निर्माण होइल अशी आशा बाळगणे व्यर्थ आहे. दक्षिण कोरियाने उत्तर कोरीयावर आक्रमण केल्यास अमेरिका तेवढ्याच तत्परतेने दक्षिण कोरियावर कार्यवाही करील? हे म्हणणे व्यर्थ आहे. असे मार्गन लॉ म्हणतात. ह्याचे कारण अमेरिकाचा स्वार्थ हाच आहे.

### निष्कर्ष :

संयुक्त राष्ट्रसंघाने सैनिक गटबंधनाला मान्यता देऊन सामुहिक सुरक्षिततेला धोका निर्माण केला. आज सामुहिक सुरक्षितता ही महाशक्तीच्या राष्ट्रांवर अवलंबुन असणारी कृती ठरली आहे. या दोन्ही राष्ट्रांचा दृष्टिकोण एकच असेल तर सामुहिक सुरक्षिततेचा प्रश्न सुटतो. उदा. कॅनालचा प्रश्न सुटला आहे. परंतु ह्या महाशक्तीच्या राष्ट्रांचा भिन्न दृष्टिकोन असल्यामुळे इराक-इराण, अफागाणिस्थान, कापुचिया, इस्त्रायल असे अनेक प्रश्न आजही सुटले नाहीत.

अशा प्रकारे आपणास असाच निष्कर्ष काढावा लागतो की, सामुहिक सुरक्षितता ही संकल्पना योग्य असली तरी व्यवहारीकदृष्ट्या अव्यवहार्य आहे. कारण तिच्या

अंमलबजावणीमुळे राष्ट्रीय शक्तीमध्ये वाढ होते. हीच वाढ तिच्या विनाशाला कारणीभूत ठरते. त्यामुळे जागतीक युद्धाला चालना मिळते.

## ४.२.३ संयुक्त राष्ट्रसंघ आणि विश्वशांती

संयुक्त राष्ट्रसंघाची निर्मिती आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षा प्रस्तावित करण्याकरीता झाली असल्यामुळे कोणत्याही ठिकाणी सशस्त्र आक्रमण झाले असल्यास त्या करीता सार्वजनिक कृती करणे हे त्यांचे कर्तव्य ठरते. संयुक्त राष्ट्राच्या चार्टरमधील ३३ ते ३८ या अंतर्गत आंतरराष्ट्रीय विवादासंबंधीच्या शांतीपूर्ण तोडग्याची व्यवस्था केली गेली आहे. या अंतर्गत अनेक विवाद आजपर्यंत संयुक्त राष्ट्रासमोर उपस्थित झालेले आहेत. हे विवाद सोडवण्यात संयुक्त राष्ट्राला संपूर्ण यशस्विता मिळाली नसली तरी देखील हे विवाद पराकोटीचे होवू नये याकरीता संयुक्त राष्ट्राने जी भूमिका पार पाडली ती निश्चितच उल्लेखनीय आहे. त्यामुळेच संयुक्त राष्ट्राच्या या भुमीकेविषयी आपल्याला समजून घ्यावे लागते.

संयुक्त राष्ट्राला अशाप्रकारच्या विवादाना समोर जावे लागलेले आहे. की ज्यातून ३रे महायुद्ध निर्माण होण्याचेदेखील शक्यता होती. उदा. बार्लिन समस्या किंवा कोरीया युद्ध यासारख्या प्रकरणात, संयुक्त राष्ट्राची भूमिका महत्त्वपूर्ण ठरलेला आहे. अनेक अभ्यासकांच्या मते अश्या अनेक राजकीय समस्या असतात. ज्या शांतता आणि सुरक्षेकरीता प्रश्नचीन्ह निर्माण करीत असतात. आण्विक शक्तिचा प्रसार रंगभेद सीमा विवाद अश्या प्रसंगात वेळीच नियंत्रण प्रस्थापित केले नाही. तर मोठी समस्या धारण करू शकतात. या समस्या विकसित होवू न देणे हीच एक यशस्विता आहे की जी जागतिक राजकारणातील गतिविधीना प्रभावित करते.

संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या माध्यमातून अश्या सर्व समस्यांचे समाधान विचारविर्मश या माध्यमातून किंवा विविध उपायांच्या द्वारे सातत्याने केल्या जाते. संयुक्त राष्ट्रसंघ एक शासन व्यवस्था नसली तरी देखील आपल्या सदस्यांच्या सहकार्यातून विश्व ुद्ध ही संकल्पना अमान्य ठरविण्यात यशस्वी ठरलेली आहे. असे आपल्याला दिसून येते.

''संयुक्त राष्ट्रसंघासमोर आलेल्या विविध समस्या''

संयुक्त राष्ट्राच्या शांती प्रक्रियेतील योगदानाविषयी समजून घेण्याकरीता त्याच्या समोर आलेल्या विविध समस्यांचा उल्लेख याठिकार्णा आपल्याला करावा लागेल. (१) इराण – १९ जानेवारी १९४६ला जेव्हा सोवियत रशीयाच्या सैन्यानी इराणमध्ये

हस्तक्षेप केला तेव्हा संयुक्त राष्ट्रसंघाला सर्वप्रथम आपली भूमिका पार पाडण्याचा श्री गणेशा करावा लागला. ही समस्या २१मे १९४६ला यशसवीरित्या सोडवण्यात संयुक्त राष्ट्रसंघाच्या सुरक्षा परिषदेत आपली भूमिका व्यवस्थित पार पाडली. ज्यामुळे सोव्हिएत रशियाला आपले सैन्य मागे घ्यावे लागले.

(२) बर्लिनची समस्या १९४५ला जर्मनिचा पराभव झाल्यानंतर बार्लिन या नगराची वाटणी सोव्हिएत रशिया फ्रान्स अमेरिका आणि इंग्लड यांच्यात करण्यात आली होती. यात सोव्हिएत रशियाकडे जो भाग आलेला होता. त्या भागातूनच इतर काही प्रातांना सेवा उपलब्ध होत होत्या. परंतू सोव्हिएत रशियाने या सेवा दिल्यास नकार दिला. उदा. रस्ते किंवा पाणी यातून ही समस्या निर्माण झाली. संयुक्त राष्ट्रसंघाचय मध्यस्थिमुळे १९४९ला या समस्येचे निवारण करण्यात आले.

(३) काश्मीर भारत आणि पाकिस्तान याच्यातील सगळ्यात ज्वलंत विषय म्हणजे काश्मिर समस्या होय. या समस्येवरून भारत आणि पाकिस्तान यांच्यात युद्ध झालीत या युद्धाच्या प्रसंगी संयुक्त राष्ट्रसंघाच्या सुरक्षा परिषदेने महत्वपूर्ण भूमिका पार पाडली १९४८, १९६५, आणि १९७२ या तिन्ही युद्धानमध्ये जो युद्ध विराम झाला. त्यात संयुक्त राष्ट्रसंघाशी भूमिका महत्वाची.

(४) म्यानमार. १९५३ मध्ये म्यानमारच्या शासनाने संयुक्त राष्ट्रसंघाकडे तक्रार केली होती. की चीन च्या सेनेने त्याच्या राज्यात हस्तक्षेप केला आहे. यावर कारवाई म्हणून संयुक्त राष्ट्रसंघातर्फे संयुक्त सैकि समिती स्थापन करुन त्या माध्यमातून चीनच्या सैनिकांना बाहेर काढण्याची प्रक्रिया सुरु करण्यात आली आणि शेवटी शांतता पूर्वक या समस्येवर तोडगा काढण्यात आला.

(५) कवैत : २ ऑगस्टला १९९० इराकने कुवेत वर आक्रमण करुन त्यावर आपले नियंत्रण प्रस्थापित करण्याचा प्रयत्न केला. संयुक्त राष्ट्रसंघातर्फे मित्रराष्ट्रांनी इराकी सैनिकांवर आक्रमण करून कुवैतला स्वतंत्र्य करण्याचे महत्वपूर्ण कार्य पार पाडले.

(६) युगोस्लावीया : पूर्व युगोस्लावीयात १९९२–९५ दरम्यान आंतरीक जात संघर्ष निर्माण झाला. हा संघर्ष संयुक्त राष्ट्रसंघाने आपल्या शांती सेनेच्या माध्यमातून यशस्वीपणे हा संघर्ष संपूष्टात आणला.

या सारख्या इराक, अमेरिका, अफगाणिस्तान व्हेइतनाम इराण–इराक, युद्ध

अश्या अनेक प्रसंगातून संयुक्त राष्ट्रसंघाने महत्वपूर्ण भूमिका पार पाडली आहे.

## संयुक्त राष्ट्रसंघाच्या शांती प्रक्रियेतील योगदानाचे मूल्यमापन

संयुक्त राष्ट्रसंघात जागतीक शांतता प्रक्रियेची जबाबदारी ही सुरक्षा परिषदेवर आहे. सुरक्षा परिषदेमद्ये अमेरिका, फ्रान्स, चीन, रशिया, ब्रिटन या राष्ट्राना विशेष अधिकार प्राप्त झालेला आहे. त्यामुळे कोणत्याही संघर्षात या राष्ट्राचा सहभाग असतो. अश्यावेळेला संयुक्त राष्ट्रसंघाच्या शांती प्रक्रियेच्या भूमिकेवर मर्यादा पडतात. असे अनेक अभ्यसकाना वाटते. मूळात संयुक्त राष्ट्रसंघाचा निर्मितीचा संघर्षातून निर्माण झाली आहे. आणि त्यातील बलाढ्य राष्ट्रांना दिले गेलेले स्थान काही वेळेला संयुक्त राष्ट्राच्या कार्यावर मर्यादा घालणारी ठरलेली आहे. असे आपल्याला दिसून येते. जसे बार्लिनचे संकट, हंगेरीची समस्या, व्हेइतनाम युद्ध. त्यामुळे सुरक्षा परिषदेला फार काही कार्यवाही करता आलेली नाही. काही वेळेला तर अमेरिकेसमोर संयुक्त राष्ट्रसंघा संपूर्ण हतलब झालेला आहे. असे दिसून आलेले आहे. यावरूनच त्यांची मर्यादीत भूमिका आपल्याला दिसून येते.

गेल्या ७२ वर्षापासून कोणतीही ३ महायुद्ध झालेली नसली तरी देखील त्याचे श्रेय संयुक्त राष्ट्रसंघापेक्षा त्या संघर्षातील राष्ट्रमधील विविध संघाना आपल्याला द्यावे लागते. गेल्या २५ वर्षात मर्यादीत प्रमाणावरील युद्ध आपल्याला अनेक दिसून येतील जसे भारत–पाकिस्तान, अरब–इजारायील इराक–इराण, हे सर्व संघर्ष संयुक्त राष्ट्रसंघाच्या मध्यस्थीपेक्षा दुसऱ्या राष्ट्राच्या मध्यस्थीने किंवा परस्पर देशातील संधीमुळे यशस्वीरित्या सुटलेले आहेत असे दिसून येते. काही वेळातर संयुक्त राष्ट्रसंघाच्या विचित्र भूमिकेमुळे या समस्या सुटण्याऐवजी अधिकच गुंतागतीच्या झालेल्या आहेत. असे आपल्याला दिसून येते.

वरील मर्यादा आपल्याला दिसत असल्या तरी अनेक प्रसंगाच्या बाबतीत संयुक्त राष्ट्रसंघाने महत्वपूर्ण योगदान दिलेले आहेत. हे मान्यच करावे लागेत. जसे भारत–बांगलादेश वाद–विवाद, पश्चिम आशियाची समस्या या सगळ्या समस्या मध्ये संयुक्त राष्ट्रसंघाने महत्वपूर्ण भूमिका पार पाडली आहे. अफगाणीस्तान मदील सोव्हिएत सैनिकात वापस वाल्वण्या संबंधीची संधी, इराण–इराक युद्ध संबंधीची संधी. नामिबियतील स्वतंत्र्य संबंधी संधी इत्यादी अनेक यशस्विता संयुक्त राष्ट्राच्या

विश्व शांती प्रक्रियेतील भूमिका आपल्याला सांगता येतील. थोडक्यात संयुक्त राष्टातही दोन राष्ट्रातील संघर्षामध्ये जे सुरक्षा भिंत म्हणून कार्य करते त्यामुळे अनेक युद्ध टळलेली आहेत. त्यामुळेच त्यांच्या या भूमीकेचे महत्व आपल्याला मान्यच करावे लागते.

## ४.२.४ अलिप्तता चळवळ

४.० उद्दिष्टे
४.१ प्रास्ताविक
४.२ विषय विवेचन
४.२.१ अलिप्ततेचा अर्थ
४.२.२ अलिप्ततावादाचा विकास
४.२.३ अलिप्तता व शीतयुद्ध
४.२.४ अलिप्ततेचे मूल्यमापन
४.२.५ अलिप्त चळवळीचे औचित्य
४.३ सारांश
४.४ सरावासाठी स्वाध्याय
४.५ अधिक वाचनासाठी पुस्तके

## ४.० उद्दिष्टे

या सिध्दान्ताचा अभ्यास केल्यानंतर आपणास –

- आंतर राष्ट्रीय राजकारणातील अलिप्ततावादाची ओळख होईल.
- अलिप्ततावादी धोरणाचा आंतरराष्ट्रीय संबंधांवर काय व कसा परिणाम होतो ते समजून घेता येईल.

शीतयुद्ध दरम्यान व शीतयुध्दोत्तर काळात अलिप्ततेच्या धोरणाचे औचित्य समजून घेण्यास मदत होईल.

विदेशनीतीतील एक महत्वपूर्ण संकल्पना या दृष्टीने नाम चळवळीच्या बदलत्या स्वरूपाचा परीचय करुन घेता येईल.

## ४.१ प्रास्ताविक :

आंतरराष्ट्रीय राजकारणात द्वितीय विश्वयुद्धानंतर अनेक नवीन घटकांचा उदय

झाला. अमेरीका व सोवियत संघ या दोन जागतिक महासत्तांचा प्रभाव निर्माण झाला. आशिया व आफ्रिका या दोन खंडांतील युरोपीय सत्तांचे साम्राज्य संपुष्टात येऊ लागले. अनेक नव्या स्वतंत्र राष्ट्रांचा जन्म या खंडांमध्ये याच दरम्यान झाला. यातूनच या नव स्वतंत्र राष्ट्रांच्या तिसऱ्या जगाची निर्मिती झाली. अमेरिकेच्या नेतृत्वाखालील पश्चिम युरोप आणि कॅनडा यांचे उदारतवादाचा पुरस्कार करणारे 'पहिले' जग, सोवियत संघाच्या नेतृत्वाखाली पूर्व युरोप आणि चीन यांचे साम्यवादाचा पुरस्कार करणारे 'दुसरे' जग आणि निर्वसाहतीकरणाच प्रक्रियेतून नव्याने स्वतंत्र होत असणाऱ्या राष्ट्रांचे 'तिसरे' नव्याने स्वतंत्र होत असणाऱ्या राष्ट्रांचे 'तिसरे' जग असे ओळखले जाऊ लागले.

तिसऱ्या जगातील राष्ट्रांसमोर राष्ट्र उभारणीचे मोठे आव्हान उभे होते. या बरोबरच लोकशाहीची स्थापना, आर्थिक विकासाकरीता प्रयत्न, साम्राज्यवादाचा विरोध या सारखी आव्हाने ही होती. परीणामी महासत्तांच्या स्पर्धेपासून दूर राहून आपल्या समोरील उद्दिष्टांची पूर्ती करण्यासाठीच तिसऱ्या जगाती राष्ट्रांनी गट निरपेक्षतेचे धोरण विकसित करून त्याचा पुरस्कार केला. भारत हा या संघटनेचा संस्थापक सदस्य असून द्वितीय विश्व युद्धोत्ता काळात भारताचे पहिले पंतप्रधान जवाहरलाल नेहरू, इंडोनेशयिाचे पहिले राष्ट्राध्यक्ष सुखारनो, इजिप्तचे दुसरे राष्ट्राध्यक्ष गमल अब्देल नासेर आणि युगोस्लावियाचे राष्ट्राध्यक्ष टीटो या सारख्या द्रष्ट्या नेत्यांच्या पुढाकाराने या आंतरराष्ट्रीय चळवळीची सुरवात केली गेली.

## ४.२ विषय विवेचन

## ४.२.१ अलिप्ततेचा अर्थ

शीतयुद्धा दरम्यानच्या काळात अमेरीका व सोवियत युनियन या दोन सत्ता गटांपासून समानांतर ठेवून कुठलाही कायम स्वरूपी करार करून त्यांचे अंकित बनून राहण्यास ठाम नकार देणे हा गट निरपेक्षतेचा अर्थ आहे.

पीटर लायन () यांच्या शब्दात ''राजनयिक किंवा राजकीय तटस्थता म्हणजे दोन गटांमध्ये जेव्हा भांडण होत असते तेव्हा तिसरा गट त्यांच्यापैकी कुणाचीही बाजू न घेण्याचे धोरण ठरवीत असतो.'' अेकदा गटनिरपेक्षता म्हणजेच अलिप्तता असे समजले जाते. परंतु या दोन संकल्पना वेगवेगळ्या आहेत. अलिप्त राष्ट्रे आंतरराष्ट्रीय घडामोडींपासून स्वतःला दूर ठेवतात. आंतरराष्ट्रीय समस्यांवर ही राष्ट्रे एक बाजू घेण्याचे टाळतात. गटनिरपेक्षतेत मात्र असे अभिप्रेत नाही. गटनिरपैक्ष देश आंतरराष्ट्रीय

घडामोडींपासून दूर राहत नाहीत. या उलट हे राष्ट्र आंतरराष्ट्रीय राजकारणात सक्रिय सहभाग घेतात. आंतरराष्ट्रीय समस्यांवर भूमिका घेणे हे गटनिरपेक्ष राष्ट्रांकडून असले तरी सत्ता गटांपैकी एकाची बाजू ही राष्ट्रे कधीच घेत नाही. ती आंतर राष्ट्रीय समस्यांचा विचार महासत्तांच्या राजकारणाच्या दृष्टीने नाही तर स्वतःच्या हितसंबंधांच्या दृष्टिकोणातून करत असतात.

वसाहतवादातून मुक्त झाल्यावर महासत्तांच्या नववसाहतवादात अडकावे लागू नये हाच गटनिरपेक्षतेचा एकमात्र मुख्य उद्देश होता.

## ४.२.२ अलिप्ततावादाचा विकास

जून १९६१ मध्ये केरो येथे आशिया व अफ्रिका खंडातील अलिप्त राष्ट्रांची एक सभा घेण्यात आली. याच वर्षी बेलग्रेड येथे झालेल्या सम्मेलनात २५ सभासद उपस्थित होते. अलिप्त राष्ट्रांचे दुसरे सम्मेलन १९६४मध्ये इजिप्तची राजधानी कैरो येथे पार पडले. या सम्मेलनांमद्ये अलिप्त राष्ट्रांची उद्दीष्टे ठरविण्यात आली. त्यात १. वसाहतवाद व साम्राज्यवाद नष्ट करणे २. राष्ट्रीय स्वयंनिर्णयाचा हक्क सर्वांना देणे, ३. वर्णभेदाचा विरोध करणे ४. प्रत्येक राज्याच्या स्वातंत्र्याचा व सार्वभौमत्वाचा आदर करणे. ५. आंतरराष्ट्रीय संघर्ष शांततेतच्या मार्गाने सोडविणे ५. निःशस्त्रीकरणाचा प्रयत्न करणे व अणुशक्तीचा शांततेसाठी उपयोग करण्यासाठी अण्वस्त्रधारी राष्ट्रांना आवाहन करणे. अण्वस्त्र प्रभावहीन क्षेत्र वाढविणे व अणुशक्तीची चाचणी बंद करणे.७. परकीय राज्याचे सैनिक तळ नष्ट करणे. या सारख्या उद्दीष्टांचा समावेश करण्यात आला.

सत्तरच्या दशकात गटनिरपेक्ष राष्ट्रांची संख्या वाढत गेली. साधारणतः दर तीन वर्षांनी गटनिरपेक्ष चळवळीच्या शिखर परिषदा आयोजित केल्या गेल्या. तसेच संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेच्या अधिवेशनाआधी गटनिरपेक्ष देशांच्या परराष्ट्र मंत्र्यांची बैठक घेण्याचीही प्रथा सुरू झाली. या सर्व बैठकांमध्ये तिसऱ्या जगातील राष्ट्रांसमोरील प्रश्नांवर सामूहीकरीत्या उहापोह करून तोडगा काढण्याचा प्रयत्न केला गेला.

नामाच्या आतापर्यंत सतरा सभा विविध सदस्य राष्ट्रांमध्ये झाल्या आहेत. त्यापैकी १७वी सभा १३ ते १८ सप्टेंबर २०१६ दरम्यान व्हेनेझुएला येथे पार पडली.

## ४.२.३ अलिप्तता व शीतयुद्ध

अलिप्ततावादाचा उदय दुसऱ्या महायुद्धानंतर बड्या राष्ट्रांमधील शीतयुद्धाच्या पार्श्वभूमीवर झाला. शीतयुद्ध समाप्त होऊन बड्या राष्ट्रांचे सहकार्य निर्माण झाल्यावर अलिप्ततेचा राष्ट्रांनी त्याग करावा असे सूचविले गेले. परंतु शीतयुद्ध संपल्यावर देखिल अलिप्ततेच्या धोरणाचे औचित्य तिसऱ्या जगातील राष्ट्रांसाठी संपले असे म्हणता येणार नाही. शितयुद्धाचे बदलते स्वरूप याकरीता लक्षात घेणे आवश्यक आहे. एडवर्ड क्रँकशा यांनी असे मत मांडले होते की सोव्हिएट संघ व चीन यांच्यात शीतयुद्ध सुरू झाले असून दुसरीकडे असेच वातावरण अमेरीका व फ्रान्स यांच्यात आहे. नवीन शीतयुद्ध हे परस्परविरोधी गटांमध्ये न राहता प्रत्येक गटातील सदस्य राष्ट्रात सुरू असलेले दिसून येते आहे.

अप्पादोराई व एम.एस.राजन यांसारखे भारतीय लेखक अलिप्ततेला धोरण मानण्यास तयार नसून अलिप्तता त्यांच्या मते केवळ परराष्ट्र धोरणाचा एक भाग आहे. मात्र अलप्तिता व परराष्ट्र धोरण यांस पृथक करता येणार नाही. परराष्ट्राचे धोरण हे राष्ट्रीय हिताचे ध्येय बनले आहे. खरे तर जगातील मोठी राष्ट्रे आपले परराष्ट्र धोरण ठरविताना अलिप्ततेच्या धोरणाचा विचार करीत असतात. शीतयुद्धोत्तर काळात अलिप्ततेच्या धोरणाचे औचित्य किती राहीले आहे हा विषय त्यामुळेच चर्चेचा ठरला आहे.

## ४.२.४ अलिप्ततेचे मूल्यमापन

अलिप्ततेच्या धोरणावर अनेक प्रकारे टीका करण्यात आली आहे. सर्वप्रथम म्हणजे चळवळीच्या सभासदत्वाबाबत कोणताच काटेकोरपणा नसणे. त्यामुळेच अमेरीकेला बांधलेला पाकिस्तान आणि सोविएत संघाशी बांधला गेलेला क्यूबा गटनिरपेक्ष चळवळीत सामिल होऊ शकले. दुसरे असे की जागतिक व्यवस्थेमध्ये न्याय आणि लोकशाहीकरणची मागणी करणाऱ्या या देशांपैकी बहुतांश देशांमद्ये एकाधिकारशाही राज्यव्यवस्था होत्या. तसेच यापैकी बहुतेक राष्ट्रांमध्ये अंतर्गत तंटे चालू होते. हे विवाद सोडविण्याची क्षमता गटनिरपेक्ष चळवळीकडे कधीच नव्हती. या देशांपैकी काही देशांची आर्थिक प्रगती लक्षणीय होती तर काही देश मागासलेलेच राहीले. परीणामी आर्थिक हितसंबंध समान राहीले नाही. एकंदरीत शीतयुद्ध संपल्यानंतर गटनिरपेक्ष धोरणाचे अस्तित्वाचे कारणच उरले नसल्याचेही म्हटले गेले.

मात्र मानवास विचारधारा, समाजवाद, भांडवलशाही या संकुचित कल्पनांपासून जागतिक कल्याणाच्या दृष्टीने विचार करावयास लागणार सिद्धान्त म्हणून अलिप्त धोरणाचे महत्व मोठे आहे. अलिप्त राष्ट्रांनी संयुक्त राष्ट्र तसेच सामूहिक सुरक्षितता या सारख्या आंतरराष्ट्रीय प्रयत्नांना नेहमीच मदत केली. अलिप्त राष्ट्रांनी गटबाजीपासून दूर राहून जगातील दोन गटांचे वैमनस्य नष्ट राहून जगातील दोन गटांचे वैमनस्य नष्ट करून त्यांच्यात सहकार्य निर्माण करण्याचे उद्‌दिष्ट नेहमीच ठेवले. जागतिक शांतता व सहकार्य प्रस्थापित करण्यासाठीच अलिप्त राष्ट्रांनी नेहमी प्रयत्न केले. खरे तर अलिप्तेच्या धोरणाचे यश एखादा आंतरराष्ट्रीय प्रश्न शांततेच्या मार्गाने कसा सोडविला जाईल यासंबंधी स्पष्ट दिग्दर्शन करण्यावर अवलंबून आहे. प्रसंगी राष्ट्रीय हित आंतरराष्ट्रीय हितामध्ये समर्पित केल्यास अलिप्तवादास यश प्राप्त होऊ शकते.

## ४.२.५ अलिप्त चळवळीचे औचित्य

अलिप्तता चळवळीच्या कार्याचा आढावा घेतल्यास या चळवळीचे औचित्य आज ही आहे असे म्हणता येईल. या चळवळीने राष्ट्रीय स्वातंत्र्याच्या चळवळींना प्रोत्साहन दिले. विकसनशील राष्ट्रांमध्ये आत्मविश्वास निर्माण करण्याचे कार्य या चळवळीने केले व  आज ही करत आहे.

शीतयुद्धाच्या काळात सैनिक संधी आणि वसाहतवाद यांना अलिप्त गटाने विरोध केला होता. परंतु आज जागतिक निःशस्त्रीकरणाकरीता प्रयत्न करणे, संघर्षाच्या ठिकाणी शस्त्रपुरवठा न होऊ देणे, वर्णभेदाचा विरोध करणे, पर्यावरण संरक्षणा संबंधी जागतिक स्तरावर प्रयत्न करणे, आंतरराष्ट्रीय दहशतवादावर उपाय शोधण्यासाठी एकत्र येऊन ठोस पाऊले उचलणे यासारखी उद्‌दीष्टे आज या गटातील राष्ट्रांसमोर आहेत.

शीतयुद्धाच्या पार्श्वभूमीवर शक्तीगटांना एक पर्याय म्हणून पारंपारिक अर्थाने जरी ही चळवळ मागे पडली असली तरी देखिल शांततापूर्ण सहअस्तित्वाचे तत्व हे विदेशनीतीची एक स्वतंत्र संकल्पना या  दृष्टीने अलिप्ततेचे महत्व आज ही कायमआहे. बदलत्या आंतरराष्ट्रीय राजकारणात ज्या नव्या समस्या जगाला भेडसावत आहेत त्यावर तोडगा शोधून काढण्याचे कार्य ही राष्ट्रे एकत्र येऊन प्रभावीपणे करीत आहेत. विशेषतः तिसऱ्या जगाचे आर्थिक हिसंबंध सुरक्षित ठेवण्याचे कार्य ही राष्ट्रे पार पाड शकतात. नामचा मूळ उद्‌देश हा जगात लोकतंत्र, समता, शोषणरहित आंतरराष्ट्रीय

संबंध प्रस्थापित करणे हा असल्यामुळे शांतता व विकाश यावर आधारीत नवा समाज निर्माण व्हावा याकरीता ही संघटना नेहमीच प्रयत्नशील राहील. थोडक्यात जागतिक शांतता, समता, मानवता व विकास या उद्‌दीष्टांना सामोरे ठेऊन निर्माण झालेल्या नाम सारख्या संघटनेचे औचित्य तोवर राहील जोवर पृथ्वीवर शोषण, युद्ध, विनाश, दहशतवाद दारिद्र्य व प्रदुषणा सारख्या समस्या राहतील.

## ४.३ सारांश

गटनिरपेक्षतेचे धरण समजावून घेताना सर्वप्रथम आपण त्याचा अर्थ समजावून घेतला. द्वितीय महायुद्धानंतर राजकीय दृष्ट्या दोन गटात विभाजित झालेल्या आंतर राष्ट्रीय राजकारणात नव्याने स्वतंत्र झालेल्या राष्ट्रांनी अलिप्ततेचे धोरण स्विकारून दोन ही महासत्तांपासून स्वतत्र असे गटनिरपेक्षतेचे धोरण स्विकारले हे आपण पाहिले.

आशिया व आफ्रिका खंडातील मोजक्याच नवोदित राज्यांच्या पुढाकाराने आकाराला आलेली ही चळवळ हळू हळू कशी विकसित होत गेली याचा देखिल थोडक्यात आढावा आपण घेतला. शितयुद्धादरम्यान आणि शितयुद्धोत्तर काळात गट निरपेक्ष राष्ट्रांची भूमिका कशी बदलत गेली हे देखिल समजावून घेण्याचा प्रयत्न आपण केला.

शितयुद्धोत्तर काळात अलिप्ततावादाचे औचित्यच उरलेले नाही अशी टीका बदलत्या राजकीय संदर्भात आंतरराष्ट्रीय राजकारणाचे अभ्यासक करीत असतात. या पार्श्वभूमीवर अलिप्ततावादी सिद्धान्ताचे औचित्य आपण तपासले. बदलत्या काळाबरोबरच ज्या नव्या समस्या व जी नवी आव्हाने जगासमोर उभी राहीली त्यांच्यावर तोडगा काढण्याच्या दृष्टिने ही चळवळ आजही आपले महत्व टिकवून आहे हे आपण बघितले.

## ४.४ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

१) राष्ट्रीय शक्तीचे वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

२) राष्ट्रीय शक्तीच्या विविध घटकांची चर्चा करा.

३) सामुहीक सुरक्षिततेच्या विविध आधारांची चर्चा करा.

४) शांतीमोहीमेचे महत्व विशद करा.

५) अलिप्ततावादी चळवळीचे वैशिष्ट्ये सांगा

## ४.५ सरावासाठी स्वाध्याय

प्र.१. गट निरपेक्षता म्हणजे काय हे सांगून गटनिरपेक्ष चळवळीच्या विकासाचा आढावा घ्या.

प्र.२. शीतयुद्धाच्या पार्श्वभूमीवर अलिप्तता सिद्धान्ताचे मूल्यमापन करा.

प्र.३. शीतयुद्धोत्तर काळात अलिप्त चळवळीच्या औचित्याची चर्चा करा.

प्र.४. अलिप्ततावादी चळवळ म्हणजे काय ?

प्र.५. अलिप्ततावादी चळवळीचे महत्व विशद करा.

प्र.६. अलिप्ततावादी चळवळीचे सध्या स्थितिवीका संबंध दर्शवा.

प्र.७. अलिप्ततावादी चळवळीची आंतरराष्ट्रीय राजकारणावरील परीणामांची चर्चा करा.

## ४.६ अधिक वाचनासाठी पुस्तके

१. रायपूरकर वसंत, 'आंतरराष्ट्रीय संबंध'.

२. पेंडसे अरूणा; सहस्त्रबुद्धे उत्तरा, 'आंतरराष्ट्रीय संबंध'.

*****

# ५

# शांततेचे दृष्टिकोन

**घटक संरचनाः**

५.१ प्रास्तावना
५.२ विषय विवेचन
    ५.२.१ राजनय
    ५.२.२ संयुक्त राष्ट्रसंघ
    ५.२.३ आंतरराष्ट्रीय कायदा
    ५.२.४ निःशस्त्रीकरण आणि शस्त्रनियंत्रण
५.३. स्वयं अध्ययनासाठी प्रश्न
५.४ सरावासाठी प्रश्न

## ५.१ प्रस्तावना :

आंतरराष्ट्रीय संबंधाच्या एक महत्त्वपूर्ण अभ्यासविषयक म्हणजे प्रामुख्याने दोन राष्ट्रांचा किंवा त्यापेक्षा अधिक राष्ट्रांचा राजकीय, आर्थिक, सामाजिक, लष्करी, व्यापारी, सांस्कृतिक, अशा विविध दृष्टीकोणातून आलेला संबंध होय. कि ज्या संबंधाचा अभ्यास आंतर्राष्ट्रीय संबंधात केला जातो. या संबंधाच्या निर्मितीतून अनेक संघटना निर्माण झाल्यात. त्या संघटनेचा प्रभाव जागतिक राजकारणावर झाल्यामुळेच आतर्राष्ट्रीय संबंधाला या संबंधाचा अभ्यास करणे क्रमप्राप्त ठरावे. उदा. नाटो, सिंटो, सेंटो यासारख्या प्रादेशिक संघटनांचा अभ्यास तसेच राष्ट्रसंघ व संयुक्त राष्ट्रसंघ यासारख्या जागतिक संघटनांचा अभ्यास आंतर्राष्ट्रीय संबंधात केल्या जावू लागला. आणि कालांतराने यांनी एक महत्त्वपूर्ण स्थान या अभ्यासविषयात प्राप्त केल्यामुळेच आंतर्राष्ट्रीय संबंधातील एक महत्त्वपूर्ण अभ्यास विषयक म्हणून आज आपल्याला त्याचा विचार करावा लागतो.

## ५.२ विषय विवेचन

### ५.२.१ राजनय

लोक राजकिय संघर्षात मध्यस्थी करण्याचे कार्य करीत ासतात. श्रीकृष्णाची शिष्टाई व्यर्थ ठरल्यानंतरच महायुद्धाला प्रारंभ झाला. असा उल्लेख महाभारतात आहे. अतिप्राचीन विशेष सवलती प्राप्त होत असल्याचा उल्लेख इतिहासात आढळतो अगदी रानटी अवस्थेत देखिल दिवसभर चालले. युद्ध जखमी व मृत सैनिकांना उचलुन नेण्याची गरज वाटल्यामुळे दोन डोळ्यानी परस्परांशी बोलर्णा करून थांबविण्याचे कार्य साधले असले पाहीजे या सर्व घटनांचा संबंध राजनय या संज्ञेशी आहे. निकोल्सन म्हणतात, ''राजनय हि केवळ आजच्या काळाची गरज नसुन अति प्राचिन काळापासुन मानवी जिवनाची ती एक गरज झाली आहे.

इंग्रजी भाषेतील Diplomacy चा समानार्थी शब्द म्हणुन राजनय हि, संज्ञा मराठीत वापरली जाते. डिप्लोमसी म्हणजे 'कुटनीती किंवा कुटौलनीती' असे समजण्याचा असलेला दिसून येतो परंतु डिप्लोमसी ही संज्ञा दोन राज्यामध्ये संबंध करण्याच हेतुने होणाऱ्या व्यवहाराला संबोधण्यासाठी वापरली जाते. दोन राज्यामध्ये होणारा कोणताही व्यवहार सद्‌भावनेवर अवलंबून असल्यामुळे अशा व्यवहाराला कुटील नीती संबोधन अयोग्य ठरते. त्यामुळे ही शब्द योग्य नसुन राजनय हा योग्य अर्थाचा शब्द ठरतो.

पिटमन पिटरच्या मते राजनय या शब्दाद्वारे असा संबंधाचा व ग्रंथाचा उल्लेख होतो कि, ज्या द्वारे प्रत्येक राष्ट्र आपल्या विविध प्रकारच्या प्रतिनिधीच्या माध्यमाने एकमेकांचा राजनैतिक संबंधाची संचालन करीत असते.

राजनय हा राज्यामध्ये संबंध प्रस्थापित करण्यासाठी केलेला एक तात्पुरता व्यवहार नसुन ती एक सातत्याने सुरु असलेले प्रक्रिया आहे. स्थायी दुतावयास आंतरराष्ट्रीय संमेलने व परीषदा आंतरराष्ट्रीय संस्था प्रचार व संपर्क की सर्व राज्याची साधने आहे. भारताचे राजदुत पाकीस्थान चिन, अमेरीका, आदी देशामद्ये आहे. तसेच अन्य देशाचे हे राजदूत भारतात आहेत. म्हणून राज्याद्वारे निरभुक झालेल्या राजदुताला सभ्यतेची वागणुक व अवध्य म्हणण्याची प्रथा निर्माण होणे स्वाभावीक ठरते. सर्नेस्ट, सॅटो यांच्या मते, राज्याच्या राज्यनितीतील राजकीय संबंधाचा कार्यवाहीत बुद्धीमत्तेचा आपण धावपंजचा वापर म्हणजे राजनय होय. मॉगेन्थॉ यांच्यामते शांततापुर्ण मार्गाने राष्ट्रीय हिताची वृद्धी करणे म्हणजे राजनय होय.

के.एम. पण्णीकर यांच्या मते, राजनय ही आंतराष्ट्रीय राज्यकारणात आपले राष्टीय दुसऱ्या देशाचा संबंधात सादर करण्याची कला होय.

राजनय ही राष्ट्रीय हिताची संरक्षण करण्याचे विदेश निती धोरण अमलात आणण्याचे साधन होय. असा राजनयाचा अर्थ वर उल्लेखित व्याख्यामधुन व्यक्त होतो. राजनय या संकल्पनेचा अर्थाशी संबंधी विविध पैलू  महत्वाचा आहे असे समजुन विचारवंत व्याख्या करतात परीणामी वर उल्लेखीत सर्व व्याख्या वेगवेगळ्या अर्थ व्यक्त करणाऱ्या आहेत असे आपणास वाटते परंतु या सर्व व्याख्यांमधुन राजनयाचा अर्थाचे विभिन्न पैलू व्यक्त होत असल्यामुळे त्या महत्वाच्या ठरतात राजनयाचा वरील विविध व्याख्यावरून राजनयाचा सामान्य व्यवहाराची विवेचन पुढील प्रमाणे करता येईल.

(१) राजनय ही दोन राष्ट्रात सलोख्याची परस्पर संबंध प्रस्थापीत करण्याची कला आहे.

(२) राजनयाचा प्रमुख हेतु दुसऱ्यास न दुखवता आपल्या राष्ट्राचे हित साध्य करणे हा आहे या दृष्टीने राजनीय हे विदेशनीती धोरणाची अंमलबजावर्णा करण्याचे साधन आहे.

(३) राजनयीक संबंधातुन एक राज्याचे अन्य राज्याशी राष्ट्रीय सामाजीक आर्थिक संस्कृतीक हित संबंध प्रस्थापित करणे हे राजनयाचे उद्‌दिष्ट असते.

(४) राजनयीक कार्यामध्ये आहे किंवा तरजोद करण्यावर भर दिला जातो.

(५) राज्यामधील राजनयीक व्यवहारात उपयोगता आणली जाणारी साधने तंत्रे व व्यवहारी संबंधीत प्रथा अशा लिखित अर्थ बोध राजनय या शब्दावरुन स्पष्ट होतो.

कोणत्या राज्याशी मित्रत्वाचे मित्रत्वाची व सलोख्याचे संबंध, प्रस्थापित करावयाचे व कोणत्या राज्याशी कोणकोणत्या बाबतीत सहकार्य करायचे हे सर्व राष्ट्रीय हित लक्षात घेऊन विदेश निती धोरणार ठरविले जाते.

(१) राजनय हे विदेशनीतीचे साधन आहे. तर विदेशनीती हे राजतयाचे साध्य आहे.

(२) विदेशनीतीचा तुलनेत राजनय हा बदलत असतो. राजनयाची पद्धती देशकालपरिस्थितीनुसार बदल असते. एकाच हेतुच्या पूर्तीसाठी वेगवेगळ्या राजनयिक पद्धतीचा वापर करावा लागतो.

(३) अस्तित्वात असलेल्या परीस्थितीत आपला राष्ट्रीय हेतू साध्य करण्यासाठी राजनयीक यंत्रणा वापरली जाते.

(१) राजनय हे विदेशनीतीचे साधन आहे तर विदेशनीती हे राजनयाचे साध्य आहे.

(२) विदेशनीतीचा तुलनेत राजनय हा बदलत असतो. राजनयाची पद्धती देशकाल परिस्थितीनुसार बदलत असते. एकाच हेतुच्या पूर्तीसाठी वेगवेगळ्या राजनयिक पद्धतीचा वापर करावा लागतो.

(३) अस्तित्वात असलेल्या परीस्थितीत आपला राष्ट्रीय हेतू साध्य करण्यासाठी राजनयीक यंत्रणा वापरली जाते.

**राजनयाची उद्दिष्टे :**

(१) राजनयाची व्याख्या करीत असताना निकोलसनने उद्दीष्टावर प्रकाश टाकला आहे. चर्चा, वाटाघाटी, सल्लामसलती इत्यादीद्वारे राष्ट्राराष्ट्रांमधील सामान्य स्वरूपाचे वादग्रस्त प्रश्न सोडविणे हे राजनयाचे उद्दीष्ट आहे.

(२) चार्लस वेबस्टरच्या मते, कोणत्याही हिसफ प्रकारचा आधार न घेता इच्छित उद्दिष्ट साध्य करणे हा राजनयाचा प्रमुख हेतू होय.

(३) सरदार के. एम. पण्णिकर यांच्यामते आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या संदर्भात आपले राष्ट्रीय हित साध्य करणे हे राजनयाचे उद्दीष्टे आहे.

**राजनयाची किंवा राजनयाची कार्ये :**

आजच्या काळात प्रत्येक राज्याला अन्य राज्यांशी स्थायी स्वरूपाचे राजनयिक संबंध प्रस्थापित करण्याचा सातत्याने करावा लागतो. दोन राष्ट्राची विचार प्रणालीच्या दृष्टीने तात्विक भूमिका वेगवेगळी असली आणि त्याच्यामद्ये संस्कृतिक मतभेद असले

तरीही धनिष्ट स्वरूपाचे राजनयिक संबंध प्रस्थापित करण्याचा बुद्धीःपुरस्पर प्रयत्न केला जातो याचे मूळ कारण आजच्या काळात राजनद्वारे पुढील महत्त्वाच्या कार्याची पूर्ती होत असते.

**(१) राष्ट्रीय हितसंबंधाचे रक्षण :**

प्रत्येक देशाला स्वतःचे असे हिसंबंध असतात व ते जपावे लागतात. अन्य राज्याशि स्थायी स्वरूपाची मैत्री स्थापन करून राष्ट्रीय हित संबंध जपले जातात. आपल्या देशाच्या राष्ट्रीय हिताला बाधा येईल असे निर्णय बाधा येईल विदेशअतील सरकार होणार नाही या दृष्टीने प्रयत्न करणे हे राज्याच्या राजदुताचे कार्य असते.

**(२) युद्ध व संघर्ष टाळणे :**

राजनय हा युद्धाचा पर्याय मानला जातो. राजनय अपयश ठरल्यास युद्धाची घटना निच्छितपणे घडते. कुशल राजदुत चातुर्यानी व मत्सदेगीरीने युद्ध टाळण्याचा प्रयत्न करतो. यशस्वी राजनय कष्टाने युद्ध टाळू शकतात तसेच सोईतासाठी युद्ध घडवून ही आणु शकतो.

**(३) विदेशात प्रतिनिधीत्व :**

आधुनिक काळात प्रत्येक देश आपला प्रतिनिधी किंवा राजदूत आपल्या देशामध्ये पाठवीतात आणि दुसऱ्या देशातुन आपल्या राजदुताचर स्वीकार करतात. राजदूत केवळ सरकारचे प्रतिनीधीत्व करतो असे नाही तर तो आपल्या देशातील जनतेची प्रतिनिधीत्व करीत असतो. त्या देशामधील आर्थिक राजकीय अशा अतीशय महत्वाचा घडामोडीचे वृत तो आपल्या देशात सरकारला कळवतो.

**(४) वाटाघाटी करणे :**

राजदूताचे कार्यच वाटाघाटी करणारा असे स्वरूपाचे असते. संबंधीत नेत्याशी किंवा मान्यवर व्यक्तीशी प्रत्यक्ष व्यक्तिगत संबंध, निर्माण करुन तडजोड किंवा देवाणघेवाणच्यिा मार्गाने समत्वाने करण्याचा प्रयत्न म्हणजे वाटाघाट करणे होय.

**(५) निवेदन करणे (Reporting) अथवा अहवाल पाठविणे :**

आपल्या देशाला अहवाल किंवा निवेदन सादर करण्याची कार्य राजदूताला

पार पाडावे लागते. राजदूत हा खऱ्या अर्थाने देशाचे कान व डोळे असतो. त्याची ज्या देशात नियुक्ती झालेली असते तेथील सर्व घडामोडीचे तो सूक्ष्म निरीक्षण करतो. त्याचा अहवाल आपल्या देशाच्या परराष्ट्र मंत्रालयाकडे पाठवून देतो.

### (६) परदेशातील स्वकीय नागरिकांचे रक्षण :

आधुनिक काळात व्यापा, शिक्षण, व्यवसाय, पर्यटन इत्यादी कारणांसाठी एका देशातील नागरिक दुसऱ्या देशात जातात. त्यांच्या त्या देशातील वास्तव्याच्या काळात त्याच्यावर कोणताही अन्याय होऊ नये. तसेच त्यांना प्रवासाविषयक परवाने, नागण कायद्याने संरक्षण, योग्य त्या संबंधी इत्यादी प्राप्त करुन देणे हे राजदूताचे कार्य असल्याचे दिसून येते.

### (७) सांस्कृतिक संबंध व आर्थिक सहयोग :

आधुनिक काळात राजदूताचे कार्य केवळ राजकीय राहीले नसून ते अतिशय व्यापक झाले आहे. आज सांस्कृतीक, सामाजिक शैक्षणिक आणि इतर संबंधात राष्ट्राराष्ट्रांच्या व्यवहारात फार मोठी वाढ व विविधता निर्माण झाल्याने दिसून येते. यामुळे आर्थिक, सांस्कृतिक आणि इतर पाहावे लागत आहे.

### (८) हितसंबंधाचे रक्षण :

राजदूताने आपले कार्य करीत असताना आपल्या राष्ट्राच्या हितासंबंधांचे रक्षण करण्याचे उद्‌दीष्ट सतत बाळगावे अशी अपेक्षा असते हा दृष्टीकोन स्थायी वाटत असला तरीही राजनयिक प्रक्रियेमध्ये त्याचाच अवलंबन केला जातो.

### राजनयाचे प्रकार

राजनयाचा विकासाचा इतिहास दोन कालखंडात सामान्यतः विभाजीत करण्यात येतो. प्राचीन काळापासून तो व्हिएन्ना काँग्रेस (१८१५) पर्यंत कालखंड हा प्राचीन राजनयाचा कालखंड म्हणून ओळखला जातो. व्हिएन्ना काँग्रेस ते महायुद्ध १८१५ ते १९१९ या कालखंडातील राजनयाला जुना राजनय असे म्हणतात. पहिल्या महायुद्धानंतरच्या कालखंडातील सर्व राजनयिक व्यवहार हे नवीन राजनयाच्या कक्षेत येतात.

## जुना राजनय व नवा राजनय

(१) जुन्या राजनयाचा अर्थ व स्वरूप : १८१५ ते १९१९ म्हणजे व्हिएन्ना काँग्रेस ते प्रथम महायुद्धापर्यंतचा कालखंड हा जुन्या राजनयाचा कालखंड समजला जातो.

जुन्या राजनयात बोलणी, वाटाघाटी व तह किंवा करार गुप्त ठेवण्यावर अधिक भर दिला जात असे. त्या काळात सर्वत्र निरंकुश राजेशाही होती. त्यामुळे लोकांना विश्वासात घेऊन निर्णय घेण्याची गरज भासत नव्हती राजाचे वेयक्तिक हित सुरक्षित राखणे हाच जुन्या राजनयाचा प्रमुख घेण्याची गरज भासत नव्हती, राजाचे वैयक्तिक हित सुरक्षित राखणे हाच जुन्या राजनयाचा प्रमुख पाया होता. युद्ध शांततेचा निर्णय राजा घेत असे. यामुळे परराष्ट्र धोरण हा राज्यापेक्षा राजधरण्याचे अधिक होते म्हणावे लागते.

जुन्या राजनयाची वैशिष्ट्ये : (१) या कालखंडात दोनहून अधिक प्रबळ राजा अस्तित्वात होता. त्याच्या निश्‍चित असे संबंध निर्माण झाले नव्हते. त्यामुळे ती आपला अध्यक्ष बदलवून दुर्बल राष्ट्रांच्या पक्षाला मिळत असला सलासंतुलन घडवून आणत असते. बदल राष्ट्र पद्धती व सत्ता संतुलनाला अधिक प्राधान्य ही जुन्या राजनयाची वैशिष्ट्ये आहेत.

(२) या कालखंडातील राजनय हे प्रशिक्षित व अनुभवी होते ते कोणतीही तडजोड करण्यास देवाण घेवाणीची प्रवृत्ती ठेवत असते. व्हिएन्ना करारात फ्रांस अपमानित होणार नाही अशा अटी फ्रांसवर लादल्या. या अशा तडजोड करण्याच्या वृत्तीमुळे युद्ध व संघर्ष टाळले जाते.

(३) जुन्या राजनयाच्या काळात कोणताही प्रश्‍न प्रतिष्ठेचा न करता तो तडजोडीच्या मार्गाने कसा सोडविला जाईल याचा प्रयत्न राजनय काळात सातत्याने करीत असत. प्रतिष्ठानिरपेक्ष राजनय ही जुन्या राजनयाची एक ठळक वैशिष्ट आहे.

नव्या राजनयाचा अर्थ व स्वरूप : पहिल्या महायुद्धाच्या समाप्तीनंतरच्या कालखंडातील राजनय म्हणजे नया राजनय होय. साम्राज्यवादाची साधी, व्यापारी हितसंबंधात निर्माण झालेला तणाव जलद वाहतुकीची साधने, लोकशाही शासनाचा उदय जलद संपर्काची साधने इत्यादी कारणांमुळे राजनयाचे क्षेत्र हे युरोपपुरते मर्यादीत न राहता जगव्यापी झाले.

**नव्या राजनयाची वैशिष्टये :**

(१) नवीन राजनयाचे कार्यक्षेत्र व्यापक आहे. जुन्या राजनयाप्रमाणे ते युरोपपुरते मर्यादीत नसुन सर्व देशांशी संबंधीत झाले आहे. जलद वाहतुकीच्या साधनांमुळे सर्वच देश परस्परांच्या अधिक जवळ आले आहेत.

(२) नव्या राजनयाच्या कार्यात वाढ झाली आहे. जुन्या राजनयात युद्ध थांबविणे व शांतता प्रस्थापित करणे यावर अधीक भार दिला जात असे आज आर्थिक व्यवहार, सामाजिक व सांस्कृतीक व्यवहार विदेशात राहणाऱ्या नागरीकांच्या अधीकारामध्ये रक्षण अशी अनेक कार्ये राजनयात पार पाडावी लागतात.

(३) जुन्या राजनयात गुप्ततेवर अधिक भर होता. संसदीच पध्दतीमुळे राजनयीक व्यवहाराची चर्चा देशाच्या कायदेमंडळात व वृत्तपत्रामध्ये होते. यामुळे गुप्ततेला फारसा वाव राहीला नाही. युमुळे आधुनिक काळातील राजनय हा खुला राजनय (Open Diplomacy) म्हणून ओळखला जातो.

(४) आधुनिक काळात राजनयिक यंत्रणेमध्ये काम करणाऱ्या राजनयची नेमणूक स्पर्धा परीक्षातून केली जाते. त्यांना विशिष्ट प्रकारचे प्रशिक्षण दिले जाते. थोडक्यात आधुनिक काळातील राजदूत व राजनयज्ञ हा प्रशिक्षित व त्या कार्यातील विशेषज्ञ असतो.

(५) आधुनिक काळातील राजनयाचे वैशिष्ट्य म्हणजे राजदूताच्या निर्णयस्वातंत्र्याची मर्यादा कमी झाली आहे.

(६) आधुनिक जगात सर्वत्र मतभेद व संघर्षाचे वातावरण आहे. जुन्या राजनयाच्या कालखंडात सामर्थ्यशाली राष्ट्र दुर्बल राष्ट्राच्या पारड्यात आपले वजन टाकून संतासंतुलन साधीत असे. यामुळे युद्ध त्वरित समाप्त होत असे आज तशी परीस्थिती राहीली नाही.

**गुप्त राजनय व प्रकट किंवा खुला राजनय :**

(१) गुप्त राजनयाचा अर्थ व स्वरूप : गुप्त राजनय हे जुन्या राजनयाचे एक वैशिष्ट्य मानले जाते. पूर्वी राजनयिक व्यवहार हा केवल शासनापुरतात मर्यादित असल्यामुळे राजे किंवा त्यांचे प्रतिनिधी आपले राजनयिक कार्य साधण्यासाठी अनेक प्रकारचे गुप्त करार करीत असत. या गुप्त कराराची माहीती केवळ राजनयज्ञ व राज व महाजे यांनाच असे उदा. विस्माकने सेनेचे एकीकरण करण्यासाठी माहीत केवळ राजनयज्ञ व राजे व

महाराजे यांनाच असे. उदा. बिस्माकने जर्मनीचे पद संधी व त्रिपक्ष संधी यासारखी गुप्त करार केला.

**गुप्त राजनयाचे गुण दोष :** गुप्त राजनयामुळे आपले राजनयीक उद्दिष्ट साध्य करण्यासाठी योग्य असा मार्ग शोधता येतो कारण करार गुप्त असल्यामुळे इतर देशांचे हितसंबंध दाखवले जाण्याचा संभव असल्यास ते करार घडून येण्यात व्यत्यय निर्माण करू शकत नाही. गुप्त राजनयात राजनयिक व्यवहाराबाबत लोकांना अंधारात ठेवले जाते. परंत त्याचे अनिष्ट परिणाम मात्र जनतेलाच भोगावे लागतात. गुप्त करार केवळ राजयज्ञास माहिती असल्यामुळे त्याच्या मृत्युनंतर गोंधळ निर्माण होतो. गुप्त असफल झाल्यास जनतेचा राज्याकर्त्यांवरील विश्वासच नष्ट होतो.

अश्याप्रकारे आधुनिक काळात गुप्त राजनयाला मर्यादा असल्यामुळे जुन्या राजनयाच्या कालखंडातील गुप्त राजनयाची जागा खुलवा राजनयाने घेतली आहे.

एक किंवा खुल्या राजनयाचा अर्थ व स्वरूप : पहिल्या महायुद्धाच्या समाप्तीनंतर अमेरीकेचे अध्यक्ष विलसन यांनी जगाला खुला राजनयाचे आवाहन केले गुप्त करार, परस्परविरोधी भूमिका यामुळे जगात अशांततेचे वातावरण निर्माण झाले होते. पहिले महायुद्ध ऊद्भवले ही परीस्थिती जगात पुन्हा उद्भवू नये म्हणून राजनय हा खुला असावा गुप्त राजनयाच्या तुलनेत खुला राजनय चांगला असला तरीही खुल्या राजनयात राजनयिक व्यवहारात पुढील अडचणी निर्माण झालेल्या दिसून येतात.

## खुल्या राजनयाच्या मर्यादा किंवा दोष

(१) आंतरराष्ट्रीय प्रश्न सोडविण्यासाठी जगातील राष्ट्रे एकत्र येतात खुली चर्चा होत असली तरीही त्यात प्रश्न सोडविणे ही भावना वा भूमिका नसते तर त्या प्रश्नाला अधिक प्रसिद्धी देणे व आपला प्रभाव इतरांवर टाकणे हाच मूळ हेतू त्यामागे असतो.

(२) खुल्या राजनयात लोकांना राजनयिक व्यवहाराची माहीत देणे व लोकमताचा अनुरोधाने प्रश्नन सोडविणे अभिप्रेत असते. परंतु आजच्या काळातही राष्ट्र हिताच्या दृष्टीने संधी किंवा द्विपक्षीय करारामधील काही महत्वपूर्ण बाबी प्रगट करणे घातक असते.

(३) राजनयात होणारी देवाणघेवाण ही परिस्थितीनुरुप असावी लागते. लोकमतावर

आधारित खुल्या राजनयात अशी देवाणघेवाण करणे शक्य होत नाही. कारण देवाणघेवाणीत केवळ लाभ प्राप्त व्हावा परंतु त्याच्या प्राप्तीसाठी काहीही सोडावे लागू नये अशी राष्ट्रांमधील सर्वसामान्य जनतेची भावना असते.

(४) खुल्या राजनयात राजनयज्ञाना लोकमताची भीती बाळगावी लागते तसेच राजनयीक व्यवहाराबाबत अति जागृतता ठेवावी लागते.

**सर्वकषवादी राजनय व लोकशाही राजनय**

सर्वकषवादी राजनयाचा अर्थ व स्वरूप : पहिल्या महायुद्धाच्या समाप्तीनंतर इटली, जर्मनी व जमात या देशांमध्ये सर्वकषवाद राजवटीचा उदय झाला. हिटलर, मुसलोनीच्या राजवटीमुळे आंतरराष्ट्रीय संबंधामध्ये काही नवे प्रश्न निर्माण झाले.

सर्वकषवाद राजनय हा खोटा प्रचार व असता त्यावर आधारलेला असुन नितितत्वाला पूर्णपणे हा फासणारा आहे. विस्तारवादी धोरण अमलात आणणे हे या राजमयाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. सर्वकषवादी राजनयात कोणत्याही प्रश्नांवर संधी किंवा करार करण्याबाबत तयारी दर्शविली जाते. परंतु केलेले करार सांभाळणावर मात्र फार भर दिला जात नाही. केलेले करार किंवा संधी पडणे हे नैतिकदृष्ट्या आवश्यक आहे असे समजले जात नाही.

लोकशाही राजनवाचा अर्थ व स्वरूप : लोकशाही राजनयाची सुरुवात विसाव्या शतकाच्या प्रारंभी झाली. विसाव्या शतकाच्या प्रारंभापासून अनेक राष्ट्रांनी लोकशाही शासनपद्धतीचा स्वीकार करण्या प्रारंभ केला. यामुळे लोकशाही व्यवस्था असणाऱ्या राष्ट्रांमधील संबंध लोकशाही राजनय पद्धतीनेच अस्तित्वात येऊ लागले.

**लोकशाही राजनय पद्धतीची ठळक वैशिष्ट्येः**

(१) या पद्धतीत विवादासाद प्रश्न सोडविण्यासाठी राष्ट्रे तत्वाचा वापर न करात शातंतामय वाटाघाटी, चर्चा व विचार विनीमयाचा आधारे प्रश्न सोपविण्याचा प्रयत्न करतात.

(२) या पद्धतीत नम्रतापूर्ण व्यवहाराला अतिशय महत्व असते तसेच सद्‌भावना व शिष्टचार यांनाही महत्व असते. यातुन धेशादेशात गाढ मैत्रीवर विश्वास व्यक्त केला जातो.

(३) लोकशाही राजनयाच्या पद्धतीत राज्याराज्यामध्ये झालेले करार सहसा मोडले जात नाहीत, ते पाळण्यास राष्ट्रे वचनबद्ध असतात.

(४) लोकशाही व्यवस्थे राज्यकारभार हा अंतिमतः लोकांसाठीच चालतो. म्हणुन दोन देशांमधील संबंध हे दोन राजदूतांचे नाहीत तर त्यात दोन्ही देशामधील लोकांचे संबंध अंतर्भुत असतात. असे समजले जाते. त्यामुळे लोकशाही राजबंधात लोकांचा पाठींबा मिळविण्याचा प्रयत्न केला जातो.

(५) लोकशाही राजनयात काही वेळा घटनाबद्ध मार्गाचा अबलंब केला. उदा. काही राष्ट्रांना प्रलोभने दाखवून आपल्या गटात ओढले जाते, तर काही विरोधक राष्ट्रांना अमिषे दाखवली जातात, अनेकदा विरोधी प्रचार करण्यावरही भर दिला जातो.

**लोकशाही राजनयातील दोषः**

(१) सर्वसामान्य लोकांना आंतराष्ट्रीय व्यवहारातील गुंतागुंतीची माहीती नसते. त्यात रसही नसतो. परंतु राजनयाच्या बाबतीत अंतिम सल्ला मात्र लोकांकडे त्यामुळे हा राजनय प्रभावी ठरू शकत नाही.

(२) शीघ्र निर्णय त्वरीत अंमलबजावणी राजनयाचे गमक आहे. परंतु या पद्धतीत कायदेमंडळाच्या संमतीशिवाय राजनयज्ञाचा निर्णय घेता येत नाही.

(३) निकोलसन यांच्या मते या पद्धतीत लोकांच्या दडपणाखाली अत्यंत महत्वाच्या व गुंतागुंतीच्या प्रश्नावर चुकीचे निर्णय घेतले जातात.

(४) लोकांची इच्छा हा जसा या पद्धतीचा दोष आहे. तसेच नेते सुद्धा एक दोषच आहे. या पद्धतीत नेहमी देशाच्या धोरणा संबंधी अस्पष्ट व गोंधळ निर्माण करणारे विवेचन करतात.

**व्यक्तिगत राजनय किंवा शिखर राजनय :**

(१) **अर्थ व स्वरूप :** अनेकदा राष्ट्रप्रमुख किंवा शासनप्रमुख हे प्रत्यक्ष वाटाघाटी करण्यासाठी एकत्र असतात. तेव्हा व्यक्तिगत राजनय असे म्हणतात. अलीकडच्या काळात त्यांस शिखर राजनय असे देखील म्हटले जाते. रूझव्हेल्ट यांची १९४१

मधील अटलांटिक महासागरातील शिखर परिषद १९७२ इंदिरा गांधी भुदो यांचा सिमला शिखर परिषद (१) राष्ट्रप्रमुख कवि‍ा शासन प्रमुख हेच विदेशनीतीचे निर्धारण करणारे असतात.

(२) शिखर परिषदेत सहभागी होणारे नेते सामान्यतः राष्ट्राचे नेते असतात. त्यामुळे त्यांच्या निर्णयाला कायदेमंडळाचा व लोकमताचा पाठिंबा सहजपणे मिळतो.

(३) शिखर परीषदेत घेलेले निर्णय स्वतःहून घेतले असल्यामुळे त्याचे पालन करण्याची, जबाबदारीही स्वेच्छेने स्वीकारली जाते.

**शिखर राजनयाचे दोष :**

(१) शिखर परीषदेत तडजोड होऊ न शकल्यास पुन्हा चर्चा घडवून आण्यास वाव नसतो. त्यामुळे शिखर परीषदेची असफलता ही अत्यंत हानिकारक स्वरूपाची मानली जाते.

(२) शिखर परीषद ह अत्यंत अल्पकाळ चालते, अशा वेळी आंतरराष्ट्रीय प्रश्नांशी संबंधीत विविध पैलू काळजीपूर्वक विश्लेषण करणे शक्य असते. त्यामुळे शिखर राजनयात व्यक्तीगत मते व पुर्वग्रह यांना महत्व प्राप्त होऊन राज्याच्या हितसंबंधांना बाधा निर्माण होण्याचा धोका असतो.

(३) शिखर परीषदेत सहभागी होणाऱ्या नेत्यांची कोणताही प्रश्न सोडविण्याची अगदी मनापासुन नसली तर शिखर परीषद ही निरूपयोगी आहे. असा युक्तीवाद सर विल्यम यांनी केला आहे.

**संसदीय राजनय :**

अर्थ व स्वरूप : संयुक्त राष्ट्रे संघटनेच्या राजनयाला यांनी संसदीय राजनय असे संबोधिले आहे. कारण संयुक्त राष्ट्रे संघटनेच्या कार्यपद्धतीचे स्वरूप संसदीय कार्यपद्धतीशी आंतराष्ट्रीय जुळणारे आहे. या आंतरराष्ट्रीय संघटनेच्या महासभेत सर्व सदस्य राष्ट्र एकत्र येऊन कोणत्याही आंतरराष्ट्रीय प्रश्नाची चर्चा करतात. हासभेने घेतलेल्या निर्णयांची अंमलबजावर्णा करण्याचे कार्य सुद्धा परीषदेच्या माध्यमातुन केले जाते. अशा प्रकारे संयुक्त राष्ट्रे संघटनेमार्फत आंतरराष्ट्रीय समस्या सोडविणयची व

आंतरराष्ट्रीय शांतता, सहयोग सुरक्षा निर्माण करण्याची जी कार्यपद्धती आहे तिला संसदीय राजनय असे म्हणतात.

**संसदीय राजनयाच्या पद्धतीचे दोष :**

(१) या पद्धतीच्या राजनयात अत्यंत महत्वाचा आंतराष्ट्रीय प्रश्न सोडविण्यात गुंतागुंत निर्माण होते.

(२) संयुक्त राष्ट्रे संघटनेच्या संसदीय राजनयामुळे, आंतरराष्ट्रीय तणाव कमी होण्याऐवजी वाढले आहेत.

(३) यशस्वी राजनयासाठी एखाद्या प्रश्नावर गंभीर चिंतन आवश्यक असते असे म्हटले जाते. संयुक्त राष्ट्रे संघटनेत अनेक प्रश्नांवर गरम चर्चा होतात.

**परीषद राजनय :**

अर्थ व स्वरूप : प्राचीन काळात वादाशी दोन राष्ट्रे परस्पर एकत्र येऊन आपले प्रश्न सोडविण्याचा व संघर्ष करार करण्याच प्रयत्न करीत हा राजनय द्विपक्षीय राजनय या नावाने संबोधिला जातो. आधुनिका काळात अनेक राष्ट्र एकत्र येऊन समस्यांवर विचारविनिमय करताना आढळतात. यालाच परीषद राजनय किंवा बहुपक्षीय राजनय असे संबोधिले जाते.

**परिषद राजनयाची वैशिष्ट्ये :**

(१) परीषद राजनयात आंतरराष्ट्रीय हिताला प्राधान्य असते. त्यास राष्ट्रीय स्वार्थ किंवा मतभेद यांना फारसा वाव नसतो.

(२) कोणत्याही आंतरराष्ट्रीय समस्येवर विचार करण्यासाठी एकत्र आलेले राजनय अशा परिषदांच्या निमित्ताने एकमेकांना वारंवार भेटत असतात.

(३) अशा परीषदांमध्ये राज्यशासनाने पूर्ण अधिकार दिलेत प्रतिनिधी सहभागी होतात.

(४) परीषदेत होणाऱ्या चर्चा खुल्या स्वरूपाच्या असतात. जागतीक लोकमताला आव्हान देणारे विचार त्यातुन व्यक्त होतात.

**परीषद राजनयाचे गुण :**

(१) परीषद राजनय पद्धती योग्य प्रकारे हाताळली तर यद्ध टाळण्याचा तो एक सर्वोत्तम मार्ग आहे. असे मत लॉर्ड मॉरिस हॅर्क यांनी व्यक्त केले आहे.

(२) परिषद राजनयाच्या पद्धतीची प्रक्रिया अगदी लवचिक असते, सहभागी होणाऱ्याची कमी संख्या अनौपचारिक परस्पर ओळख व वैयक्तिक मैत्रीची निर्मिती हे देखिल या पद्धतीचे विशेष गुण आहेत.

(३) परीषद राजनयाच्या पद्धतीत सहभाग होणारे प्रतिनिधी आपापल्या देशातील जनतेचे प्रतिनिधीत्व करतात. त्यांच्याबरोबर आवश्यकता असल्यास अशा परिषदांमध्ये गोपनियताही ठेवली जाते.

**परिषद राजनय पद्धतीचे दोष :**

(१) परिषदेमध्ये सहभागी होणाऱ्या प्रतिनिधीशी मते पूर्वग्रहदूषित असल्यास त्यांच्या मैत्रीचे संबंध वाढण्याऐवजी परस्परविषयी गैरसमज अधिक दाखवितात व परीषद अपयशी होतात.

(२) परिषदेत आलेले प्रतिनिधी काही वेळा त्या परषदेचा उपयोग आपल्या राष्ट्रीय उद्दिष्टांचा प्रचार करण्यासाठी किंवा विरोधकांचा अपप्रचार करण्यासाठी वापरतात.

(३) नवीन ध्येयवादी राजकारणाच्या काळात परीषद राजनय हा अशक्य स्वरूपाचा झाला आहे. कारण साम्यवादी, भांडवलशाही इत्यादी ध्येयवादाने प्रेरीत झालेल्या राष्ट्रांचे परस्पर एकत्र येणे व चर्चा करणे हे या घ्येयवादी दुराभिमानामुळे अडचणीचे झाले आहे.

**राजनयाचा ऱ्हास :**

राजनय हे राष्ट्रीय धोरणाचे आंतरराष्ट्रीय क्षेत्रात सतासंध नियंत्रित करण्याचे एक साधन आहे. परंतु आधुनिक काळात राजनयाचे महत्व कमी होत आहे असे मानणारा एक विचारवंत गट आहे. राजनयाचा ऱ्हासाची पुढील कारणे प्रो. रॉबर्टसन यांनी दिली आहेत.

**(१) राजनयावर जनतेचा अविश्वास**

(२) दूरसंचार साधनाचा विकास

(३) संसदीय राजनयाचा विकास

(४) आंतरराष्ट्रीय राजकारणात महासत्तांचा उदय

(५) आंतरराष्ट्रीय राजकारणाचे स्वरूप

(६) सत्ता संतुलनाची समाप्ती

**राजनयाचे महत्व किंवा उपययक्तता**

(१) युद्ध टाळणे

(२) राष्ट्रा-राष्ट्रातील संबंध जोडण्यासाठी

## ५.२.२ संयुक्त राष्ट्रसंघ

### ऐतिहासिक पार्श्वभूमी :

पहिल्या महायुद्धाच्या परिणामातून पुढील भविष्यात अशा प्रकारची परिस्थिती निर्माण होवू नये. याकरिता राष्ट्रसंघाची स्थापना करण्यात आली. परंतु या राष्ट्रसंघाच्या अपयशातून द्वितीय महायुद्ध निर्माण झाले आणि या द्वितीय महायुद्धात झालेल्या विध्वसंकारी परिणामाची झळ संपूर्ण जगाला सोसावी लागली. याच महायुद्धात अमेरिकेने अण्वस्त्राचा प्रयोग केला व तेव्हापासून आण्विक युग देखिल सुरू झाले. वरिल सर्व पार्श्वभूमी लक्षात घेता यानंतर तिसरे महायुद्ध झाले तर संपूर्ण मानवी जगाची समाप्ती होवू शकते याची जाणीव सर्व राष्ट्रांना झाली. त्यामुळे अशा प्रकारची परिस्थिती पुन्हा निर्माण होवू नये, म्हणून २४ ऑक्टोंबर १९४५ ला संयुक्त राष्ट्रसंघाची स्थापना करण्यात आली. त्यामुळेच द्वितीय महायुद्धाच्या परिणामातून व्यापक उद्‌दीष्टाने निर्माण झालेली एक महत्त्वपूर्ण संघटना म्हणून संयुक्त राष्ट्रसंघाच्या जागतिक राजकारणातील यशापयाशाची कारणीमीमांसा करणे आवश्यक वाटू लागले. व त्यातून ती अधिक उपयुक्त कशाप्रकारे ठरू शकेल. यासंबंधी देखिल अनेक विचार व्यक्त झाले. त्याचेच विवेचन आपल्याला करता येईल.

### कार्ये/उद्दीष्ट्ये/तत्त्वे :

संयुक्त राष्ट्रसंघाची कार्ये/उद्दीष्ट्ये/तत्त्वे खालीलप्रमाणे आहेत. द्वितीय महायुद्धाच्या परिणामातूनच संयुक्त राष्ट्रसंघाची निर्मिती झाली. त्यामुळे तिचे उद्दीष्ट्ये, तत्त्वे व्यापक असणे स्वाभाविकच ठरते. त्यामुळे त्याच्या अभ्यासाला देखिल महत्त्व प्राप्त होते.

संयुक्त राष्ट्रसंघाचा हेतू पत्रिकेत स्पष्ट केलेला आहे. यात मुलभूत मानवी हक्क व व्यक्ती प्रतिष्ठा याचे रक्षण करणे, लहान-मोठी राष्ट्रे व स्त्री-पुरुष समानतेची निर्मिती करणे, आंतर्राष्ट्रीय कायदा करार यांना अनुसरून आंतर्राष्ट्रीय कायदा करार यांना अनुसरून आतर्राष्ट्रीय न्याय प्रस्थापित करणे इत्यादी अनेक स्वरूपाचे हेतू स्पष्ट केले आहे.

संयुक्त राष्ट्रसंघाच्या नियमावलीत सुरुवातीलाच तीची उद्दीष्ट्ये स्पष्ट केलेली आहेत, ती पुढीलप्रमाणे :

१. आंतरराष्ट्रीय शांतता व सुरक्षा बोलविणे.
२. स्वयंनिर्णय व समान अधिकार या तत्त्वावर आधारलेले मीप्रत्वाचे संबंध राष्ट्रांराष्ट्रामध्ये विकसित करणे.
३. आंतरराष्ट्रीय स्वरूपाचे आर्थिक, सामाजिक, सांस्कृतिक व मानवतावादी प्रश्न सोडविण्यासाठी आणि मानवी अधिकार मुलभूत स्वातंत्र्य याविषयी आदर निर्माण करण्यासाठी सहकार्य करणे व प्रयत्नशील राहणे.
४. ही सामान्य उद्दीष्ट्ये साध्य करण्यासाठी राष्ट्रांच्या प्रयत्नात समायोजन घडवून आणणे.

वरील उद्दीष्ट्य साध्य करण्याकरिता संयुक्त राष्ट्रसंघ साध्य राहील तसेच उद्दीष्टांवरून स्वत:ची कामकाज पद्धती देखिल निश्चित करेल असे स्पष्ट केल्या गेले आहे. त्यामुळे या उद्दीष्यांवरूनच संयुक्त राष्ट्रसंघाची काही तत्त्वे स्पष्ट केल्या गेली ते पुढीलप्रमाणे :-

१. सर्व सदस्य राष्ट्रांचे सार्वभौमत्व आणि समानता हे संयुक्त राष्ट्रसंघाचे पायाभूत तत्त्व होय.
२. प्रस्तुत रचनेद्वारे स्विकारलेली कर्तव्य सदस्य देशांनी प्रामाणिक राहावे.
३. त्यांनी आपअपसातील संघर्ष शांततामय उपयांनी मिटवावेत.
४. संयुक्त राष्ट्रसंघाच्या उद्दीष्टांशी विसंगत होईल अशाप्रकारे बळाचा वापर केला जावू नये.
५. सदस्य राष्ट्रांनी संयुक्त राष्ट्रसंघाला त्याच्या कार्यात सहकार्य करावेत.
६. सदस्य नसलेल्या देशांचेही वर्तन आंतर्राष्ट्रीय शांतता व सुरक्षेला पोषक राहील, असा प्रयत्न करावा.
७. कोणत्याही राज्याच्या अंतर्गत कारभारात संयुक्त राष्ट्रसंघ हस्तक्षेप करणार नाही. मात्र त्या ठिकाणी शांतता भंग होईल किंवा शांततेला बाधक ठरणाऱ्या घटनासंबंधी हा कायदा लागू होणार नाही.

इत्यादी स्वरूपाशी तत्त्वे स्पष्ट केली गेलेली आहेत.

## संयुक्त राष्ट्रसंघाची कार्ये :

संयुक्त राष्ट्रसंघाच्या उद्दोंची कर्तव्याची, तत्त्वांची आपण दखल घेतल्यास याला अनुसरून आतापर्यंत संयुक्त राष्ट्र संघाने जागतिक राजकारणात कोणती भूमिका पार पाडलेली आहे. ती भूमिका पार पाडतांना कोणकोणती कार्ये पार पाडावी लागली, कोणकोणत्या प्रसगांना सामोरे जावे लागले आहे आणि त्यामुळे संयुक्त राष्ट्र संघाबद्दल कशा प्रकारची भूमिका सर्वसामान्यामध्ये निर्माण झालेली आहे. इत्यादी सर्व गोष्टींचा आढावा घेणे आवश्यक ठरते. त्याकरिता सर्वप्रथम संयुक्त राष्ट्रसंघाची कार्ये थोडक्यात स्पष्य करावी लागतात.

## ती कार्ये पुढीलप्रमाणे स्पष्ट करता येतील.

## १. राजकीय व शांतताविषयक समस्या :

शांतता रक्षणासाठी शस्त्र रुपात व अणुशक्ती नियम याकरिता १९४७ मध्ये साधारण शस्त्रास्त्र आयोग १९४६ मध्ये अणुशक्ती आयोग यांची स्थापना करण्यात आली. १९५२ मध्ये या दोन्ही आयोगाची कामे एकत्र करून एकच निशस्त्रीकरण आयोग स्थापन करण्यात आली. या आयोगाच्या वतीने वाटाघाटी व परिषदा आयोजित करून शस्त्र कपातीचे व अणुशक्ती नियंत्रणाचे प्रयत्न करण्यात आले. परंतु शीत युद्धाच्या वातावरणात या प्रयत्नांना फारसे यश आले नाही. संयुक्त राष्ट्रसंघाच्या स्थापनेपासून राजकीय व शांतताविषयक अनेक आंतर्राष्ट्रीय संबंधातील समस्या समोर येवू लागल्या. १९४६ च्या इरानमदील रशियन सेनेचा प्रश्न, काश्मीर, क्लोन, इंडोनेशियाचे स्वातंत्र्य, १९५० चा कोरीयाचा प्रश्न, १९५६ सुवेन संघर्ष प्रश्न, ग्रीसचा प्रश्न, अरब-इस्त्राईल संघर्ष, तैवानची समस्या, तिबेट इत्यादी अनेक प्रश्न संयुक्त राष्ट्रसंघासमोर निर्माण झाले. इंडोनेशियाचे स्वातंत्र्य व सुवेजचा संघर्ष या प्रश्नांची सोडवणूक करण्यात संयुक्त राष्ट्रसंघाला बरेच यश प्राप्त झाले. तरिपण एकंदरित जगातील राजकीय व शांतता विषयक प्रश्न सुटू शकले नाहीत. मोठ्या राष्ट्रातील संघर्ष व त्यामुळे त्यातून निर्माण झालेले शीत युद्ध हे जरी त्यातील मुख्य कारण असले तरी, संयुक्त राष्ट्रसंघाच्या प्रयत्नामुळे उपरोक्त प्रश्नांवरून संभवणाऱ्या तिसऱ्या जागतिक युद्धाचा भडका टाळला असला तरीही काही बाबतीत संयुक्त राष्ट्रसंघ अपयशी ठरला आहे. असेच आपल्याला म्हणावे लागते. ते अयपश पुढील उदाहरणाद्वारे देता येईल.

१. 'सर्वसमावेशक अण्वस्त्र बंदी करार' या बाबतीत संयुक्त राष्ट्रसंघाचे धोरण काही प्रमाणात स्थायी सदस्यांच्या हीताच्याच दृष्टीने घेतल्या गेलेले आहे. त्यामुळेच या

कराराची कार्यक्षमता कमी झालेली आहे. तसेच या कराराचे एक प्रकारचे राजकारण झाले.

२. १९९०-९१ मधील इराक-कुवेत युद्धात केवळ अमेरिकेच्या स्वार्थाकरिता संयुक्त राष्ट्रसंघाने हस्तक्षेप केला. त्यामुळे या व्यापक उद्देश्याने या संघटनेची निर्मिती झाली होती. त्या उद्देशाला धक्का पोहोचला.

अशा प्रकारे अनेक कारणांवरून संयुक्त राष्ट्रसंघाचे अपयश आपण स्पष्ट करू शकतो. परंतु तिसरे महायुद्ध न होवू देण्यास त्याचे असलेले कार्य लक्षात घेता या संघटनेने महत्त्व मान्यच करावे लागते.

## २. आर्थिक व सामाजिक विकास :

जगात आर्थिक सहकार्य व्हावे व अविकसित देशांचा विकास व्हावा यासाठी संयुक्त राष्ट्रसंघाने आर्थिक व सामाजिक परिषदेच्या व इतर सर्व संलग्न संबंधाच्या मार्फत वरिल कार्य केलेली आहेत.

१९५० मध्ये 'तांत्रिक सहाय्य कार्यक्रम', संलग्न संस्थांच्या साहय्याने सुरू करण्यात आला. या कार्यक्रमाद्वारे गरजू राज्यांना तज्ञ, यंत्रसामुग्री, इत्यादी मदत केल्या गेली होती. पाणीपुरवठा, शेती, हस्तकला, वाहतूक इत्यादी क्षेत्रात प्रामुख्याने मदत दिल्या जात होती. पहिल्या वर्षात या कार्यक्रमाद्वारे १५० देशांना व प्रदेशांना फायदा झाला. हा फायदा या देशांना व्हावा याकरिता १३,००० तज्ञांची मदत पुरविण्यात आली. तसेच २५,००० विद्यार्थी व शासकीय अधिकारी यांना प्रशिक्षण देण्यात आले. आणि १९९८ मध्ये विशेष निधी सुद्धा स्थापन करण्यात आला. अशा प्रकारचे विविध कार्य करीत असतांनाच त्याचा समावेश संयुक्त राष्ट्रसंघाच्या अहवालात कमी प्रमाणावर झाला असेल. त्यामुळे ज्या देशाचा आर्थिक विकास कमी प्रमाणात झाला असेल, त्यांची योग्य दखल घेवून त्या देशाचा आर्थिक विकासाकरिता 'प्रादेशिक आर्थिक आयोग' ची स्थापना देखील करण्यात आली. इत्यादीवरूनच संयुक्त राष्ट्रसंघाच्या आर्थिक व सामाजिक संबंधीच्या कार्याचा बोध आपल्याला होतो. त्यामुळे त्याचे महत्त्व देखिल आपल्याला मान्य करावे लागेल.

## ३. सामाजिक, मानवी व सांस्कृतिक कार्य :

१० डिसेंबर, १९४७ ला साधारण सभेने (महासभेने) ३० कलमी मानवधिकाराचे

घोषणापत्र स्विकृत केले. जगातील प्रत्येक व्यक्तीला मनुष्य म्हणून काही किमान अधिकार सर्वत्र मिळाले. या हेतूने ही घोषणा करण्यात आली. जिवीत स्वातंत्र्य, वैयक्तिक सुरक्षा, निवास स्वातंत्र्य, संपत्ती विषयक स्वातंत्र्य इत्यादी मूलभूत अधिकारांचा यात समावेश करण्यात आला. १९५० पासून दरवर्षी १० डिसेंबर हा 'मानवी अधिकार दीन' म्हणून पाळण्यात येतो. १९५४ मध्ये 'स्त्रीयांच्या राजकीय हक्कांची सनद' व १९५९ 'बालकांच्या हक्कांची घोषणा' महासभेने स्विकृत केलेली आहे. सर्व मानवांना काही समान अधिकार असावे. स्त्रीयांनाही पुरुषांच्या बरोबरीने समान राजकीय अधिकार असावेत व बालकांच्या विकासाकडे ते प्राधान्याने लक्ष द्यावे यासाठी उपरोक्त घोषणा संबंधाशी जवाबदारी आंतर्राष्ट्रीय संघटनेत स्विकारली आहे. अशा प्रकारची जवाबदारी आंतर्राष्ट्रीय संघटनेने स्विकारणे हे इतिहासातील पहिलेच कृत्य होय. असे म्हणावे लागते. या कृतीवरून संयुक्त राष्ट्रसंघाच्या उद्देशातील व्यापकतेची जाणीव आपल्याला दिसून येते. त्यामुळेच त्याचे महत्त्व देखिल मान्य करावे लागते.

## ४. पारतंत्र्यातील राष्ट्रांना स्वंतत्र करण्यासंबंधीचे कार्य (भूमिका) :

द्वितीय महायुद्धाच्या शेवटी जगातील १/४ जनता परतंत्र्यात होती. पारतंत्र्याविषयीच्या घोषणेच्या घटनेत अंतभाव करून संयुक्त राष्ट्रसंघाने त्यांचा मुक्ती कार्याला चालना दिली. त्यामुळे १५ वर्षात ३८ देश मुक्त झाले. इतरांची स्वातंत्र्याची प्रक्रीया झपाट्याने सुरू झाली. या भुमिकेमुळेच साम्राज्यवादावर किंवा वसाहतवादावर एक प्रकारे अंकुश प्रस्थापित झाला. आजही कोणत्याही राष्ट्रांवर सामर्थ्याच्या आधारावर राजकीय वर्चस्व निर्माण करता येत नाही. त्यामुळेच सामर्थ्यशाली राष्ट्रांच्या या वर्चस्वकृतीच्या नियंत्रणात एक प्रकारचे बंधन निर्माण झालेले आहे. यामुळेच यबाबतीत संयुक्त राष्ट्रसंघांची भूमिका आज महत्त्वपूर्ण ठरलेली आहे.

## ५. संलग्न संस्थाची कार्ये :

संयुक्त राष्ट्र संघटनेच्या तत्त्वाखाली कार्य करणाऱ्या अनेक संघटना आहेत. त्या आपआपल्या क्षेत्रात महत्त्वपूर्ण कार्ये पार पाडीत असतात. उदा. आंतर्राष्ट्रीय 'अशुशक्ती अधिकरण' ही संस्था अणुशक्तीच्या शांततामय उपयोगासाठी प्रयत्न करीत आहेत. मजूर वर्गाची स्थिती सुधारण्यासाठी आंतरराष्ट्रीय मजूर संघटना कार्यरत आहे. अविकसित राष्ट्रांना विकसित करण्याच्या दृष्टीने विविध आर्थिक मदत जागतिक बँक, आंतरराष्ट्रीय मुद्रानिधी, यासारख्या संस्था पार पाडीत आहेत. तसेच शैक्षणिक, वैज्ञानिक, सांस्कृतिक आणि जागतिक आरोग्य इत्यादी क्षेत्रासंबंधी संयुक्त राष्ट्रसंघ महत्वपूर्ण कार्य करते.

मानवधिकार संपूर्ण जगात टिकून राहावा याकरिता देखिल तेवढीच प्रयत्नशील आहे. परंतू हे करित असतांना विकसित राष्ट्रांचा प्रभाव त्यांच्या ध्येय धोरणावर देखिल पडत असल्यामुळे एक प्रकारच्या मर्यादा देखिल प्रस्थापित झाल्या आहेत.

## ६. मूल्यमापन :

द्वितीय महायुद्धाच्या पार्श्वभूमीवर निर्माण झालेल्या 'युनोने' जागतिक शांततेच्या क्षेत्रात केलेली कामगिरी आज महत्त्व पूर्ण ठरते. 'युद्ध म्हणजे विनाश' त्यामुळे संघर्षाचे प्रश्न शांततेच्या मार्गाने सोडवावे हा मुख्य उद्देश घेवून 'युनो' जगापुढे आली. युनोने आपल्या भरीव कामगिरीने अनेक राजकीय, आर्थिक, आरोग्यविषयक प्रश्न सोडविले. त्याचप्रमाणे राष्ट्राराष्ट्रांत सांस्कृतिक दवाण-घेवाण यास अनुकूल अशी पाऊले उचलली.

युनोच्या अस्त्विामुळे आज जग तिसऱ्या महायुद्धाच्या भीतीपासून दूर आहे. युनोच्या प्रयत्नामुळेच अनेक ठिकाणी उद्‌भवलेल्या त्या संघर्षांना जागतिक स्वरूप प्राप्त झाले नाही. इराण-इराक प्रश्न, ग्रीस, लेबनॉन, सुवेझ प्रसंग, बर्लिन तटबंदी, भारत-पाक प्रश्न इत्यादी अनेक प्रसंगी उद्‌भवलेल्या संघर्षाच्या स्थितीत युनोने हस्तक्षेप करून शांतता प्रस्थापित केली. अनेक कल्याणकारी कार्ये ही युनोच्या यशाची पोचपावती आहे. 'युनोस्को', 'युनिसेफ' आंतरराष्ट्रीय मजूर संघटना हा साहाय्यक संस्थांच्या माध्यमातून युनोने अनेक जागतिक स्वरूपाचे आर्थिक, सामाजिक व आरोग्यविषयक प्रश्ने सोडविली.

असे असले तरी अनेक प्रसंगी/प्रश्नासंबंधी ती अपयशी ठरली. भारत-पाक संबंध मैत्रीचे करण्यात तीला अपयश आले. सशस्त्र स्पर्धा ती रोखू शकली नाही. अमेरिकेच्या बाजूने निर्णय घेणे हे तीचे एकसुत्री धोरण बनले आहे. इ. युनोमधील असलेल्या दोषांचे निराकरण करण्याची गरज आज आहे.

## संयुक्त राष्ट्रसंघाच्या अयशस्वीतेची कारणे :

२४ ऑक्टोबर १९४५ ला निर्माण झालेल्या या संघटनेचे उद्देश किती प्रमाणात सफल झालेले आहे किंवा जागतिक राजकारणात या संघटनेने कोणती भूमिका पार पाडलेली आहे. यावरच त्या संघटनेची यशस्वीता अवलंबून असते. परंतू ज्या उद्देशाने आणि ज्या व्यापक दृष्टीकोणाने निर्माण झालेली ही संघटना अनेक प्रसंगात यशस्वी ठरल्याचे

आढळून येते आणि त्यामुळेच त्या अयशस्वीतेची कारणे शोधणे आवश्यक ठरते. ती कारणे आपल्याला पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१. संयुक्त राष्ट्रसंघाला आजही संपूर्ण जागतिक संघटन म्हणून त्याचे स्वरूप तयार झालेले नाही. आतापर्यंत जर्मनी, कोरिया तसेच १९७१ पर्यंत चीन इत्यादींचा समावेश या संघटनेत नव्हता. त्यामुळे विश्वशांती प्रस्थापित करणे हे आपले कर्तव्य नव्हे. अशी भुमिका या संघटनेच्या बाहेरील असलेल्या देशांची होती आणि त्यामुळेच संयुक्त राष्ट्रसंघाच्या कार्यक्षमतेवर विपरित प्रभाव पडल्यामुळेच त्याच्या यशस्वीतेमध्ये बाधा निर्माण झाली असल्याचे दिसून येते.

२. संयुक्त राष्ट्रसंघात सैद्धांतिक विरोधाभास आहे. एकीकडे सर्वच रोग्यांना समान अधिकार आणि सार्वभौमसत्ता प्रदान केल्या गेली. तर काही ठिकाणी मात्र सार्वभौम सत्तेचे संतुलन निर्माण झाले आहे. उदा. सुरक्षा परिषदेत स्थायी सदस्यांना विरोध अधिकार (तर्शी झ्रेशी) प्राप्त झालेला आहे. तसेच न्याय, आंतर्राष्ट्रीय कायदा, राष्ट्रीय आत्मसन्मान इत्यादी बाबतीत देखिल स्पष्ट स्वरूपात भाष्य केलेले नसल्यामुळे या संघटनेच्या सिद्धांतात विरोधाभास निर्माण झाल्यामुळेही संघटना अयशस्वी ठरलेली आहे.

३. अंतर्गत अधिकारी संबंधी स्पष्ट उल्लेख संयुक्त राष्ट्रसंघात केला गेलेला नाही. त्यामुळे कोणत्याही देशाच्या अंतर्गत अधिकारासंबंधी कोण निर्णय घेईल हा देखिल एक प्रश्न समोर उभा राहीला आहे. महासभेच्या द्वारे बरेच निर्णय घेतले जातात. परंतु ते स्थितीला धरून नसल्याने आपल्याला अनेक उदाहरणे देता येईल. त्यामुळेच अंतर्गत अधिकारासंबंधी संयुक्त राष्ट्रसंघाचे कार्य एक राजनैतिक तत्त्व म्हणून राहीलेले आहे.

४. संयुक्त राष्ट्रसंघात यथास्थितीसंबंधी देखिल अस्पष्टता असल्यामुळे त्याचा प्रभाव काही प्रमाणात कमी झाला आहे. त्यामुळे कोणत्या वेळेला कोणती कारवाई केल्या जावी यासंबंधी देखिल या संघटनेचे धोरण अस्पष्ट असल्याचे दिसून येते.

५. संयुक्त राष्ट्रसंघातील बऱ्याच गोष्टींवर होणारे वाद-विवाद आणि त्यांचा निर्णय हा पक्षपातपूर्ण किंवा महासत्तेच्या धोरणाला अनुकूल असेच घेतला गेल्यामुळे विश्वशांती प्रस्थापित करण्यास बऱ्याच वेळेला अडचणी निर्माण झालेल्या आहेत. उदा. रशिया किंवा अमेरिका दोन्ही महासत्तांनी नकराधिकाराचा वापर करून एकप्रकारे विश्वशांती प्रस्थापित करण्यात आशा निर्माण केली आहे.

६. संयुक्त राष्ट्रसंघातील ज्या राष्ट्रांना कायम झाले आहे. ते राष्ट्र बऱ्याच वेळेला आपल्या हितसंबंधाचे संरक्षण करण्याकरिता इतर राष्ट्राने मांडलेल्या विधेयकासंबंधी त्यांनी विरोधाची भूकिा घेतली आहे व एकप्रकारे दुसऱ्या राष्ट्रावर दबाव आणण्याचा देखिल प्रयत्न केला आहे. त्यामुळे या प्रकारची न्यायाची योग्यप्रकारे प्रतिष्ठापना करण्यात संयुक्त राष्ट्रसंघ अपयशी ठरलेली आहे. उदा. भारत व पाक संबंधी काश्मीर व्यवस्था.

७. संयुक्त राष्ट्रसंघातील एक प्रमुख संस्था म्हणून तसेच जनतेचे प्रतिनिधीत्व करणारे संस्थामधून महासभेला महत्वपूर्ण स्थान प्राप्त झाले असले तरीही बऱ्याच निर्णयाबाबत त्यांना सुरक्षा परिषदेवर अवलंबून राहावे लागते. त्यामुळेच एखादा ठराव महासभेने संमत केली असली तरीही सुरक्षा परिषदेच्या सदस्यांना प्राप्त झालेल्या विशेष अधिकारामुळे ते या नियमात बाधा निर्माण करू शकतात. त्यामुळेच संयुक्त राष्ट्रसंघ ही एक स्थायी सदस्यांची व महासत्तेच्या इच्छेप्रमाणे वागणारी एक संस्था होय, असे स्वरूप तीला आता प्राप्त झाले आहे.

८. संयुक्त राष्ट्रसंघाला स्वत:चे निर्णय प्रत्यक्षात आणण्यास इतर राष्ट्रांवर अवलंबून राहावे लागते. तीची स्वतंत्र कोणतीही यंत्रणा नाही. त्यामुळे मुख्यत: निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता तीला स्थायी सदस्यांवरच अवलंबून राहावे लागते. या परिस्थितीमुळेच स्थायी सदस्यांची मनमानी किंवा प्रभाव पडणे स्वाभाविक करते. त्यामुळे या संघटनेने घेतलेले निर्णय निपक्ष असतील किंवा योग्यच असतील किंवा योग्च असतील असे आपल्याला म्हणता येत नाही.

संयुक्त राष्ट्र संघटनेत कोणताही मुद्दा उपस्थित करण्याचा अधिकार इतर अस्थायी संदस्यांनी प्राप्त झालेला आहे. परंतू हा प्रस्ताव स्विकारावा किंवा नाही. स्वीकारावा याबाबत मात्र स्थायी सदस्यांना अधिकार प्राप्त झाल्यामुळे या संघटनेची उपयोगिता बऱ्याच प्रमाणात कमी झालेली आहे.

९. आधुनिक काळातील महासत्तांच्या राजकारणामुळे संयुक्त राष्ट्रसंघाचे महत्त्व कमी झाले आहे. या संघटनेने घेतलेला निर्णय म्हणजे केवळ सल्ला असे त्याचे स्थान उरलेले आहे. कारण या निर्णयाला जोपर्यंत महासत्तेचे समर्थन प्राप्त होत नाही. तोपर्यंत प्रत्यक्ष जागतिक राजकारणात या निर्णयाला महत्त्व प्राप्त होत नाही. त्यामुळेच या निर्णयाला असलेले अस्थिर स्थान बऱ्याच वेळेला युनो (ण. छ.) चा महासचिवांच्या कार्यावर किंवा अधिकारावर देखील अधिकार देखील मर्यादा घालीत असल्याचे आपल्याला दिसून येते.

१०. युनोच्या नियमातील आत्मरक्षा आणि आक्रमण यासंबंधी स्पष्ट स्वरूपाचा फरक केल्या गेलेला नाही. त्यामुळे कोणत्याही राष्ट्राने केलेले आक्रमण हे कोणत्या प्रकारात मोडते हे सांगता येत नाही. त्यामुळेच हा विषय देखील विवादास्पद उरलेला आहे.

११. युनोतील महासभा या संस्थेची कार्यपद्धती देखिल दोषपूर्ण आहे. कारण या विभागात असणारी सदस्यसंख्या आणि प्रत्येक सदस्याला स्वत:चे विचार मांडण्याचे असलेले स्वातंत्र्य यामुळे बऱ्याच वेळेला कोणत्याही विषयावर निर्णय घेतल्या जात नाही किंवा एकच एक विषयावर बराच वेळ चर्चा चालवून देखिल निर्णय घेतल्या जात नाही. अशा प्रकारच्या कार्यपद्धतीमुळे केवळ निर्णय अशक्य होत असल्याचे आपल्याला दिसते आणि ज्या उपयोगितेकरिता महासभा या विभागाची निर्मिती केल्या गेली आहे ते कार्य देखिल योग्यरित्या होत नसल्याचे दिसून येते. त्यामुळेच युनोचे महत्त्व कमी होत चाललेले आहे, असे जाणवते.

१२. महासभेची जी अधिवेशने होतात त्यात बुद्धीमान राजकीय विचारक उपस्थित राहण्यास उत्सूक नसतात. त्यामुळे केवळ सदस्यांच्या उपस्थितीतच या अधिवेशनाचा प्रारंभ होतो आणि त्यात होणाऱ्या चर्चेवर योग्यप्रकारे जो प्रकाश पडणे आवश्यक आहे, तो मात्र न पडताच हे अधिवेशन संपुष्टात येते. त्यामुळे संयुक्त राष्ट्रसंघाचे महत्त्व दिवसेंदिवस कमी होत चाललेले आहे.

१३. युनोचे महत्त्व कमी होण्याकरिता बऱ्याच प्रमाणात प्रादेशिक संघटना देखिल कारणीभूत ठरलेल्या आहेत. कारण या प्रादेशिक संघटना स्वत:च्या गटाचा विकास कसा होईल? यावरच जास्त लक्ष केंद्रीत करीत असल्यामुळे ज्या उद्देशांकरिता युनोची निर्मिती झाली आहे त्याचे महत्त्व कमी होत चाललेले आहे.

१४. युनोच्या महासभा व सुरक्षा परिषदेवर अशी टिका करण्यात येते की, ही दोन्ही विभागे राष्ट्राराष्ट्रातील संघर्षाचे निर्वारण करीत नसून केवळ जागतिक जनमत स्वत:च्या मताला कसे अनुकूल करून घेता येईल यावरच या विभागाचे अधिक लक्ष असते. त्यामुळेच बऱ्याच वेळेला दोन राष्ट्रांमधील संघर्ष कमी करण्यापेक्षा वाढविण्याचे कार्य सुद्दा या दोन विभागांनी केलेले आहे. त्यामुळेच युनोच्या स्थानाला हानी पोहोचलेली आहे.

## संयुक्त राष्ट्रसंघातील दोष दूर करण्यासंबंधी विविध उपाय :

युनोची निर्मिती ज्या कारणाकरिता झालेली आहे. ती कारणे थोडक्यात लक्षात घेतली तर, आजही युनोची उपयोगिता संपलेली नसल्याचे आपल्याला दिसते. परंतू वरील प्रकारचे अनेक दोष निर्माण झाल्यामुळे त्याच्या उपयोगितेवर प्रश्नार्थक चिन्ह देखिल निर्माण झालेले आहेत. त्यामुळेच यूनोतील हे दोष दूर कशा प्रकारे करता येईल तसेच अधिक सक्षम व प्रभावशाली कसे करता येईल? याचा अभ्यास करणे महत्त्वपूर्ण ठरते.

यासंबंधी विविध उपाय खालील प्रमाणे सांगता येतील.

१. युनोची सदस्यसंख्या किंवा सदसत्व प्राप्त करण्याकरिता सुरक्षा परीषदेची संमती असणे आवश्यक आहे. अशाप्रकारची अट असल्यामुळे

व्यापकता आणावयाची गरज आहे. कारण वेळ पडल्यास अनेक संस्थाने देखिल निर्माण करता आले पाहिजे.

२. जागतिक पातळीवरील प्रत्येक क्षेत्र हे राष्ट्रीय सार्वभौम सत्तेखाली आहे की नाही याची संपूर्ण चौकशी करायाला हवी आरि जे क्षेत्र नसेल, त्या क्षेत्रावर प्रसासकीय सत्ता निर्माण करण्यात यावी.

३. युनोला स्वत:चे कार्य करित असतांना अनेक प्रकारचा खर्च येत असतो. हा खर्च पुरविण्याकरिता स्वतंत्र प्रकारची उपाययोजना असणे आवश्यक आहे. त्याकरिता विकास कर, सेवाकर, इत्यादी विविध प्रकारचे कर लावून युनोकरिता उत्पन्नाची स्वतंत्र सोय करणे देखिल आवश्यक आहे.

इत्यादी विविध उपाय प्रत्यक्षात आणल्यास युनोची कार्यक्षमता वाढून खऱ्या अर्थाने जागतिक संघटनेचे स्वरूप प्राप्त होईल. परंतु त्याकरिता वरील उपाययोजना आवश्यक आहे.

## ५.२.२ आंतरराष्ट्रीय कायदेपद्धती :

आंतरराष्ट्रीय विवाद कायदेशीर पद्धतीने सोडविण्याच्या दृष्टीने आंतरराष्ट्रीय न्यायालय

महत्त्वाची भूमिका पार पाडीत असते. १९४६ पासून साधारणत: २५ विवाद न्यायदानासाठी आले आहेत. प्रदेशावरील प्रभुत्व, समुद्री अधिकार क्षेत्र, आंतरराष्ट्रीय कराराचा अर्थ, इत्यादी अनेक प्रकारच्या प्रश्नांमधून निर्माण झालेले वाद सोडविण्यात संयुक्त राष्ट्रसंघाने महत्त्वपूर्ण भूमिका निभावलेली आहे. तसेच संयुक्त राष्ट्रसंघातील 'महासभा सुरक्षा परिषद' यांना कायदेविषयक सल्ला देण्याचे कार्य दखिल आंतरराष्ट्रीय न्यायालयाने केले आहे. आंतरराष्ट्रीय कायद्याचा विकास व सहजीकरण करण्यासाठी १९४९ मध्ये महासभेने 'आंतरराष्ट्रीय विधी आयोग' स्थापन केले. या आयोगाच्या प्रयत्नाने १९५८ मध्ये सागरी कायद्याबद्दल चार आंतरराष्ट्रीयअभिसंधी करण्यात आल्या. बऱ्याच राष्ट्रांनी या संधीला मान्यता देखिल दिली. तसेच १९५० मध्ये आंतर्राष्ट्रीय कायद्याची तत्त्वे कोणती. १९५४ मध्ये मानव जातीच्या शांतता व सुरक्षा विरोध गुन्ह्यांची संहीता, इत्यादी स्पष्टीकरण करण्याचे कार्य देखिल आंतरराष्ट्रीय न्यायालयाने केले आहे. त्यामुळेच असे म्हणावे लागते की, आंतरराष्ट्रीय क्षेत्रात कायद्याचे राज्य निर्माण व्हावे यादृष्टीने आंतरराष्ट्रीय न्यायालयाचे स्थान अधिक महत्त्वपूर्ण ठरले असल्याचे दिसून येते.

## आंतरराष्ट्रीय कायदा

### * आंतरराष्ट्रीय क्षेत्रातील संघर्ष नियंत्रित ठेवण्या एक महत्वपूर्ण साधन:

सार्वभौम राज्याची सत्ता व कृती नियंत्रित करण्याचे एक महत्त्वपूर्ण साधन म्हणजे आंतरराष्ट्रीय कायदा होय. सत्ता संतुलन, सामुहिक सुरक्षा ही देखील आंतरराष्ट्रीय संबंधाचे नियमण करणारी साधने आहेत. या साधनाचा परिणामकरक वापर आंतरराष्ट्रीय संबंधाना स्थैर्य प्राप्त करून देतो. परंतु या साधनापेक्षाही अधिक सर्वसाधारण आणी सातत्य असलेले साधन म्हणजे आंतरराष्ट्रीय कायदा होय. शांतता व युद्ध या दोन्ही काळात राज्या-राज्याची वर्तन पद्धती निर्धारीत व नियंत्रित करण्याचे कार्य आंतरराष्ट्रीय कायद्याद्वारे होते. त्यामुळेच आंतरराष्ट्रीय कायद्याला आंतरराष्ट्रीय क्षेत्रातील संघर्ष नियंत्रित ठेवण्याचे एक महत्वपूर्ण साधन माणल्या जाते.

### * आंतरराष्ट्रीय कायद्याची व्याख्या व अर्थ :

विभिन्न राष्ट्रे परस्पर संबंध निश्चित करण्यासाठी जी लीखीत व अलीखीत (प्रथा संकेत इत्यादी) या स्वरूपातील नियमावली स्विकृत करतात तिलाच आंतरराष्ट्रीय कायदा

असे म्हणतात. आं. कायदा या सज्ञेचा हा अर्थभाव व्यक्त करणाऱ्या प्रमुख व्याख्या पुढील प्रमाणे आहेत.

'ओपेनहाईम' यांच्या मते ''सभ्य राष्ट्रे परस्परात व्यवहार करताना संकेत आणी परंपरा यावर आधारीत जे नियम कायदेशिरीत्या बंधनकारक मानतात, अशा नियमांचा समुच्चय म्हणजे आं. कायदा होय.'

'हँन्स क्लेसन' यांच्या मते ''सभ्य राष्ट्रांना परस्परामध्ये व्यवहार करणे ज्यामुळे शक्य होते अशा नियम व सिद्धांताचे संकलन म्हणजे आं. कायदे होय.''

'लॉरेन्स' यांच्या मते, ''सुसंस्कृत राज्यामधील सामान्य समुहाच्या परस्पर व्यवहाराचे निर्धारण करणाऱ्या नियमांना आंतरराष्ट्रीय कायदे असे म्हणतात.

वर उल्लेखीत आंतरराष्ट्रीय कायद्याच्या अर्थाचे विवेचन पुढीलप्रमाणे करता येईल.

१) आं. कायदे हे सार्वभौम राज्याची स्विकृत केलेले असतात. म्हणजे त्याचे पालन करण्यास राज्याची मान्यता असते. आं. कायद्याचा हा अर्थभाव व्यक्त करण्यासाठी त्यांची व्याख्या करतांना विभिन्न लेखकांनी सभ्य राष्ट्रे सुसंस्कृत राष्ट्रे या सारख्या शब्दाचा उपयोग केला आहे.

२) आंतरराष्ट्रीय कायदा हा राज्याच्या परस्पर व्यवहाराशी संबंधित प्रथा, परंपरा, संकेत, नियम व सिद्धांत यांचा एकत्रित समुच्चय आहे.

३) आंतरराष्ट्रीय कायद्याचा विषय कोणता याबाबत विचारवंतामध्ये मतभिन्नता असल्याचे दिसून येते.

उदा. लॉरेन्स यांच्या मते आं. कायद्याचा संबंध प्रामुख्याने राज्यामधील समुहाच्या परस्पर व्यवहाराशी आहे. 'फेनविक' यांच्या मते, राज्याचे हक्क व त्या हक्काचे रक्षण करण्याची कार्यपद्धती हा आं. कायद्याचा विषय आहे.

अशा प्रकारे राज्ये आंतरराष्ट्रीय संस्था व संघटना आणि विभिन्न देशात राहणाऱ्या लोकांचे परस्पर संबंध याच्याशी संबंधीत आं. कायदे आहे. आं. कायद्याचे क्षेत्र अतिशय व्यापक असल्यामुळे त्याचा संपूर्ण बोध कोणत्याही एका व्याख्यावरून होने शक्य नाही, असे म्हणता येईल.

## * आ. कायदा आणि राष्ट्रीय कायदा यातील फरक :

आंतरराष्ट्रीय कायद्याचे स्वरूप समजुन घेण्यासाी आं. कायदा आणि राष्ट्रीय कायदा यातील फरक लक्षात घेणे आवश्यक ठरते. आं. कायदा आणि राष्ट्रीय कायदा यातील मुलभूत फरकाचे विवेचन पुढीलप्रमाणे करता येईल.

## * नियमण करण्याचे क्षेत्र :

राष्ट्रीय कायदा हा राज्यांतर्गत व्यक्ती-व्यक्तीमधील आणि राज्य-व्यक्तीमधील संबंधाचे नियमण करतो. तर आं. कायदा हा सामाण्यपणे राज्या-राज्यांतर्गत संबंधाबाबत असतो.

## * उगमस्थान :

दोन्ही प्रकारचे कायदे काही प्रमाणात रुढी, प्रथा व परंपरा यातून निर्माण झालेले आहेत. परंतु राष्ट्रीय कायद्याचे प्रमुख उगमस्थान राज्याचे कायदे मंडळ असते, तशा प्रकारचे सर्वश्रेष्ठ कायदेमंडळ आं. कायद्याची निर्मिती करण्यासाठी नाही. आं. परिषदा व आंतरराष्ट्रीय करार यातुन आं. कायदे निर्माण होतात.

## * अंमलबजावणी करणारी यंत्रणा :

राष्ट्रीय कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी कार्यकारी मंडळ आणि प्रशासकीय नौकरवर्ग अशी स्वतंत्र यंत्रणा असते. आं. कायद्याच्या अंमलबजावणीसाठी अशी कोणतीही यंत्रणा नाही.

## * न्यायालयीन प्रक्रीया :

न्यायालयीन प्रक्रीयेबाबतही या दोन कायद्यामध्ये मुलभूत स्वरूपाचा फरक आहे. राष्ट्रीय कायद्याचा अर्थ प्रतीपादीत करण्याचे कार्य राज्यातील सुसंघटीत अशा न्यायव्यवस्थेकडून होत असते. आं. कायद्यानुसार न्यायदान करण्याचे कार्य जगातील विविध राज्यामधील न्यायालये करतात. आं. न्यायालही आं. कायद्यानुसार न्यायदान करण्याचे कार्य करते. अशा प्रकारे आंतरराष्ट्रीय कायद्याबाबतची न्यायालयीन प्रक्रीया ही पूर्णत: विकेंद्रित आहे.

## * लिखित स्वरूप :

राष्ट्रीय कायदा हा लीखीत व निसंदिग्ध स्वरूपात असतो. आं. कायद्याचे काही प्रमाणात संहतीकरण झाले असले तरी आजही ही कायदा बऱ्याच प्रमाणात रुढी व परंपरांवर आधारलेला व संदिग्ध स्वरूपात आहे.

## * आं. कायदा खऱ्या अर्थाने कायदा आहे काय?

आंतरराष्ट्रीय कायद्याचे स्वरूप कोणते याबाबत विचारवंतामध्ये सर्वात जास्त मतभिन्नता आहे. राष्ट्रीय कायदा व आं. कायदा यामध्ये मुलभूत स्वरूपाचा फरक आढळून येतो. यामुळे अनेक अभ्यासक विशेषत: ब्रिटीश विचावंत आं. कायदा हा खऱ्या अर्थाने कायदाच नव्हे असे प्रतिपादन करतात.

जॉन आस्टीन या ब्रिटीश विचारवंताने सार्वभौमसत्तेच्या दृष्टीकोनातून कायद्याची व्याख्या केली आहे. त्यांच्या मते ''सर्वश्रेष्ठ सत्तेने आपल्या अधिकार क्षेत्रातील व्यक्तीच्या वर्तणुकीबाबत केलेला नियम म्हणजे कायदा होय.'' कायद्यासंबंधी जॉन आस्टीनचा हा दृष्टीकोन मान्य असणारे विचारवंत आं. कायदा हा खऱ्या अर्थाने कायदा नाही हा विचार पुढील मुद्याच्या आधारे प्रतीपादीत करतात.

## * अंमलबजावणी करणारी यंत्रणा :

ऑस्टीनच्या मते, आं. कायद्याला 'कायदा' असे संबोधणे योग्य नाही कारण कायदा म्हणजे सर्वश्रेष्ठ सत्तेने आपल्या अधिकार क्षेत्रातील कनिष्ठास दिलेला हुकूम होय. आं. क्षेत्रात असा हुकूम देणारी कोणतीही सर्वश्रेष्ठ सत्ता नाही. तसेच आं. कायद्याचे सक्तीने पालन करवून घेणारी यंत्रणा नाही. प्रत्येक राज्य सार्वभौम असल्यामुळे आं. कायद्याच्या स्वरूपात आज्ञा देणारी सर्वश्रेष्ठ सत्ता निर्माण होऊ शकत नाही. म्हणून आं. कायद्याला कायदा असे संबोधणे योग्य ठरत नाही.

## * कायदा निर्माण करणारी वैधानिक सार्वभौम सत्ता :

कायदा हा नेहमी वैधानिक सार्वभौम सत्तेकडून निर्माण केला जातो. आं. क्षेत्रात अशी कोणतीही वैधानिक सार्वभौमसत्ता नाही की जीच्याकडून आं. कायदा मंजूर होऊ शकेल.

**❋ सार्वभौमसत्तेचे अथवा दंड सत्तेचे पाठबळ :**

कायद्याचे पालन न करणाऱ्यास शिक्षा होणे आवश्यक आहे. कायद्याच्या मागे दंड सत्तेचे पाठबळ नसेल तर कायद्याचे अस्तीत्व धोक्यात येते. आं. कायद्यामध्ये दंडसत्तेचे पाठबळ नाही. आंतरराष्ट्रीय न्यायालयाने जरीही निर्णय दिला तरीही तो निर्णय मानने अथवा न मानणे हे पूर्णपणे सार्वभौम राज्याच्या इच्छेवर अवलंबून असते. ज्या-ज्या राष्ट्रानी आं. कायदा मोडला तर त्या-त्या राष्ट्राला शिक्षा कोन करेल व कशी करणार हा प्रान आहे म्हणून आं. कायदा हा खऱ्या अर्थाने कायदा नव्हेच.

**❋ कायद्याबाबत एकवाक्यता नाही :**

कायद्याचे स्वरूप स्पष्ट असते. तो निसंदिग्ध असतो. परंतु आं. कायदा हा स्पष्ट व निसंदिग्ध स्वरूपाचा नाही. त्यात कोणती तत्वे अंतर्भुत असावीत याबाबत सर्व राज्यामध्ये एक वाक्यता निर्माण होवू शकत नाही. तसेच विभिन्न राज्यामधील आर्थिक, सामाजिक व राजकीय परिस्थिती भिन्न असल्यामुळे कायद्याबाबत एकवाक्यता होवू शकत नाही आणि म्हणूनच आ. कायदा हा कायदा नव्हे.

**❋ राज्या-राज्यामधील कायदा :**

आंतरराष्ट्रीय कायदा हा राज्या-राज्यामधील कायदा आहे तो राज्या-राज्यावरील कायदा नाही. त्यामुळे त्याचे पालन करणे किंवा न करणे ही राज्यासाठी एक ऐच्छीक बाब आहे. आणि जिथे ऐच्छीक बाब असते तेथे कायदा निर्माण होवू शकत नाही.

**❋ लोकमताचा आधार :**

कायद्याला लोकमताचा आधार असेत. परंतु आं. कायद्याला लोकमताचा आधार नाही. काही राज्ये लोकशाही पद्धतीची तर काही हुकूमशाही, तर काही साम्यवादी पद्धतीची आहे. त्यामुळे ही सर्व परस्पर विरोधी राष्ट्रे एखाद्या आं. कायद्याला जागतीक लोकमताचा पांठिबा मिळवू शकत नाही. लोकमताचा आधार नसलेला कायदा हा खऱ्या अर्थाने कायदा असुच शकत नाही.

**❋ आंतरराष्ट्रीय नैतीकतेचे नियम :**

आस्टीनवादी विचारवंताच्या मते, आंतरराष्ट्रीय कायदे हे खऱ्या अर्थाने कायदे नसुन ते

केवळ आंतरराष्ट्रीय नैतीकतेचे नियम आहे. अश प्रकारे आं. कायदे हे खऱ्या अर्थाने कायदे नाहीत, असे मानणार आस्टीनवादी विचारवंताचा एक गट आहे.

परंतु कायद्याच्या स्वरूपाबात जॉन आस्टीनवादी विचारवंताशी सहमत नसणारा विचारवंताचा एक गट आहे. सर हेन्री मेन, हॉल, ओपनहाईम, लॉरेन्स आदी विचारवंताच्या मते आं. कायद्यास कायद्याचेच स्वरूप आहे. तो खऱ्या अर्थाने आं. कायदाच आहे. हे पुढील मुद्याच्या आधारे स्पष्ट करता येईल.

### * आस्टीनचा दृष्टीकोन चुकीचा :

या विचारवंताच्या मते, कायद्याचे स्वरूप हे सहमतीचे असते. शांतता व सुरक्षितता या दृष्टीने राष्ट्रीय कायद्याला लोकांची संम्मती असते. त्याचप्रमाणे आं. क्षेत्रात सुद्धा विभिन्न राष्ट्रे स्वेच्छेने व सहमतीने परस्परावर नियत्रंण ठेवण्यासाठी कायद्याला मान्यता देतात. स्वतंत्र व सार्वभौम राज्यानी सहमती दिलेल्या कायद्यांना आं. कायद्याचे स्वरूप प्राप्त होऊ शकते.

### * दंडसत्ता हा कायद्याचा आधार नसतो :

केवळ दंडसत्तेमुळे कायद्याचे पालन होते हा विचार बरोबर नाही. नीती हा सुद्धा कायद्याचा आधार आहे. लोकशाही व सांसदीय शासन पद्धतीचा उदय होण्याच्या पूर्वकालखंडात आस्टीनने हे विचार मांडले आहे. आज परिस्थितीत बदल झाल्यामुळे आस्टीनचे विचार हे काल विसंगत ठरतात हे लक्षात घेणे आवश्यक आहे.

### * कायद्याच्या पालनाचे अन्य आधार :

केवळ दंड सत्ता हाच एकमेव कायद्याचे पालन करण्याचा आधार नाही. रुढी, प्रथा, परंपरा हे सुद्धा कायद्याचे आधारस्तंभ आहे. आं. नैतीकता तसेच कल्याण हे सुद्धा आंतरराष्ट्रीय कायद्याचे आधार आहे, अशा प्रकारे कायद्याचे आधार अनेक आहेत हे मान्य केले तर आं. कायदा हा खऱ्या अर्थाने कायदा ठरतो.

### * आंतरराष्ट्रीय कायद्यामागे शक्तीचे पाठबळ :

आं. कायद्याला केवळ नितीनियम समजू नये. आवश्यकता पडल्यास त्यांच्या अंमलबजावणीसाठी बळाचा व शक्तीचा वापरही करता येतो. कांगो या आफ्रीकेतील देशात बळाचा वापर करूनच संयुक्त राष्ट्रे या संघटनेने शांतता प्रस्थापीत केली.

आर्थिक बहीष्कार हे सुद्धा आजच्या काळातील सर्वात प्रभावी शस्त्र आहे म्हणूनच आं. कायद्याचे पालन पुर्णत: ऐच्छीक आहे, असे समजणे चुक ठरते.

### * आंतरराष्ट्रीय कायद्याचा भंग हा निष्फळ युक्तीवाद :

आं. कायद्याचा भंग होतो म्हणून त्यास कायदा म्हणता येणार नाही. हा युक्तीवाद निष्कळ स्वरूपाचा वाटतो. कारण युक्तीवाद ज्यांनी मांडला त्या आस्टीनच्या काळात संयुक्त राष्ट्रासारखी आं. संघटनाच निर्माण झाली नव्हती. राज्यानी केलेले कायदे सुद्धा काहीवेळा पाळले जात नाही. त्यामुळे कायद्याच्या मुलभूत स्वरूपात फरक नाही, त्याचप्रमाणे संयुक्त राष्ट्रे या आं. संघटनेने केलेल्या कायद्याचा काही वेळा भंग होतो. म्हणुन त्यास कायदे न समजणे हे चुकीचे ठरते.

### * आंतरराष्ट्रीय कायद्याची व्याप्ती :

आज आं. कायद्याची संख्या प्रचंड आहे हे जरी सत्य असले तरीही अनेक विचारवंताच्या मते अनेक महत्त्वाचे विषय अद्यापही आं. कायद्याच्या कक्षेबाहेर आहेत. म्हणजे अनेक महत्त्वाच्या विषयावर आं. कायदेच निर्माण झाले नाही. उदा. नागरीकांना त्यांच्या राज्याकडून मिळणारी वागणूक, एका देशातून दुसऱ्या देशात स्थलांतरीत होणाऱ्या लोकांचे प्रश्न, आं. राजकारणातील तटस्थतता इत्यादी.

तसेच प्रथा, परंपरा यावर आधारीत असणाऱ्या आंतरराष्ट्रीय कायद्याचे सहतीकरण झाले आहे व होत आहे. करार व संधी यातून निर्माण होणारे आंतरराष्ट्रीय कायदे लीखीत स्वरूपातच असतात अशा प्रकारे आधुनिक काळात बहुतांश आं. कायदे लीखीत स्वरूपात आहेत. तरीही आं. कायदे हे संदिग्ध स्वरूपाचे आहेत असेच म्हणावे लागते. कारण त्याचा अर्थ लावण्याचा अंतीम अधिकार राज्यांना आहे. यामुळे कराराचा किंवा आं. कायद्याचा आपआपल्या सोईनुसार अर्थ लावण्याची मोकळीक राज्यांना प्राप्त होते.

### * आंतरराष्ट्रीय कायद्याचे उद्‌देश व स्वरूप :

राज्या-राज्यामधील संबंधाचे नियमण करणे हा आंतरराष्ट्रीय कायद्याचा उद्‌देश आहे. याबाबत विचारवंतामध्ये एकमत आहे. परंतु कोणत्याही राज्याचा नागरीक आं. कायद्याने निश्चित केलेल्या कर्त्यव्याबाबत जबाबिंदार किंवा उत्तरदायीत्व आहे कही शनाही

याबाबत विचारवंतामध्ये मतभिन्नता आहे. द्वितीय महायुद्धाच्या समाप्तीपासून याबाबत असलेली मतभिन्नता अद्यापही कायम आहे. महायुद्धाच्या काळात राज्यातील शासनाच्या आदेशानुसार कृती करणारे जर्मन अधिकारी आं. कायद्यानुसार युद्ध-गुन्हेगार ठरू शकत नाही, असे मत किंवा विचार त्या काळात काही विचारवंतानी मांडले होते. याउलट जर्मन अधिकारी हे युद्ध गुन्हेगारच आहे, असे मत काही विचारवंतानी मांडले होते. परंतु या प्रश्नाबाबत अद्यापही एक वाक्यता नाही. म्हणून व्यक्तीच्या संदर्भात आंतरराष्ट्रीय कायद्याचा उद्देश कोणता हा एक वादग्रस्त प्रश्न आहे, असे म्हणावे लागते.

आंतरराष्ट्रीय कायद्याच्या स्वरूपाबाबतही विचारवंतामध्ये एक वाक्यता नसल्याचे आढळून येते. जॉन आस्टीनवादी विचारवंत आं. कायदा हा खऱ्या अर्थाने कायदाच नाही, असा युक्तीवाद करतात, तर काही विचारवंत कायद्या संबंधी ऑस्टीनचे विचार कालबाह्य झाले आहेत, असे प्रतिपादन करून आं. कायदा हा खऱ्या अर्थाने कायदाच आहे, असा युक्तीवाद थोडक्यात तात्वीकदृष्ट्या आं. कायदा आहे की, ते आंतरराष्ट्रीय नितीमत्तेचे नियम आहे, याबाबत विचारवंतामध्ये मतभिन्नता आहे.

## * आंतरराष्ट्रीय कायद्याचे महत्त्व/भूमिका :

### * सुव्यवस्थित आंतरराष्ट्रीय संबंधाचा आधार :

आं. कायद्याला अनेक मर्यादा आहेत. त्याच्या स्वरूप व उद्देशाबाबत मतभिन्नता असल्यामुळे आं. कायदा हा खऱ्या अर्थाने कायदाच नाही असेच काही विचारवंताना वाटते, असे असुनही आं. संबंधाबाबत आं. कायद्याची भुमिका महत्वपूर्ण असल्याचे कोणीही नाकारू शकत नाही. आं. संबंध हे अधिक सुरळीत आण सुव्यवस्थित आं. कायद्याच्या आधारेच होवू शकतात. राज्या-राज्यामधील आर्थिक सांस्कृतीक, राजकीय असे सर्व प्रकारचे संबंध सतत वृद्धीगत होत आहे. अशा स्थितीत त्यांच्यामध्ये सुव्यवस्था निर्माण करण्यासाठी कायद्याची नितांत आवश्यकता आहे. तसेच राजकीय प्रतीनीधी, राजदूत यांचे विशेषाधिकार आं. कायद्यामुळेच सांमजस्याने येऊ शकतात.

### * राज्या-राज्यामधील व्यापारी संबंधाचा आधार :

विभिन्न राज्यामधील व्यापारी संबंध सुरळीत राहण्यास आं. कायद्याची फार मोठी मदत झाली आहे. व्यापारी संबंध हे राज्यांच्या द्विपक्षिय किंवा बहुपक्षिय संबंधामधुन निर्माण होतात. अशा करारातून प्रस्थापीत झालेल्या अनेक नियमांना आं. कायद्याचे

स्थान मिळाले. आंतरराष्ट्रीय पोस्टल सेवा, समुद्रमार्ग होणारी जल वाहतुक, आंतरराष्ट्रीय विमान सेवा, आदीचे सुव्यवस्थित संचालन आं. कायद्याच्या निर्मितीमुळेच शक्य झाले आहे.

### * राज्याच्या पुर्वापार भुमिकेत बदल :

प्रत्येक राज्य सार्वभौम आहे. या राष्ट्र-राज्य व्यवस्थेच्या आधारभुत तत्वाला आं. कायद्यामुळे कोणताही धक्का बसत नाही. आं. कायद्याने युद्ध बेकायदेशीर ठरविले नाही परंतु रणांगणावरील जखमीची सेवा, युद्ध कैद्यांना द्यावयाची वागणुक, रासायनिक शस्त्राचा उपयोग, आदी विषयासंबंधीच्या आं. कायद्यामुळे युद्धातील अमानुषता कमी होण्यास बरीच मदत झाली आहे. राज्यातील जनतेला कोणते अधिकार द्यावयाचे ही राज्याच्या अधिकार क्षेत्रातील बाब आहे. परंतु कोणत्याही राज्यातील मानवी समुहाला किमान कोणते हक्क प्राप्त झाले पाहीजेत हे मानवी हक्काच्या जाहीरनाम्याने स्पष्ट केले आहे. मानवी हक्काचा जाहीरनामा हे मानवी समुदायाच्या दृष्टीने आं. कायद्याद्वारे महत्वपूर्ण योगदान आहे. युद्धामधील अमानुषता आणि राज्यातील जनतेला दिली जाणरी वागणूक ही आपल्याच अखत्यारीतील बाब आहे. ही राज्याची पूर्वीपासून सुरू असलेली भूमिका थोडी फार तरी बदलण्याचे कार्य आंतरराष्ट्रीय कायद्याच्या निर्मिती व विकासामुळे झाले आहे, असे म्हणता येते.

### * तांत्रिक, वैज्ञानिक क्षेत्रातील विकास कार्यात मदत :

संपूर्ण जगात तांत्रिक, वैज्ञानिक क्षेत्रातील विकासकार्य सुरळीत चालू राहण्यास आंतरराष्ट्रीय कायद्याची मदत होत आहे. अंतराळ क्षेत्र, अंटार्टीकाचे क्षेत्र, महासागरामधील खनिज संपत्ती व नैसर्गिक साधनसामग्री, सागरी सीमा, इत्यादी विषयाबाबत आं. कायदे करण्यात आले आहेत. या सर्व क्षेत्रात विभिन्न राज्यांना संशोधन व विकास कार्य सुरू ठेवण्याबाबत आं. कायद्याने मोलाचे सहाय्य झाले आहे.

### * आंतरराष्ट्रीय संघर्षाच्या नियमनाचे व नियंत्रणाचे साधन :

कायद्याची निर्मिती व अंमलबजावणी या दृष्टीने आं. कायद्याला अनेक मर्यादा आहेत, असे असुनही आं. कायद्याचे राज्याकडून पालन होत असल्याचे आढळून येते. आं. कायद्याचे पालन करण्याचे राज्यानी स्वत:वर बंधन घालून घेतले तर आं. क्षेत्रात

अधिक स्थायी स्वरूपाची शांतता प्रस्थापीत होऊ शकेल, असे विचारवंताना वाटते.

''आंतरराष्ट्रीय कायदे हे सार्वभौम राष्ट्रांना विश्वसमुदायात परिवर्तीत करतात.'' असे क्विन्सी राइट यांनी म्हटले आहे. आं. शांततेच्या दृष्टीने आंतरराष्ट्रीय कायद्याचे महत्व स्पष्ट करतांना पामर व परर्किन्स म्हणतात, ''आंतरराष्ट्रीय कायदे वैधानिक व्यवस्था निर्माण करतात. या कायद्याअभावी जागतीक शांततेस धोका निर्माण होऊ शकतो.''

## * मुल्यांकन

आंतरराष्ट्रीय कायद्याच्या स्वरूपाबाबत विचारवंतामध्ये तिव्र स्वरूपाची मतभिन्नता आहे. आस्टीनवादी विचारवंताचा गट आंतरराष्ट्रीय कायदा हा खऱ्या अर्थाने कायदा आहे, हे मान्य करण्यास तयार नाही, तर आं. कायदा हा खऱ्या अर्थाने कायदाच आहे, असे प्रभावी समर्थन करणारा विचारवंताचा दुसरा गट आहे.

अशा प्रकारे आंतरराष्ट्रीय कायद्याच्या स्वरूपाबाबत दोन्ही विचारवंताच्या गटामध्ये अंशीक सत्यता आहे. म्हणुनच आं. कायद्याचे स्वरूप राष्ट्रीय कायद्यापेक्षा भिन्‍ आहे. तत्वत: आंतरराष्ट्रीय कायदा हा कायदा असो वा नसो. त्यांचे पालन मात्र केले जाते. आं. संबंध सुरळीत राहण्यासाठी काही नियमांचे पालन करणे जरूरीचे आहे. त्यामुळेही त्याचे पालन केले जाते, असे म्हणता येईल. त्याला कायद्याऐवजी नियम, असे संबोधील्याने त्याचे महत्व कमी होत नाही.

## ५.२.३ नि:शस्त्रीकरण आणि शस्त्रनियंत्रण अर्थ

जागतिक शांतता भंग होण्याचे कारण राष्ट्रा-राष्ट्रातील संरक्षण शक्तीच्या माध्यमातुन सोडविण्यासाी राष्ट्रा-राष्ट्रात सुरू झालेली शस्त्रस्पर्धा होय. पहिल्या आणि दुसऱ्या महायुद्धाच्या संघर्षात जी दोस्त राष्ट्रे विजयी झाली. त्याचे कारण त्यांच्याजवळ असलेली, त्यांनी निर्माण करून उपयोगात आणलेली भयानक शस्त्रे आणि अस्त्रे हेच होते. जगाचा विशाश काही तासाच्या अवधीत घडवुन आणणारी अण्वस्त्रे काही राष्ट्रांनी निर्माण केली. राष्ट्राला आपले संरक्षण करण्यासाठी आक्रमक राष्ट्राला धडा शिकविण्यासाठी शस्त्राचा वापर, त्याचा अधिकार देणे म्हणजे मानवी जीवन कायमचे नष्ट करणे होय, म्हणुनच युद्धे टाळण्याची असतील तर इतर उपाययोजना उदा. सामुहिक सुरक्षितता, सत्तासंतुलन ह्यासारखेच महत्व निशस्त्रीकरणाला आहे.

नि:शस्त्रीकरणाद्वारे भविष्यकाळात निर्माण होणाऱ्या शस्त्रास्त्रांवर प्रतिबंध घालता येत

नाही; परंतु शस्त्रनियंत्रामुळे भविष्यकाळात निर्माण होणाऱ्या शस्त्रास्त्राच्या निर्मितीवर बंधने घालता येतात. निशस्त्रीकरण शस्त्रावर नियंत्रण घालते. तर शस्त्रनियंत्रण शस्त्रस्पर्धेवर नियंत्रण घालते. शस्त्रनियंत्रणाशिवाय कधी कधी निशस्त्रीकरण करता येते. तसेच नि:शस्त्रीकरणाशिवाय शस्त्रनियंत्रण कधी कधी करता येते.

असे असले तरीही शस्त्रनियंत्रण हा नि:शस्त्रीकरणाला पर्याय नसुन शस्त्रविरहीत जगाची निर्मिती करण्यासाठी ती आवश्यक गोष्ट ठरली आहे. निशस्त्रीकरणाला अनेक अर्थ प्राप्त होतात. उदा. साधारण, सामान्य, मानवीय व भौतीक युद्धसामुग्रीचे निशस्त्रीकरण वगैरे; परंतु शस्त्रनियंत्रणाला असे विविध अर्थ प्राप्त होत नसतात.

अशा प्रकारे शस्त्रनियंत्रण आणि नि:शस्त्रीकरण ह्या संकल्पना जागतिक शांतता निर्माण करण्यास पोषक असल्या तरी त्या एक नाहीत.

**नि:शस्त्रीकरणाचे प्रकार :**

नि:शस्त्रीकरण ही संकल्पना व्यापक अर्थाने वापरल्या जाते. त्यामुळे तिचे अनेक प्रकार पडतात.

**१) गुणात्मक निशस्त्रीकरण :**

ह्यामध्ये विशीष्ट प्रकारचीच शस्त्रे नष्ट करावी असे ठरविले जाते. उदा. हायड्रोजन बॉम्ब.

**२) मात्रात्मक निशस्त्रीकरण :**

सर्व प्रकारची शस्त्रे संपुर्णपणे किंवा काही प्रमाणात नष्ट करावी, असे प्रतिपादन केल्या जाते.

**३) व्यापक नि:शस्त्रीकरण :**

सर्व प्रकारची शस्त्रे आणि त्यांचे उत्पादन करण्याची प्रक्रिया थांबविण्यात येणारे निशस्त्रीकरण हणजे व्यापक नि:शस्त्रीकरण होय.

### ४) सक्तीचे नि:शस्त्रीकरण :

सक्तीने किंवा दबावाने केलेले निशस्त्रीकरण उदा. पहिल्या महायुद्धानंतर जर्मन व जपानचे निशस्त्रीकरण सक्तीने केले होते.

### ५) ऐच्छिक नि:शस्त्रीकरण :

जेव्हा राज्यसंस्था स्वेच्छेने नि:शस्त्रीकरणाला मान्यता देते तेव्हा तिला ऐच्छीक नि:शस्त्रीकरण असे म्हणतात. हे निशस्त्रीकरण जबरदस्तीच्या नि:शस्त्रीकरणाचे विरोधी असते.

### ६) स्थानिक नि:शस्त्रीकरण :

ह्यामध्ये काही राज्ये स्वत:च्या पुरतेच नि:शस्त्रीकरण करते.

## राष्ट्रसंघाने नि:शस्त्रीकरणाबाबत केलेले प्रयत्न

निशस्त्रीकरणाचे प्रयत्नकार पुर्वीपासून झालेले दिसतात. कॅनडा आणि अमेरीका ह्यांच्यामधील सरहद्दीचा प्रश्न मिटविण्यासाठी १८१७ मध्ये रश फॉगाट करार झाला. १८६० साली रशियाच्या झार राजाने ब्रिटन, ऑस्ट्रिया आणि फ्रान्स ह्यांच्याशी नि:शस्त्रीकरणाबाबत आणि शस्त्रकपातिबाबत बोलणी केली. १८९९ मध्ये रशियाचा झार निकोलस दुसरा ह्याने हेश येथे पहिली जागतिक शांतता परिषद बोलाविली. त्याला २८ राष्ट्राचे प्रतिनीधी उपस्थित होते. शस्त्रनिर्मितीवर बंधने घालणे, सैन्यावरील खर्च कमी करणे, ह्यावर चर्चा झाली. परंतु काहिच निष्पन्न झाले नाही.

राष्ट्रसंघाच्या संविधानाच्या ८ व्या कलमात शांतता प्रस्थापिण्यासाठी शस्त्रकापीतीच आवश्यकता सर्व सभासद राष्ट्रांनी मान्य केली. त्यानुसार १९२१ मध्ये अस्थायी मिश्र आयोगाची निर्मिती झाली. त्या कमीशनणे नि:शस्त्रीकरणाबाबत पुढील प्रयत्न केले.

१) प्रत्येक राष्ट्राला किती सैन्याची आवश्यकता आहे? ते ठरविण्याचा प्रयत्न केला.

२) वार्शिग्टन संमेलनात राष्ट्राची नाविक शक्ती सीमित करण्याचा प्रयत्न केला.

३) जिनेव्हा प्रीटीकॉलनुसार आक्रमक राष्ट्राविरुद्ध प्रतिबंध लावण्याचा प्रयत्न केला.

४) आंतरराष्ट्रीय वाद शांततेच्या मार्गाने सोडविण्याबाबत विचार केला.

परंतु ह्यापैकी कोणत्याही प्रयत्नाला यश आले नाही.

त्यानंतर १९२५ मध्ये राष्ट्रसंघाने पुर्वतयारी आयोग स्थापन केले. ह्या आयोगाने नि:शस्त्रीकरणाबाबत १९३० मध्ये एक योजना मंजुर केली. त्यातील काही तरतुदी अशा आहे.

१) युद्धसांमुग्रीवर अर्थसंकल्पाद्वारे लक्ष ठेवणे.

२) सैनिकसंख्या भेदभाव न करता कमी करणे.

३) सैनीकांचा सेवाकाळ कमी करणे.

४) रासायनिक व जैवीक युद्ध होऊ न देणे.

## जिनेव्हा संमेलन १९३२ :

ह्या संमेलनात ६१ राष्ट्रांच्या प्रतिनिधींनी भाग घेतला. त्यामध्ये

१) राष्ट्रसंघाच्या अंतर्गत सैनिक दल स्थापन करणे.

२) रासायनिक व जैविक शस्त्रास्त्रनिर्मितीवर बंधणे घालणे.

३) आंतरराष्ट्रीय संघर्ष कायद्याच्या आधारावर सोडविणे.

परंतु अस्थायी आयोग, पुर्वतय्यारी आयोग आणि जिनेव्हा संमेलनातील निशस्त्रीकरणाबाबतचा कोणताही ठराव प्रत्यक्षात अमलात आला नाही. ह्याच काळात नि:शस्त्रीकरणावर टाकलेला बहिष्कार, रशिया आणि फान्स ह्यांनी सुरक्षिततेवर दिलेलला भर आदी कारणामुळे राष्ट्रसंघाच्या बाहेरील निशस्त्रीकरण करण्याबाबत पुढील प्रयत्न झाले.

१) १९२१-२२ चे वॉशिग्टंन संमेलन

२) १९२७ चे जिनेव्हा संमेलन

३) १९३० ची लंडन नौसेना संमेलन

४) १९३५-३६ चे लंहन नौसेना संमेलन

५) १९३५ ची इंग्लंड व जर्मनी संधी

परंतु हे सर्व प्रयत्न अयशस्वी ठरले. ह्याची कारणे अशी आहेत.

१) प्रत्येक राष्टाने राष्टहिताला प्राधान्य दिले.
२) आंतरराष्ट्रीय नियमांचे उल्लघन करणाऱ्या राष्ट्रविरुद्ध कार्यवाही करण्याची राष्ट्रसंघाची दुर्बळता.
३) शस्त्रास्त्रांच्या निर्मीती व उपयोगाबाबत राष्टा-राष्टातील भेद.
४) राष्टांची निशस्त्रीकरण करण्याची मानसीक तयारी नसणे.

त्यानंतर स्थापन झालेल्या संयुक्त राष्टसंघाने नि:शस्त्रीकरणाबाबत जे प्रयत्न केले. त्यांचा आढावा घेणे आवश्यक आहे.

### ५.२.४ संयुक्त राष्ट्रसंघ आणि नि:शस्त्रीकरण

### राष्ट्रसंघाच्या अपयशचा परिणाम म्हणुन दुसरे महायुद्ध झाले.

ह्या महायुद्धात अमेरीकेने सरतेशेवटी अणुबॉम्बचा उपयोग करून हजारो सैनीक आणि असैनीक लोकांना मृत्युमुखी पाठविले. त्यामुळे युद्धसमाप्तीनंतर स्थापन झालेल्या संयुक्त राष्ट्रसंघाने निशस्त्रीकरणाचा प्रामुख्याने विचार केला. त्यानुसार नि:शस्त्रीकरणाबाबत अनेक योजना, परीषदा आणि सम्मेलने झाली आणि आजही होत आहेत आणि भविष्यातही होत राहणार. यादृष्टिने त्यांचा थोडक्यात परामर्श घेणे योग्य ठरेल. त्या योजना, सम्मेलणे आणि परिषदा खालीलप्रमाणे :

### योजना, संमेलने आणि परिषदा

### १) परमाणु उर्जा आयोग १९४६ :

परमाणु उर्जानिर्मितीवर बंधने घालण्यासाठी १९४६ साली ह्या आयोगाची स्थापना झाली; परंतु महाशक्तीच्या राष्ट्रानी मतभेदामुळे हा आयोग अयशस्वी ठरला.

२) नि:शस्त्रीकरण आयोग :

ह्या आयोगाची स्थापना १९५२ साली युनोच्या महासभेने केली. शस्त्रास्त्रामध्ये घटकरणे,

नि:शस्त्रीकरणासंबंधी करार करणे, ही कार्य या आयोगाकडे सोपविली; परंतु महाशक्तीच्या व इतर प्रमुख राष्ट्राच्या जाणुनबुजुन केलेल्या दुर्लक्षामुळे हा आयोग यशस्वी झाला नाही.

३) शांततेसाठी परमाणु आयोग :

अणुशक्तीचा उपयोग फक्त शांततेसाठीच करावा ह्या उद्देशाने हा आयोग निर्माण झाला. परंतु ह्या आयोगाच्या उद्देशाबाबत महाशक्तीच्या राष्ट्रात झालेल्या मतभेदामुळे हा आयोग निष्फळ ठरला.

४) १९५५ चे जिनेव्हा संमेलन :

१९५५ साली संयुक्त राष्ट्रसंघाने प्रमुख राष्ट्रांनी जिनेव्हा येथे संमेलन भरविले. ह्या संमेलनात राष्ट्रा-राष्ट्रात उत्पन्न झालेल्या मतभेदामुळे परमाणु शक्तीच्या विकासावरील प्रतिबंध घालणारे उपाय फोल ठरले. आणि निशस्त्रीकरणाच्या बाबतीत सोव्हीएट रशिया इतपर सहकार्य करणार नाही, असे सोव्हिएट रशियाने ठणकावुन सांगितले.

५) १९६० आणि १९६२ चे नि:शस्त्रीकरण संमेलन :

१९६० साली १० राष्ट्रांचे आणि १९६२ साली १८ राष्ट्रांचे नि:शस्त्रीकरण संमेलन जिनेव्हा येथे भरली. परंतु नि ठाण व्यवस्थेबाबत झालेल्या मतभेदामुळे ही दोन्ही संमेलने व्यर्थ ठरली.

६) आंशिक परीक्षण बंदी करार :

५ ऑगस्ट १९६३ रोजी अमेरिका, रशिया आणि इंग्लड ह्या देशांनी आंशिक परीक्षण बंदी करार केला. त्यानुसार त्या देशांनी आपल्या अधिकार क्षेत्रातल्या कोणत्याही ठिकाणी अणुविस्फोट करण्यास व अणुस्फोटाला प्रोत्साहन देण्यास बंदी केली; परंतु अण्वस्त्रांच्या विक्रीवर बंदी न घालणे आणि कराराचा अर्थ संबंधीत राष्ट्राने आपल्या सोयीनुसार लावणे ह्यामुळे हा करार जवळपास असफल ठरला.

### ७) १९६६ ची राष्ट्राध्यक्ष जॉन्सनची सात सुत्री योजना :

नि:शस्त्रीकरणाबाबत राष्ट्राध्यक्ष जॉन्सनने सात सुत्री योजना मांडली. यामध्ये महागड्या शस्त्रनिर्मितीवर भर देऊ नये, आक्रमक व सुरक्षात्मक प्रक्षेपणास्त्रांच्या विकासावर

बंदी घालणे, अणुविकास कार्यक्रमाची पाहणी करणे यासाठी आंतरराष्ट्रीय संघटनेची निर्मिती करणे अशि महत्त्वाची तत्वे त्यामध्ये होती, परंतु अमेरिकेने नाटो, सिंटो व प. जर्मनीला शस्त्रास्त्रांचा पुरवठा केला आहे. ह्या कारणामुळे ही सात सुत्री योना असफल ठरली.

## ८) १९६८ ची परमाणु अस्त्र निर्माण व प्रसार प्रतिबंधक संधी :

नि:शस्त्रीकरण आयोगाने मांडलेली एक योजना युनोच्या महासभेने १९६८ साली स्वीकारली. तीला महाशक्तीच्या आणि जागतिकदृष्ट्या महत्वाच्या अशा एकूण ४० राज्यांनी मान्यता दिली.

त्यानुसार अण्वस्त्रधारी राष्ट्रांनी इतर राष्ट्रांना अण्वस्त्र प्राप्त करण्यासाठी मदत करू नये, अण्वस्त्रहीन राष्ट्रांनी अण्वस्त्रे बनवु नये, अण्वस्त्राचा उपयोग विकासासाठी करावा. अशा अटींचा समावेश ह्या करारात केला. त्या कराराला १०० राष्ट्रांनी मान्यता दिली.

## ९) १९७१ सालची न्युक्लीअर फ्री सीबेड ट्रिटी :

समुद्र तळ आणि महासमुद्र तळ हे अण्वस्त्रे आणि संहारक अस्त्रे ह्यांपासुन मुक्त ठेवण्यासाी ११ फेब्रुवारी १९७१ रोजी इंग्लंड, अमेरीका व रशिया ह्यांच्यामध्ये एक करार झाला. त्यात १९ कि.मी. प्रादेशीक समुद्राचा भाग वळवण्यात आला. ह्या संधीला युनोच्या महासभेने मान्यता दिली. परंतु ह्यामध्ये वरील तीन राष्ट्राचाच फायदा होणार असल्यामुळेच भारत व चीनने सही नाकारली.

## १०) १९७९ ची साल्ट १ आणि साल्ट २ संधी :

ह्याला डींरींशसळल अीाी ङ्ळाळींरींळेप ढीशरीं असे म्हणतात. महाशक्तीच्या शस्त्रास्त्रांवर नियंत्रण घालण्याच्या दृष्टिने ह्या संधी झाल्या. साल्ट १ संधीच्या वेळी शस्त्रास्त्र स्पर्धा कमी करण्याच्या दृष्टिने विचार करण्याचे ठरले.

## ११) मध्यम मारा परमाणु प्रक्षेपास्त्र संधी :

हा करार अमेरिका व रशिया मध्ये झाला त्यानुसार ह्या दोन्ही राष्ध्रांनी ५०० ते ५००० कि.मी. अंतरावर जमिनीवरून मारा करणारी प्रक्षेपास्त्रे नष्ट करण्याचे मान्य केले.

ह्या योजना, संमेलने आणि परिषदांमधुन नि:शस्त्रीकरणाच्या संकल्पनेच्या अभ्यास स्पष्टपणे आपण करू शकतो.

## नि:शस्त्रीकरण मर्यादा

नि:शस्त्रीकरणाबाबत आजपावेतो जे प्रयत्न झाले त्यांना अपेक्षीत यश आले नाही. ह्याचे कारण महाशक्तीच्या राष्ट्रातील तणाव, त्यांचा राष्ट्रीय स्वार्थ हे आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे जी नवनवीन शस्त्रे आणि परमाणु अस्त्रे निर्माण झाली. त्यामुळे नि:शस्त्रीकरण प्रक्रिया अधिकाधीक गुढ बनली आहे. निशस्त्रीकरण करणे ही समस्या दिवसेंदिवस उग्र बनली आहे. त्या प्रक्रियेत अनेक अडचणी निर्माण झाल्या आहेत.

### १) आत्मसंरक्षण :

नि:शस्त्रीकरणाशी संबंधीत राष्ट्र हे नेहमीच स्वत:च्या संरक्षणाचा विचार करते. कोणत्याही राष्ट्राला प्रथम सुरक्षिततेची आणि आक्रमकांविरुद्ध संरक्षणाची हमी मिळाल्याशिवाय कोणतेही राष्ट्र नि:शस्त्रीकरणाला तयार होणार नाही.

### २) प्रमाणाचे तत्व :

नि:शस्त्रीकरणाच्या बाबतीत दुसरा अडथळा म्हणजे निशस्त्रीकरणाचे प्रमाण ठरविणे हा आहे. राष्ट्राने कोणत्या प्रमाणात नि:शस्त्रीकरण करावे किंवा कोणती शस्त्रे किती प्रमाणात नष्ट करावी आणि त्याचे उत्पादन किती प्रमाणात करावे हे ठरविणे फारच ?? आहे. कारण प्रत्येक राष्ट्राजवळ एकसारखीच शस्त्रास्त्रे नसतात. त्यांचे उत्पादनही कमी जास्त प्रमाणात असते. १९३२ च्या जागतिक नि:शस्त्रीकरण परिषदेत फ्रान्स आणि जर्मनी नि:शस्त्रीकरणाचा समतोलपणा हे तत्व नाकारले होते.

### ३) शस्त्रास्त्राने उत्तम संरक्षण होते :

शस्त्रास्त्राच्या सहाय्याने सुसज्य राहुन संरक्षण चांगल्या प्रकारे होते. हे संरक्षण खात्रीलायक आहे. अशीच समजुत राष्ट्रा-राष्ट्रात झाली आहे. निश:स्त्रीकरणाने संरक्षण होईलच अशी खात्री राष्ट्रांना वाटत नाही. म्हणून कोणतेही राष्ट्र सहासहजी नि:शस्त्रीकरणास तयार होत नाही.

## ४) पद्धती ठरविणे कठीण :

निशस्त्रीकरणाच्या बाबतीतला आणखी एक अडथळा निरनिराळ्या शस्त्रांची आणि त्यांची परिणामकारकता नष्ट करण्याची पद्धती ठरविणे कठीण आहे. शस्त्रास्त्रामुळे राज्याला सुरक्षितता वाटते. त्यामुले अशी शस्त्रास्त्रे नष्ट करण्यास राज्य तयार होत नाही. तसेच प्रत्येक शस्त्राची व अस्त्राची परिणामकारकता असते. प्रत्येक राष्ट्राजवळ एकसारखी व एकाच पद्धतीची शस्त्रास्त्रे नसतात. त्यामुळे कोणती शस्त्रास्त्रे आणि ती किती प्रमाणात नष्ट करावी? हे ठरविणे कठीण झाले आहे.

## ५) नि:शस्त्रीकरण केले काय? ते ठरविणे कठिण :

प्रत्येक राष्ट्र त्यांच्याजवळ असलेल्या शस्त्रास्त्र भांडाराची, उत्पादन क्षमतेची आंतरराष्ट्रीय संघटनेकडून किंवा इतर देशांकडून चाचणी करू देण्यास तयार होत नाही. त्यामुळे नि:शस्त्रीकरणाद्वारे देशांनी किती प्रमाणात नि:शस्त्रीकरण केलेले समजणे कठिण आहे.

## ६) हेरगिरीचा प्रयत्न :

नि:शस्त्रीकरणाच्या बाबतीतला आणखी एक अडथळा म्हणजे राष्ट्रा-राष्ट्रांचा परस्परांवर असणारा अविस्वास हा आहे. नि:शस्त्रीकरणाबाबत आजपर्यंत अनेक ठराव आंतरराष्ट्रीय कराराद्वारे मान्य केले. त्यासाठी निरीक्षण करावे हे तत्वसुद्धा मान्य करण्यात आले. परंतु प्रत्यक्षात निरीक्षणाच्या नावाखाली महाशक्तीची राज्ये हेरगीरी करतात. असाच समज निर्माण झाला. अशा अविस्वासाच्या वातावरणात नि:शस्त्रीकरण करणे शक्य आहे, असे सुकझर म्हणतो.

## ७) स्पर्धांच्या युगात अण्वस्त्रांना महत्व :

आजचे युग स्पर्धेचे युग आहे. त्यामुळे नि:शस्त्रीकरण करून आपली राष्ट्रीय शक्ती खच्ची करण्यास साधारणत: कोणतेही राष्ट्र तयार होत नाही. आज आपणही अण्वस्त्रधारी राष्ट्र बनले पाहिजे, अशी समजुत विकसनशील राष्ट्रांची झाली आहे. भारत आणि पाकिस्तान ह्यांनी अण्वस्त्रनिर्मिती केली. अशी राष्ट्रे नि:शस्त्रीकरण स्वीकारून आपला प्रभाव कमी करण्यास कधीच तयार होत नाही. कारण ह्या अण्वस्त्रांच्या साहाय्यानेच ही राष्ट्रे इतर क्षेत्रात आपली प्रगती करीत आहेत.

## नि:शस्त्रीकरणाच्या बाबतीत भारताची भुमिका

भारताने अलिप्तता धोरण स्विकारले आहे. भारत हा शांतताप्रीय देश आहे. ''जगा आणि जगु द्या'' ह्याच धोरणाचा भारताने स्वीकार केला आहे. पंचशील तत्वाचा भारताने स्वीकार केला आहे. त्यामुळे कोणत्याही प्रकारच्या युद्धाची भारत कधीच समर्थन करीत नाही. आतापावेतो झालेल्या अनेक नि:शस्त्रीकरण संमेलनात आणि अण्वस्त्र बंदी विषयीच्या संमेलनात भारताने नि:शस्त्रीकरणाबाबतचे आपले मत स्पष्टपणे मांडताना असे सांगितले की, निशस्त्रीकरण करून शस्त्रास्त्राची स्पर्धा थांबवावी. परमाणु प्रतिबंधक संधीक भारताने तात्विक विरोध दर्शवुन संधीवर स्वाक्षरी करण्याचे नाकारतांना असे स्पष्टपणे केले की, ''परमाणुचा उपयोग भारत शांततेसाठी आणि राष्ट्रीय विकासासाठीच त्याचा दुरुपयोग जागतिक शांता भंग करण्यासाठी, इतर राष्ट्रांना धमकी देण्यासाठी आणि त्याच्या स्वातंत्र्याने अपहरण करण्यासाठी करार नाही. भारताच्या शेजारील राष्ट्रे चीन आणि पाकिस्तान ही अण्वस्त्रधारी राष्ट्रे आहेत, त्यांना खंबीर आणि यशस्वी उत्तर देण्यासाठी भारत अण्वस्त्रधारी होणे ही काळाची गरज आहे.'' त्यासाठी भारताने १९९४ मध्ये पोखरण येथे यशस्वीपणे आण्विक चाचणी केली होती.

ह्याचा अर्थ भारत नि:शस्त्रीकरणाच्या विरोधी आहे. असे न ?? भारताने अलिप्तता धोरण स्विकारून महाशक्तीच्या दोन्ही राष्ट्रामध्ये शस्त्रास्त्र स्पर्धा करण्याचे, त्यांच्यातील संघर्ष टाळण्याचे प्रयत्न करून त्यांच्यामध्ये सामज्यस्य निर्माण करण्याचा प्रयत्न केला. शस्त्रास्त्रावरील होणारा खर्च कमी करून त्याचा सदुपयोग ?? विकासासाठी करावा हाच आहे.

## अण्वस्त्रांच्या संदर्भात नि:शस्त्रीकरणाचे प्रयत्न

अण्वस्त्रांच्या संदर्भात नि:शस्त्रीकरणाला विशेष महत्व आहे. कारण ??ची जागतीक संहारक शक्ती हेच आहे. जोपर्यंत अण्वस्त्रांची निर्मिती पुर्णपणे थांब?? तोपर्यंत नि:शस्त्रीकरण आणि जागतीक शांतता निर्माण होणे शक्य नाही. अण्वस्त्रे शत्रुचा नि:पात करतात तसाच अण्वस्त्राची लहानशी चुक ही अण्वस्त्रधारी राष्ट्राचा ?? धडविण्यास कारणीभुत ठरतात.

१९४५ ते १९४८ पर्यंत अमेरीका हे एकमेव अण्वस्त्रधारी राष्ट्र परंतु १९४९ साली सोव्हिएट रशिया, नंतर ब्रिटेन आणि १९८५ मध्ये पाकिस्तान अण्वस्त्रधारी राष्ट्रे बनली. अण्वस्त्राचा दुरुपयोग टाळावा, त्यांच्यावर नियंत्रण प्रस्थापित करावे ह्या दृष्टिने ज्या जागतिक परिषदा झाल्या त्यांचा थोडक्यात विचार करणे ??.

## जागतीक परिषदा

### १) सहा राष्ट्रांची १९८५ सालची दिल्ली परिषद :

अर्जेन्टीना, ग्रीस, स्विडन, टॅगानीका आणि भारत ह्यांची दिल्ली येथे २८ जानेवारी रोजी परीषद झाली. त्या अण्वस्त्रधारी राष्ट्रांनी अण्वस्त्राची चाचणी बंद करणे अशी विनंती करण्यात आली.

### २) रीगन, गोर्बाचेव्ह परिषद १९८५ :

अमेरीका अध्यक्ष रीगन आणि रशियन गोर्बाचेव्ह ह्यांची १९८५ च्या अखेरीस जिनेव्हा येथे बैठक झाली. त्यामध्ये अण्वस्त्रे समाप्तीबाबतचा विचार झाला. परंतु १५ वर्षात अण्वस्त्राची क्रमश: समाप्ती करावी ह्या रशियाच्या ठरावाला अमेरिकेने संमती न दिल्यामुळे ही परिषद निरर्थक ठरली.

### ३) रेवजावीक परिषद १९८६ :

ऑक्टोंबर १९८६ मध्ये पुन्हा गोर्बाचेव्ह आणि प्रे. रीगण ह्यांची नि:शस्त्रीकरणाबाबत रेवजाविक येथे बैठक झाली. परंतु स्ट्रेटेजिक डिफेन्स एनिशिएटीव्ह प्रोग्रामबाबतचे संशोधण केवळ प्रयोगशाळेपुरतेच मर्यादीत असावे, असे रशियाचे विचार अमेरिकेने अमान्य केल्यामुळे बैठक निष्फल ठरली.

### ४) क्षेपणास्त्राबाबतची संधी :

वॉशिंग्टन येथे १९८७ मध्ये पुन्हा प्रे. रिगन व गोर्बाचेव्ह ह्यांची बैठक झाली. त्यामध्ये ५०० ते ५००० किलोमीटर परिक्षेत्रातील क्षेपणास्त्राचे उच्चायन करण्याचे ठरले. यानुसार अमेरिकेने ८५९ व सोव्हीएट रशियाने १७५२ क्षेपणास्त्रेचे अड्डे नष्ट करण्याचे मान्य केले.

### ५) अंतराळातील नि:शस्त्रीकरण कार्यक्रम :

त्यानंतर जुन १९८९ मध्ये अंतराळातील नि:शस्त्रीकरण कार्यक्रमाबाबतची संधी अमेरीकेच्या विरोधामुळे झाला नाही.

### ६) वाशिंग्टन सभा :

१ मे १९९० रोजी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष बुश आणि रशियन अध्यक्ष गोर्बाचेव्ह ह्यांच्यामध्ये नि:शस्त्रीकरणाबाबतचा एक करार झाला आणि दोन्ही राष्ट्रांनी हजारो टन शक्तीची शस्त्रास्त्रे नष्ट करण्याचा करार केला. २७ सप्टेंबर १९९१ रोजी युरोपच्या भुमीवरून सर्व अण्वस्त्रे व क्षेपणास्त्रे काढून घेण्याची एकतर्फी घोषणा राष्ट्राध्यक्ष बुश ह्यांनी केली. त्यानुसार शीतयुद्ध समाप्तीच्या दृष्टिने चांगले वातावरण तयार झाले.

त्यानंतर अमेरिका आणि रशिया ह्यांच्यामध्ये १६ जुलै १९९२ रोजी वॉशिंग्टन येथे एक करार झाला. त्यानुसार दोन्ही देशांनी आपली अण्वस्त्रे सिमीत करण्याचा निर्णय घेतला.

अशा प्रकारे अण्वस्त्राच्या क्षेत्रात नि:शस्त्रीकरण करण्याचे जे प्रयत्न झाले, ते सर्व यशस्वी झाले नाही तरी अण्वस्त्राचे नि:शस्त्रीकरण करण्याचे जे प्रयत्न झाले, ते सर्व यशस्वी झाले नाही तरी अण्वस्त्रेचे नि:शस्त्रीकरण करणे आवश्यक आहे ही जाणीव महाशक्तीच्या राष्ट्रांना आली. अण्वस्त्रामुळे युद्ध झाले तर कोणाचेही हित साध्य होणार नाही. अण्वस्त्राच्या दुरुपयोगामुळे विनाश अटळ आहे. ही जणीव झाल्यामुळेच नि:शस्त्रीकरणाला अधिक चालना मिळाली ही गोष्ट मान्य करावीच लागेल.

## ५.३ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

(१) राजनय म्हणजे काय ? राजनयाचे जागतिक राजकारणातील भुमिका स्पष्ट करा.

(२) राजनयाच्या बदलत्या स्वरुपाबद्दल चर्चा करा.

(३) आंतरराष्ट्रीय कायदा म्हणजे काय सांगून त्याचे महत्व विशद करा.

(४) संयुक्त राष्ट्रसंघाची जागतिक शांतता प्रस्थापित करण्यासाठीच्या प्रयत्नांची चर्चा करा.

(५) टिपा लिहा.

  (अ) निशस्त्रीकरण

  (ब) शस्त्रनियंत्रण

## ५.४ सरावासाठी स्वाध्याय

(१) राजनयाच्या विविध प्रकारांची चर्चा करा.

(२) राजनयाची 'सत्ता आणि संघर्षाच्या' संदर्भातील भूमिका स्पष्ट करा.

(३) ''राजनय हे युद्ध टाळण्यासाठी आवश्यक असे साधन आहे'' चर्चा करा.

(४) आंतरराष्ट्रीय कायद्याचे बहूध्रुविय सत्ताकारणातील महत्व विशद करा.

*****

# ६

# घटक : ६ साम्यवादोत्तर जग आणि नवीन जागतिक संरचना

**घटक संरचनाः**

६.० उद्दिष्टे.
६.१ प्रास्ताविक.
६.२ विषय विवेचन.
६.२.१ साम्यवादोत्तर जग.
६.२.२ नवीन जागतिक व्यवस्था.
६.२.३ प्रादेशिकतावाद आणि प्रादेशिक एकात्मीकरण.
६.२.४ जागतिकीकरण.
६.२.५ जागतिक राजकारण आणि तांत्रिक प्रगती
६.२.६ पर्यावर्णीय प्रभाव.
६.३ स्वयंःअध्ययन प्रश्न.
६.४ सारांश.
६.५ सरावासाठी स्वाध्याय.
६.६ संदर्भग्रंथ यादी.

## ६.० उद्दिष्टे :

आंतरराष्ट्रीय संबंधांच्या अध्ययनामध्ये आपण सिध्दांतांचा आणि काही जागतिक मुद्यांचा अभ्यास आधीच्या घटकांत केला. प्रस्तुत घटकात काही महत्त्वाच्या नवीन घडामोडींचा अभ्यास आपण करु. ह्या घडामोडींचा जागतिक राजकारणावर दूरगामी परिणाम झाला आहे. ह्या घटकाच्या अभ्यासानंतर आपणास.

- जागतिक राजकारणातील काही महत्त्वाच्या घडामोडींचे आकलन होईल.
- जागतिक राजकारणावर प्रभाव टाकणाऱ्या काही नव्या प्रश्नांचे व मुद्यांचे ज्ञान होईल.

- आंतरराष्ट्रीय संबंधांतील बदलते प्रवाह स्पष्ट करता येतील.

## ६.१ प्रास्ताविक :

आंतरराष्ट्रीय संबंधांचा अभ्यास सिध्दांत, दृष्टीकोण आणि प्रत्यक्ष जागतिक स्तरावर होणाऱ्या घडामोडी ह्यांच्या आधारे करता येतो. पहिल्या घटकात आपण शीतयुध्द, त्याची समाप्ती, सोवियत रशियाचे विघटन आणि नवे शीतयुध्द ह्यांचा अभ्यास केला. ह्याच घडामोडींशी संबंधीत काही महत्त्वाच्या घडामोडी आणि जागतिक राजकारण त्यामुळे निर्माण झालेले काही नवे प्रश्न अभ्यासणार आहोत. तसेच त्यातील परस्पर संबंधसुध्दा समजून घेणार आहोत.

## ६.२ विषय विवेचन :

### ६.२.१ साम्यवादोत्तर जग :

शीतयुध्दाची समाप्ती, सोवियत रशियाचे विघटन, साम्यवादाचे पतन ह्या तीनही घटना एकमेकांच्या पूरक असून परस्परांचे परिणामही म्हणता येतील. साम्यवादाच्या पतनाचा सर्वांत जास्त खोल परिणाम पूर्व युरोपात दिसून आला. ह्या घटना अत्यंत झपाट्याने १९८९ ते १९९१ च्या काळात घडल्या. साम्यवादोत्तर जग समजण्यासाठी प्रथम साम्यवादाच्या काळातील जगाची वैशिष्ठ्ये समजून घेणे आवश्यक आहे. दुसऱ्या महायुध्दानंतर सोविएत रशियाच्या साम्यवादी विचारांनी प्रभावित पूर्व युरोपातील देश हे बहुतांशी हुकुमशाही किंवा सर्वंकषसत्तावादी होते. साम्यवादी पक्षाच्या अधिपत्याखाली तेथे नियंत्रित निवडणुका होत आणि सरकारे निवडली जात. संपूर्ण अर्थव्यवस्थेवर सरकारचे नियंत्रण होते. उद्योगधंदे, शेती इत्यादी सरकारच्या ताब्यात होते. देशांतर्गत सुरक्षा आणि सीमांची सुरक्षा राखण्यासाठी प्रचंड सैन्य आणि शस्त्रसाठा ह्या देशांकडे होता. सैन्य एकप्रकारे शासनाचा आधारच होता. देशांतर्गत विरोध गुप्तहेर संघटनांद्वारे मोडून काढला जात असते. मानवाधिकारांच्या बाबतीत ह्या देशांचा क्रमांक फारच शेवटचा होता. शिक्षण, स्वास्थसेवा, दळण-वळण, वाहतूक ह्या बाबतीत ह्या देशांनी भरीव प्रगती केली होती. आंतरराष्ट्रीय राजकारणात हे देश द्विध्रृवीय व्यवस्थेत अडकले होते. ह्या सर्व देशांचा नेता असलेल्या रशियातील साम्यवाद मोडकळीस आल्याबरोबर प्रथम पूर्व आणि पश्चिम जर्मनीमधील भिंत कोसळली आणि साम्यवादी पूर्व जर्मनी पश्चिम जर्मनीत विलीन झाला. त्यानंतर पूर्व युरोपातील साम्यवादी देश एकामागून एक साम्यवादी जोखडातून मुक्त झाले. सोविएत रशियाची पण शकले झाली आणि अनेक नवे देश जन्माला आले.

साम्यवादोत्तर जगाची वाटचाल संभ्रमित अवस्थेत सुरु झाली. रशियासारखी तुल्यबळ महाशक्ती संपुष्टात आल्याने अमेरिका एकमेव जागतिक शक्ती राहिला. द्विध्रुवीय जागतिक व्यवस्था संपून अमेरिका नियंत्रित एकध्रुवीय व्यवस्था अस्तित्वात आली. अमेरिका जागतिक राजकारणाच्या प्रत्येक घडामोडीत हस्तक्षेप करु लागला आणि एकप्रकारे 'जागतिक पोलीस' या भूमिकेत वावरू लागला. संयुक्त राष्ट्रासारख्या संघटनेवरसुध्दा अमेरिकेचा दबाव वाढला. या जगामध्ये अमेरिक-धर्जिणी व्यवस्था आणि राष्ट्रांमध्ये आपले अंकीत शासन यावे म्हणून अमेरिका 'लोकशाहीकरण' ह्या गोंडस नावाखाली थेट लष्करी हस्तक्षेप करु लागली. ह्या कारवाया संयुक्त राष्ट्राला न विचारताच करण्यात आल्या. अमेरिका आपले परंपरागत मित्र राष्ट्रांच्या कारवायांकडे मात्र सोयीस्करपणे दुर्लक्ष करत होती. अमेरिकेचा दुटप्पीपणा आणि वाढते जागतिक, निरंकुश नियंत्रण जगातील राष्ट्रांना व काही गटांना सहन होत नव्हता. त्यामुळे अमेरिकेचे जगात शत्रू वाढू लागले.

साम्यवादोत्तर जगात होणारे बदल फार झपाट्याने झाले. परंतु सुरवातीच्या संक्रमण काळात प्रचंड अस्थिरता, संभ्रम आणि संघर्षाला तोंड द्यावे लागले. साम्यवादी देशांना आपल्या अर्थव्यवस्थेची पुनर्रचना करणे क्रमप्राप्त होते. नियंत्रित व्यवस्थेकडून नव्या खुल्या, बाजारपेठी अर्थव्यवस्थेकडे त्यांना जावे लागले. पूर्वीच्या सर्वच साम्यवादी राष्ट्रांनी खुल्या अर्थव्यवस्थेला स्विकारले. चीनसारखा देश ह्याला अपवाद होता, ज्याने आपली राजकीय व्यवस्था, विचारसरणी व साम्यवादाची भक्कम चौकट न मोडता बदलत्या जागतिक परिस्थितीनुरुप आपली अर्थव्यवस्था खुली केली. विकसनशील राष्ट्रांना सुध्दा ह्या काळात आपल्या धोरणांना बदलावे लागले. मुख्यतः अर्थव्यवस्था खुली करताना देशांतर्गत संरचनात्मक बदल करणे त्यांना भाग पडले. ह्या मागे सुध्दा अमेरिकेचा दबाव होता. अमेरिकेला ह्या राष्ट्रांच्या बाजारपेठेचे आपल्या उद्योगांच्या आणि व्यापाराच्या वाढीसाठी अत्यंत महत्त्व वाटत होते.

साम्यवादोत्तर जगात जुने काही संघर्ष, मुख्यतः रशिया व अमेरिका, हे कालबाह्य झाले तरी काही संघर्ष कायमच राहिले. उदा. अरब विरुध्द ज्यू, इराण विरुध्द इराक इत्यादी. शिवाय काही नव्या वादांची आणि संघर्षांची त्यामध्ये भर पडली. त्यात विशेष करुन धार्मिक मूलतत्ववाद आणि दहशतवाद ह्या समस्या प्रमुख आहेत. दहशतवादाचे विवेचन पुढील घटकात दिले आहे. धार्मिक मूलतत्ववाद ही समस्या पश्चिम आशिया, दक्षिण आशिया आणि युरोपात निर्माण झाली. पूर्वीच्या साम्यवादी राष्ट्रांमध्ये नव्या वंशवादाने तोंड वर काढले आणि ह्या देशांचे तुकडे होऊन तेथे वांशिक संघर्ष सुरु झाले. धार्मिक मूलतत्ववाद आणि त्यातून उद्भवलेल्या दहशतवादाची

सर्वात भयंकर प्रचिती ११ सप्टेंबर, २००१ ला झालेल्या महासत्ता अमेरिकेतील वर्ल्ड ट्रेड सेंटर वर झालेल्या हल्ल्याने आली. त्यातून ह्या प्रश्नाकडे अमेरिका व जागतिक समुदाय गांभिर्याने पाहू लागलें असे असले तरी नव्या दहशतवादी संघटना - तालीबान, १ऽ१ऽ, हिजबुल मुजाहिदिन, अल-कायदा वगैरे तयार झाल्या आणि जगात अतिरेकी कारवाया, हल्ले, लढाया सुरु झाल्या. प्रमुख दहशतवादी संघटनांचा मुख्य रोष अमेरिकेवर असून अमेरिकेच्या जागतिक दादागिरीमुळे तो ह्या संघटनांचा शत्रू नं. १ झाला आहे. भारतालासुध्दा ह्या धार्मिक कट्टरवादाची झळ पोचली आहे.

अशारितीने साम्यवादोत्तर जगाची एकूण स्थिती आहे. ह्या पार्श्वभूमीवर ह्या जगाची अन्य वैशिष्ठ्ये पुढीलप्रमाणे अभ्यासता येतील.

## ६.२.२ नवीन जागतिक व्यवस्था :

१९९२ मध्ये डॉ. जॉन कोलमन ह्या इतिहासकाराने 'कॉस्पिरसी थिअरी' नावाचे पुस्तक लिहून ह्या नवीन जागतिक व्यवस्थेचे चित्र रंगवले. त्यामध्ये आजपर्यंतच्या जगाच्या इतिहासाचा अभ्यास करुन भविष्यात जगावर राज्य करण्याचे कसे प्रयत्न होत आहेत याचे विवेचन केले आहे. 'कमिटी ऑफ ३००' म्हणजे जगातील जुनी राजघराणी, मोठे उद्योगसमूह, जागतिक संघटना, नामांकित संशोधन संस्था, मोठ्या प्रकाशन संस्था, काही प्रतिथयश संशोधक आणि विचारवंत, बँका, वित्तीय संस्था, समाजसेवी संस्था, विविध क्षेत्रातील तज्ञ, चर्च आणि धर्मगुरु इत्यादींनी बनलेला एक गट. हा गट जगामध्ये एकसंघ शासनव्यवस्था आणण्याचा प्रयत्न करतो. असा कोलमन ह्यांच्या सिध्दांताचा मतितार्थ आहे. हा गट श्रेष्ठीजनांचा गट असून बुध्दी, शारीरिक क्षमता, वंश ह्या आधारावर तो एक वरिष्ठ-श्रेष्ठ असा मानवी समूह म्हणून जगाला आपल्या क्षमतांच्या बळावर नियंत्रित करण्याचा प्रयत्न करीत आहे. ह्या गटाला 'इल्युमिनाटी' (Illuminati) असेही नाव दिले आहे. कोलमन गेल्या शतकातील घडामोडीचा आढावा घेऊन भविष्यात जगावर अधिपत्य गाजवण्याचा कसा प्रयत्न होणार आहे ह्याचे विश्लेषण करतात. त्यांच्यामते पुढील उद्दिष्टे ह्या श्रेष्ठीजन गटाने निर्धारित केली आहेत.

(१) जागतिक एकात्म अर्थव्यवस्था निर्माण करणे.
(२) राष्ट्रीयत्वाच्या खुणा आणि राष्ट्रीय स्वाभिमानाची चिन्हे नष्ट करणे.
(३) चर्च नियंत्रणाखाली आणून त्याचा प्रभाव नष्ट करणे.
(४) व्यक्तीच्या मनावर आणि विचारक्षमतेवर नियंत्रण प्रस्थापित करुन त्यांना यंत्रवत करणे.

(५) उद्योगप्रधान व्यवस्था नष्ट करुन 'शून्य विकास प्रधान' समाज निर्माण करणे. ह्यातून फक्त संगणकीय आणि सेवाक्षेत्र वगळण्यात येतील.

(६) उद्योगांच्या नष्ट होण्याने तयार होणारे बेरोजगार हे मादक द्रव्यांचे आहारी जातील आणि नष्ट होतील.

(७) मादक पदार्थ आणि नग्नचित्रे कायदेशीर करणे.

(८) मोठ्या शहरांतून लोकसंख्या कमी करणे / हटवणे.

(९) काही अत्यावश्यक वैज्ञानिक संशोधना व्यतिरिक्त अन्य सर्व संशोधन बंद करणे.

(१०) तिसऱ्या जगातील सुमारे तीन लाख लोक हे 'निरुपयोगी व भार' असून त्यांना उपासमार, साथीचे आजार किंवा छोट्या युध्दांद्वारे मारुन टाकणे.

(११) कामागारवर्गाचे मनोबल खच्ची करणे आणि अन्य जनतेचे नैतिक खच्चीकरण करणे. त्याद्वारे त्यांना व्यसनधीन करणे.

(१२) छोट्या-छोट्या संघर्षातून जनतेमध्ये अनेक समस्या व संभ्रम निर्माण करणे. त्यातून त्यांची व्यसनाधीनता आणि व्यवस्थेबद्दल उदासिनता वाढवणे.

(१३) रॉक संगीत, विविध मनोरंजनात्मक संघटनाद्वारे जनतेला गुंतवून ठेवणे.

(१४) ख्रिश्चन धर्माच्या कट्टरपंथाला प्रोत्साहन देणे व त्यासाठी भरपूर पैसा पुरवणे. तसेच अन्य धर्मातील कट्टर विचारांना प्रोत्साहित करणे.

(१५) जागतिक अर्थव्यवस्था दुबळी करणे आणि राजकीय अस्थिरता व अराजकता वाढवणे.

(१६) देशांच्या सार्वभौमत्वाला आणि एकात्मतेला पोखरुन नष्ट करणे.

(१७) जगभर दहशतवादी कृत्यांना प्रोत्साहन देणे.

वरील उद्दिष्टे ही विघातक असली तरी जागतिक शासन व्यवस्था प्रस्थापित करण्यासाठी संयुक्त राष्ट्रे व अन्य सर्व जागतिक संस्थांना सहकार्य करण्याचे आवाहन ह्यामध्ये केले आहे. परंतु एकूण हा सिध्दांत एक प्रकारचा 'कट' असून त्याचा आधार भयगंड, संभ्रम, द्वेष, संघर्ष इत्यादी आहे. ही सर्व कृत्ये जाणीवपूर्वक प्रचारातून नियंत्रित केली जातात. जगामध्ये घडलेल्या अनेक कृत्यांतून, संघर्षातून, गुप्तहेर संघटना व संशोधन संस्थांच्या कार्यातून भविष्यातील तथाकथित कटाच्या ह्या सिध्दांताची मांडणी करण्यात आली आहे. परंतु अत्यंत अतर्क्य, भडक, अतिरंजित, विघातक असा हा सिध्दांत वाटतो. संयुक्त राष्ट्र संघाला अधिक सशक्त करुन सामोपचाराने, समन्वयाने जागतिक शासन निर्माण होऊ शकते. पण त्याकरता उपरोक्त अघोरी मार्गांपेक्षा अधिक सकारात्मक, विधायक मार्ग स्विकारावा लागेल.

वरील वर्णनातून एक भडक आणि अतिरंजित असे नव्या जगाचे चित्र रंगवले असून त्याला जागतिक स्तरावर फारच अल्प समर्थन प्राप्त आहे. हयाला पर्यायी असे सर्व समावेशक, उदारमतवादी, आणि सर्वसाधारणपणे स्वीकार्ह असे नव्या जागतिक व्यवस्थेचे चित्त काही राजकीय नेत्यांनी व विचार वंतांनी उभे केले आहे. पहिल्या महायुध्दानंतर अमेरिकन अध्यक्ष बुड्रो विल्सन हयांनी सर्वप्रथम 'नवी जागतिक व्यवस्था' हा शब्दप्रयोग केला, आणि राष्ट्रसंघाचा जन्म झाला. परंतु खऱ्या अर्थाने जागतिक राजकारणाला कलाटणी देणारा आणि नव्या जागतिक व्यवस्थेला प्रोत्साहन देणारा विचार हा सोवियत संघाच्या विघटना नंतर व साम्यवादाच्या ऱ्हासानंतर उदयाला आला. शीतशुध्दाच्या समाप्तीनंतरचे जग कसे असेल किंवा असावे हयाचा विचार प्रकर्षाने त्याकाळात समोर आला.

भारताचे तत्कालीन पंतप्रधान राजीव गांधी यांनी १८८८ मध्ये भारत-रशिया कराराचा संदर्भ देऊन नवी जागतिक व्यवस्था ही अहिंसेवर आणि शांततामय सहअस्तित्व हया तत्वांवर आधारीत असावी असे मन जागतिक व्यवस्थेचे एक विस्तृत चित्त संयुक्त राष्ट्रांच्या आमसभेसमोर उभे केले. त्यांच्या दृष्टीने नव्या जागतिक व्यवस्थेत संयुक्त राष्ट्राला महत्वाची आणि मध्यवर्ती भूमिका वढवावी लागेल. नव्या व्यवस्थेत पृथक आर्थिक गट नसावेत आणि वैचारिक मतभेद नष्ट व्हावेत असे त्यांचे मन होते. पर्यायाने गोर्बाचेव्ह यांनी जागतिक स्तरावर एकात्मिक अर्थव्यवस्था आणि वैचारिक एकसंघता प्रतिप्तिदन केली. हया नव्या जागतिक व्यवस्थेमध्ये रशियाकरीता विविध जागतिक संघटनांमध्ये सक्रिय भूमिका त्यांनी अपेक्षिली होती. त्याशिवाय विकसनशील रांष्ट्रांमधील वाढीव सहकार्य, पर्यावरण संस्था, जागतिक कर्जबाजारीपणातून मुक्ती, अण्वस्त्रींवर बंदी अशी उद्दिष्टये सुध्दा त्यांनी अपेक्षिली होती.

गोर्बाचेव्ह ह्यांच्या अपेक्षांना प्रत्युत्तर म्हणून अमेरिकेने जॉर्ज बुरा ह्यांनीसुध्दा नव्या जागतिक व्यवस्थेबद्दल आपले विचार १९८९ मध्ये मांडले. त्यांच्या दृष्टीने साहजिकच नाटो संघटनेला बदलत्या विश्व रचनेत महत्वाची भूमिका त्यांनी वर्तवली. परंतु रशियाला जागतिक आर्थिक संघटनांमध्ये सामिल करुन घेण्याची उदारता सुध्दा, त्यांनी दाखवली. त्याचबरोबर क्षेत्रिय संघर्षाचे निवारण, शस्त्र नियंत्रण, पूर्वेकडील व पश्चिमात्य देशांमधील व्यापारांवरील निर्बंध उठवणे, अतर्ण पर्यावरणाचे संरक्षण अशी उद्दिष्ट्ये सांगण्यासही बुश विसरले नाहीत, परंतु अमेरिकन सैन्यासाठी काही जागतिक समस्यांमध्ये सक्रीय सहभाग कायम ठेवण्यास बुश अनुकुलच होते. उदाहरणार्थ, काही विश्लेषकांच्या मते बुश सद्दाम हुसेन विरुध्द अमेरिका व रशिया अशी संयुक्त आघाडी उघडण्यासाठी अनुकुल होते. परंतु हया सर्व विचारांच्या आदर्शवादामध्ये नव्या जागतिक व्यवस्थेत अमेरिकेची मध्यवर्ती भूमिका ठेवूनच जगाचे नेतृत्व करण्याची दर्पोक्ती दडलली होती हे सुध्दा तितकेच खरं. अगदी अलीकडे

बराक ओबामा अमेरिकेचे अध्यक्ष निवडून आल्यावर २००९ मध्ये माजी अमेरिकी परराष्ट्र मंत्री व विख्यात मुत्सद्दी हेन्सी किसींजर त्यांना जाहिर सलाल देताना म्हणाले की, 'अमेरिकेच्या परराष्ट्र धोरणाला आता नवी दिशा देण्याची वेळ आली आहे. तरी जागतिक व्यवस्था निर्माण करण्याची ही संधी आहे ज्यामध्ये अमेरिका एकमात्र महत्वाचा भाग आहे.' ब्रिटीश पंतप्रधान होती ब्लेअर यांनी मात्र बरीच समजूतदार आणि वास्तववादी भूमिका घेतली. त्यांच्या मते नव्या जागतिक व्यवस्थेचे आगमन हे अपरिहार्य असून त्याची वाटचाल व्यापक जागतिक सहमती आणि जागतिक सहभागाशिवाय होऊ शकणार नाही.

वास्तवात मात्र नव्या जागतिक व्यवस्थेचे विचार स्वप्नाळू आदर्शवाद याच रुपात केवळ विचारच राहिले. त्या प्रत्यक्षात आणण्याचे गंभीर प्रयत्न झालेच नाहीत. प्रसिध्द अमेरिकी विचारवंत सॅम्युएल हंटिग्टन यांनी हया कल्पनेवर टिकाच केली. त्यांच्या नुसार शीतयुध्दाच्या समाप्तीनंतर निर्माण झालेले ते एक मृगजल आहे. जगात बदल झाला, पण प्रगती नाही. जगातील मित्र व शत्रूंची समीकरणे बदलली, नवे संघर्ष उत्पन्न झाले; नवे-सान्यवादी, नवे-फासीवादी, धार्मिक मूलतत्ववादी इ. उदयाला आले; 'नरसंहार' व 'वांशिक सफाई' असे नवे प्रकार निर्माण झाले; आणि सर्वात गंभीर म्हणजे जगाचे 'आम्ही व ते' असे किंवा 'आम्ही सभ्य आणि ते रानटी' असे स्पष्ट दोन गट पडावे. हया सर्व वैचारिक पाश्र्वभूमीवव भारतीय जीवनदृष्टी नवी जागतिक व्यवस्था निर्माण करण्यास अधिक सहायकारी ठरु शकते. 'वसुधैव कुटुंबकम्' हे प्राचीन भारतीय ब्रीद आहे. त्यात अहिंसा, अनाक्रमण, शांततामय सहअस्तीत्व, परस्परावलंबित्व, समानता व समादर आणि चिरंतन विकास हया मूल्यांच्या आधारे एका सर्वसमावेशक, व्यापक, सर्वमान्य, व न्यायपूर्ण नव्या जागतिक व्यवस्थेची निर्मिती होऊ शकते.

शीतयुध्दाच्या समाप्तीनंतर जागतिक शासनाच्या निर्मितीचे विचार अनेकांनी मांडले. परंतु ते त्यांच्या–त्यांच्या भोवतालच्या घटनांनी प्रेरित झाले आहेत. नवीन जागतिक अर्थव्यवस्थेबद्दलचे विवेचन आपण पहिल्या घटकात वाचले आहे. परंतु राजकीय स्वरुपात ते काहीसे कठीण आहे. भौगोलिक सीमारेषा पुसणे, मनांतील भेदाभेद नष्ट होणे आणि जागतिक सहकार्य वाढणे ह्यावर जागतिक शासन आणि नवी जागतिक व्यवस्था अवलंबून आहे, हेही तितकेच सत्य आहे.

## ६.२.३ प्रादेशिकतावाद आणि प्रादेशिक एकात्मिकरण :

शीतयुध्दोत्तर जागतिक राजकारणात नव्याने पुढे आलेली संकल्पना म्हणजे प्रादेशिकतावाद होय. ह्याला काही विचारवंत प्रादेशिक एकात्मिकरण असेही संबोधतात. दुसऱ्या महायुध्दापूर्वी पॅरिसचा तह, व्हर्सायचा तह, युरोपीय कॉन्सर्ट ह्याद्वारे प्रादेशिक एकीकरणाचे प्रयत्न झाले. ते युरोपच्या संरक्षणापुरते मर्यादित होते. दुसऱ्या महायुध्दानंतर नाटो, वॉर्सा करार व अन्य गट अस्तित्वात आले. पण त्यांचा उद्देश राजनैतिक आणि संरक्षणात्मक होता. जोसेफ न्ये ह्या अमेरिकन राज्यशास्त्रज्ञाने प्रादेशिकतावादाची प्रथम विस्तृत व्याख्या केली. त्याच्यानुसार 'एखाद्या प्रदेशांतर्गत देशांनी काही समान उद्दिष्टांसाठी परस्पर संबंधांद्वारे निर्माण केलेली संघटना' म्हणजे प्रादेशिकतावाद होय. प्रदेशामध्ये असलेली भौगोलिक समिपता, परस्परावलंबित्व आणि समान उद्दिष्टे प्रादेशिकतावादात महत्त्वाची असतात. हा सिध्दांत १९८० नंतर अधिक विकसित झाला आणि अनेक विचारवंतांनी त्यावर मते मांडली. प्रादेशिकतावादाची काही प्रमुख पूर्वापेक्षित घटक असे आहेत :

(अ) भौगोलिक समिपता,
(ब) देशांचे क्षेत्रफळ,
(क) देशांमधील व्यवहारांमधील सातत्य,
(ड) देशांतील श्रेष्ठीजनांमधील संबंध,
(ई) परस्परावलंबित्व आणि त्याचे आकलन,
(फ) सामाजिक वैशिष्ठ्ये,
(ग) तत्कालीन जागतिक परिस्थिती,
(ख) देशांमधील राजकीय व्यवस्था आणि निर्णय प्रक्रियेची पध्दत.

दुसऱ्या महायुध्दानंतर द्विधृवीय जागतिक व्यवस्थेमुळे सामूहिक सुरक्षिततेच्या तत्वाला महत्त्व प्राप्त झाले. त्याचा आपण चौथ्या घटकात अभ्यास केला आहे. नाटो, वॉर्सा करार, सिटो, सेंटो असे गट त्याकाळात अस्तित्वात आले, ज्यांचा उद्देश परस्परांचे लष्करी संरक्षण करणे हा होता. वर दिलेल्या घटकांच्या आधारे खऱ्या अर्थाने प्रादेशिकता वादाचा प्रयोग युरोपमध्ये झाला. १९५२ मध्ये युरोपीयन कोल अँड स्टील कम्युनिटी अशी संघटना निर्माण झाली. १९५७ मध्ये त्या संघटनेत आणखी युरोपीय देश सामिल झाले आणि त्याचे नाव युरोपीय आर्थिक संघ असे झाले. कस्टम्स युनीयन, युरोपीय ॲटॉमिक एनर्जी संघ असे त्याचे उपघटक होते. पुढे त्यात अधिक देश समाविष्ठ झाले आणि १९६७ मध्ये त्याला युरोपीयन कम्युनिटी

संबोधण्यात आले. १९७९ पर्यंत त्याचा आणखी विस्तार झाला आणि निवडणुकीद्वारे युरोपीय संसद स्थापन झाली. १९९३ मध्ये मास्ट्रीच कराराद्वारे 'युरोपीय संघ' अस्तित्वात आला जे आज त्याचे स्वरुप आहे. आज ह्या संघात युरोपातील एकूण २८ देश आहेत ज्यात पूर्वीचे साम्यवादी देशही आहेत. ह्या संघाने आज भरीव प्रगती केली असून युरोपीय संसदेद्वारे समान राजकीय निर्णय घेतले जातात. युरोपीय संघाचे आर्थिक व्यवहार 'युरो' ह्या समान चलनाद्वारे चालतात आणि त्याद्वारे युरोपीय देशांची अर्थव्यवस्था बाजारपेठीय तत्वावर एकात्मपध्दतीने चालते. अशारितीने युरोपीय संघ राजकीय, लष्करी, आर्थिक, व्यापार, उद्योग ह्या सर्वच बाबतीत भरीव सहकार्य करीत आहेत. युरोपीय देशांमधील सीमारेषा मुक्त असून दळणवळण, व्यापार, वाहतूक सर्व बंधनमुक्त आहे. जागतिक राजकारणातही हा संघ महत्त्वाची भूमिका बजावत आहे. त्याच्या सर्वकष कामगिरीमुळे २०१२ मध्ये युरोपीय संघाला शांततेचा नोबेल पुरस्कार देण्यात आला.

युरोपीय संघाची निर्मिती आणि पुढची प्रगती ही वर उल्लेखलेल्या सामाजिक घटकांमुळे शक्य झाली. भौगोलिक समिपता, समान अर्थव्यवस्था, समान राजकीय शैली व विचार ह्या घटकांमुळे युरोपमध्ये प्रादेशिक एकात्मिकरण यशस्वी झाले.

जगामध्ये ह्या व्यतिरिक्त अन्य प्रादेशिक संघटना अस्तित्वात आल्या आहेत. अरब लीग, आफ्रिकन युनियन, कॅरिबियन कम्युनिटी, दक्षिण-पूर्व आशियाची संघटना (ASEAN), दक्षिण आशियायी संघटना (SAARC), कॉमनवेलथ ऑफ इंडिपेडेंट स्टेटस् (CIS) इत्यादी ह्या सर्व संघटना प्रादेशिकवादाच्या तत्त्वावर निर्माण झाल्या आहेत. शीतयुध्दोत्तर जगाचे हे नवे वैशिष्ठ्य आहे.

शीतयुध्दकाळात परस्पर संरक्षण आणि लष्करी सहकार्य ही संघटनांची प्रमुख उद्दिष्टे होती. आज ते उद्दिष्ट मागे पडून व्यापार, आर्थिक संबंध आणि तांत्रिक - शैक्षणिक सहकार्य ही प्रमुख उद्दिष्टे आहेत. ह्या प्रादेशिक संघटना संयुक्त राष्ट्राला सहकार्य करण्याचे उद्दिष्ट समोर ठेवतात आणि जागतिक समस्यांवरही ठोस भूमिका घेतात. प्रादेशिक सहकार्याने सुरुवात करुन हळूहळू प्रादेशिक एकात्मिकरण साध्य करण्याच्या मार्गाने ह्या प्रादेशिक संघटना वाटचाल करत आहेत.

## ६.२.४ जागतिकीकरण :

शीतयुध्दोत्तर जागतिक राजकारणात साम्यवादी विचार आणि त्यावर आधारित शासन व्यवस्था कोलमडून पडल्या. द्विधृवीय जागतिक व्यवस्था संपून अमेरिका प्रणित एकधृवीय जागतिक व्यवस्था निर्माण झाली. त्याचबरोबर ही व्यवस्था स्तरीय सुध्दा होती म्हणजे मूठभर श्रीमंत, प्रगत राष्ट्रे ही वरच्या स्तरावर, विकसनशील, कमी उत्पन्न असलेली राष्ट्रे मधल्या स्तरावर आणि गरीब अविकसित राष्ट्रे ही खालच्या तिसऱ्या स्तरावर अशी पूर्वीचीच रचना सुरु राहिली. परंतु शीतयुध्दोत्तर जगाचे एक महत्त्वाचे वैशिष्ठ म्हणजे जागतिकीकरण. ह्या काळात अमेरिकेचे निर्विवाद नियंत्रण असल्यामुळे भांडवलशाही आर्थिक व्यवस्थेचा प्रसार जगभर झाला.

जागतिकीकरणामध्ये प्रत्येक देश एक आर्थिक घटक म्हणुन गणला जातो आणि सगळ्या जगाचे परिवर्तन एका बाजारपेठेत होते. ह्या प्रक्रियेला विश्व व्यापार संघटनेच्या १९९५ मधील स्थापनेमुळे गती प्राप्त झाली. सर्व जगाचा आर्थिक विकास आणि समृध्दी हे प्रमुख उद्दिष्ट बनले. आर्थिक विकासात त्यामुळे जागतिक व्यापार मुक्तपणे करुन त्यात वाढ करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. बहुराष्ट्रीय कंपन्या विकसनशील राष्ट्रात उद्योग सुरु करताहेत. त्याकरता प्रचंड भांडवल गुंतवून तेथील स्वस्त कामगारवर्ग, नैसर्गिक साधनसंपत्ती आणि संरचना वापरल्या जात. विकसनशील राष्ट्रांवर त्यांचे आर्थिक धोरण, औद्योगिक धोरण व कृषीविषयक धोरण बदलण्यासाठी दबाव आणला जातो. व्यापारावरील निर्बंध कमी करुन सबसिडीसुध्दा कमी करण्याचा आग्रह केला जातो. सेवा क्षेत्रांमध्ये प्रचंड वाढ होऊन विदेशी कंपन्या किंवा गुंतवणूकीला प्रोत्साहन दिले जाते. त्याचबरोबर संरचनात्मक बदल करण्यास भाग पाडले जाते. राजकीय निर्णय प्रक्रियेमध्ये सुध्दा त्यामुळे हस्तक्षेप होतो आणि शिक्षण, संस्कृती, स्वास्थ इत्यादी क्षेत्रातही धोरणात्मक बदल होण्यास सुरुवात होते. ह्या धोरणात्मक बदलातून विकसनशील राष्ट्रात एक अशी संस्कृती रुजवली जाते, ज्याद्वारे व्यक्तीची उपभोग वृत्ती वाढते आणि वाढत्या क्रयशक्तीमुळे विविध उपभोगाच्या किंवा चैनीच्या वस्तूंवर खर्च करण्याची वृत्ती वाढते. ह्या वृत्ती जोपासण्यासाठी बाजारपेठेत त्याप्रमाणे उपलब्धता असते. ह्यामुळे चंगळवादी वृत्ती वाढून बचत करण्याऐवजी खर्च करण्याकडे व्यक्तीचा कल वाढतो. अशारितीने जागतिकीकरणात अधिकाधिक क्रयशक्तीवर भर दिला जातो.

जागतिकीकरणाच्या ह्या व्यवस्थेवर सर्वांगाने टिका होत आहे. १९ व्या शतकातील साम्राज्यवाद नष्ट झाला तरी २१ व्या शतकात हा मागील दाराने आलेला

'नवा साम्राज्यवाद' आहे असे म्हटले जाते. त्याचे शक्तीस्थान आर्थिक असून तो विकसनशील देशांना आर्थिक गुलाम बनवत आहे. पाश्चात्य संस्कृतीचे आक्रमण अन्य देशांवर होत असून संगीत, कला, नृत्य, चित्रपट, खाद्यसंस्कृती, भाषा ह्या सर्वच क्षेत्रात आक्रमण होत आहे. त्याचा भयानक परिणाम म्हणजे परंपरागत संस्कृती आणि मूल्यव्यवस्था ढासळत आहे. आत्यंतिक व्यक्ती स्वातंत्र्याच्या नावाखाली स्वैराचार व व्यक्तीचार बळावत आहे. जागतिक राजकारणात भक्कम कर्ज देऊन देशांना जागतिक प्रश्नांवर बळजबरीने मत द्यायला लावले जात आहे. जागतिकीकरणामुळे आर्थिक संपन्नता येईल असा भ्रामक आशावाद दाखवला गेला. परंतु वास्तविक श्रीमंत व गरिब देशातील दरी वाढतच आहे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेवर आज टिका होत असली तरी एक अपरिहार्यता म्हणून आजच्या जागतिक व्यवस्थेत त्याचा स्विकार करणे क्रमप्राप्त आहे.

## ६.२.५ जागतिक राजकारण आणि तांत्रिक प्रगती :

२०वे शतक हे विज्ञान - तंत्रज्ञानाचे युग आहे. २०व्या शतकाच्या शेवटी संगणक व इलेक्ट्रानिक क्षेत्रात प्रचंड प्रगती झाली. ह्या प्रगतीमुळे संपूर्ण मानवीजीवन व्यापून टाकले आहे. जागतिक राजकारणसुध्दा त्यापासून अलिप्त राहू शकले नाही.

वास्तविक औद्योगिक क्रांतीनंतरच जागतिक राजकारणावर त्याचा परिणाम दिसू लागला. मुख्यतः लढाईसाठी लागणारी विविध हत्यारे निर्माण होऊ लागली आणि त्याचा व्यापार हा देशांतील विषय बनला. दुसऱ्या महायुध्दात वापरण्यात आलेल्या अणुबाँबमुळे सर्व जगावर परिणाम झाला. त्याच्या व्यापक संहारक शक्तीमुळे जागतिक राजकारणाचा तो विषय होणे अपरिहार्य होते. शीतयुध्द काळातील जागतिक राजकारण हे शस्त्रस्पर्धा आणि वैज्ञानिक संशोधन ह्या भोवती केंद्रित होते. अधिक घातक शस्त्र तयार करणे, लष्करी शक्ती अत्याधुनिक उपकरणांनी वाढवणे आणि त्याद्वारे जागतिक राजकारणावर प्रभाव टाकणे असे शीतयुध्द काळातील जागतिक राजकारणाचे स्वरुप होते. लष्करी तंत्रज्ञान ही एक प्रगत आणि स्वतंत्र शाखा बनली. पाश्चात्य देशांमध्ये शस्त्रास्त्रांच्या उत्पादनामध्ये मोठे उद्योगसमूह निर्माण झाले. हे उद्योगसमूह त्या देशांतर्गत राजकारणावर प्रभाव टाकीत आणि त्यातून आपल्या अनुकूल धोरणे तेथील सरकारला करण्यास भाग पाडत. ह्या माध्यमातून जगातील अन्य देशांना शस्त्र विकण्याचा व्यवहार ते सुकर बनवीत. शस्त्रांची बाजारपेठ हे फार व्यापक आणि शक्तीशाली असा जागतिक राजकारणाचा हिस्सा बनले. ह्या शस्त्रांच्या विक्रीसाठी जगातील छोटे, स्थानिक संघर्ष सतत धगधगत ठेवणे हे महासत्तांच्या राजकारणाचे वैशिष्ठ बनले.

अण्वस्त्रांच्या विकासामुळे आणि प्रचंड संहारक शक्तीमुळे त्याचा गैरवापर होऊ नये ह्याकडे जगाने लक्ष देणे क्रमप्राप्त बनले. संयुक्त राष्ट्रसंघाने ह्याबाबत अनेक उपाय योजले. आंतरराष्ट्रीय अणुऊर्जा आयोग नेमून त्याद्वारे अण्वस्त्रसंपन्न राष्ट्रे आणि संभाव्य अण्वस्त्र राष्ट्रे ह्यांच्यावर नियंत्रण ठेवण्याचे प्रयत्न सुरु झाले. दिवसेंदिवस हा प्रश्न जटिल होत गेला. इराण, पाकिस्तान, दक्षिण कोरिया ह्या देशांनी चोरुन अणुतंत्रज्ञान मिळवून अण्वस्त्र बनवण्याची प्रक्रिया सुरु केली. त्यांचा कार्यक्रम उघडा पाडणे आणि त्यावर नियंत्रण ठेवणे हे एक आव्हान बनले. गुप्तपणे केलेल्या अणुस्फोटांविरुध्द अमेरिकेच्या दबावामुळे अणुऊर्जा आयोगाने अथक प्रयत्न केले आणि शेवटी थेट लष्करी हस्तक्षेप करण्यापर्यंत वेळ आली. ह्याशिवाय ह्या लष्करी साहित्याचा आणि तंत्रज्ञानाचा होणारा चोरटा व्यापार ही नवीनच जागतिक डोकेदुखी झाली आहे. बेजबाबदार देश आणि अतिरेकी संघटना ह्यांच्या ताब्यात ही शस्त्रे येत आहेत हा अधिकच चिंतेचा विषय आहे. जागतिक समुदायाला अण्वस्त्र प्रसार बंदी करार असे उपाय करणे भाग पडले आणि शस्त्र नियंत्रण हा एक कायमस्वरुपी जागतिक कार्यक्रम बनला. त्याचे विवेचन अन्य घटकात आले आहे. आज जगात काही देशांकडे अणुप्रक्रियेसाठी लागणारे युरेनियम व अन्य खनिजे भरपूर आहेत. हे देश त्याआधारे शस्त्र बनवत नसले तरी खनिजांच्या आधारे जागतिक व्यापारावर प्रभाव टाकत असतात. ही खनिजे अण्वस्त्रांशिवाय अन्य विधायक कामासाठी व संशोधनासाठी उपयोगी आहेत, त्यामुळे त्याचा व्यापार हा जागतिक राजकारणाचा महत्त्वाचा भाग आहे. ह्या व्यापारावर जागतिक संघटनांचे कडक नियंत्रण आहे. १९९८ मध्ये भारताने अणुस्फोट केल्यावर भारतावर ह्या संघटनांनी निर्बंध घातले आणि ह्या देशांनी भारताला अणुइंधन पुरवणे थांबवले. यावरुन अणुविज्ञानाचे महत्त्व आणि त्याभोवती गुंफलेल्या जागतिक राजकारणाची व्यापकता लक्षात येते.

२०वे शतक हे तंत्रज्ञानाचे होते तर २१वे शतक हे संगणक, इलेक्ट्रॉनिक आणि माहिती तंत्रज्ञानाचे आहे. जागतिक राजकारण ह्या प्रगतीमुळे प्रभावित झाले आहे. त्यामुळे आंतरराष्ट्रीय संबंधामध्ये तंत्रज्ञानाच्या शाखेला 'टेक्नोपॉलिटीक्स' (Techno politics) असे संबोधले जाते. जागतिकीकरणाची लाट अधिक गतिमान होण्यास माहिती तंत्रज्ञानाने हातभार लावला आहे. ह्या तंत्रज्ञानाचे प्रमुख वैशिष्ठ्य म्हणजे ज्ञानाचा स्फोट. शास्त्रज्ञांबरोबरच, राजकारणी, नोकरशहा, शिक्षक प्राध्यापक, राजनयज्ञ, धोरणात्मक निर्णय घेणारे आणि सामान्य जनता सुध्दा अद्ययावत ज्ञान प्राप्त करु शकतात; किंबहुना त्यांना ते आवश्यकच आहे.

आंतरराष्ट्रीय राजकारणात माहिती तंत्रज्ञानाचा कसा प्रभाव आहे हे पुढील उदाहरणांवरुन लक्षात येईल :

१) देशांनी अवकाशात सोडलेले उपग्रह विविध कामासाठी अन्य देशांना भाड्याने वापरु दिले जातात.

उदा. : जीपीएसद्वारे एखाद्या व्यक्तीची, वाहनाची, सैन्याच्या हालचालीची, शास्त्रीय उपकरणाच्या वाहतूकीची माहिती पुरवली जाते. अण्वस्त्रांच्या चोरट्या व्यापाराची किंवा गुन्हेगारांच्या कारवायाची माहिती यातून मिळू शकते. अमेरिकेने पाकिस्तानात लपलेला ओसामा-बिन-लादेन ला असेच हुडकून काढले आणि ह्याच तंत्रज्ञानाचा वापर करुन अत्यंत गुप्तपणे पाकिस्तानच्या सीमेत घुसून त्याला ठारही मारले.

२) उपग्रह तंत्रज्ञानाद्वारे पर्यावरणविषयक माहिती अचूक व आगाऊ मिळण्यास उपयोग होतो. पर्जन्यवृष्टी, वादळ, भूकंप, हिमपात, पूर इत्यादी नैसर्गिक बदलांची पूर्वसूचना मिळू शकते. प्रगत देशांनी काही उपग्रह केवळ ह्याच कारणासाठी अवकाशात सोडले आहेत. ह्या क्षेत्रात जागतिक सहकार्य वाढवण्यासाठी जागतिक हवामानशास्त्र संघ (World Meteorological Organization) प्रयत्नशील आहे.

३) दळणवळणाच्या क्षेत्रात आज फार मोठी क्रांती झाली आहे. दूरध्वनी, चित्रवाणी ह्याद्वारे जगभर क्षणार्धात संपक साधला जाऊ शकतो. पूर्वी फक्त आवाज प्रसारित होत असे, पण आज रंगीत चित्रेसुध्दा क्षणार्धात जगाच्या कोणत्याही कोपऱ्यात पाठवली जाऊ शकतात.

४) दळणवळणाच्या आणि संदेशवहनाच्या ह्या क्रांतीमुळे राजकारणी, राजदूत, जागतिक नोकरशहा आणि आंतरराष्ट्रीय संघटनांचे नेते ह्यांचे काम सोपे झाले आहे. राजदूतांना कोणत्याही कठीण पेचप्रसंगात आयत्या देशातील राजकीय नेत्यांचा झटकन सल्ला घेता येतो. त्याचप्रमाणे राजदूतांना देशांशी व्यवहार करताना विविध क्षेत्रातील तांत्रिक ज्ञान प्राप्त करणे आज सहज शक्य झाले आहे.

५) भौगोलिक क्षेत्रात नवीन तंत्रत्रानामुळे फार उपयुक्त असे बदल झाले आहेत. उपग्रहद्वारे हजारो मैल अवकाशातून जमिनीच्या गर्भाचा ठाव घेणे शक्य झाले आहे. जमिनीच्या गर्भात असलेली खनिजे, तेल, गॅस इत्यादींचा शोध घेता येतो; तसे समुदाच्या खोल तळाशी असलेल्या जैविक सृष्टीचा तपास करता येतो.

६) आर्थिक क्षेत्रात, व्यापारात, बँकांच्या व्यवहारात फार फायदा झाला आहे. बँकाचे व्यवहार, पैशांची देवाण-घेवाण इत्यादी क्षणार्धात करणे शक्य झाले आहे.

७) अण्वस्त्रांच्या उत्पादनामुळे आणि त्यांच्या प्रचंड संहारक शक्तीमुळे मोठ्या स्वरुपाचे प्रत्यक्ष युध्द आता शक्य नाही. अणुतंत्रज्ञान एकप्रकारे रोधक

(Detessent) म्हणून जागतिक राजकारणात नवी शक्ती निर्माण झाली आहे. जागतिक देशांमध्ये द्वेष, तणाव, संशय, अविश्वास आहे; पण अण्वस्त्रांच्या भीतीमुळे देशांचे हात बांधले आहेत. अण्वस्त्रे एकप्रकारे केवळ 'दर्जादर्शक' ठरले असून जागतिक राजकारणात यथास्थिती राखण्यात त्याचा हातभार आहे.

८) तंत्रज्ञानाच्या वाढत्या प्रभावामुळे देशांना राजकीय व राजनैतिक लाभसुध्दा मिळवता येतो. १९७४ आणि १९९८ मध्ये भारताने अणुस्फोट केले. तसेच अवकाशात व मंगळावरही उपग्रह सोडले. ह्यामुळे भारताची जागतिक प्रतिमा उंचावली आहे. चीनसुध्दा गेल्या काही दशकात नेपाळ, भूतान सीमेलगत रस्ते, रेल्वे व धरणे बांधून आपला प्रभाव वाढवण्याचा प्रयत्न करत आहे.

९) तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे सर्व जगामध्ये प्रत्येक क्षेत्रात प्रमाणिकरण (Standardization) होत आहे. घरोघरी दैनंदिन वापराच्या वस्तू, इलेक्ट्रॉनिक उपकरणे, चैनीच्या वस्तू, मोठ्या उपभोगाच्या वस्तू, मापके व एकके ह्यामध्ये प्रमाणिकरण होत आहे. त्यामुळे एकच वस्तू जगभर कुठेही वापरता येऊ शकते, तसेच वस्तूंच्या दर्जाबद्दल सुध्दा समान मापके व मापदंड तयार झाले आहेत. उदाहरणार्थ : चार चाकी वाहनांच्याबद्दल कार्बन उत्सर्जनाचे जागतिक मापदंड किंवा फळ-भाज्यांवर निर्यात करताना फवारणाऱ्या औषधांच्या यात्रे बद्दलचे जागतिक नियम.

१०) तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे जग छोटे होऊन जवळ आल्यासारखे वाटते. ह्या तांत्रिककारणांनी जग गतिमान झाले आहे. ह्या बदलांमुळे मानवी जीवन समृध्द व **सुरवावह** झाले आहे. परंतु त्याची दुसरी बाजू तितकीच काळी आहे. या नवीन जागतिक व्यवस्थेत प्रचंड स्पर्धा वाढली आहे. नेमून दिलेले लक्ष्य साध्य करण्यासाठी माणसावर प्रचंड दबाव आहे. ह्यामुळे व्यक्तींचे मानसिक स्वास्थ बिघडले आहे. समाजात वावरताना करमणूक, विरंगुळा इत्यादी गोष्टी बाद झाल्या आहेत. कुटुंबव्यवस्था कोलमडलीय आणि व्यसनाधिनता वाढली आहे. त्यामुळे आंतरराष्ट्रीय जगतात वावरणारी आजची व आगामी पिढी शारीरिक व मानसिक दृष्ट्या किती सक्षम असेल हा एक गंभीर प्रश्न आहे.

## ६.२.६ पर्यावरणीय प्रभाव :

शीतयुध्दोत्तर जागतिक राजकारणात पर्यावरण हा एक महत्त्वाचा घटक बनला आहे. कधी नव्हे तितके पर्यावरणाचे महत्व आंतरराष्ट्रीय संबंधामध्ये वाढले आहे. दुसऱ्या महायुध्दानंतर आंतरराष्ट्रीय संबंधाची व्याप्ती प्रचंड वाढली आणि आर्थिक,

लष्करी, शैक्षणिक, सांस्कृतिक, तांत्रिक, सामाजिक अशा प्रत्येक क्षेत्रात जागतिक व्यवहार वाढले आहेत. त्यामध्ये पर्यावरणीय समस्यांची भर पडली आहे.

पर्यावरणीय समस्या निर्माण होण्याची काही पार्श्वभूमी आणि प्रमुख कारणे आहेत. ही कारणे गेल्या पाच-सहा दशकात मानवाने स्विकारलेल्या विकासाच्या प्रारुपातून निर्माण झाली आहेत. वैज्ञानिक व तांत्रिक प्रगतीतून मानवाने निसर्गावर नियंत्रण मिळवण्याचा व काही वेळा मात करण्याचा प्रयत्न केला. स्वतःच्या भौतिक प्रगतीसाठी, सुखासाठी व चैनीसाठी निसर्गाचे शोषण केले. प्रचंड प्रमाणात जंगल तोड, नद्यांवर मोठी धरणे बांधून पाणी अडवून त्याचा अनियंत्रित वापर, रासायनिक कारखान्यातून निर्माण होणारा रासायनिक घातक कचरा व विषारी वायू पाण्यात किंवा हवेत सोडून देणे; वाहने व अन्य उपकरणातून उत्सर्जित होणारे विषारी वायू; जैविक संकटाच्या प्रयोगातून तयार झालेली नवीन बीजे; रासायनिक खतांचा अनिर्बंध वापर इत्यादी अनेक गोष्टींमुळे पर्यावरणाच्या समस्या निर्माण झाल्या आहेत. त्यातील काही प्रमुख समस्या पुढीलप्रमाणे आहेत :

१) प्रदूषण : हे प्रदूषण वायू, पाणी आणि जमिन ह्या तीनही नैसर्गिक घटकात आढळते. वायू प्रदूषण कारखान्यातून व वाहनातून निघणाऱ्या विषारी वायूंमुळे होते. पाणी हे विषारी रसायनांमुळे आणि मानवाच्या सदोष कचरा व्यवस्थापनामुळे प्रदूषित होते. जमिनीचे प्रदूषण तिचा कस कमी करते ज्याचे मुख्य कारण कचरा आणि रासायनिक खतांचा वापर हे आहे.

२) ग्लोबल वॉर्मिंग : ह्यामध्ये दिवसेंदिवस पृथ्वीचे तापमान वाढत असल्याने समस्या निर्माण झाल्याचे लक्षात येत आहे. ग्रीनहाऊस वायूंमुळे हे होत आहे. ह्यामुळे दक्षिण व उत्तर धृवावरील बर्फ वितळत आहे. उंच पर्वनशीखरांवरील बर्फही वितळत आहे. त्यामुळे समुद्र पातळी वाढत आहे.

३) नैसर्गिक संपत्ती : पृथ्वीच्या पोटात अनेक खनिज पदार्थ आहेत, ज्याचा उपयोग मानवाला अनेक उद्योगांत होतो. उदा. कोळसा, लोखंड, तांबे, तेल व वायू इत्यादी ह्यांचा उपयोग मानवाने आपल्या भौतिक सुखासाठी केला. पण ह्या खनिजांचे साठे मर्यादीत स्वरुपाचे असल्याने भविष्यात त्यांचे साठे नष्ट होतील, तेव्हा काय करायचे हे मानवापुढे फार मोठे आव्हान

आहे. मानवाने भविष्याचा विचार न करता ह्या संपत्तीचा अनिर्बंध उपभोग घेतला आहे. उदा. : तेल व नैसर्गिक वायूचे साठे संपल्यावर वाहनांसाठी, इंधनांसाठी आणि उद्योगांसाठी पर्यायी इंधन काय हा गहन प्रश्न आहे.

४) जैवविविधता : (Biodiversity) पृथ्वीवर जी सजीव सृष्टी आहे, ती विविध प्रकारची आहे. समुद्रातील जलचर प्राणी, हवेतील पक्षी आणि पृथ्वीतलावरील प्राणी, वृक्ष आणि मानव ह्या सर्वांची मिळून एक जीवसृष्टी आहे. ह्या सर्व सजीवांचा परस्परांशी विशिष्ठ सहसंबंध आहे आणि त्याचे संतुलन वर्षानुवर्षे टिकून आहे. ह्या सर्व जीवसृष्टीत मानव हा एकमेव प्राणी आहे; जो विचार करतो आणि जीवसृष्टीतील अन्य घटकांचा वापर करतो. परंतु ह्या प्रक्रियेत मानवाने जीवसृष्टीच्या शृंखलेला आणि सहसंबंधांना धक्का पोचवला आहे. त्यामुळे अनेक सजीव लुप्त झाले आहे किंवा नष्ट होण्याच्या मार्गावर आहेत. ही जैवविविधता मानवाच्याच अस्तित्वासाठी आवश्यक आहे आणि ती टिकवणे हे फार मोठे आव्हान आहे.

५) जननशास्त्रीय संकर : (Genetic Engineering) विज्ञानाच्या प्रगतीमुळे मानवाने खाद्यान्नामध्ये प्रयोग केले. धान्याच्या दोन भिन्न जातींच्या संकरातून नवीन प्रजाती निर्माण केली. पण ह्या नव्या प्रजातींना अधिक पाणी, अधिक खते व अधिक औषधे लागतात, जी खर्चिक असतात. शिवाय त्यांच्या दीर्घकाळ वापराने जमिन व बियांणांवर दुष्परिणाम होतो. ह्या प्रजातींद्वारे काही गंभीर आजारही मानवामध्ये पसरतात. मानवाने अशारितीने संशोधना एकीकडे आपला फायदा करुन घेतला, तर त्याचबरोबर नवीन समस्या निर्माण केल्या.

६) कचरा व्यवस्थापन : मानवप्राणी (किंबहुना सर्व सजिवप्राणी) निसर्गाचा उपभोग घेताना अनेक प्रकारचा टाकाऊ कचरा निर्माण करतात. मानवाने हा कचरा नष्ट करण्याचा विचारच केला नाही. स्वतःचे मलमूत्र पासून कारखान्यातील कचरा ह्याबाबत निश्चित धोरण नाही. औद्योगिक देश कारखान्यातील कचरा निर्मितीत आघाडीवर आहेत. त्याशिवाय अणुचाचणीतून निर्माण होणारा कचरा हा सर्वात घातक आहे. मानवाने काही वस्तू किंवा रसायने निर्माण केली आहेत, ज्याचा घातक परिणाम आज जाणवू लागला आहे. उदा. प्लास्टिक.

७) वाढती लोकसंख्या : ही एक जागतिक समस्या असून इतर अनेक समस्यांना जन्म देणारी आहे. वाढत्या लोकसंख्येला अन्न, वस्त्र, निवारा, स्वास्थसेवा, शिक्षण इत्यादी सर्व पुरवावे लागते. त्याकरता पृथ्वीवरील साधनसंपत्तीवर भार पडतो आणि मग जंगलतोड, जमिनीतील पाणी वाटप अशा मार्गांचा अवलंब होतो. त्यातून अनेक समस्या निर्माण होतात.

आंतरराष्ट्रीय संबंधात वरील सर्व समस्यांचा विचार होऊ लागला आहे. कारण ह्या सर्व मानवनिर्मित समस्या असून वेळीच त्यावर उपाय योजले नाहीत तर मानवाच्या अस्तित्वालाच धोका निर्माण होईल.

संयुक्त राष्ट्रांसह अनेक संघटना, सेवा संघटना आणि गैरशासकीय संघटना विविध पर्यावरणीय समस्यांवर कार्य करत आहेत. संयुक्त राष्ट्रांद्वारे पर्यावरणासंबंधी अनेक करार किंवा नियम करण्यात आले आहेत. कारखान्यांतून निघणारा विषारी कचरा, समुद्रतळ व अवकाश ह्यांचा संशोधनासाठी वापर; अणुऊर्जेचा वापर, जंगलसंपत्तीचा वापर, पाण्याचा वापर इत्यादीबद्दल अनेक नियम करण्यात आले आहेत. १९९२ मध्ये रिओ दी जानेरो येथे पृथ्वी परिषद घेण्यात आली, ज्यात ‘असशपवर २१’ नावाचा व्यापक कार्यक्रम आखण्यात आला. त्यामध्ये पर्यावरणाच्या समस्यांव्यतिरिक्त व्यापक विकासाच्या मुद्यांवर विचार केला गेला. त्यानंतर क्योटो आणि रिक्ताविक येथे समान मुद्यांवर परिषदा झाल्या. त्यामध्ये पर्यावरणीय समस्यांसाठी विकसनशील देशांना जबाबदार धरण्यात येऊन त्या दूर करण्याची जबाबदारी त्यांच्यावर टाकण्यात आली. भारताने ह्यावर तीव्र आक्षेप घेऊन सध्याच्या पर्यावरणीय समस्या

ह्या विकसित राष्ट्रांमुळे झाल्या असून त्यावरील उपायांसाठी त्यांनीच निधी पुरवावा असे स्पष्टपणे सांगितले. अशारितीने एकमेकांवर दोषारोपण करण्यात देश गुंतले असले तरी संयुक्त राष्ट्राने आपल्याअंतर्गत अनेक संस्था निर्माण करुन पर्यावरणाच्या समस्या सोडवण्याचा प्रयत्न केला आहे. आंतरराष्ट्रीय राजकारणामध्ये आता हा आघाडीचा विषय झाला असून, विविध समस्यांवर देशांमध्ये एकमत तयार करणे, त्याआधारे नियम / कायदे तयार करणे आणि उपाययोजनांसाठी निधी गोळा करणे इत्यादी आजच्या जागतिक राजकारणाचे एक प्रमुख कार्य झाले आहे.

१९८३ चा बुंडलँड कमिशन अहवाल, १९९२ ची पृथ्वी शिखर परिषद आणि १९९२ मध्येच संयुक्त राष्ट्रांने स्थापलेले कमिशन ऑन सस्टेनेबल डेव्हलमेंट ह्यामुळे पर्यावरणीय समस्यांचा आणि पर्यायी विकासमार्गाचा मुद्दा जागतिक राजकारणात **ऐरणीवर** आला. त्यानुसार पाश्चात्य भांडवलशाही, मुक्त व्यापारावर आधारित आणि आत्यंतिक उपभोगवादाने प्रेरित विकासाचा मार्ग सोडून ''चिरंजीवी विकासाचा'' मार्ग स्विकारण्याची वेळ आली आहे. चिरंजीवी विकास (Sustainable Development) म्हणजे सर्वसमावेशक, संयमी विकास आहे. त्यामध्ये निसर्गाचे शोषण नसून दोहन आहे. सध्याच्या पिढीचा गरजा भागवत पुढच्या पिढीची सोय करण्याचा उदात्त विचार त्यात आहे. थोडक्यात चिरंजीवी विकास म्हणजे एक अशी विकासाची प्रक्रिया ज्यामध्ये नैसर्गिक साधनांचा उपभोग, गुंतवणूकीची दिशा, तांत्रिक विकासाची दृष्टी आणि संरचनात्मक बदल हे सर्व समन्वयाने आणि एकवाक्यतेने होते आणि त्याद्वारे सध्याची पिढी आणि भावी पिढी ह्यांचे एकमेकांच्या गरजा पूर्ण करण्याच्या क्षमता अबाधित राहतात.

आजच्या जागतिक राजकारणाला वरील विचारांनुसार दिशा देण्याचे फार मोठे आव्हान मानवजातीपुढे आहे.

## ६.३ स्वयं अध्ययन प्रश्न :

१) साम्यवादोत्तर जागतिक राजकारणाची ठळक वैशिष्ट्ये सांगा.
२) प्रादेशिकतावादाच्या उगमाची कारणे स्पष्ट करा.
३) जागतिकीकरणाचा विकसनशील राष्ट्रांवर झालेल्या प्रभावाचे विश्लेषण करा.
४) आजच्या जागतिक पर्यावरणीय समस्यांची चर्चा करा.
५) संयुक्त राष्ट्रांद्वारे अणुतंत्रज्ञानावरील नियंत्रणाचे उपाय सांगा.

## ६.४ सारांश :

ह्या घटकामध्ये आपण साम्यवादी जगाच्या पतनानंतर जगामध्ये झालेल्या स्थित्यंतराचे अध्ययन आपण केले. साम्यवादाचे पतन ही एक अलिप्त घटना नाही. त्याला अनेक घटना जोडल्या आहेत. शीतयुध्दाची समाप्ती हे त्यापैकी एक. त्यानंतरच्या जगात आंतरराष्ट्रीय संबंधामध्ये झालेले बदल ह्या घटकातून आपल्या लक्षात येतात. त्याची वाढती व्याप्ती आपणास समजते. राजकीय प्रश्नांसोबतच नवीन जागतिक अर्थव्यवस्था, प्रादेशिकतावाद, तंत्रज्ञानाचा प्रभाव, पर्यावरणाच्या समस्या आणि एकूण जागतिकीकरणाच्या लाटेमुळे जगावर झालेला परिनाम आपणास समजला. हे सर्व विवेचन आजच्या जागतिक राजकाणाबद्दल अध्ययन करता आपल्याला उपयोगी पडेल.

## ६.५ सरावासाठी स्वाध्याय :

(अ) संयुक्त राष्ट्राद्वारे पर्यावरणासंबंधी करण्यात येणाऱ्या उपयांची माहिती संकलित करा.

(ब) भारताची नवीन जागतिक अर्थव्यवस्थेबद्दल काय भूमिका आहे, ह्याबद्दल माहिती मिळवा.

## ६.६ संदर्भग्रंथ सूची :

१) मायकल रॉस्कीन व निकोलस बेरी : 'द न्यू वर्ल्ड ऑफ इंटरनॅशनल रिलेशन्स', प्रेंटिस हॉल, नवी दिल्ली (२००२).

२) जोशुआ गोल्डस्टिन : 'इंटरनॅशनल रिलेशन्स', लाँगमन, न्यूयॉर्क (२००१).

३) शैलेंद्र देवळाणकर : 'आंतरराष्ट्रीय संबंध'.

*****

# ७

# घटक ७: आंतरराष्ट्रीयदृष्टया महत्वाचे तात्कालिक प्रश्न.

**(अण्वस्त्रप्रसार आणि दहशतवाद)**

**घटक संरचनाः**


७.० उद्दिष्टे

७.१ प्रास्ताविक

७.२ अण्वस्त्र प्रसार

    ७.२.१ अण्वस्त्र निर्मिती का होते ?

    ७.२.२ अण्वस्त्र निर्मिती न करण्यामागची भूमिका

    ७.२.३ अण्वस्त्र प्रसाराचे स्वरूप

    ७.२.४ अण्वस्त्र प्रसार बंदी

    ७.२.५ अण्वस्त्र प्रसारापुढील आव्हाने

७.३ दहशतवाद

७.४ सारांश

७.५ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

७.६ पारिभाषिक शब्द, शब्दार्थ

७.७ सरावासाठी स्वाध्याय

७.८ क्षेत्रीय अभ्यास

७.९ अतिरिक्त महिती

७.१० अधिक वाचनासाठी पुस्तके


## ७.० उद्दिष्टे

आंतरराष्ट्रीय दृष्टया महत्वाच्या तात्कालिक प्रश्नांचा अभ्यास करताना पुढील गोष्टी समजतात.

- आंतरराष्ट्रीय संबंधाचे बदलते स्वरूप लक्षात येते.
- विज्ञान-तंत्रज्ञानातील बदल आंतरराष्ट्रीय संबंधावर परिणाम करताना दिसतात.
- २१ व्या शतकातील अण्वस्त्रप्रसार व दहशतवाद या समस्यांच्या आकलनातून त्यांची संहारकता, भीषणता लक्षात येते.
- या समस्यांचे निराकरण झाल्यास शांततापूर्ण, सहकार्यावर आधारीत आंतरराष्ट्रीय समूहाची कल्पना करता येणे शक्य आहे हे लक्षात येते.
- २१ व्या शतकातील अण्वस्त्रपग्रसार व दहशतवादाने आंतरराष्ट्रीय समूहापुढे जी नवनवीन आव्हाने निर्माण केली आहेत त्यांचा शोध घेता येतो.

## ७.१ प्रास्ताविक

आंतरराष्ट्रीय स्तरावर शांतता व सुव्यवस्था निर्माण कण्यासाठी, सर्वसंहारक तिसरे युध्द टाळण्यासाठी आणि मुलभूत अधिकारांचे संरक्षण करण्यासाठी दुसऱ्या महायुध्दानंतर 'संयुक्त राष्ट्र संघटनेची' स्थापना करण्यात आली. परंतु २१ व्या शतकात विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रात झपाटयाने प्रगती झाली त्यामुळे राष्ट्राराष्ट्रातील स्पर्धा ही 'जीवघेणी' ठरू लागली. प्रगतीचा वेग भिन्न राहिल्याने जगाची विभागणी विकसित, विकसनशील आणि मागास राष्ट्रे अशा तीन गटात झाली. या तीनही गटातील राष्ट्रांच्या सामर्थ्यात कमालीची तफावत असल्याने त्यांच्यातील ताणतणाव संघर्ष वाढले त्यातून साशंकता व अविश्वास वाढू लागले आणि आंतरराष्ट्रीय सहकार्य, सामंजस्याचा मुद्दा गैरलागू ठरू लागला. २१ व्या शतकातील अण्वस्त्रप्रसार आणि दहशतवाद या समस्यांनी आंतरराष्ट्रीय समुदयासमोर आव्हान उभे केले. या समस्यांचा बीमोड करण्यासाठी सर्व सदस्य राष्ट्रांना संघटित होऊन प्रयत्न करण्याचे आवाहन संयुक्त राष्ट्र संघटनेने केले पण त्यास म्हणावा तसा प्रतिसाद मिळाला नाही म्हणून या समस्यांचे स्वरूप भीषण होऊ लागले. प्रस्तुत पाठात अन्वस्त्रप्रसार व दहशतवाद ह्या आव्हानांचा आपण अभ्यास करु.

## ७.२ अण्वस्त्र प्रसार

'अणु तंत्रज्ञानाचा उपयोग करु' अशा घोषणा राज्यकर्ते देत असले तरी आपल्या अणुशांततेसाठी व प्रगतीसाठी आण्विक ताकदीचे समर्थन झाले असले तरी त्याची सर्वविनाशकता, विध्वंसकता विसरता येत नाही, त्यामुळे 'आण्विक तंत्रज्ञानातील प्रगती' व त्याचा होणारा उपयोग हा आंतरराष्ट्रीय राजकारणातील चर्चेचा विषय ठरला आहे. म्हणून त्याविषयी जाणून घेणे आवश्यक ठरते.

अण्वस्त्रप्रसाराचा मुद्दा दोन अर्थाने विचारात घ्यावा लागतो. एक म्हणजे तांत्रिक विकासासाठी व दुसरे म्हणजे राजकीय महत्वाकांक्षेसाठी. आण्विक ताकद राष्ट्राचे सामर्थ्य निर्धारीत करते, त्यामुळे यांच्या प्रसारामुळे आंतरराष्ट्रीय राजकारण व आंतरराष्ट्रीय संबंधांना नवीन परिमाण प्राप्त झाले. जगाची विभागणी 'अण्वस्त्रसंपन्न राष्ट्र' आणि 'बिगरअण्वस्त्रधारी राष्ट्रे'अशा दोन गटात होऊन त्याच्यामध्ये आंतरराष्ट्रीय राजकारण आकारास येऊ लागले. आण्विक प्रसाराचा मुद्दा हा तंत्रज्ञनातील प्रगतीशी संबंधित हया राजकीय निर्णयावर आधारीत आहे, म्हणून 'आण्विक प्रसार' हा तांत्रिक मुद्दा ठरत नसून राजकीय मुद्दा ठरतो.

## ७.२.१ अण्वस्त्रनिर्मिती का होते ?

**जगामध्ये अण्वस्त्रांची निर्मिती का होते ह्यामागे अनेक कारणे आहेत.**

- राष्ट्राची प्रतिष्ठा, दर्जा वाढविण्यासाठी अण्वस्त्रप्रसाराला चालना दिली जाते.
- राजकीय दडपण किंवा अंतर्गत राजकीय गरजांनी प्ररित होऊन राष्ट्रे अण्वस्त्रांची निर्मिती करतात.
- सामाजिक क्षेत्रात अधिक स्वायत्तता मिळविण्यासाठी
- एखाद्या राष्ट्राच्या मनात इतरांबद्दल संशय अविश्वास, भीती असल्यास लष्करी व राजकीय अनिश्चिततेच्या संकटातून मुक्त होण्यासाठी एक व्यूहनीतीचा भाग म्हणून अण्वस्त्रनिर्मिती केली जाते.
- अचानक युद्ध उद्‌भवल्यास गैरसोय टाळण्यासाठी अण्वस्त्रांचा उपयोग तात्कालीक उपाययोजना म्हणून केला जाऊ शकतो.
- विविध राष्ट्रांबरोबर व्यापार देवाणघेवाण करताना एक अस्त्र (साधन) म्हणून अण्वस्त्रक्षमता उपयोगी ठरते.

## ७.२.२ अण्वस्त्रनिर्मिती न करण्यामागची भूमिका

- अण्वस्त्रनिर्मिती खर्चिक आणि विध्वंसक असल्याने त्यातून विघातकता वाढीस लागते. देशाच्या प्रगतीचा वेग मंदावतो.
- आंतरराष्ट्रीय लोकमत विरोधात जाण्याचा धोका असल्याने अण्वस्त्र निर्मिती पासून परावृत्त राहणे श्रेयस्कर.
- देशाच्या आण्विक कार्यक्रमामुळे अन्यराष्ट्रांच्या सुरक्षिततेस धोका होऊ शकतो.
- आण्विक कार्यक्रमामुळे देशाच्या अन्यदेशांशी असलेल्या व्यापारावर विपरीत परिणाम होण्याची शक्यता असते.

- काही वेळेस राष्ट्रे आण्विक निर्मितीचा कार्यक्रम हा दीर्घकालीन, खर्चिक प्रक्रिया असल्याने श्रीमंत, तांत्रिकदृष्टया प्रगत राष्ट्रांचे हितसंबंधच यात गुंतलेले दिसतात आणि अन्य राष्ट्रे ह्या श्रीमंत राष्ट्रांच्या राजकारणात भरडली जातात.

### ७.२.३ अण्वस्त्र प्रसाराचे स्वरूप

दुसरे महायुद्ध चालु असताना १९४५ मध्ये अमेरिकेने जापनच्या हिरोशिमा व नागासाकी या दोन शहरांवर अणुबॉम्ब हल्ला करून जपानला शरणागती पत्कण्यास भाग पाउले. या अणुबॉम्ब हल्याने जपान पुरता उध्वस्त झाला आणि अणूचे सामर्थ्य (विध्वसक) जगासमोर पहिल्यांदाच आले. त्यानंतर गेल्या ४० वर्षात प्रत्यक्षात अणुबॉम्बचा वापर कोणत्याही राष्ट्राने केलेला दिसत नाही. भयंकर सहारकता असल्याने अण्वस्त्रांचा वापर मुख्यतः प्ररोधनासाठी (Deterrence) किंवा आण्विक राजनयासाठी (Nuclear Diplomacy) केला गेला अण्वस्त्रांचा जाणीवपूर्वक वापर जरी राष्ट्रांकडून होण्याची शक्यता कमी असली तरी त्यांचा अपघाती वापर (Accidental Nuclear War) होण्याची शक्यता आहे.

जगातील पहिली अणुस्फोट चाचणी अमेरिकेने १९४५ साली केली. रशियाने दुसऱ्याच वर्षी १९४६ साली अणुस्फोट चाचणी केली. या दोन देशदरम्यान अण्वस्त्रस्पर्धा सुरू झाली. १९५२ मध्ये ब्रिटनने, १९६१ मध्ये फ्रान्सने १९६४ मध्ये चीनने अणुस्फोट चाचणी केली. या ५ देशांनी पुढील काळात आपली अण्वस्त्रसज्जता वाढवली. अणुउर्जा निर्मितीच्या क्षेत्रात भारत, इस्त्रायल आणि उत्तरकोरिया यांनी स्वबळावर प्रगती केली. भारताचे १९७४मध्ये अनुस्फोट केला. अणुचा उपयोग शांततेसाठी करणे या सूत्रावर भारताचा अणूकार्यक्रम आधारीत होता. जेव्हा जुन्या ५ राष्ट्रांची आण्विक क्षेत्रातील मक्तेदारी संपुष्टात आली व इतर राष्ट्रेही अण्विक प्रगती साधू लागले तेव्हा या बड्या पाच राष्ट्रांकडून (अमेरिका, रशिया, फ्रान्स, ब्रिटन, चीन) अण्वस्त्र प्रसाराला आळा घालण्याचे प्रयत्न सुरू झाले. वेगवेगळया आमसभेतील ठरावांमधून अण्वस्त्रप्रसारावर बंदी घालण्यासाठी प्रयत्न सुरू झाले.

### ७.२.४ अण्वस्त्रप्रसारबंदी

**जागतिक स्तरावर अण्वस्त्र प्रसारबंदी संबंधी विविध उपाययोजना करण्यात आल्या. त्यांची माहिती आपण येथे घेऊ.**

## अ) संस्थात्मक उपायः

१) **अणुशक्ती आयोग :-** संयुक्त राष्ट्र संघटनेच्या आमसभेने २६ जाने. १९४६ ला अणुशक्ती आयोगाची स्थापना केली. या आयोगाकडे चार जबाबदाऱ्या सोपविण्यात आल्या. त्या पुढीलप्रमाणे -

i) अणुशक्तीचा वापर शांततेच्या व विधायक कार्यासाठी करण्यास राष्ट्रांना प्रवृत्त करणे.
ii) सर्व प्रकारची विध्वंसक शस्त्रास्त्रे नष्ट करण्यासाठी प्रयत्न करणे
iii) राष्ट्रांच्या अणुशक्ती विकास कार्यक्रमाची पाहणी करणे
iv) अणू अपघात टाळण्यासाठी आवश्यक ती मदत दणे.
v) आण्विक प्रसाराऐवजी राष्ट्राराष्ट्रातील विज्ञान व तंत्रज्ञान क्षेत्रातील सहकार्य वाढविणे.

२) आंतरराष्ट्रीय अणुशक्ती संस्था (International Automic Energy Agency-(IAEA)

या संस्थेची स्थापना अमेरिकेचे तत्कालीन राष्ट्रध्यक्ष आयसेनहॉवर यांच्या पुढाकाराने १९५६ मध्ये करण्यात आली. ही संस्था आयसेनहॉवर यांच्या ॲटम फॉर पीस (शांततेसाठी अणू) या कार्यक्रमावर आधारित होती, या संस्थेची उद्दिष्टे पुढील प्रमाणे आहेत.

i) आण्विक कार्यक्रमांची पडताळवी करणे

ii) आण्विक अपघात टाळण्यासाठी राष्ट्रांनी कोणते सुरक्षा उपाय योजले आहेत याची शहानिशा करावे

iii) अणुतंत्रज्ञानाचे हस्तांतरण विधायक कामासाठीच होत आहे की नाही हे पाहाणे. आज आंतरराष्ट्रीय अणुशक्ती संस्थेला एका चळवळीचे रूप प्राप्त झाले आहे. या संस्थेतर्फे राष्ट्राराष्ट्रांत विकासात्मक कार्यासाठी अणुशक्ती चा वापर करण्यावर भर देण्यात येतो. तसेच अणुशक्तीचा वापर अण्वस्त्रे बनविण्यासाठी राष्ट्रे करणारे नाहीत याची काळजी घेण्यात येते.

## ब) संयुक्त राष्ट्रांतर्गत उपाय

१९५० च्या दशकात संयुक्त राष्ट्र संघटनेच्या अनेक सदस्य राष्ट्रांकडून

शस्त्रास्त्रे नियंत्रण व निःशस्त्रीकरण संदर्भात अनेक महत्वपूर्ण ठराव शिफारशी व्यक्तीगत पातळीवर सुचविल्या गेल्या. उदा. १९५३ साली अमेरिकेकडून मांडण्यात आलेली शांततेसाठी अणू योजना, १९५४ साली इंग्लंड व फ्रांन्स कडून मांडली गेलेली निःशस्त्रीकरण योजना, १९५५ साली सोव्हिएट रशिया कडून मांडला गेलेला निशस्त्रीकरण प्रस्ताव इ. १९५७ मध्ये आमसभेने निःशस्त्रीकरण करण्याबाबत एक महत्वपूर्ण ठराव मंजूर केला. त्यातील तरतुदी पुढीलप्रमाणे आहेत.

- अण्वस्त्रचाचण्यांवर बंदी घालणे
- अणुशक्तीच्या विधायक वापर करण्यास प्रोत्साहन देणे.
- अणुशक्तीच्या संस्थेत कपात घडवून अण्वस्त्रांच्या भविष्यातील निर्मितीवर प्रतिबंध घालणे इ.

## क) आंतरराष्ट्रीय करार :-

अण्वस्त्रांच्या स्पर्धेमुळे जागतिक पातळीवर तणाव निर्माण झाला. हा तणाव निवळयासाठी व जगात शांतता प्रस्थापित करण्यासाठी हया ५ अण्वस्त्रधारी राष्ट्रांनी पुढाकार घेतला. (१) अण्वस्त्रप्रसार बंदी करार (NPT) या व बड्या ५ राष्ट्रांव्यतिरिक्त इतर राष्ट्रांमध्ये अंण्वस्त्रांची निर्मिती व प्रसार होऊ नये आणि अणुशक्तीचा शांततेसाठी व आर्थिक विकासासाठी उपयोग करता यावा या हेतूने अण्वस्त्रप्रसार बंदीचा ठराव संयुक्त राष्ट्र संघाच्या व्यासपीठावर मांडण्यात आला. ५ मार्च १९७० ला अण्वस्त्रा प्रसार बंदी करार अस्तित्वात आला जगातील १८६ राष्ट्रांनी त्यावर सहया केल्या आहेत मात्र भारत, पाकिस्तान व इस्त्रायल सारख्या राष्ट्रांनी या करारावर सहया करण्यात नकार दिला आहे. या कराराचा तपशील पुढीलप्रमाणे

- हा करार अस्तिस्वात येण्यापूर्वी ज्या राष्ट्रांनी अणूचाचण्या केल्या आहेत ती 'अण्वस्त्रधारी राष्ट्रे' आणि ज्यांनी अणूचाचण्या केल्या नाहीत ती 'बिगर अण्वस्त्रधारी राष्ट्रे' अशी वर्गवारी ह्यात करण्यात आली.
- अण्वस्त्रांची मक्तदारी जुन्या पाच राष्ट्रांकडे (अमेरिका, रशिया, इंग्लंड, फ्रान्स, चीन) राहील हे स्पष्ट करण्यात आले.
- ज्या राष्ट्रांनी अणुचाचणी केली नाही त्यांना यापुढे करता येणार नाही त्याना अणुतंत्रज्ञान आयात करता येणार नाही.
- या कराराद्वारे अणुतंत्रज्ञानाच्या हस्तांतरणावर प्रतिबंध घालण्यात आला.

हस्तांतरणावर नियंत्रण ठेवण्यासाठी कडक नियम बनविण्यात आले. आणि अणूतंत्रज्ञानाच्या हस्तांतरणाच्या माध्यामातून अण्वस्त्रांचा होणारा प्रसार रोखण्यात आला.

**आक्षेप :**

१. हा करार संपूर्ण निःशस्त्रीकरणाच्या तत्वाशी सुसंगत नव्हता. कारण या कराराद्वारे काही राष्ट्रांना अण्वस्त्रे बाळगण्याचा अधिकार देण्यात आला.

२. या कराराने अण्वस्त्रधारी पाच राष्ट्रांची एकाधिकारशाही निर्माण केली.

३. या कराराने शांतता व विकास कार्यासाठी अणुशक्तीचा वापर करू इच्छिणाऱ्या राष्ट्रांवर मोठा अन्याय केला. भारताच्या अणुशक्ती विकास कार्यक्रमावर या करारांने मर्यादा आणल्या.

कराराच्या या पक्षपाती भूमिकेमुळेच भारताने या करारावर सही करण्यास नकार दिला. भारताने या करारावर सही करावी म्हणून वेळोवेळी अमेरिकेकडून भारतावर दडपण आलेले दिसून येते. परंतु भारताने या दडपणाला बळी न पडता अण्वस्त्रधारी राष्ट्रांनी अण्वस्त्र चाचण्या थांबवाव्यात अशी विनंती संयुक्त राष्ट्र संघटनेच्या व्यासपीठावरून केलेली दिसते.

## (२) सर्वसमावेशक अणूचाचणी बंदी करार (CTBT - Comprehensive Nuclear Test Ban Treaty)

संपूर्ण जगातून अण्विकशक्ती नष्ट करण्याच्या हेतूने संयुक्त राष्ट्र संघटनेने एप्रिल १९९६ मध्ये जिनिव्हा येथे एका परिषदेचे आयोजन करण्यात आले या परिषदेत 'अणुशक्ती' या विषयावर सविस्तर चर्चा करण्यात येऊन त्यातून सर्वसमावेशक अणुचाचणी बंदी करार करण्यात आला या कराराच्या तरतुदी पुढील प्रमाणे आहेत.

- सर्व प्रकारच्या अण्वस्त्रांच्या चाचण्यांवर बंदी घालणे
- कराराचे उल्लंघन करणाऱ्या विरूद्ध नियंत्रण करणारी आंतरराष्ट्रीय निरीक्षण योजना तयार करणे
- अणुचाचणी घेणाऱ्या राष्ट्रांची चौकशी कराणे
- जी राष्ट्रे अणुशक्तीचा शांततेच्या कार्यासाठी उपयोग करतात आणि त्या क्षेत्रात त्यांचे संशोधन सुरू आहे त्यांच्यावरही अनेक बंधने या करारानुसार घालण्यात आली. १९९६ मध्ये अमेरिकेबरोबरच जगातील ६ राष्ट्रांनी या करारावर सह्या केल्या. या करारावर सह्या करण्याचे नाकारून भारतने बडया राष्ट्रांच्या'अण्विक साम्राज्यवादाला' आव्हान दिले आहे.

## (३) भारत–अमेरिका अणुकरार

१९९८ साली भारताने अणुचाचणी घेतल्यानंतर अमेरिका, ब्रिटनसहीत अनेक

देशांनी भारतावर आर्थिक, निर्बंध घातले तसेच भारताला अणुइंधन आणि इतर सामुग्री पाठविणे बंद केले. आर्थिक निर्बंध काही काळानंतर उठविण्यात आले परंतु अणुइंधन व तंत्रज्ञान यावरील निर्बंध कायम ठेवण्यात आले. भारताची वाढती उर्जेची गरज भागविष्यासाठी हे निर्बंध उठविले जाणे गरजेचे होते. परंतु भारताने अण्वस्त्र प्रसारबंदी करार आणि सर्वसमावेशक अणुचाचणी बंदी करारांना मान्यता दिल्यानंतरच भारतावरील निर्बंध उठविता येतील अशी अमेरिका व अणुइंधन पुरविणाऱ्या इतर देशांनी भूमिका घेतली. या पार्श्वभूमीवर २००५ साली तत्कालीन पंतप्रधान डॉ. मनमोहन सिंग यांनी अमेरिकेला भेट देऊन या प्रश्नाबाबत तोडगा काढण्यासाठी सहकार्य करण्याची तयारी दाखवली. २००६ साली अमेरिकेचे अध्यक्ष जॉर्ज बुश भारतात आले. या भेटीत भारत-अमेरिका अणुकरार झाला. या करारातील प्रमुख तरतुदी पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१. अण्वस्त्रानिर्मितीचे तंत्रज्ञान आणि सामुग्री बिगर अण्वस्त्रधारी देशांना भारत देणार नाही.
२. भारताने आपल्या आण्विक प्रकल्पांची नजीकच्या काळात 'नागरी' आणि 'लष्करी' अशी विभागणी करून नागरी प्रकल्प आंतरराष्ट्रीय संघटनेला तपासणीसाठी खुले करावे.
३. भारताच्या नागरी अणुउर्जा उपक्रमात लागणारे तंत्रज्ञान व सामुग्री पुरवण्यासाठी अमेरिका प्रयत्न करेल. तसेच भारताला मदत करण्यासाठी आण्विक पुरवठा गटाला तयार करेल.

हा करार अंमलात येण्याच्या मार्गातील सर्व अडथळयांवर मात करून भारताने अमेरिकेनंतर अश्या प्रकारचा अणु करार फ्रान्स, रशिया इ. देशां बरोबर करून त्यांचे सहकार्य मिळवले आहे.

## ७.२.५ अण्वस्त्रप्रसारापुढील आव्हाने

अण्वस्त्रप्रसाराच्या समस्येचा पुन्हा नव्याने विचार होणाची गरज आहे. अण्वस्त्रप्रसाराची समस्या भारताने १९७४ ला अणूचाचणी घेतल्या नंतर सुरू केली नाही. तर त्यापूर्वीचा १९४५ ला अमेरिकेने जपानवर केलेल्या अणूबॉम्ब हल्यापासून सुरू झाली. ही समस्या गुतागुंतीची होण्याचे कारण १९९० नंतर अमेरिकेची या क्षेत्रातील मक्तेदारी संपुष्टांत आली हे आहे. त्यासाठीच NPT, CTBT या सारखे करार करण्यात झाले. परंतु भारत, इस्त्रायल इ. देशांनी या करारावर सहया करण्यास नकार दिला.

दुसरे म्हणजे शीतयुध्दोत्तर काळात अण्वस्त्रांचा जो प्रसार झाला त्यामागे सोविएट रशियाचे विषटन आणि त्यानंतर सोव्हिएट रशियातून झालेली आण्विक गळती हे कारण आहे या विघटनानंतर रशियाकडील अण्वस्त्र तंत्रज्ञान आणि साधनसामग्री मोठया प्रमाणात काळया बाजाराच्या माध्यमातून इराण, उत्तर कोरिया व पाकिस्तानच्या अणु कार्यक्रमासाठी उपलब्ध झाली. याचा फायदा दहशतवादी संघटनांनी घेतला व दहशतवादाचा भस्मासूर उदयाला आला.

तिसरे म्हणजे जागतिकीकरणाच्या प्रक्रियेचा विध्वंसक शस्त्रास्त्रांच्या प्रसारावर सकारात्मक व नकारात्मक अशा दोन्ही प्रकारे परिणाम झाला. जागतिकीकरणामुळे राष्ट्राराष्ट्रातील माहितीचे आदान प्रदान सहज शक्य झाले. विध्वंसक शस्त्रे बनविण्यासाठी आवश्यक तंत्रज्ञान, साधनसामग्री व माहिती मिळविणे आता राष्ट्रांसाटी अवघड राहिले नाही. त्यामुळे जागतिकीकरणाची प्रक्रिया विध्वंसक शस्त्रास्त्रांच्या प्रसारासाठी उपकारक ठरली.

चौथे म्हणजे, १९६० नंतर चीनने आण्विक सामर्थ्य सिध्द केल्यानंतर अमेरिका, ब्रिटन, सोव्हिएट युनियन यांना अण्वस्त्रप्रसारावर बंदी घालणे आवश्यक वाटले विध्वसक शस्त्र-नियंत्रण राजवटी अंतर्गत अणूनिर्माण प्रक्रियेवर नियंत्रण व तपासणी चे अधिकार बड्या राष्ट्रांनी स्वतः कडे ठेवले. तेव्हा तिसऱ्या जागतिक देशांनी या मर्यादांविरुद्ध आवाज उठवला. आपली आण्विक क्षमता सिध्द करण्याची तयारी दर्शवून शांततेसाठी अणूचा आग्रह धरला.

पाचवे म्हणजे शीतयुद्धोत्तर काळात दक्षिण आशियामध्ये झपाटयाने अण्वस्त्र प्रसार घडून आला. दक्षिण आशियात 'उभा' व 'आडवा' अश्या दोन्ही प्रकारचा अण्वस्त्र प्रसार घडून आला. उभ्या अण्वस्त्रप्रसारांतर्गत भारत व पाकिस्तान ही दक्षिण आशियातील मोठी राष्ट्रे अण्वस्त्रधारी बनली. आडव्या अण्वस्त्र प्रसाराची प्रक्रिया २००४ नंतर पाकिस्तानमधील ए.क्य.खान यांच्या न्युक्लियर रॅकेट प्रकरणाच्या माध्यमातून उघडकीला आली. हा अण्वस्त्रप्रसार उत्तर कोरिया, लिबिया, इराण यांच्या पाकिस्तानमार्फत पुरवल्या गेलेल्या तंत्रज्ञान व साधनसामग्रीच्या माध्यमातून झाला.

सहावे म्हणजे दक्षिण आशियातील अण्वस्त्र स्पर्धेत आता राज्यांबरोबरच राज्यकांनीही प्रवेश केला आहे या राज्यकांमध्ये 'अल्-कायदा' सारख्या दहशतवादी संघटना येतात. ह्यांनी पाकिस्तानमधील काही शास्त्रज्ञ व अधिकाऱ्यांच्या माध्यमातून अण्वस्त्रे प्राप्त करण्याचा प्रयत्न करत असल्याने उघडकीस आले आहे ही संपूर्ण जगासाठी चिंतेची बाब आहे.

सातवे म्हणजे दक्षिण आशियातील अण्वस्त्रप्रसार प्रकियेवर परिणाम घडवून आणणारा अपरवी एक महत्वाचा घटक म्हणजे अमेरिकेसारख्या महासत्तांचे या उपखंडात चाललेले सत्ता संतुलनाचे राजकारण भारताने जरी आपला अण्वस्त्र कर्यक्रम चीनला गृहीत धरून. विकसित केला असला तरीदेखील चीनला भारताच्या आण्विक कार्यक्रमामुळे असुरक्षित वाटत नाही. चीनची स्पर्धा ही भारताबरोबर नाही तर अमेरिकेबरोबर आहे. चीनने ज्या आंतररखंडीय क्षेपणास्त्रांचा विकास केला आहे तो अमेरिकेला गृहीत घरूनच अमेरिकेलाही चीनच्या अणुकार्यक्रमामुळे असुरक्षितता वाटते चीनच्या वाढत्या प्रभावाला संतुलित करण्यासाठी भारताला पुढे करण्याचे डवपेच अमेरिका आखत आहे. भारत-अमेरिका अणुकरार हा त्याच डावपेचाचा भाग आहे अमेरिकेच्या अशा दुटप्पी धोरणामुळे दक्षिण आशियातील अण्वस्त्र प्रसाराला चालना मिळत आहे. त्यातून दहशतवादाच्या भस्मासुराने डोके वर काढले आहे. त्या समस्येचा अभ्यास आपण पुढे करु.

## ७.३ दहशतवाद

समकालिन जागतिक राजकारणाला दहशतवादाच्या समस्येने ग्रासले आहे. २००१ च्या अमेरिकेवर झालेल्या दहशतवादी हल्यानंतर ही समस्या केवळ गरीब विकसनशील राष्ट्रांपुरती मर्यादित राहिली नसल्याचे व बडी राष्ट्रे सुद्धा दहशतवाद्यांचे लक्ष्य (Target) बनल्याचे जगासमोर आले. आज विकसित व विकसनशील देशांच्या शांतता व सुरक्षिततेला दहशतवादाने आव्हान अभे केले आहे. या समस्येला तोंड देण्यासाठी प्रादेशिक व आंतराष्ट्रीय स्तरावर अनेक करार गेल्या काही वर्षात झालेले दिसून येतात. उदाहरणार्थ, अमेरिकेने दहशतवादाविरूद्ध आंतरराष्ट्रीय मोहिम सुरू करून त्या संदर्भात अनेक राष्ट्रांशी करार केलेले आहेत. शांघाय फाईव्ह सारख्या प्रादेशिक पातळी वरील संघटनाही दहशतवादाचा सामना करत आहेत. म्हणून दहशतवादाचा पद्धतशीर अभ्यास अलीकडील काळात होऊ लागला आहे. दहशतवादाने आत्ता आंतरराष्ट्रीय स्वरूप प्राप्त केले आहे. कोणत्याही देशाच्या अंतर्गत राजकारणावर तसेच आंतरराष्ट्रीय राजकारणावर परीणाम करणारा तो एक महत्वाचा घटक बनला आहे. म्हणून या भागात या महत्वाच्या संकल्पनेचा सविस्तर विचार करू.

### ७.३.१ अर्थ आणि स्वरूप

'दहशतवाद ही राजकीय उद्देशाने प्रेरित झालेली आणि मोठया प्रमाणात हिंसाचार किंवा हिंसाचारचा धाक निर्माण करणारी कृती असते.' दहशतवादामागे

राजकीय उद्दिष्टे असतात व ती हिंसाचाराच्या सहाय्याने पूर्ण केली जातात. अशी 'दहशत' एखाद्या गटाकडून किंवा व्यक्ती कडूनही निर्माण केली जाते.

डॉ. शांतिश्री पंडित यांच्या मतानुसार राजकीय करणांनी प्रेरित झालेला आणि भय निर्माण करण्यासाठी निष्पाप लोकांना आणि प्रशासनाला लक्ष्य करणारा हिंसाचार म्हणजे 'दहशतवाद' होय. दहशतवादी भीती, दरारा आणि अनिश्चिततेचे वातारण तयार करून काही राजकीय उद्दिष्टांच्या पूर्ततेसाठी शासनावर व लोकमतावर दबाव आणण्याचा प्रयत्न करतात. दहशत निर्माण करण्यासाठी हत्या, बॉम्बस्फोट, अपहरण या सारख्या साधनांचा अवलंब केला जातो. 'दहशतवाद ही शासना विरोधी कृती म्हणून जरी या संकल्पनेचा  उल्लेख केला जात असला तरी आज अनेक राष्ट्रांमधील सरकारे दहशवादी साधनांचा वापर इतर राष्ट्रांविरूद्ध किंवा अंतर्गत विरोधकांचा बीमोड करण्यासाठी करीत आहेत. अश्या या दहशतवादाचे 'स्वरूप' पुढीलप्रमाणे सांगता येईल.

दहशतवाद ही एक गुंतागुंतीची आणि वादग्रस्त संकल्पना आहे. दहशतवादाची राजकीय उद्दिष्टये साध्य करण्यासाठी जो मार्ग किंवा साधने वापरली जातात त्याद्वारे त्याचे स्वरूप लक्षात येते. दहशवादाचा  शांततामय व सनदशीर मार्गावर विश्वास नसून क्रांतीकारी, विध्वंसक मार्गावर विश्वास आहे. मात्र दहशतवादी आणि क्रांतीकारक यातही फरक आहे. क्रांतीकारकांचे लक्ष्य 'जुलमी राजवटीस विरोध करणे', परकीय राजवटीपासून लोकांची मुक्तता करणे हे असते. क्रांतिकारक सर्वसामान्यांसाठी लढतात, त्यामुळे त्यांना लोकांची सहानुभूती असते. याउलट दहशतवादी प्रस्थापित राजवट उलथून टाकून तिच्या जागी आपली राजवट आणण्याची आकांक्षा बाळगतात. स्वतःला धर्मयोद्धा समजतात. आपल्या संकुचित स्वार्थासाठी निष्पाप, निरपराध लोकांचा बळी घेतात त्यामुळे जनतेची सहनुभूती ते गमावून बसतात. 'दहशतवाद' ही सामूहिक शृंखलाबद्ध (Chain) कृती आहे. संघटनेच्या मार्फत दहशतवाद फैलावला जातो. संघटनेच्या मार्फत बॉम्बस्फोट मालिका, गोळीबार इ. कृत्ये केली जातात. त्यामुळे दहशतवाद ही आखीव, नियोजनबद्ध, प्रशिक्षित व्यक्तींनी केलेली सामूहिक कृती असते. अशा प्रकारे दहशतवादाचे स्वरूप, भीषण, सर्व-संहारक, बेकायदेशीर, संघटित असल्याचे दिसून येते.

### ७.३.२ दहशतवादाची  वैशिष्टये

- दहशतवाद ही जाणीवपूर्वक केलेली सामूहिक कृती असते.
- हया कृत्या द्वारे भीती, दहशत, अस्थिरता, निर्माण केली जाते.

- हयात मानवतावादी मूल्यांना स्थान नसते.
- उद्दिष्ट साध्य कवण्यासाठी युद्ध, बंडाळी यांना चालना दिली जाते.
- दहशतवादी संघटना उद्दिष्टपूर्तीसाठी विशिष्ठ विचारसरणींचा आधार घेतात.

### ७.३.३ दहशतवादाची उद्दिष्टये

सर्व वैशिष्टयांनी परिपूर्ण असणाऱ्या दहशतवादाची उद्दिष्टये पुढीलप्रमाणे सांगता येतील.

१. स्वातंत्र्य प्राप्तीः- प्रस्थापित राजवट पलथवून टाकणे व त्या जागी स्वतःची राजवट प्रस्थापित करणे.

२. स्वतंत्र सार्वभौम राज्याची निर्मिती करणेः- श्रीलंकेतील लिट्टे (Liberation Tigers of Taruil Elam-LTTE)ही संघटना, पॅलेस्टाईल मधील हमास, लष्कर-ए-तोएबा, जैश-ए-मोहम्मद यांसारख्या कडव्या दहशतवादी संघटना स्वतंत्र राज्याच्या निर्मितीच्या उद्दिष्टयाने प्रभावित आहेत.

३. धार्मिक आणि वांशिक प्रेरणांद्वारे अल्पसंख्यांकांवरील अन्यायाचा सूड घेणे त्या उद्देशाने प्रेरित झालेल्या संघटना म्हणजे अल्-कायदा, अबू निदाल संघटना या धार्मिक भावनेने प्रभावित आहेत.

४. राजकीय आणि सामाजिक परिवर्तन साधणेः- जगातील सर्व मुस्लिम राष्ट्रांना एकत्र इस्लाम धर्मावर आधारीत राजवटींची स्थापना करणे हे अल्-कायदा सारख्या संघटनेचे उद्दिष्ट आहे.

५. आपल्या प्रश्नांकडे देशांतर्गत तसेच देशाबाहेरील जनतेचे लक्ष आकर्षित करणेः- या साठी राजकीय नेत्यांचे अपहरण, हत्या, विमानाचे अपहरण, पराराष्ट्रांच्या प्रति निधींना ओलिस ठेवणे, सरकारी इमारतींवर हल्ले इ. मार्ग जनता आणि सरकारचे लक्ष वेधून घेण्यासाठी वापरले जातात.

## ७.३.४ दहशतवादाची कारणे

'दहशतवादी' हा जन्माला येत नाही तर तो घडविला जातो. दहशतवाद हे सामाजिक, राजकीय, आर्थिक, मानसिक वातावरणाचे' असते. त्यामुळे त्याची कारणे समजाऊन घेऊ.

१. सामाजिक व सांस्कृतिक कारणेः काही समाजशास्त्रज्ञांच्या मते, सामाजिक असुरक्षिततेच्या भावनेतून दहशतवाद उदयाला येतो. समाजजीवनात एका बाजूला नैराश्य व दुसऱ्या बाजूला विकास असे विरोधाभासी चित्र दिसते. तसेच निर्णय प्रक्रियेत काही व्यक्तींना वाटा मिळत नाही, त्यामुळे वंचना, उपेक्षेच्या भावनेतून हे लोक दहशतवादाकडे वळतात. संस्कृतीच्या संरक्षणासाठी

सुध्दा दहशतवादाचा अवलंब करण्यावर भर दिला जातो.

२. आर्थिक कारणेः- देशाची आर्थिक दुरावस्था, आर्थिक शोषण, बेकारी, दारिद्र्य इ.ला कंटाळून तरूण आर्थिक प्रलोभनांच्या किंवा भीतीच्या आहारी जाऊन दहशतवादाकडे वळताना दिसतात.

३. राजकीय कारणेः- राष्ट्रीय हितसंबंध, विस्तारवादी धोरण, सूडाची भावना इ. करणांनी प्रेरित होऊन दहशतवादाचा उदय होतो.

४. धार्मिक कारणेः- मूलतत्ववादी व धार्मिक कट्टरतावादी दहशत वादाचा मार्ग स्वीकारून आपल्या विचारसारणीचा व धार्मिक तत्वाचा मार्ग स्वीकारतात. उद. काश्मिर मधील पंडितांची किंवा हिंदूची हत्या ही धार्मिक दहशतवादाची फळे आहेत.

## ७.३.५ दहशतवादाचे प्रकार

गेल्या काही वर्षापासून दहशतवादाने उग्ररूप धारण केलेले आहे. दहशतवादी संघटनांचे कार्यक्षेत्र, त्यांची उद्दिष्टये, कार्यप्रणाली या आधारावर दहशतवादाचे पुढील काही प्रकार पडतात.

अ) **राष्ट्र पुरस्कृत दहशतवादः-** काही राष्ट्रांचे आर्थिक, राजकीय हितसंबंध असतात. ते हितसंबंध दुसऱ्या राष्ट्रांमुळे धोक्यात येतात. आपले हितसंबंध धोक्यात येत आहेत हे पाहून अशी राष्ट्रे दहशतवादास प्रोत्साहन देतात. त्यातून राष्ट्रपुरस्कृत दहशतवाद निर्माण होण्यास मदत होते. उदा. काश्मिर आमचा आहे व तो भारताकडून युद्ध करून जिंकता येत नाही म्हणून स्वतःची प्रतिष्ठा आणि हितसंबंध जपण्यासाठी पाकिस्तानने काश्मिर मध्ये दहशतवादाला प्रोत्साहन दिले.

ब) **राष्ट्रीय किंवा देशांतर्गत दहशतवादः-** या दहशतवादाचा उदय एकाच देशात होतो. त्याचे कार्यक्षेत्र, व्याप्ती त्या देशापुरती मर्यादित असते. यामध्ये आपल्याच देशातील सरकारविरोधी काही गट सक्रिय होतात. आपल्यावर झालेला अन्याय दूर करण्यासाठी किंवा आपल्या काही मागण्या मान्य करून घेण्यासाठी या दहशतवादाचा स्वीकार केला जातो. उदाहरणार्थ- भारतातील नक्षलवाद, श्रीलंकेतील तामिळी दहशतवाद इत्यादी. स्वतंत्र्य मिळविणे किंवा स्वतंत्र सार्वभौम राष्ट्राची निर्मिती करणे ही या दहशतवादाची उद्दिष्टये असतात.

क) **सीमापार दहशतवादः-**जेव्हा एका राष्ट्रातील दहशतवादी संघटना दुसऱ्या राष्ट्रातील सरकार किंवा जनतेच्या विरूद्ध दहशतवादी कारवाया करतात. तेव्हा त्याला 'सीमापार दहशतवाद' म्हणतात, सीमापार दहशतवादामध्ये दहाशतवादी संघटनेचा

उदय आणि त्याचे प्रशिक्षण एका राष्ट्रात होते. मात्र हयाचे कार्य दुसऱ्या राष्ट्रात चालते. उदहरणार्थ- भारतातील दहशतवादी संघटनांची मुख्य कार्यालये पाकिस्तानात आहेत तेथे त्यांना प्रशिक्षण दिले जाते.

ड) **आंतरराष्ट्रीय दहशतवादः-** या प्रकारच्या दहशतवादांमध्ये दहशतवादाचे कार्यक्षेत्र अनेक राष्ट्रांमध्ये पसरलेले असते. उदाहरणार्थ, अल् कायदा सारख्या संघटनेचे जाळे एकापेक्षा अधिक राष्ट्रांमध्ये पसरलेले आहे. आंतरराष्ट्रीय दहशतवादी संघटना आपल्या उद्दिष्टांच्या आड येणाऱ्या प्रत्येक राष्ट्राला आपले शत्रू मानतात.

इ) **राज्य पुरस्कृत दहशतवादः-** जेव्हा एखादे राष्ट्र शेजारील राष्ट्रामध्ये अस्थिरता निर्माण करते तेव्हा तो राज्यपुरस्कृत दहशतवादाचा प्रकार असतो. दहशतवादी कारवाया घडवून आणण्यात राज्याचा प्रत्यक्ष हात असतो. अनेकदा देशातील विरोधकांचा नाश करण्यासाठी शासनकर्ते दहशतवादी मार्गांचा अवलंब करतात. हा देखील राज्यपुरस्कृत दहशतवादाचा प्रकार आहे. नाझी जर्मनीतील हिटलरचा, फॅसिस्ट इटलीमध्ये मसोलिनीचा, सोव्हिएट रशियातील स्टॅलिनचा दहशतवाद हा या दहशतवादच्या प्रकारामध्ये मोडतो. भारताशी समोरासमोर युद्ध करणे पाकीस्तानच्या क्षमतेबाहेरचे असल्याने पाकिस्तान राज्यपुरस्कृत दहशतवादाच्या माध्यमातून भारताबरोबर छुपे युद्ध लढत आहे. जम्मू काश्मिरमध्ये हिंसाचाराचे थैमान घालणाऱ्या हिजबुल मुजाहिदिन, लष्कर-ए-तोएबा, जैश-ए-मुहम्मद या सारख्या दहशतवादी संघटनांना पाकिस्तानकडून आर्थिक व लष्करी मदत मिळते. या संघटनांची प्रशिक्षण केंद्रे पाकिस्तानमध्येच आहेत.

### फ) धार्मिक आणि वांशिक भावनेने प्रेरित दहशतवादः-

या प्रकारच्या दहशतवादाचे प्रमाण गेल्या काही वर्षात वाढले आहे. धार्मिक मूलत्ववादी भावनेतून हा दहशतवाद उदयाला येतो. आर्थिक अल्पसंख्याकांना वाटणारी असुरक्षितता, बहुसंख्यांकडून धार्मिक अल्पसंख्याकांवर होणारे अत्याचार, सांस्कृतिक वसाहतवादाच्या प्रक्रियेतून पश्चिम संस्कृतीचा वाढता प्रसार, जागतिकीकरण इ. चा समावेश होतो.

## ७.३.६ दहशतवादाची साधने

दहशतवादी संघटना आपल्या मागण्यांकडे जनतेचे व सरकारचे लक्ष आकर्षित करण्यासाठी तसेंच आपल्या प्रश्नांचे गांभीर्य लक्षात आणून देण्यासाठी विविध साधनांचा वापर करते, ती साधने पुढीलप्रमाणे -

- आत्मघातकी पथकांचा वापर करून सार्वजनिक ठिकाणी बॉम्बस्फोट गोळीबार घडवून आणणे.
- आर्थिक, व्यापारी व संरक्षणदृष्टया महत्वाच्या स्थळांवर, शासकीय कार्यालयांवर, धार्मिक स्थळांवर हल्ले करणे.
- अंमली पदार्थांच्या व्यापारातून सामाजिक अस्थिरता निर्माण करणे.
- राजकीय व्यक्तींची हत्या करणे.
- आंतरराष्ट्रीय संस्थांमधील महत्वाच्या व्यक्तींना अपहरण करुन ओलीस ठेवणे.
- प्रसिध्द व्यक्ती किंवा विमानाचे अपहरण करणे.

## ७.३.७ दहशतवादाचा प्रतिकार

दुसऱ्या महायुद्धानंतर दहशतवादाचे चटके आंतरराष्ट्रीय समूहाला बसायला लागते. दहशतवादी कारवायांमधून होणाऱ्या हिंसाचाराचे प्रमाण वाढले. यातच 'अण्विक दहशतवादाच्या संकटाने नवीन विश्वरचनेत नवे आव्हान अभे केले. आण्विक दहशतवादाचा प्रतिकार करण्यासाठी संयुक्त राष्ट्र संघटना व बडी राष्ट्रे पुढे सरसावली. त्यांनी दहशतवादाचा सामना करण्यासाठी केलेले प्रयत्न पुढील प्रमाणे सांगता येतील.

अ) दहशतवादाविरूद्ध सामुहिक प्रयत्नांसाठी आमसभेचा ठरावः- संयुक्त राष्ट्र संघटनेच्या आमसभेने १९ डिसेंबर १९७२ रोजी दहशतवादाविरूद्ध बहुमताने एक ठराव मंजूर केला. या ठरावान्वये निष्पाप लोकांची हत्या आणि मूलभूत मानव अधिकारांच्या उल्लंघनासाठी जबाबदार असणाऱ्या दहशतवादाचा निषेध करण्यात आला. दहशतवादाच्या निर्मूलनासाठी आंतरराष्ट्रीय पातळीवर सहकार्याचे सदस्य राष्ट्रांना आवाहन करण्यात आले.

ब) १९७३ साली दहशत वादविरोधी समितीची स्थापना आमसभेच्या अध्यक्षांकडून करण्यात आली.

क) २९ नोव्हेंबर १९७८ ला संयुक्त राष्ट्र संघटनेच्या आमसभेच्या ठरावानुसार दहशतवाद्यांकडून निष्पाप नागरिकांचे अपहरण करून त्यांना ओलिस ठेवण्याच्या पद्धतीला आंतरराष्ट्रीय गुन्हा मानण्यात आले आणि अश्या प्रकारांविरूद्ध सामुहिक कारवाईचे आवाहन सदस्य राष्ट्रांना करण्यात आले.

ड) ४ डिसेंबर १९८९ रोजी संयुक्त राष्ट्र संघटनेच्या आमसभेने दहशतवादी संघटनांचा वापर आणि त्यांना मदत व प्रशिक्षण देण्याऱ्या राष्ट्रांविरूद्ध ठराव मंजुर केला. या ठरावामध्ये दहशतवादी संघटनांना राष्ट्रांकडून मिळत असलेल्या समर्थनांचा तीव्र निषेध करण्यात आला आणि असे समर्थन थांबविण्यासाठी त्यांना आवाहन करण्यात आले.

इ) १९९० च्या दशकात दहशतवादी कारवायांमध्ये मोठया प्रमाणांवर वाढ झाली. म्हणून ९ डिसेंबर १९९४ रोजी संयुक्त राष्ट्र संघटनेच्या आमसभेने दहशतवादाच्या निर्मूलनासाठी सदस्य राष्ट्रांनी दहशतवादाचा सामना करण्यासाठी देशांतर्गत कायदयांमध्ये कडक उपायांची तरतूद करावी असे आवाहन करण्यात आले.

फ) दहशतवाद निर्मूलन ठरावातील तरतुदींचे पालन सदस्य राष्ट्रांकडून होत आहे किंवा नाही याची चौकशी करण्यासाठी एक स्वतंत्र दहशतवाद निर्मूलन विभाग स्थापन करण्यात आला. दहशतवाद निर्मूलन विभागाच्या निर्मितीमुळे आंतरराष्ट्रीय दहशतवाद विरूद्धच्या संघर्षाला संघटित रूप प्राप्त झाले.

ज) ९ डिसेंबर १९९९ ला संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या आमसभेने एक महत्वपूर्ण ठराव करून दहशतवादी संघटनांना काही राष्टांकाडून मिळणारी प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष मदत थांबविण्यासाठी आवाहन केले.

## ७.३.८ संयुक्त राष्ट्रांच्या दहशतवादविरोधी धोरणातील अडथळे.

अ) अपुरा निधीः- दहशतवादविरूद्ध आंतरराष्ट्रीय पातळीवरून कारवाई करणे ही आतिशय खर्चिक बाब आहे. दहशतवाद निर्मूलनासाठी संयुक्त राष्ट्राच्या सदस्यराष्ट्रांकडून मिळणारी मदत अपुरी आहे. त्यामुळे संयुक्त राष्ट्र संघटनेकडून सदस्य राष्ट्रांना सढळ हाताने दहशतवाद विरोधी मोहिमेसाठी अर्थसाहाय्य देण्याचे आवाहन केले जाते.

आ) दहशतवादविरोधी मोहिमेवर पश्चिमी राष्ट्रांचा अधिक प्रभाव पडलेला दिसतो. म्हणजे जी संवेदनशीलता आणि तत्परता अमेरिकेवर दहशतवादी हल्ला झाल्यानंतर संयुक्त राष्ट्र संघटनेने दाखवली ती जम्मू-काश्मिरमधील पाकिस्तान पुरस्कृत

दहशतवादाविषयी दाखवली जात नाही असा आरोप करण्यात येतो.ह्यात एक प्रकारच्या दुटप्पीपणा दिसतो.

इ) सदस्य राष्ट्रांचे असहकार्यः- संयुक्त राष्ट्र संघटनेच्या दहशतवाद विरोधी मोहिमेत सदस्य राष्ट्रांचे सक्रिय सहकार्य मिळत नसल्यामुळे ही मोहिम प्रभावहीन बनली आहे. सदस्य राष्ट्रांना आवाहन करूनही सदस्य राष्ट्रांनी आपल्या भौगोलिक क्षेत्रातील दहशतवादाची माहिती संयुक्त राष्ट्र संघटनेला सादर न केल्यामुळे दहशतवादाचा सामना करण्यासाठी धोरण निश्चिती व उपाय योजना संयुक्त राष्ट्रसंघटनेला करता येत नाही.

ई) महासत्तांचे राजकारणः- बडया राष्ट्रांचे राजकारण त्यांचे व्यक्तिगत हितसंबंध हा दहशतवादाचा बीमोड करण्याची मुख्य जबाबदारी सुरक्षा परिषदेची आहे. परंतु अनेकदा सुरक्षा परिषदेतील पाच कायम सदस्य राष्ट्रांच्या व्यक्तिगत हितसंबंधामुळे अशा स्वरूपाची कारवाई अवघड बनते. या बडया राष्ट्रांच्या मित्र राष्ट्रांविरूद्ध कारवाई करण्यास ते उदासिन असतात.

## ७.४ सारांश

अशाप्रकारे दहशतवादाचा सामना करण्यासाठी काही सामाजिक आर्थिक, राजकीय आणि सांस्कृतिक उपाय योजता येतील. देशांतर्गत दहशतवाद निर्माण होऊ नये म्हणून समाजाच्या विविध गटात ऐक्य सामंजस्य विकसित व्हायला हवे. राजकीय नेतृत्वाने पक्षपाती दृष्टिकोन सोडून व्यापक राष्ट्रीय हित जपले पाहिजे. भ्रष्टाचार, वशिलेबाजी, विरूध्द आवाज उठवून वंचित व उपेक्षितांच्या प्रगतीसाठी योजना आखून या घटकाला विकास प्रक्रियेत सामावून सामावून घेतले पाहिजे. दहशतवादाचा मुकाबला करण्यासाठी पोलीसांना व अन्य संरक्षक दलांना चांगली शस्त्रास्त्रे, बुलेटप्रुफ जाकिटे, गाडया, वायरलेस सेटस् दिले पाहिजेत. दहशतवाद दारिद्रय, बेकारीमुळे वाढीस लागतो. म्हणून शासनाने लोकांच्या प्राथमिक गरजा भागविण्यावर भर दिला पाहिजे. म्हणजे राष्ट्रातील जनता सुखी, समाधानी राहील. बेकारी निर्मूलनासाठी शासनाने आर्थिक प्रगतीवर भर दिला पाहिजे. दहशतवाद हा मानवतेला लागलेला कलंक असल्याने त्याचा प्रतिकार करण्यासाठी सर्व स्तरावरून विशेष प्रयत्न व्हायला हवेत.

## ७.५ स्वयंअध्ययनासाठी प्रश्न

१. अण्वस्त्रप्रसार बंदीवर टीपा लिहा.
२. एन्.पी.टी. व सी.टी.बी.टी. वर सही करण्यास भारताने नकार का दिला?
३. अण्वस्त्रप्रसारा पुढील आव्हाने स्पष्ट करा.
४. दहशतवादाचे प्रकार सांगा.
५. दहशतवादाचा प्रतिकार कसा केला पाहिजे याबदल तुमचे मत सोदाहरण सांगा.

## ७.६ पारिभाषिक शब्द

१. अण्वस्त्र प्रसारबंदी करार –CNPT -Nuclear Non- proliferation Treaty.
२. अण्वस्त्र क्षमता– nuclear capability.
३. आण्विक राजनय– nuclear diplomacy
४. आण्विक साम्राज्यवाद– muclear imperialism
५. प्ररोधन – Deterrence
६. क्षेपणास्त्र – missile
७. दहशतवाद – Terrorism
८. अण्वस्त्र प्रसार बंदी राजवट – Nuclear Non-proliferation Regime
९. आण्विक दहशतवाद – Nuclear Terrorism
१०. सर्वंकष अणुप्रस्तर बंदी करार – Comprehensive Test Ban Treaty (CTBT).

## ७.७ सरावासाठी स्वाध्याय

१. अण्वस्त्रप्रसारबंदी वरील योजण्यात आलेले उपाय–
२. अण्वस्त्र प्रसारापुढील आव्हाने स्पष्ट करा.
३. दहशतवादाचा अर्थ आणि स्वरुप विशद करा.
४. दहशतवादाची कारणे लिहा.
५. दहशतवादाचा प्रतिकार कसा करावा हयाबद्दल तुमचे मत सांगा.

## ७.८ क्षेत्रीय अभ्यास

‘अण्वस्त्र प्रसार बंदी राजवट’ या बाबतची माहिती मिळवा.

## ७.९ अतिरिक्त माहिती

(१) सन १९९० च्या दशकात झालेला अण्वस्त्रांचा प्रसार

| स्वबळावर अण्वस्त्रांचा विकास करणारी राष्ट्रे | परराष्ट्रांच्या मदतीने अण्वस्त्रांचा विकास करणारी राष्ट्रे | अण्वस्त्रांसाठी परराष्ट्रावर अवलंबून असणारी राष्ट्रे |
|---|---|---|
| भारत | अर्जेंटिना, ब्राझील, इजिप्त | अफगाणिस्तान |
| इस्त्रायल | इंडोनेशिया, इराण, इराक | अल्जेरिया, चिली, क्यूबा |
| उत्तर कोरिया | द.कोरिया, सर्बिया, द. अफ्रिका, तैवान | पाकिस्तान, सिरिया, येमेन |

(२)

| अण्वस्त्रधारी राष्ट्रे | अण्वस्त्रांची अंदाजे संख्या | |
|---|---|---|
| अमेरिका | १०,००० | |
| रशिया | ११,००० | |
| चीन | ४०० | |
| ब्रिटन | २०० | |
| फ्रान्स | ४०० | |
| इस्त्रायल | १००-१७५ | |
| भारत | ५०-७५ | |
| पाकिस्तान | ३०-४० | |

### (३) थोडक्यात महत्त्वाचे

जगात सध्या अंटार्टिका, आफ्रिका, लॅटिन अमेरिका, दक्षिण पूर्व आशिया आणि दक्षिण प्रशांत अशी पाच क्षेत्रे अण्वस्त्रांपासून मुक्त आहेत.

आज अण्वस्त्र युद्धाची शक्यता खूपच कमी आहे. दुसऱ्या महायुद्धानंतर अद्याप एकदाही अण्वस्त्रांचा वापर झाला नाही. अण्वस्त्रे ही प्रामुख्याने प्रतिरोधनाची साधने बनली आहेत. अण्वस्त्रांचा जाणीवपूर्वक वापर जरी राष्ट्रांकडून होण्याची शक्यता कमी असली तरी त्यांचा अपघाती वापर होण्याची शक्यता आहे. ही शक्यता दक्षिण आशियात भारत आणि पाकिस्तानच्या बाबतीत वर्तविली जाते.

अण्वस्त्र प्रसार बंदी करारावर स्वाक्षरी न करणाऱ्या अतिशय अल्पसंख्याक राष्ट्रांमध्ये भारत, पाकिस्तान, इस्त्रायल ही राष्ट्रे प्रमुख आहेत. सध्या इराक, इराण आणि उत्तर कोरिया ही तीन राष्ट्रे अण्वस्त्रांच्या बाबतीत महत्वाकांक्षी राष्ट्रे म्हणून ओळखली जातात.

आण्विक दहशतवाद म्हणजे दहशतवादी संघटनांकडून आपल्या हितसंबंधांच्या पूर्ततेसाठी अण्वस्त्रांचा होणारा वापर होय.

## ७.१० अधिक वाचनासाठी पुस्तके

१. देवळणकर शैलेंद्र, 'समकालीन जागतिक राजकारण', विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, २०१०

२. पेंडसे अरुणा, सहस्त्रबुद्धे उत्तरा 'आंतरराष्ट्रीय संबंध', ओरिएंट लाँगमन, मुंबई , २००८

३. तोडकर, बी.डी. 'भारत आणि जग,' डायमंड पब्लिकेशन्स्, पूणे , २०१०.

*****

# ८

# घटक ८ : आंतरराष्ट्रीय दृष्ट्या महत्त्वाचे तात्कालिक प्रश्न

**मानवी आयाम**

**घटक संरचनाः**

८.० उद्दिष्टे
८.१ प्रास्ताविक
८.२ विषय विवेचन
 ८.२.१ पर्यावरण
 ८.२.२ मानवी हक्क
 ८.२.३ लिंगभाव
 ८.२.४ शांततेच्या चळवळी
८.३ स्वयं अध्ययन प्रश्न
८.४ सरावासाठी स्वाध्याय

## ८.० उद्दिष्टये

आंतरराष्ट्रीय संबंधामध्ये जुन्या समस्यांचे समाधान होत असते, परंतु काही नवीन समस्या, प्रश्न निर्माण झालेले दिसतात. अशा नवीन समस्यांचा विचार प्रस्तुत घटकात आपण करणार आहोत. हया घटकाच्या अध्ययनामुळे आपणास –

- आंतरराष्ट्रीय राजकारणाची बदलती कक्षा लक्षात येते.
- नव्या जागतिक आव्हानांचे आकसब होते.

- नव्या समस्यांना जागतीक समुदाय कसा सामोरा जातो हायचे ज्ञान होईल.

## ८.१ प्रास्ताविक

आतापर्यंतच्या प्रकरणात आपण आंतरराष्ट्रीय राजकारणातील विविध संकल्पना, सिद्धान्त व महत्त्वाच्या मुद्द्यांचा अभ्यास केला आहे. गेल्या काही वर्षांमध्ये आंतरराष्ट्रीय राजकारणाला नवनवीन आव्हानांना सामोरे जावे लागत आहे. या संदर्भात मानवी पैलूना स्पर्श करणारे चार महत्त्वाच्या मुद्द्यांचा आपण अभ्यास करणार आहोत - १) पर्यावरण, २) मानवी हक्क, ३) लिंग-भाव, ४) शांततेच्या चळवळी.

## ८.२ विषय विवेचन

### ८.२.१ पर्यावरण :

वर उल्लेख केल्याप्रमाणे, काही दशकांपासून आंतरराष्ट्रीय राजकारणामध्ये 'पर्यावरण' एक महत्त्वाचा विषय म्हणून पुढे आला आहे. पर्यावरणाच्या प्रदूषणाचे परिणाम सर्वच राष्ट्रांना भेडसावत आहेत - तसेच राष्ट्रांमध्ये परस्परावलंबित्व वाढत चाललेला आहे - हवा, पाणी, समुद्र, जंगले यांना 'Global Commons' ''वैश्विक सामायिक संसाधने'' असे म्हंटले जात आहे आणि म्हणून त्यांचे संरक्षण आणि संवर्धनाची जवाबदारी सर्व राष्ट्रांची राहणार आहे.

**अर्थ :** पर्यावरण म्हणजे आपल्या भोवतीची हवा, पाणी, वनस्पती, समुद्र, जंगले इत्यादिनी बनलेला परिसर.

पर्यावरणातील हे घटक ऐकमेकावर अवलंबून आहेत. आणि विशिष्ट पद्धतीने जोडलेले आहेत. यामध्ये काही हानिकारक पदार्थ मिसळल्यामुळे हवा, पाणी, समुद्र यांच्या गुणधर्मामध्ये बदल घडते. त्यामुळे माणसाच्या आरोग्याला धोका निर्माण होतो - याला 'प्रदूषण' असे म्हणतात.

जागतिक पर्यावरणाचा ऱ्हास अनेक काळापासून होत आहे तरी आंतरराष्ट्रीय राजकारणात त्याची गंभीर दखल गेल्या काही दशकांपासूनच घेतली आहे. १९७० च्या दशकात पर्यावरणांशी संबंधित कार्यकर्त्यांनी जागतिक पृथ्वी दिन साजरा करून आंतरराष्ट्रीय राजकारणात पर्यावरण या विषयाबद्दल लक्ष वेधून घेतले. त्याचे महत्त्व स्वीकारून संयुक्त राष्ट्राने पर्यावरणाची पहिली जागतिक परिषद स्वीडन येथील स्टॉकहोम

येथे १९७२ ला घेतली. या परिषदेत काही सामान्य तत्वे मान्य करण्यात आली.

(१) कोणत्याही देशांच्या धोरणामुळे दुसऱ्या देशातील पर्यावरणाची हानी होणार नाही, याची काळजी संबंधित देशांनी घ्यावी.

(२) जागतिक पातळीवर पर्यावरणासंबंधी जागरूकता निर्माण केली जावी.

यानंतर दर दशकात, म्हणजे १९८२ मध्ये नैरोबी केनिया), १९९२ मध्ये वसुंधरा परिषद, रिओब्राझिल, २००२, मध्ये (जोहान्सबर्ग द. आफ्रिका) येथे विविध परिषदाचे आयोजन करण्यात आले. या सर्व परिषदांची मध्यवर्ती संकल्पना – 'शाश्वत विकास किंवा चिरकालीन विकास' ही होती –

## शाश्वत विकास किंवा चिरकालीन विकास (Sustainable Development)

ब्रॅडलँड आयोगाच्या मते ''भावी पिढीच्या गरजांचा विचार करून वर्तमान पिढीच्या गरजांची पूर्तता करणारा विकास म्हणजे चिरकालीन विकास होय.'' चिरकालीन विकासाची कल्पना ही नैसर्गिक साधन संपत्तीच्या विवेकबुद्धीने व दूरदृष्टिने वापर करण्यावर आधारीत आहे. त्याची आवश्यकता खालील मुद्द्यांच्या आधारे स्पष्ट करता येईल –

(अ) वाढती लोकसंख्या

(ब) औद्योगिक विकासाचे पर्यावरणावर झालेले दुष्परिणाम

(क) नैसर्गिक साधन संपत्तीचा अविवेकी वापर

## चिरकालीन विकासाचे घटक –

(अ) पर्यावरणाचा विचारपूर्वक वापर

(ब) नैसर्गिक साधन संपत्तीचा काळजीपूर्वक वापर

(इ) पर्यावरणाचा समतोल साधणे

(ई) पर्यावरणाचे प्रदूषण कमी करणे.

## पर्यावरणाचे प्रदूषण

प्रदूषणाचे अनेक प्रकार आपल्याला दिसतात. उदाहरणार्थ वायू प्रदूषण, जल प्रदूषण, भू प्रदूषण, सागरी प्रदूषण, इत्यादी. याची प्रमुख कारणे म्हणजे औद्योगिक विकासाची अनियंत्रित प्रक्रिया, रासायनिक खते – कीटकनाशकांचा अती वापर, वाढते शहरीकरण इ. आहेत.

## पर्यावरण प्रदूषणाचे परिणाम

(१) वैश्विक तापमान वाढ (**Global Warming**) – म्हणजे जागतिक तापमानात हळू हळू होत गेलेली वाढ. अठराव्या शतकात औद्योगिक क्रांतीनंतर आर्थिक आणि औद्योगिक विकासाच्या प्रक्रियेत अनेक प्रकारचे वायू (कार्बन डाय ऑक्साईड ($C_2$), मिथेन ($CH_4$), हाड्रोफ्लोरोकार्बन (HFCs), हवेत मिसळले गेले, ज्यामुळे पृथ्वीचे तापमान वाढले. पृथ्वीचे हे सरासरी तापमान सतत वाढत असून ते २०५० पर्यंत अजून दोन ते ११ अंश सेल्सियस वाढण्याची शक्यता आहे. हे पर्यावरणासं व एकूण सजीव सृष्टीस घातक आहे.

(२) ओझोन क्षय (**Ozone Depletion**) – म्हणजे वातावरणातील ओझोन थराचे विरळ होणे. मानवी जीवनासाठी ओझोन थराचे खूप महत्त्व आहे. कारण ते एक संरक्षण ढाली प्रमाणे काम करते आणि सूर्यापासून परावर्तित होणाऱ्या हानीकारक किरणांना अडविते. अलीकडील काळात वातावरणातील हा ओझोनचा थर विरळ होण्यास काही औद्योगिक वायू जवाबदार आहेत – यात विशेषत: क्लोरो फ्लुरो कार्बन्स (CFCs), हायड्रोफ्लोरोकार्बन (HFCs) यांचा समावेश होतो.

ओझोन क्षय थांबविण्यासाठी जागतिक पातळीवर 'मॉन्ट्रीयल करार' (१९८७) करण्यात आला आणि १९९९ मध्ये तो पुन्हा सुधारण्यात आला. त्यावर ८१ राष्ट्रांनी सही केली आहे आणि घातक औद्योगिक वायूंच्या उतसर्जनाचे प्रमाण कमी करण्याचे मान्य केले. तसेच एक जागतिक निधी उभी करण्याचा संकल्प केला गेला. ज्याद्वारे दक्षिणेकडच्या विकसनशील राष्ट्रांच्या पर्यावरण संवर्धनाच्या प्रयत्नांना हातभार लावला जाईल.

## जैवविविधता :

प्राणी व वनस्पती यांतील विविधतेतून ह्या पृथ्वीवरच्या परिसराची समृद्धी वाढली आहे. परंतु पर्यावरणाच्या ऱ्हासाने अनेक प्राणी व वनस्पतींच्या जाती नष्ट होत आहेत. अनिर्बंध शिकार/मासेमारी आणि सर्वात महत्त्वाचे प्राण्यांची वसतीस्थाने नष्ट

होणे इत्यादी आव्हानांना मानवाला तोंड द्यावं लागत आहे. जैवविविधतेतील असमतोल हा सर्व दृष्ट्या हानीकारक आहे, म्हणूनच संयुक्त राष्ट्राच्या माध्यमातून जैवविविधता जपण्याचे जाणीवपूर्वक प्रयत्न होत आहेत.

जंगले आणि महासागर - पृथ्वीचा ७०% भाग महासागराने बनलेला आहे आणि पृथ्वीवरची जैवविविधता आणि हवामानाचा समतोल राखण्यात महत्त्वाची भूमिका बजावतात. पण इथं सुद्धा अनिर्बंध मासेमारी, होत आहे. तसेच तेल सांडल्यामुळे आणि कचरा टाकल्यामुळे सागरी प्रदूषण वाढत आहे. संयुक्त राष्ट्राने याबाबतही पुढाकार घेऊन समुद्राच्या वापरासंदर्भात कायदे केले आहेत. जगातील सर्वात मोठी जंगल संपदा विकसनशील राष्ट्रांमध्ये आहे - ब्राझिल, इंडोनेशिया, मलेशिया, मादागास्कर इत्यादि हया देशात औद्योगिकरण आणि विकासाच्या नावाखाली मोठ्या प्रमाणावर जंगल-तोड झाली. परंतु गेल्या काही वर्षांपासून या जंगलांचे महत्त्व फक्त त्या त्या राष्ट्रापुरते नसून जगासाठी आहे, हे लक्षात आल्यावर जंगलांच्या संरक्षणाबाबतची जागरूकता वाढली आहे.

**सारांश** - वरील विवेचनाद्वारे आपल्या लक्षात येईल की -

* आंतरराष्ट्रीय राजकारणात अलीकडच्या काळात पर्यावरण या घटकाचा उदय प्रकर्षाने झालेला दिसतो.

* पर्यावरणाचा प्रश्न आता केवळ एका राष्ट्रापुरता मर्यादित न राहता तो सर्व मानवजातीचा व सर्व राष्ट्रांचा प्रश्न बनला आहे.

* हवा, पाणी, जमीन, वन्यजीवन, जंगले या सर्वांना 'वैश्विक सामायिक संसाधने' असे संबोधले आहे म्हणून त्यांचे संरक्षण व संवर्धन सामूहिक जवाबदारी आहे.

* पर्यावरणाचे संरक्षण व संवर्धन हयाबाबत सर्वच जागतिक संस्थानी पुढाकार घेतला आहे.

## ८.२.२ मानव अधिकार/मानवी हक्क :

गेल्या काही दशकापासून आंतरराष्ट्रीय राजकारणामध्ये 'मानव अधिकार' ही संकल्पना रुढ होऊ लागली आहे. त्यामुळे या संकल्पनेचा अर्थ, स्वरूप समजून घेणे समजून घेणे आणि जागतिक पातळीवर मानव अधिकाराच्या संरक्षणासाठी होत असलेल्या प्रयत्नांचा आढावा घेणे आपणास आवश्यक आहे.

मानव अधिकार म्हणजे माणसाला माणूस या नात्यानेच जन्मत: काही मूलभूत अधिकार प्राप्त झाले आहेत. हे अधिकार निसर्गत: त्याला मिळालेले असून ते हिरावून घेण्याचा अधिकार कोणत्याही शासन, समाज किंवा अन्य व्यक्तीला नाही.

हे अधिकार व्यक्ती जगण्यासाठी, त्याच्या व्यक्तिमत्व विकासासाठी आवश्यक आहेत. मानवाधिकारांचे अगदी प्राथमिक रुप म्हणून नैसर्गिक अधिकारांच्या संकल्पनेकडे पाहिले जाते. नैसर्गिक अधिकाराची संकल्पना सतराव्या शतकात प्रसिद्ध पाश्चात्य विचारवंत जॉन लॉक व रूसो यांनी मांडली.

इंग्लंडमध्ये अनियंत्रिक राजेशाहीवर निर्बंध लादण्यासाठी मानव अधिकाराची संकल्पना मांडली गेली. यातूनच १२१५ मध्ये मॅग्नाकार्टा करार, सन १६२८ सालचा पिटीशन ऑफ राईटस, सन १६८९ सालचा बिल ऑफ राईटस इत्यादी अधिकारांच्या मान्य करण्यात आल्या.

१७७६ मध्ये झालेले अमेरिकन स्वातंत्र्य युद्ध आणि १७८९ च्या फ्रेंच राज्य क्रांती मधली मुख्य प्रेरणा माणसाच्या मूलभूत हक्कांची होती. दोन्ही घटनांनंतर तयार करण्यात आलेल्या जाहीरनाम्यात मूलभूत मानवी हक्कांना मध्यवर्ती मानले गेले.

नाझीवाद आणि दूसऱ्या महायुद्धाच्या भीषण मानवी हानी नंतर १९४५ मध्ये संयुक्त राष्ट्र संघटनेची स्थापना झाली. संघटनेच्या स्थापना पत्रामध्येच मानवी अधिकारांना महत्त्वाचे स्थान दिले गेले. संयुक्त राष्ट्र संघटनेने १० डिसेंबर १९४८ रोजी ''मानवी अधिकारांचा जाहीरनामा'' घोषित केला. त्यात ''सर्व माणसं जन्मत: स्वतंत्र आणि समान आहेत.'' अशी अतिशय क्रांतिकारक घोषणा केली!

या जाहीरनाम्यामुळे मानव अधिकाराच्या संकल्पनेला वैश्विक रूप प्राप्त झाले. मानवी हक्काचा विचार केवळ एखाद्या राष्ट्राचा अंतर्गत प्रश्न राहिला नाही. कुठल्याही देशात मानव अधिकाराचे उल्लंघन होत असेल, तर आंतरराष्ट्रीय पातळीवर त्याची दखल घेऊन त्याचा निषेध केला जातो.

**मानव अधिकारांची वैशिष्ट्ये :**

(अ) वैश्विकता

(आ) व्यक्तिनिष्ठ

(इ) कायदेशीर

(ई) मानवी मूल्यांवर आधारलेले

**मानव अधिकारांचे उगम स्थान :**

(अ) प्राचीन आणि आधुनिक राजकीय तत्वज्ञान

(ब) मानव अधिकारांचा जाहीरनामा

(क) आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक अधिकाराविषयीची आंतरराष्ट्रीय प्रसंविदा (International covenant on Economic, Social and Cultural Rights)

ही प्रसंविदा ३ जानेवारी १९७६ ला करण्यात आली. यात मानव अधिकारांची कक्षा वाढवून काही महत्त्वाच्या आर्थिक, सामाजिक आणि सांस्कृतिक हक्कांचा समावेश करण्यात आला.

(ड) नागरी व राजकीय अधिकार विषयीची आंतरराष्ट्रीय प्रसंविदा (International covenant on Civil and Political Rights)

ही प्रसंविदा २३ मार्च १९७६ रोजी करण्यात आली. यात भाषण स्वातंत्र्य, विचार स्वातंत्र्य, धार्मिक स्वातंत्र्य इ. मूलभूत अधिकारांचा समावेश करण्यात आला.

(५) महिलांच्या राजकीय अधिकारांविषयीची आंतरराष्ट्रीय प्रसंविदा (International covenant on Political Rights of Women)

(६) वर्णभेद नष्ट करण्याविषयीचा आंतरराष्ट्रीय करार : संयुक्त राष्ट्र संघटनेतर्फे वर्णभेद नष्ट करण्याविषयीचा करार सन १९६६ मध्ये झाला. वर्णभेद (Racism Apartheid) हा माणसा-माणसामधील कृत्रिम भेदभाव करणारा काहींना उच्च/श्रेष्ठ, इतरांना कनिष्ठ मानणारा आणि सर्वांना समान लेखण्याच्या प्रयत्नामधील मोठा अडथळा आहे. या कराराच्या उद्देश माणसातील रंग, वंश इ. वर आधारीत कृत्रीम भेद नष्ट करणे हा आहे.

(ग) मानव अधिकारांच्या रक्षणासाठी संयुक्त राष्ट्र संघटनेकडून मानवतावादी हस्तक्षेप (Humanitarian Intervention) :-

जागतिक पातळीवर सर्व राष्ट्रे सार्वभौम आहेत म्हणून मानव अधिकारांच्या रक्षणासाठी एखाद्या राष्ट्राच्या अंतर्गत कारभारामध्ये हस्तक्षेप करण्याची स्पष्ट तरतूद संयुक्त राष्ट्र संघटनेत नाही. तरी पण संयुक्त राष्ट्राच्या सचिवांना गुप्त (राजनयाचा) वापर करून मानवी हक्क उल्लंघनाच्या संदर्भांत सदस्य राष्ट्रांशी चर्चा करता येते.

संयुक्त राष्ट्र संघटनेच्या शांती सेनेकडून मानव अधिकाराच्या संरक्षणाचे कारण पुढे करून काही राष्ट्रांच्या अंतर्गत कारभारात हस्तक्षेप झाला आहे. उदा. रवांडा, सोमालिया, पूर्व तिमोर इ.

मानवतावादी हस्तक्षेपाची दूसरी बाजू पण मांडली जाते. मानवी हक्क संरक्षणाच्या नावाखाली पक्षपाती आणि राजकीय हेतूना प्रोत्साहन दिले जाते. यामुळे राष्ट्राच्या सार्वभौमत्वाला आव्हान दिले जाते आणि मोठी राष्ट्रे छोट्या राष्ट्रांवर आपली इच्छा लादतात.

## भारत आणि मानव अधिकार :

भारताच्या राज्यघटनेमध्ये मानवी अधिकारांना मध्यवर्ती मानले गेले आहे. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या मानव अधिकारांच्या जाहीरनाम्यातील बहुतांश तत्वांचा समावेश भारतीय राज्य घटनेमध्ये आहे.

(१) घटनेचा सरनामा (Preamble) – भारतीय राज्यघटनेच्या अगदी सुरवातीलाच दिलेल्या सरनाम्यात भारतीय राज्यव्यवस्थेची व्यापक उद्दिष्टये दिली आहेत. ती साध्य करणे हे शासनाचे व प्रत्येक नागरीकाचे कर्तव्य आहे. हा सरनामा भारतीय संविधानाचे मूलभूत तत्वज्ञान आहे व त्याचा आदर सर्वांनी करावयाचा आहे.

(२) मूलभूत अधिकार (Fundamental Rights) – राज्य घटनेच्या तिसऱ्या प्रकरणात कलम १४ ते ३२ यांमध्ये मूलभूत अधिकारांचा समावेश करण्यात आला आहे. यात समानता प्रस्थापित करणारे अधिकार (कलम १४–१८), स्वातंत्र्याविषयीचे अधिकार (कलम १९–२२), शोषणाला प्रतिबंध करणारे अधिकार (कलम २३–२४), धर्मस्वातंत्र्याचा अधिकार (कलम २५–२८), सांस्कृतिक आणि शिक्षण विषयक अधिकार (कलम २९–३०), घटनात्मक उपाय करण्याचा अधिकार (कलम ३२). हयांचे उल्लंघन झाल्यास न्यायालयाकडे दाद मागता येते.

(३) राज्याची मार्गदर्शक तत्वे (Directive Principles of State Policy) – भारतीय

राज्यघटनेच्या कलम ३६ ते ५१ मध्ये हया मार्ग दर्शक तत्वांचा समावेश आहे. हया तत्वांचे स्वरुप शासनाला निर्देश देण्यासारखे आहे. राज्यकारभार चालवताना, कायदे करताना हया तत्वांचे भान ठेवले पाहिजे.य मूलभूत अधिकारां प्रमाणे हयाला न्यायातकिचे संरक्षण नसले तरी शासनकर्त्यांवर हया मार्गदर्शक तत्वांचा एक नैतिक दबाव असतो. राज्यघटनेचा सरनामा, मूलभूत अधिकार व मार्गदर्शन तत्वे हे एकमेकांना पूरक आहेत.

## मानव अधिकार आयोग :

१९९३ च्या मानव अधिकार संरक्षण कायद्या अंतर्गत (Protection of Human Rights Act १९९३) राष्ट्रीय आणि राज्यांच्या पातळीवर मानव अधिकार आयोगांची स्थापना करण्यात आली आहे.

भारतातील प्रत्येक व्यक्तीला मानव अधिकार उपभोगता यावेत या विषयीची दक्षता मानव अधिकार आयोगाकडून घेतली जाते. भारताच्या सर्वोच्च न्यायालयाचे निवृत्त सरन्यायाधीश राष्ट्रीय मानव अधिकार आयोगाचे अध्यक्षपद भूषवितात. आयोगामध्ये इतर चार सदस्य असतात. त्यापैकी दोन सर्वोच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती आणि उर्वरित दोन मानव अधिकारांच्या क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केलेले असतात. या सदस्यांची नेमणूक पाच वर्षांसाठी राष्ट्रपती करतात.

## राष्ट्रीय मानव अधिकार आयोगाची कार्ये :

(१) मानव अधिकार उल्लंघनाच्या तक्रारींची चौकशी करणे.

(२) तुरुंग, बालसुधारगृहांना भेटी देऊन त्यांच्यात सुधारणा करण्याविषयी शासनाला सूचना देणे.

(३) मानव अधिकार कायद्यांचा अभ्यास करून त्यात सुधारणा सुचविणे.

(४) मानव अधिकारांविषयी जन सामान्यांमध्ये जागरूकता निर्माण करणे.

**सारांश :**

* मानव अधिकारांची कल्पना राजकीय तत्वज्ञान, आधुनिक राजकीय मूल्यांचा उदय आणि अमेरिकन स्वातंत्र्य युद्ध, फ्रेंच राज्यक्रांतीतून पुढे आली.
* १९४५ पासून संयुक्त राष्ट्र संघटनेने मानव अधिकाराबाबत जागरूकता आणि संवेदनशीलता जागतिक पातळीवर निर्माण केली.
* मानव अधिकार म्हणजे व्यक्तीला सन्मानाने जगण्यासाठी आणि व्यक्तिमत्व विकासासाठी अतिशय महत्वाचे असलेले अधिकार.

* १० डिसेंबर १९४८ रोजी संयुक्त राष्ट्राने मानव अधिकारांचा जाहीरनामा घोषित केला. यात तीस कलमे आहेत.
* मानव अधिकाराच्या संरक्षणामध्ये संयुक्त राष्ट्र संघटनेचे महत्वपूर्ण योगदान आहे.

* भारताने मानव अधिकारांच्या संदर्भात आपली संवेदनशीलता दाखविली आहे – राज्य घटनेतील सरनामा, मूलभूत अधिकार आणि मार्गदर्शक तत्वामधून हे जाणवते.
* भारतात मानव अधिकारांच्या संरक्षणासाठी मानव अधिकार आयोग आणि न्यायालेख हे व्यासपीठ उपलब्ध करून दिले आहेत.

## ८.२.३ लिंगभाव

आंतरराष्ट्रीय संबंधाच्या विद्या शाखेत स्त्रीवादी परिप्रेक्ष्याची सुरुवात साधारणत: १९८० च्या शेवटी झाली. साधारणत: याच सुमारास शीतयुद्धाची अखेरही होत होती. हा अर्थातच केवळ एक योगायोग नव्हता. त्यापूर्वीच्या चाळीस वर्षाच्या कालखंडात आंतरराष्ट्रीय राजकारणाच्या अजेंड्यावर/कार्यक्रम पत्रिकेवर अमेरिका आणि रशिया यांच्यातील संघर्षाचा प्रभाव होता. शीतयुद्ध समाप्तीनंतरचे दशक हे साधारणत: दोन महासत्तांमधील शांततेचे दशक होते. आंतरराष्ट्रीय संबंधाच्या अभ्यासात यासुमारास अनेक प्रश्न व समस्या दृष्टीपथात येऊ लागल्या. आर्थिक घटकांना प्राधान्य येऊ लागले. पश्चिमेवर केंद्रित झालेले लक्ष पूर्वेकडे वळले. चीन, भारत या सारखे देश महत्त्वाच्या सत्ता म्हणून उदयास येऊ लागल्या आणि आंतरराष्ट्रीय राजकाराच्या अभ्यासकांचे लक्ष त्यांनी वेधले. 'सुरक्षितते'च्या कल्पनेचा विस्तार होत त्यात 'मानवी सुरक्षितते'चा प्राधान्याने विचार होऊ लागला. आंतरराष्ट्रीय राजकारणातील राज्येतर घटकांना महत्व येऊ लागले. यासर्व बदलांमुळे आंतरराष्ट्रीय राजकारणात स्त्रीयांच्या समस्येचा विचार करणारी चौकट निर्माण झाली. आंतरराष्ट्रीय संबंधातील निर्णय प्रक्रियेच्या सर्वोच्च पातळीवर स्त्रियांच्या मतांची क्वचितच दखल घेतली जाते.

लिंगभाव – दैनंदिन वापरात लिंगभाव म्हणजे साधारणत: व्यक्तींची स्त्री आणि पुरुष अशी जीवशास्त्रीय ओळख. परंतु स्त्रीवादी विचारसरणी याकडे लिंगभाव या दृष्टीने पाहतात. सामाजिक आणि सांस्कृतिक दृष्ट्या निश्चित वैशिष्ट्यांशी हा लिंगभाव जोडलेला असतो. काळानुसार आणि परिस्थितीनुसार त्यात बदल होत असतो.

लिंगभाव म्हटले की अनेकवेळा तो स्त्रीया, त्यांचे प्रश्न यांना समानार्थी मानला जातो. परंतु स्त्रीवादी अभ्यासक मात्र लिंगभाव केवळ स्त्रीयांपुरताच मर्यादित न ठेवता त्या

पुरुष, पुरुषसत्ता, पुरुषी वर्चस्व यांचाही समावेश करतात. म्हणूनच सर्वोच्च पातळीवर, आंतरराष्ट्रीय राजकारण हे पुरुषी सत्तेचे जग आहे, असे मानले जाते. सत्ता, स्वायत्तता, विवेकशीलता यासारखी वैशिष्ट्ये परराष्ट्रधोरण आणि लष्करी धोरणाचे आधार कसे होतात हे समजावून घेणे महत्त्वाचे आहे.

## लिंगभाव आणि सुरक्षितता :

आंतरराष्ट्रीय राजकारणात असे म्हटले गेले आहे की, स्त्रीया आणि मुलांच्या रक्षणासाठी पुरुष युद्ध लढतात. परंतु नागरी जीवनातील दुर्घटना आणि हिंसा पाहता, सध्याच्या युद्धामधून कांही तरी वेगळेच सूचित होत आहे असे म्हणता येईल. हिंसा, दुर्घटना यांच्यातील सर्वात मोठे प्रमाण महिला आणि मुलांचे आहे. तसेच जगातल्या एकूण निर्वासितांच्या लोकसंख्येपैकी निम्मी लोकसंख्या बालक व महिलांची आहे. युद्धकाळात स्त्रीयांवरील अत्याचाराचे प्रमाण वाढते. त्यांच्यावर बलात्कार आणि शरीरविक्रयासाठी सक्ती केली जाते.

संघर्षात्मक परिस्थितीतील हे वास्तव, संरक्षणासाठी युद्ध म्हणून युद्धाला अधिमान्यता याला गंभीर आव्हान देणारे आहे.

युद्धाचे लिंगभावीकरण – असा एक युक्तीवाद केला जातो की युद्ध आणि पुरुषी वर्चस्व यांच्यात घनिष्ठ संबंध असतो. लष्करी प्रशिक्षणात पुरुषाला पुरुषी वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठीचे प्रशिक्षण दिले आहे. 'स्त्रीयांसारख्या अभिवृत्ती मुळीच नकोत' असे पुरुषांवर बिंबवले जाते. सैनिकाच्या प्रतिमा 'संरक्षण मिथका'शी जोडली जाते. महिला, बालके आणि अन्य दुर्बल घटकांचे रक्षण करणारा योद्धा अशी प्रतिमा तयार केली जाते. याच मिथकाचा लष्करातील भरतीसाठी प्रेरणा देणारे कांहीतरी म्हणून प्रभावी वापर केला जातो. त्यामुळे युद्धाला मिळणारा पाठिंबा अव्याहतपणे चालू राहतो.

## युद्ध, प्रसारमाध्यमे, पुरुषीवर्चस्व :

अमेरिकेतील ९/११ (११ सप्टेंबर २००१) च्या घटनेनंतर पुरुषी वर्चस्वाद्वारे लष्करी करण्याची प्रक्रिया अधिक दृश्यमान झाली. टी.व्ही. वरील बातम्यांच्या प्रसारणात महिलांना बाजूला करून पुरुष तज्ज्ञमंडळी 'दहशतवादा विरुद्ध युद्ध' या विषयावर बोलत होती. युद्धकाळात अमेरिकन मतदारांनी अशा नेत्यांना अधिक पाठिंबा दिल्याचे दिसते, ज्यांनी पुरुषी वर्चस्वाच्या कल्पनेतून लष्करीकरण करण्याचा प्रयत्न केला.

## सुरक्षेविषयीची स्त्रीवादी व्याख्या :

स्त्रीवादी परिप्रेक्ष्यातून सुरक्षेची अधिक व्यापक व्याख्या करण्यात आली आहे. सुरक्षा म्हणजे सर्व प्रकारच्या हिंसेचे – शारिरिक, आर्थिक, पर्यावरणीय उच्चाटन या स्त्रीवादी परिप्रेक्ष्याने असे सूचित केले आहे की, सुरक्षेचा विचार 'खालून वर' उर्ध्वगामी दिशेने व्हावा, वरून खाली, अधोगामी दिशेने होऊ नये. म्हणजेच सुरक्षेचा विचार करताना प्रथम व्यक्तीच्या सुरक्षेचा विचार करावा त्यानंतर राज्य किंवा आंतरराष्ट्रीय सुरक्षेचा विचार करावा.

आंतरराष्ट्रीय संबंधाच्या कार्यक्रम पत्रिकेवर/विषय पत्रिकेवर लिंगभावांची समस्या ज्या महत्वाच्या घडमोडींमुळे आली त्याविषयी थोडेसे –

१९७५ – पहिली महिला जागतिक परिषद, मेक्सिको.

१९७६–१९८५ – 'महिलेचे दशक' आंतरराष्ट्रीय पातळीवर

१९७९ – संयुक्त राष्ट्रांच्या महासभेने स्वीकारलेली सनद – महिलांच्या संदर्भातील सर्व प्रकारच्या भेदभावांचे निर्मूलन.

१९८० – महिलांविषयीची दुसरी जागतिक परिषद, कोपेनहेगेन (डेन्मार्क).

१९८५ – संयुक्त राष्ट्रांची तिसरी परिषद.

१९९५ – चौथी जागतिक महिला परिषद , बीजिंग, (चीन)

१९९६ – संयुक्त राष्ट्रांच्या महासभेने लिंगभावाच्या प्रश्नाचे मुख्य प्रवाहात सामीलिकरण करण्याच्या संदर्भात स्वीकारलेले अधिकृत धोरण.

२००० – महिला २००० : लिंगभाव, समता, विकास आणि शांतता, न्यूयॉर्क (अमेरिका).

२००५ – महिलांवरील जागतिक परिषदांचा आढावा – संयुक्त राष्ट्र, न्यूयॉर्क (यूएसए).

२०१० – महिलांवरील दर्जा यावरील आयोग – संयुक्त राष्ट्र, न्यूयॉर्क (यूएसए).

**कळीचे मुद्दे -**

* आंतरराष्ट्रीय संबंधात स्त्रीवादी परिप्रेक्ष्य लींगभावाच्या बाबत संवेदनशील भूमिका घेऊन त्याआधारे जागतिक राजकारणात महिलांच्या वाट्याला दुय्यम भूमिका का येते याचे उत्तर शोधण्याचा प्रयत्न करतो.
* जागतिक सुरक्षा आणि युद्धातील पुरुषी वर्चस्व यांचे परीक्षण स्त्रीवादी परिप्रेक्ष्य करतो. या आधारे आंतरराष्ट्रीय पातळीवरील धोरण निर्मिती प्रक्रियेत महिलांचे इतके अल्प प्रतिनिधित्व कां याचा शोध घेतला जातो.
* महिला, महिला संघटना, बिगर शासकीय संघटना इत्यादींनी स्त्री-पुरुष समानता निर्माण करण्यासाठी जागतिक रणनीती म्हणून लिंगभाव मुख्य प्रवाहात आणण्यासाठी संयुक्त राष्ट्रांवर दबाव आणण्यात मदत केली आहे.

## ८.२.४ शांतता चळवळी :

२० व्या शतकातील दोन महायुद्धांनी मानव जातीचे अतोनात नुकसान केले आणि जगात शांतता असण्याची गरज अधोरेखित केली. आजच्या राष्ट्र, राज्यांपुढील सर्वात महत्वाचे आव्हान म्हणजे एक खरीखुरी आणि टिकाऊ शांतता निर्माण करणे. या पार्श्वभूमीवर शांतता चळवळी महत्त्वाच्या ठरतात. राष्ट्रा-राष्ट्रांमधील संघर्ष मिटवून शांतता प्रस्थापित करण्याचा संयुक्त राष्ट्रांनी आजवर खूप प्रयत्न केला असला तरी आजही अनेक आंतर-राष्ट्रीय संघर्ष जग अनुभवत आहे. म्हणूनच आजच्या परिस्थितीत शांतता चळवळीचे महत्व विशेष आहे?

### शांतता चळवळ म्हणजे काय?

शांतता चळवळ ही एक सामाजिक चळवळ असून तिचा हेतू, एखादे युद्ध किंवा संघर्ष मिटवणे, एखाद्या ठिकाणी होणारी हिंसा थांबवून जागतिक शांततेचे उद्दिष्ट साध्य करणे असा आहे.

ही उद्दिष्टे गाठण्यासाठी शांतता चळवळ ज्या साधनांचा किंवा मार्गांचा अवलंब करते त्यात पुढील बाबींचा समावेश होतो - शांतता प्रस्थापनेचा आग्रह धरणे, अहिंसक मार्गाने प्रतिरोध करणे, राजनय, चर्चा व वाटाघाटी, नैतिक मूल्यांच्या अधारे मतपरिवर्तन करणे, राजकीय दबाबगट निर्माण करून अनुकूल वातावरण निर्मिती करणे.

शांततेच्या संकल्पनेत दोन बाजूंचा अंतर्भाव होतो. (१) नकारात्मक शांतता, (२) विधायक शांतता.

नकारात्मक शांतता म्हणजे मोठ्या मानवी गटांमध्ये संघटित हिंसेचा अभाव असणे. विधायक शांतता म्हणजे मोठ्या मानवी गटांमध्ये अधिक सहकार्य आणि एकात्मीकरण असणे.

## शांतता चळवळींचा इतिहास (प्रादेशिक)

(१) जर्मनी – २० व्या शतकाच्या अखेरीस अनेक लोकशाही देशांमध्ये हरित पक्ष आणि त्यासारख्या अनेक राजकीय संघटना निर्माण करण्यात आल्या. यापैकी काही संघटनांनी शासन संख्यांवर त्यांच्या 'दहशतवादीविरुद्ध युद्ध' मोहिमेवर मर्यादा आणण्यासाठी निर्णायक प्रभाव टाकल्याचे दिसून येते.

(२) इस्त्रायल – इस्त्रायल–पॅलेस्टीयन आणि अरब–इस्त्रायल संघर्ष १९ व्या शतकाच्या मध्यापासून अस्तित्वात आहेत. त्यामुळे हा संपूर्ण भूप्रदेश आंतरराष्ट्रीय राजकारणातील 'फ्लॅश पॉईट' लक्षवेधी प्रश्न बनला आहे.

इस्त्राएलमध्ये शांतता व्हावी म्हणून तिथे अनेक शांतता चळवळी आजही सक्रीय आहेत. उदाहरणार्थ –

पीस नाऊ (Peace Now) ही इस्त्रायलमधील एक प्रमुख शांतता चळवळ असून वाटाघाटीतून शंतता निर्माण करण्यावर या चळवळीचा भर आहे.

गुश झालोम (GUSH SHALOM) ही आणखी एक शांतता चळवळ असून ती डाव्या विचार सरणीकडे झुकलेली आहे. इस्त्रायल आणि पॅलेस्टिनी मुक्ती संघटना यांच्यात संवाद घडवून आणण्याचे श्रेय या संघटनेला दिले जाते.

कॅनडा – कॅनेडियन पीस अलायन्स (Canadian Peace Alliance) ही एक कॅनडातील शांतता चळवळ असून तिचे १४० सदस्य गट, शहरी, निमशहरी आणि स्थानिक पातळीवर सक्रीय आहेत यात विद्यार्थी व पर्यावरणवादी संघटनांचाही समावेश आहे. सुमारे ४ लाख कॅनेडीयन नागरिक याचे सभासद आहेत. अमेरिकेच्या 'दहशतवादाविरुद्ध युद्ध' या परराष्ट्रीय धोरणाला विरोध करणारी ही एक प्रमुख शांतता चळवळ आहे.

इंग्लंड – येथील राष्ट्रीय शांतता परिषद ही (National Peace Council) संस्था १९०८ मध्ये स्थापन करण्यात आली. शांतता आणि नि:शस्त्रीकरण यात सामाईक रस असणाऱ्या राष्ट्रीय पातळीवरील संघटनेच्या प्रतिनिधींनी निर्माण केलेली ही संघटना आहे. २००१ मध्ये तिचे नेटवर्क फॉर पीस यात रुपांतर झाले आहे.

अमेरिका – अमेरिकेतील एक महत्त्वाची शांतता चळवळ म्हणजे व्हिएटनाम युद्धाच्या विरोधात निर्माण झालेली संघटना होय. या संघटनेने भिन्न गटांना एकत्रित आणून

रस्त्यावरील निषेध मोर्चाकडे वळवले. नागरी हक्क चळवळ, प्रसार माध्यमे आणि तरुण वर्गाने या मोहिमेला पाठिंबा दिल्याने चळवळ प्रबळ बनली. पॅरिस शांतता तहावर स्वाक्षरी झाल्यानंतर व्हिएटनाममधून लष्कर मागे घेतल्यानंतर ही मोहिम १९७३ मध्ये थांबवण्यात आली.

१९८० च्या दशकात अमेरिकेतील शांतता चळवळीतील कार्यकर्त्यांनी महासत्तांमधील शस्त्रस्पर्धा कमी करण्यावर अधिक लक्ष केंद्रीत केले.

मार्च २००३ मध्ये, अमेरिका आणि ब्रिटनच्या फौजांनी इराकवर हल्ला करण्यापूर्वी सुमारे ५,००,००० लोकांनी या बाबीचा निषेध करण्यासाठी एकत्र जमले. निषेधासाठी त्यांनी आंदोलने, मोर्चे याबरोबरच चित्रपट, नाटक, पत्रलिखाण, ब्लॉग लिहीणे इत्यादी मार्गांचाही अवलंब केला.

भारत – जगातील सर्वात मोठी शांतता चळवळ महात्मा गांधींनी सुरू केली. सुरुवातीस ती ब्रिटीशांच्या वासाहतिक राजवटीविरुद्ध होती. भारताला प्रामुख्याने अहिंसक व शांततेच्या मार्गाने स्वातंत्र्य मिळाले आहे. महात्मा गांधींच्या अहिंसा व सत्याग्रहाच्या मार्गांनी जगाला चकित केले. आज जगभरच्या अनेक प्रतिरोध चळवळींमध्ये या मार्गांचा आदर्श मार्ग म्हणून अवलंब केला जातो.

राष्ट्रीय पातळीवर पाहता काश्मीर आणि ईशान्येकडील राज्ये इथे गेली अनेक दशके हिंसा चालू आहे. सर्व प्रकारच्या समस्यांना शांततेच्या मार्गांनी उत्तर शोधण्याचा प्रयत्न अनेक नागरी संघटना करीत आहेत. मणिपूर येथील इरोम शर्मिला २००१ पासून शांततेच्या मार्गाने लढा देत आहेत. भारतातील शांतता चळवळीचे ती एक केंद्रस्थान/ मध्यबिंदू आहे.

## ८.४ सारांश

* शांतता चळवळींना युद्ध थांबवण्यात यश आले नसेल. परंतु त्यांनी खालील बाबतीत महत्वाची भूमिका बजावली आहे.

(१) युद्धखोर राष्ट्रांवर मर्यादा आणण्याचे काम त्यांनी केले आहे. आण्विक नि:शस्त्रीकरणासाठीच्या मोहिमेमुळे हिरोशिमा, नागासाकी पुन्हा होणार नाही, असा विश्वास त्यांनी निर्माण केला.

(२) न्याय्य शांततेसाठी मागण्या पुढे करण्यात त्यांची महत्वाची भूमिका आहे.

(३) सामाजिक न्यायाच्या बाजूचे पारडे जड करण्यात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

## ८.३ स्वयं अध्ययनासाठी प्रश्न

(१) राजनय म्हणजे काय ? राजनयाचे जागतिक राजकारणातील भुमिका स्पष्ट करा.

(२) राजनयाच्या बदलत्या स्वरुपाबद्दल चर्चा करा.

(३) आंतरराष्ट्रीय कायदा म्हणजे काय सांगून त्याचे महत्व विशद करा.

(४) संयूक्त राष्ट्रसंघाची जागतिक शांतता प्रस्थापित करण्यासाठीच्या प्रयत्नांची चर्चा करा.

(५) टिपा लिहा.

(अ) निशस्त्रीकरण

(ब) शस्त्रनियंत्रण

## ८.४ सरावासाठी स्वाध्याय

(१) राजनयाच्या विविध प्रकारांची चर्चा करा.

(२) राजनयाची 'सत्ता आणि संघर्षाच्या ' संदर्भातील भूमिका स्पष्ट करा.

(३) ''राजनय हे युद्ध टाळण्यासाठी आवश्यक असे साधन आहे'' चर्चा करा.

(४) आंतरराष्ट्रीय कायद्याचे बहूध्रुविय सत्ताकारणातील महत्व विशद करा.

*****